Maharashtra Institute of Educational Planning and Administration (MIEPA), Aurangabad



School Leadership Development Program

SLDP Case Studies

Inspiration

Hon. Vandana Krishna

Additional Chief Secretary,

School Education and Sport Department,

Govt. of Maharashtra

Hon. Dr. Ashwini Joshi

State Project Director,M.P.S.P., Mumbai

Hon. Vishal Solanki

Commissioner (Education)
Maharashtra State, Pune

Hon. Dinkar Patil

Director, State Council of Educational

Research and Training, Maharashtra, Pune

Guidance

Dr. Neha Belsare

Director, Maharashtra Institute of Educational Planning and Administration (MIEPA), Aurangabad

Vaishali Kamble

Deputy Director, Maharashtra Institute of Educational Planning and Administration (MIEPA), Aurangabad

Coordination

Dr. Jyoti Kulkarni

MIEPA, Aurangabad

Consolidation

Dr. Kiran Dhande

Senior Lecturer

DIET,Gondia

Cooperation

Jitendra Kathole

Subject Expert

DIET,Akola

संपादकीय

मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास हा त्याच्या शिक्षणावर अवलंबून असतो. शिक्षणाची दिशा त्याच्या संपूर्ण विकासासाठी व मुलभूत अधिकारासाठी महत्वाची असते. माणूस घडविणे हे शिक्षणाचे मुख्य कार्य आहे. आजचा बालक हा उद्याचा भावी नागरिक आहे. भावी नागरिकाचा सर्वांगीण विकास परिपूर्ण झाला तरच राष्ट्राचे भवितव्य उज्वल ठरू शकेल. जागतिक आव्हानांना तोंड देणारा सक्षम विद्यार्थी शिक्षणप्रक्रियेतून घडवायचा आहे. अभ्यासक्रम पाठ्यपुस्तके कितीही उद्दीष्टानुवर्ती असली तरी प्रत्यक्षात शिक्षणप्रक्रियेत शाळेची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते. या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी महाराष्ट्रातील अनेक शाळा सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत.

या शाळांच्या गुणवत्तेच्या प्रवासात महत्वाचा घटक म्हणजे या शाळांमधील सक्षम नेतृत्व. या नेतृत्वाच्या मार्गदर्शनात काही शाळांनी अथक परिश्रम घेतले आहेत काही शाळा यात यशस्वी झाल्या व गुणवत्तेच्या शिखरावर विराजमान झाल्या तर काही शाळा अजूनही प्रयत्नरत आहेत. या दोन्ही प्रकारच्या शाळांचा, विद्यार्थ्यांच्या गुणवतेव्या दृष्टीने सुरु असलेला हा प्रवास निश्चितच इतरांना प्रेरणादायी ठरणारा आहे. महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद मार्फत या दृष्टीने विशेष पुढाकार घेत मुख्याध्यापकांचा शालेय गुणवत्तेचा प्रवास महाराष्ट्रातील सर्व शिक्षण यंत्रणेतील घटकांना अनुभवता यावा यासाठी या फ्लिप बुकच्या माध्यमातून संग्रहित केला.

या संग्रहामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील यशस्वी नेतृत्व आपल्या समोर येणार आहे. यासाठी राज्यातून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळा, अनुदानित शाळा, शासकीय आश्रमशाळा, विद्यानिकेतन या सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमाच्या शाळांकडून case studies मागविण्यात आल्या होत्या. या २०५ प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक प्राप्त शाळांच्या case studies मधून निवड समितीने निर्धारित निकषानुसार ५८ case studies ची निवड करून त्यांचा समावेश या फ्लीप बुक मध्ये करण्यात आला आहे. या फ्लीप बुक मध्ये मराठी हिंदी व इंग्रजी अश्या तिन्ही भाषेतील case studies आपल्याला वाचावयास मिळतील.

ह्या case studies वाचताना आपल्याला दिसून येईल की, नाविन्याची कास स्वीकारणाऱ्या या शाळांच्या मुख्याध्यापकांनी शालेय प्रशासन, स्वयं विकास, अध्ययन-अध्यापन सुधारणा, संघबाधणी, नवोपक्रम, भागीदारी, शालेय व्यवस्थापन या नेतृत्वाच्या सप्तसूत्रीतुन या शाळांचे वेगळेपण, स्वतःची एक नवीन ओळख त्यांनी तयार केली आहे. हे कार्य करीत असताना अनेक मुख्याध्यापकांना यश मिळाले तर काही मुख्याध्यापक तितकेसे यश प्राप्त करू शकले नाही पण तरीही सामान्यातून वैशिष्ट्यपूर्ण शाळेकडे जाण्याचा त्यांचा हा प्रवास अत्यंत खडतर पण इतरांना प्रेरणा देणारा आहे. ज्या परिस्थितीत काही मुख्याध्यापक हताश होऊ शकतात अशा समस्याग्रस्त परिस्थितीत या मुख्याध्यापकांनी फिनिक्स पक्षासारखी भरारी घेऊन यश संपादन केले आहे. त्यांचा हा प्रवास तुमच्या समोर ठेवण्याचे कारण या प्रवासात सहप्रवासी होवून आपण समजून घेऊ शकतो की आपल्याच सारखी परिस्थिती, समस्या भौतिक सुविधा, समाज, विद्यार्थी असूनही आपल्या नेतृत्व कौशल्याचा उपयोग करीत हे मुख्याध्यापक अपेक्षित यश प्राप्त करू शकतात आणि शाळा यशोशिखरावर नेतात. तर आपणही नक्कीच मुलांच्या गुणवत्तेसाठी निश्चितपणे प्रयत्न करू शकतो. या मुख्याध्यापकांचे प्रयोग वाचताना तुमच्या कार्याला दिशा मिळेत, तुमच्या समस्यांवर उपाय मिळू शकतील आणि तुम्ही या दीपस्तंभाच्या प्रकाशात निश्चित ध्येयाकडे यशस्वी मार्गक्रमण करू शकाल असा मला विश्वास आहे.

या प्रेरणादायी प्रवासासाठी खूप खूप शुभेच्छा ||

डॉ नेहा बेलसरे
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व
प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद

अनुक्रमणिका

समाविष्ट शाळा यादी - मराठी

अ.क्र	शाळेचे नाव	मुख्याध्यापकाचे नाव	पृष्ठ क्रमांक
१	जिल्हा परिषद आंतरराष्ट्रीय शाळा वाबळेवाडी, तालुका.शिरूर,जिल्हा.पुणे	दत्तात्रय वारे	1-7
२	कराड नगरपरिषद शाळा क्र. 3,जिल्हा.सातारा.	अर्जुन हरिभाऊ कोळी	8-19
३	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, श्रीराम तांडा तालुका.मंठा,जिल्हा.जालना	जगदीश कुडे	20-28
४	जिल्हा परिषद सेमिइंग्रजी प्राथमिक शाळा खराशी, तालुका.लाखनी, जिल्हा भंडारा	मुबारक उमरअली सैय्यद	29-38
५	जिल्हा परिषद शाळा,कोळपांढरी, तालुका.शहादा,जिल्हा.नंदुरबार	अभिमन नामदेव कोळी	39-47
६	विद्या मंदिर रामकृष्णनगर करनूर तालुका.कागल, जिल्हा.कोल्हापूर	सुनंदा अन्नासो कोरवी	48-56
७	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काल्लेखेतपाडा (उमराणी बु.),तालुका.धडगाव,जिल्हा.नंदुरबार	रुपेशकुमार दिगंबर नागलगावे	57-62
८	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देव्हारी कैंद्र-सावळदबारा तालुका-सोयगाव जि-औरंगाबाद	मदन मारोती गायकवाड	63-81
९	जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, किन्होळा,मु.किन्होळा, पो. पान्हेरा खेडी, ता. मोताळा, जि. बुलडाणा	राजेंद्र पाटील	82-91
१०	रायगड जिल्हा परिषद शाळा,हनुमानपाडा,पोस्ट.जोहे,तालुका.पेण,जिल्हा.रत्नागिरी	यशवंती शामकांत घरत	92-110
११	शाळा विद्या मंदिर पोहाळे,बोरगांव,तालुका.पन्हाळा,जिल्हा.कोल्हापूर	प्रभाकर हरी पाटील	111-116
१२	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,आजमपूर, कैंद्र.गल्ले बोरगाव, तालुका.खुलताबाद जि. औरंगाबाद	संभाजी भाईदास पाटील	117-128
१३	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा झिंगानूर,पंचायत समिती. सिरोंचा, जिल्हा गडचिरोली	खुर्शीद कुतुबुद्दीन शेख	129-134
१४	श्री. राजाभाऊ बोन्द्रे नगर परिषद माध्यमिक विद्यालय चिखली,जिल्हा बुलडाणा	फिरोज खान मुसा खान	135-140
१५	जिल्हा परिषद आदर्श शाळा कोळकेवाडी,बोलाडवाडी, मु.पो.कोळकेवाडी,तालुका.चिपळूण जिल्हा .रत्नागिरी	सुनिता गोविंद राणे	141-146
१६	मनपा कैंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, हर्सुलगांव, मनपा औरंगाबाद	संगिता ताजवे	147-154
१७	जिल्हा परिषद उर्दू हायस्कूल रायपुर शाळेचा पूर्ण पत्ता,मु.पो.रायपुर तालुका जिल्हा बुलडाणा	शेख गुलाम नबी शेख हबीब	155-162
१८	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिवारे,माणगाव,तालूका.शाहूवाडी,जिल्हा.कोल्हापूर	चंद्रकांत पांडूरंग गुरव	163-165
१९	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोयनागुडा,तालुका भामरागड,जिल्हा गडचिरोली	विनीत बंडू पद्मवार	166-173
२०	जिल्हा परिषद कैंद्रशाळा पाचल नं.1 पाचल (नारकरवाडी) तालुका.राजापूर, जिल्हा. रत्नागिरी	रमेश काशिराम जाधव	174-186
२१	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तारू पिंपळवाडी, तालुका.पैठण जिल्हा औरंगाबाद	सतीश सावंत	187-196
२२	रायगड जिल्हा परिषद शाळा कांबे कैंद्र. मोहोपाडा, तालुका.खालापुर जिल्हा.रायगड	महैंद्र नारायण नाईक	197-213
२३	अनुसूचीत जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा दिवे, तालुका.पुरंदर,जिल्हा.पुणे	डावखर प्रमिला कोंडीभाऊ	214-222
२४	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुसेरी नं. 2 तालुक. खेड,जिल्हा. रत्नागिरी	करजवकर प्रांजली अनंत	223-228
२५	जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय, तालुका.चिखली,जिल्हा.बुलडाणा.	दिलीप भाऊराव जेऊघाले	229-239
२६	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तांबेवाडी.कैंद्र.वडोदबाजार,तालुका.फुलंब्री, जिल्हा.औरंगाबाद	योगेश मनोहरराव बन्सोड	240-252
२७	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,हटझर, कैंद्र.दुर्गापूर, पंचायत समिती.धानोरा,जिल्हा.गडचिरोली.	नीलिमा योगाजी आखाडे	253-256
२८	जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा, पावस क्रमांक.1 ता.जि.रत्नागिरी	कविता दिलीप मयेकर	257-268
२९	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भोगलवाडी नं.2,तालुका.जिल्हा.औरंगाबाद	अमोल प्रदीप बेळगे	269-279
३०	जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय, सावरगाव डुकरे, तालुका.चिखली,जिल्हा बुलडाणा	संजय गुलाबराव पाटील	280-287
३१	जिल्हा परिषद आदर्श शाळा,कळवंडे,माडवाडी,तालुका.चिपळूण,जिल्हा.रत्नागिरी	चेतना संतोष होमकर	288-301
३२	नगर परिषद माध्यमिक विद्यालय शाळा क्र.६ तळेगाव दाभाडे, चाकण रोड, तालुका.मावळ, जिल्हा.पुणे	अमोल पांडुरंग पाटील	302-308
३३	मनपा कैंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, इंदिरा नगर, बायजीपुरा,मनपा, औरंगाबाद.	मंगला एलकटवाड	309-316
३४	जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,बोराखेडी,तालुका.मोताळा,जिल्हा.बुलडाणा	अनिल कनीराम चव्हाण	317-325
३५	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुसुंबा, भिलाटी, तालुका,जिल्हा.धुळे.	जगदिश निंबा बडगुजर	326-335
३६	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,जैतापूर,कैंद्र-हतनूर तालुका- कन्नड जि-औरंगाबाद	भागीनाथ यादवराव सरोवर	336-355
३७	मनपा प्राथमिक शाळा,ओंकारनगर शिवनगर, सावेडी, जिल्हा.अहमदनगर.	शंकर भाऊसाहेब कबाडी	356-360
३८	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आबलोली नं. २, पागडेवाडी, तालुका.गुहागर जिल्हा.रत्नागिरी	नंदा नारायण बाईत	361-363
३९	कैंद्रीय प्राथमिक शाळा निल्लोड कैंद्र निल्लोड तालुका.सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद	सोनवणे डी.एन.	364-374
४०	रायगड जिल्हा परिषद शाळा, कानपोली,मु.कानपोली, पोस्ट.पडघे कैंद्र.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड	दयानंद सिताराम मोकल	375-393
४१	जिल्हा परिषद माध्य. व उच्च माध्य.विद्यालय, मंगरुळ नवघरे,तालुका.चिखली,जिल्हा.बुलडाणा.	अनिल सखाराम कड	394-406
४२	भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जि.प.शाळा साखरा पो.कळंबा महाली ता.जि.वाशिम	भाऊराव नामदेव भालेराव	407-412

अनुक्रमणिका

समाविष्ट शाळा यादी - हिंदी

अ.क्र	शाळेचे नाव	मुख्याध्यापकाचे नाव	पृष्ठ क्रमांक
१	जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,जगदंबानगर,कडदोरा,ता.उमरगा,जि.उस्मानाबाद	उमेश रघुनाथ खोसे	413-419
२	पोयसर म. न. पा. उ. प्रा. हिंदी शाला क्रमांक – १,पोयसर, कांदीवली (पू.), मुंबई.	गीता बजरंग कणवजे	420-432
३	जि. प. पूर्ण प्राथमिक मराठी शाळा, बोरावली, पो. चिखलगाव, ता. दापोली, जि. रत्नागिरी	भूपेंद्र गजानन तलाठी	433-440
४	चारकोप से.01 म.न.पा. हिंदी शाळा संकूल, कांदिवली (प.),मुंबई	स्विटी रोहित पाटील	441-454
५	जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा देवसू, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग	मनोहर वसंत परब	455-460
६	जिल्हा परिषद शाळा,जावली,एकीव,सातारा	प्रकाश विठ्ठल धनावडे	461-470

समाविष्ट शाळा यादी - ENGLISH

अ.क्र	शाळेचे नाव	मुख्याध्यापकाचे नाव	पृष्ठ क्रमांक
1	D. S. School, Sion West Mumbai 22.	Ankush Mahadev Mahadik	471-480
2	ZillaParishad Primary School, Mandaki Khurd At.Post Mandaki Khurd Taluka, Chiplun District, Ratnagiri	Chandrakant Pandurang Ukarde	481-492
3	Bunts Sangha's S M Shetty High School & Junior College Powai, Mumbai	Seema Sabhlok	493-503
4	Zilla Parishad Adarsh Kendriya School Kherdi No.1 Tal.Chiplun,Dist- Ratnagiri	Dipak Sitaram Yadav	504-509
5	Zilla Parishad High School Asgaon, Tq. Pauni, Dist. Bhandara	Bhaskar Govindrao Waghmare	510-517
6	Shree Samartha secondary and higher secondary,school,Amravati	Madhavi Deepak Mangrulkar	518-529
7	Government Vidyaniketan Nagpuri Gate,Walgaon road,Amravati	Prashant Prabhakarrao Daware	530-540
8	Z.P.Cluster Marathi Upper Primary School,Hiwarkhed,Block Khamgaon,Dist.Buldhana	Ramdas Namdeo Mirge	541-552
9	Zilla Parishad Aadarsh School,Niwali Chiplun,Ratnagiri	Ragini Ramchandra Surve	553-563
10	Zilla Parishad Primary School,Changdevnagar,Ahmednagar	Santosh T Bodkhe	564-570

दत्तात्रय वारे
जिल्हा परिषद आंतरराष्ट्रीय शाळा वाबळेवाडी, तालुका शिरूर, जि.पुणे
ईमेल आयडी - wablewadischool@gmail.com



भारतातील पहिली "झिरो एनर्जी स्कूल म्हणून वाबळेवाडीच्या शाळेचा उल्लेख केला जातो. सध्या शाळेत सहाशे विद्यार्थी आहेत. कधीकाळी दोन पडक्या खोल्यामध्ये भरवण्यात येणारी ही शाळा आज जिल्हा परिषद शाळांसाठी सर्वात मोठी रोल मॉडेल ठरली आहे.

वाबळेवाडी हे गाव शिरूर तालुक्यातील शिक्रापूर पासून अडीच किलोमीटरवरचं गाव. वाबळेवाडी हे पन्नास ते साठ घरांचे छोटसं गाव. गावाची लोकसंख्या साडेतीनशे. सहा वर्षांपूर्वी गावची जिल्हा परिषदेची शाळा म्हणजे फक्त दोन गळक्या खोल्या. पडक्या भिंती. याच खोल्यामध्ये मुलं शिकायची. साल होतं जुलै २०१२. या वर्षी जातेगाव येथून बदली होऊन मी आलो. दोन छोट्या खोल्या. त्यामध्ये दोन शिक्षक आणि सर्व इयत्तेची मुलं एकत्र असं एकंदरीत चित्र. हे चित्र बदलण्यासाठी १५ ऑगस्ट २०१२ मध्ये वाबळेवाडीच्या ग्रामसभेत एक आराखडा मांडला. शाळा जागतिक पातळीवर घेऊन जाण्यासाठी काय करता येईल हे सांगणारा तो आराखडा.

आमच्या दृष्टीनं पाहिलं तर ही गोष्ट खूप क्रांतिकारी होती. महिला बचत गटांसोबत गावातले तरुण धावून आले. नवरात्र आणि गणेशोत्सवांसारख्या सणांचा खर्च कमी करून तो पैसा शाळेसाठी उभा करायचं, असं ठरवण्यात आलं. गाव आणि शाळा एकत्र आली. शाळेतील शिक्षकांवर गावानं विश्वास दाखवला आणि शिक्षकांनी देखील तो सार्थ

करून दाखवला. यात्रा कमिटीनं तत्काळ एक लाख वीस हजार रुपयांची रक्कम देण्याचं मान्य केलं. त्या रकमेतून आम्ही विद्यार्थींना टॅब घेतले.महाराष्ट्रातील पहिली टॅब स्कूल म्हणून या शाळेचा गौरव करण्यात आला.



आजची शाळेची इमारत आहे गावकऱ्यांनी दिलेल्या जागेवर आहे. नवीन खोल्या बांधाव्यात म्हणून आम्ही गावकऱ्यापुढे आपलं म्हणणं मांडलं. गावकऱ्यांनीदेखील सुमारे दीड एकर शेती बक्षीसपत्र करून शाळेच्या नावावर केली. सर्व इयत्तेच्या विद्यार्थींना शिकवण्यासाठी विषयमित्र योजना, एकात्मिक अभ्यासक्रम, आविष्कार प्रयोगशाळा, रोबोटिक्स, टिंकरिंग लॅब, संगीत स्टुडिओ, कोडींग, प्रोग्रामिंग असे अनेक छोटे-मोठे प्रयोग करून मूलभूत संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.



शाळेची कीर्ती सर्वदूर पोचू लागल्यानंतर "बँक ऑफ न्यूयार्क" च्या सहकार्याने शाळेला देणगी मिळाली आणि नव्यानं शाळेची रचना करण्यात आली. आंतरराष्ट्रीय दर्जाशी मिळतीजुळती अशा "झिरो एनर्जी स्कुल" ची निर्मिती करण्यात आली. जपान आणि आयर्लंड यांचा अपवाद वगळता जगातली ही तिसरी शाळा ठरली.

अनुभवातून शिक्षण देण्याचं सूत्र शाळेने स्वीकारले . दिवाळीच्या सुट्टीत मुलांना पोहायला शिकवण्याची जबाबदारी देखील शाळेनं घेतली. संगीत, नाटक अशा प्रत्येक गोष्टीत विद्यार्थांची रुची वाढवण्यात आली.
साहित्य क्षेत्रात देखील शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्तम वाटचाल करत चारशे स्वनिर्मित कविता तयार करत त्यांतील शंभर निवडक कवितांचा "परिसस्पर्श" नावाचा काव्यसंग्रह प्रकाशित केला आहे. इतकंच नाही तर नाट्यछटा, ब्राम्ही लिपी यांसारखे नाविन्यपूर्ण शैक्षणिक प्रयोग शाळेत यशस्वीरीत्या आयोजित होत आहेत.

या वर्षी पूर्वमाध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षांत दणदणीत निकाल देऊन पुणे जिल्ह्यात सर्वाधिक पात्र विद्यार्थी संख्येचा शाळेने इतिहास रचला. शाळेतील एकुण ४७ विद्यार्थी मेरिट लिस्टमध्ये आणि ५ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीमध्ये झळकले.इयत्ता पाचवीमधील ५० पैकी ५० विद्यार्थी पात्र असून १०० टक्के निकाल लावून तब्बल ३४ विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये पात्र झाले आहे . अशाच प्रकारे इयत्ता आठवी मधील २७ पैकी १३ विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये पात्र असून शिक्षकांनी यशस्वी घोडदौड सुरू करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



शाळेची यशस्वी घौडदौड पाहून राज्य सरकारकडून दहा शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली. आज शाळेत एकूण बारा शिक्षक कार्यरत असून शरिफा तांबोळी, एकनाथ खैरे, सुनील पलांडे, जयश्री पलांडे, संदीप गिते, सचिन बेंडभर, पोपट दरंदले, दिपक खैरे, गोरख काळे, तुषार सिनलकर, प्रतिभा काळे हे सर्व शिक्षक एकदिलाने काम करत आहेत.ओजस च्या उपक्रमातून शाळेत आठवीपर्यंतचे वर्ग निर्माण करण्यात आले. आज शाळेत नववी पर्यंतचे

वर्ग आहेत, तर भविष्यात बारावी पर्यंतचे शिक्षण देण्यात येणार आहे. बारावीपर्यंतचे शिक्षण देणारी राज्यातील पहिली जिल्हा परिषदेची शाळा असण्याचा सन्मान वाबळेवाडीच्या शाळेला मिळणार आहे. आज शाळेची विद्यार्थीसंख्या सुमारे सहाशे असून चार हजार विद्यार्थी वेटिंग लिस्टमध्ये आहेत. विशेष म्हणजे ही शाळा आजही मराठी माध्यमाची शाळा आहे.



वाबळेवाडी (ता. शिरूर) : जिल्हा परिषद शाळेची झिरो इनर्जी इमारत.

झेडपीची शाळा बारावीपर्यंत

वाबळेवाडीत यंदापासून टप्प्याटप्प्याने पुढील वर्ग

भरत पचंगे : सकाळ वृत्तसेवा

शिक्रापूर, ता. ९ : राज्य सरकारच्या 'ओजस शाळा' उपक्रमात वाबळेवाडी (ता. शिरूर) जिल्हा परिषद शाळेची निवड झाली आहे. यामुळे या शाळेत इयत्ता आठवीचा वर्ग या वर्षी सुरू होणार असून, टप्प्याटप्प्याने बारावीपर्यंतचे वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. याशिवाय या शाळेतील शिक्षकांची पुढील पाच वर्षे बदली न करण्याचा निर्णय यात आहे. इयत्ता बारावीपर्यंत वर्ग असणारी वाबळेवाडी राज्यातील पहिली जिल्हा परिषद शाळा ठरणार आहे.

ग्रामस्थांच्या पाठबळामुळे काय होऊ शकते, हे वाबळेवाडीची टकलेट शाळा पाहून दिसते. शाळेसाठी कोटपयची रुपये किमतीची जागा देण्यापासून यात्रा रद्द करून लोकवर्गणी शाळेसाठी वापरण्याचा निर्णय जेमतेम ६५ उंबऱ्याच्या या वाडीने घेतलेला आहे. ग्रामस्थांच्या या दातृत्वाला आर्ट ऑफ लिविंग संस्थेनेही दोड कोटी रुपयांची मदत करून प्रोत्साहन दिले आहे.

दरम्यान, राज्य सरकारने गेल्या वर्षी इंटरनॅशनल स्कूलसाठी मंजूर केलेल्या राज्यातील ३१३ शाळांमधील १३ शाळा ओजस शाळा म्हणून मंजूर केल्या आहेत. स्थानिकांच्या पाठबळासह नावीन्यपूर्ण शिक्षणपद्धती, लोकवर्गणीतून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या

> चारस्तरीय गुणांकनामधून ओजस उपक्रमासाठी शाळा निवडल्या आहेत. यात वाबळेवाडी शाळेने राज्यात पहिल्या क्रमांकाचे गुण मिळविले आहेत.
> -दत्तात्रेय वारे, मुख्याध्यापक, वाबळेवाडी शाळा

भौतिक सुविधा व विद्यार्थ्यांचा चतुरस्र (क्रीडा, कला, साहित्य आणि जागतिक दर्जाचे माहिती तंत्रज्ञान) विकास अशा स्वरूपाची शिक्षणपद्धती ओजस या उपक्रमात सरकारला अपेक्षित आहे. राज्याचे शिक्षण सचिव नंदकुमार यांच्या कल्पनेतून विकसित झालेली ओजस शाळा इतर गळ शाळांना विकसित पान २ वर »

अशी झाली निवड

- मुख्याध्यापकांची मुलाखत
- पिसा (प्रोग्राम फॉर इंटरनॅशनल स्टुडंट्स असेसमेंट) परीक्षा,
- प्रकल्प सादरीकरण
- उदिष्टावरील प्रकल्प अहवाल

पुढील प्रक्रिया

- ओजस, तेजससाठीचा अभ्यासक्रम महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ तयार करणार
- पिसाअंतर्गत लेखी-तोंडी परीक्षेद्वारे शिक्षकांची नेमणूक
- नेमणूक पाच वर्षांसाठी
- नियुक्त शिक्षकाचे प्रतिवर्षी मूल्यांकन

व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा
www.esakal.com

वाबळेवाडीच्या लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा असून जवळच्या एमआयडीसीमध्ये अकुशल कामगार म्हणून काम करत असलेले लोकही सध्या या परिसरात राहायला आले आहेत . व्यवसायाने शेतकरी किंवा कामगार असलेले हे ग्रामस्थ शाळेच्या पाठीमागे खंबीरपणे उभे असतात . सन २०१२ पासून शाळा विकास हे केवळ वाडीतले एक काम न राहता प्रत्येकाच्या कुटुंबातील एक चळवळ झाली होती . प्रत्येकाने आपापल्या कुवतीनुसार या चळवळीमध्ये सहभाग घेतला होता. आर्थिक रूपानं, श्रमदानाच्या रूपानं, आपापलं योगदान प्रत्येकाने शाळेसाठी दिलेलं आहे.

२०१२ च्या ऑगस्टमध्ये प्रत्यक्ष कामाला सुरवात झाली. तेव्हाच्या झालेल्या ग्रामसभेत ग्रामस्थांपुढे दोन अटी ठेवण्यात आलेल्या होत्या; तुमची शाळा विकासासाठी बाहेरून कुणाकडून काही मदत स्वीकारणार नाही आणि ज्यांची मुलं शिकणार आहेत त्यांनी आणि ग्रामस्थांनीच सगळा खर्च करायचा आणि लेबरसाठी पैसा खर्च न करता प्रत्येकाने जमेल तसे आपापल्या कौशल्या प्रमाणे श्रमदान करून ही शाळा उभी करायची. आजपर्यंत शाळेची झालेली प्रगती आणि केलेला विकास या सगळ्यामागे ग्रामस्थांचं प्रत्यक्ष योगदान आहे .

वाबळेवाडीच्या शाळा विकासामागे ग्रामस्थांची असणारी भूमिका आणि त्या मागील कारणमीमांसा हे या ठिकाणी थोडक्यात मुद्दय़ांच्या स्वरूपात देत आहे .

शाळेतलं प्रत्येक काम हे ग्रामस्थांच्या सहकार्यानंच केलं जाते, त्यामुळे शाळेबद्दल जिव्हाळा आणि मालकीची भावना त्यांच्या मनामध्ये नियमित जागी राहते.



शाळेच्या बांधकामापासून भौतिक सुविधांच्या उपलब्धतेपासून ते प्रत्यक्ष अध्ययन अध्यापनातील प्रयोगांपर्यंत सगळ्या गोष्टी ग्रामस्थांना व्यवस्थित समजावून सांगितल्या जातात. यामागची भूमिका अशी की शिक्षकांच्या बदल्यांमुळे सुद्धा शाळेवर कुठलाही विपरीत परिणाम होऊ नये. गणपती उत्सव, नवरात्रोत्सव यासारखे उत्सव साधेपणाने साजरे करून त्यातून उरलेला पैसा शाळेचा विकास कामामध्ये वापरला जातो .

शाळेच्या बांधकामासाठी वाबळेवाडीनं गेली तीन वर्षं यात्रा, उत्सव बंद ठेवलेले आहेत. तो सर्व पैसा शाळेच्या विकासासाठी उपयोगात आणला जातो. महाराष्ट्रातील पहिली टॅबलेट शाळा व आय एस ओ शाळा बहुमान मिळवताना त्या गोष्टी गावात यात्रा बंद ठेवून जमा केलेल्या पैशातूनच उभ्या केले होत्या .

सध्या शाळेत अनेक शिक्षणप्रेमी शाळा पाहण्यासाठी भेट देत असतात. त्यांना शाळा दाखवण्याचं काम ग्रामस्थच करतात. यामुळे ग्रामस्थांना शाळेबद्दल अभिमान वाटतो आणि आलेल्या पाहुण्यांना ग्रामस्थांचा शाळेमध्ये इतका सहजसंचार, त्यांचा शाळा विकासाला असलेला पाठिंबा लक्षात घेऊन आपल्या शाळेमध्येही असं होऊ शकतं, हा आत्मविश्वास जागा होतो .

शाळेत प्रवेशासाठी चार हजारांची वेटिंग लिस्ट आहे प्रवेशासंदर्भात वादविवाद होऊ नयेत म्हणून नाव नोंदणी आणि प्रवेश प्रक्रिया हे काम ग्रामस्थांच्या ताब्यात दिलं आहे. शाळेला देणगी म्हणून मिळालेला पैसा गावातील तीन युवकांच्या नावावर बँकेत जॉइंट अकाउंटवर ठेवला जातो . ज्यांच्या नावावर पैसे असतात त्यांनी कुठलीही खरेदी करायची नसते. आवश्यक वस्तू शाळेतून सांगितली जाते. ती स्वस्त आणि चांगली कुठून मिळेल हे पाहण्यासाठी या तिघांव्यतिरिक्त वेगळ्या लोकांची कमिटी आहे . त्यांच्याकडून या संदर्भात चौकशी केली जाते आणि योग्य ठिकाणी चेक देण्यासंदर्भात या तिघांना सांगितले जाते . अशा रीतीनं वस्तू शाळेत पोहोचल्यानंतर त्या वस्तूंची पोहोच बँक अकाऊंटधारकांना दिली जाते आणि व्यवहार पूर्ण होतो. हा व्यवहार होत असतानाच त्यात असणाऱ्या पारदर्शकतेमुळे त्याचे सोशल ऑडिट पूर्ण होते. कोणत्याही स्वरूपातील पैसा शाळेच्या खात्यावर किंवा शिक्षकांच्या जवळ घेतला जात नाही. त्यामुळे सार्वजनिक काम करण्यास अडसर ठरणारी कुठलीही गोष्ट कधीच घडत नाही. शिक्षकांवरचा विश्वास वाढतो, आदरही वाढतो आणि शिक्षकांची त्यागाची भूमिका लोकांसमोर येते व काम करणं अधिक सोपं होतं.

शाळेतल्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्या भरणं, झाडांना पाणी घालणं, गेटवर मुलांकडे लक्ष देणं, बागेतलं गवत काढणं, भिंती आणि काचा यांची स्वच्छता करणं, शाळेमध्ये स्वच्छता ठेवण्यात मदत करणं, या सर्व बाबींमध्ये ग्रामस्थ सहकार्य करतात. या सर्व कामांमध्ये ग्रामस्थ प्रत्यक्ष सहभागी असल्यामुळे त्यांचं शाळेबद्दलचं नातं अधिकच दृढ होत जातं .

शाळेला अनेक पुरस्कार मिळालेले आहेत आणि मिळत असतात. हे पुरस्कार स्वीकारण्यासाठी ज्यांनी शाळेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिलं आहे अशा ग्रामस्थांना व्यासपीठावर पाठवलं जातं. अनेक शाळा व संस्थांकडून मार्गदर्शन करण्यासंदर्भात विनंती केली जाते. अशा वेळी शिक्षकांना न पाठवता शाळा व्यवस्थापन समिती वा ग्रामस्थांमधील चांगल्या पद्धतीनं बोलू शकणाऱ्या व्यक्तींना त्या ठिकाणी मार्गदर्शक म्हणून पाठवलं जातं. अशा वेळी प्रत्यक्ष ग्रामस्थांकडून अनुभव कथन ऐकणं हा अतिशय वेगळा आणि आत्मविश्वास देणारा अनुभव असल्याचं अनेक जण सांगतात. शाळा व्यवस्थापन समित्यांना मार्गदर्शक म्हणून वाडीतील दोन ग्रामस्थ मागणीनुसार मार्गदर्शन करायला जात असतात. विविध शाळा व्यवस्थापन समित्यांना प्रत्यक्ष समितीच्या सदस्यांकडून मार्गदर्शन मिळणं ही फार महत्त्वाची बाब ठरते. त्याचा खूपच चांगला परिणाम झालेला दिसून येतो.

शिक्षणाची वारी या प्रकल्पामध्ये आतापर्यंत शाळेला दोन वेळा सहभागी व्हावे लागले. त्यामध्येही आमचे ग्रामस्थच सर्वांना संबोधित करण्यासाठी जात असतात. शाळेमध्ये कुठलाही कार्यक्रम आयोजित करत असताना त्याचे आयोजक म्हणून पालकांनाच ड्रायव्हर सीटवर ठेवून नियोजन केले जाते. त्यामुळे अनावश्यक वाद व प्रोटोकॉल संदर्भात वाद उभे राहात नाहीत.

शाळेच्या नियोजनासंदर्भात घेतलेल्या शिक्षकांच्या मीटिंगमध्ये व्यवस्थापन समितीचे प्रतिनिधी उपस्थित असतात. त्यामुळे ग्रामस्थांनाही नियोजनाची माहिती होते आणि शिक्षकांकडूनही जबाबदारीने कामं पार पाडली जातात. उच्चशिक्षित पालक आणि कॉलेजमध्ये शिकणारे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी हे सर्वजण प्रत्यक्ष अध्यापनाच्या कामातही मदत करतात.

एखाद्या कार्यक्रमांमध्ये भोजन देण्याची आवश्यकता असेल तर ते शाळेमध्ये न बनवता प्रत्येक घरी थोडे थोडे नियोजन देऊन मग ते जेवण जमा केलं जातं . या उपक्रमातून खूप चांगलं वातावरण तयार होतं.

शाळा बांधकामाच्या विस्तारासाठी जमीन उपलब्ध नव्हती. वाबळेवाडीच्या ग्रामस्थांनी आजपर्यंत तीन एकर जमीन शाळेला बक्षीसपत्र म्हणून करून दिली आहे . ज्या जमिनीची मार्केट व्हॅल्यू आज नऊ ते दहा कोटींच्या घरात आहे.

वाडीतील प्रत्येक घटकाच्या वैयक्तिक जीवनामध्ये शाळा हा अविभाज्य घटक झालेला आहे त्यातून शाळेबद्दल असणारी समर्पणाची भावना आणि उभी राहिलेली वाबळेवाडीची शाळा या गोष्टी आमच्या ग्रामस्थांसाठी अभिमानास्पद आहेत.



धन्यवाद

अर्जुन हरिभाऊ कोळी
कराड नगरपरिषद शाळा क्र. 3,जिल्हा.सातारा.
ई मेल – arjunkoli.sir77@gmail.com / npschoolno.3karad@gmail.com



शाळेचे मुख्य प्रवेशद्वार व शालेय परिसर

कराड नगरपरिषद शाळा क्र. 3 ही शाळा महाराष्ट्रातील नगरपरिषदेची पहिली आय. एस. ओ. मानांकन प्राप्त शाळा आहे. शाळेला पूर्व प्राथमिक विभाग असून बालवाडी ते सातवी पर्यंत शाळेची पटसंख्या 2389 इतकी आहे. 52 स्कूल बस हे या शाळेचे वैशिष्ट्य असून सुमारे 30 किलोमीटर परिसरातून विद्यार्थी शाळेमध्ये येतात. शाळेमध्ये प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र शिक्षकांची नेमणूक केली आहे. उदा. संगणक विभाग, संगीत विभाग, क्रीडा विभाग इत्यादी. शाळा आपल्या दारी या उपक्रमांतर्गत (बूट कॅम्पेन) मध्यवर्ती गावामध्ये विभागवार पालक सभांचे आयोजन केले जाते. यामध्ये पालक व विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

ही शाळा कराड शहरात मध्यवर्ती ठिकाणी असून शाळेच्या दक्षिण व पूर्व बाजूस झोपडपट्टी आहे. तसेच ही शाळा कोयना नदीच्या काठावर वसलेली आहे. शाळेच्या भोवती बाजारपेठ असून शाळेच्या शेजारी रयत शिक्षण संस्थेचे यशवंत हायस्कूल आहे.

शाळा परिसरामध्ये बाजारपेठ असून विविध व्यवसाय करणारी दुकाने आहेत. तसेच शाळा नदीकाठी असल्याने मासेमारी करणारे लोकही या ठिकाणी वास्तव्य करतात. वीट निर्मितीचा व्यवसायही मोठ्या प्रमाणावर चालतो. शाळेच्या परिसरामध्ये पोस्ट ऑफिस व मुख्य न्यायालय आहे.

कराड हे शहर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांची कर्मभूमी असून चव्हाण साहेबांचे समाधीस्थळ शाळेपासून नजीकच्या अंतरावर आहे. या शहराला मोठा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय वारसा लाभलेला आहे. सलग 42 वर्ष नगराध्यक्ष राहण्याचा बहुमान स्व. पी.डी.पाटील साहेब यांना लाभला आहे. भव्य शिवाजी स्टेडीयम, उंच मनोरे, प्रितीसंगम बाग, भूयारी गटारे ही या शहराची वैशिष्ट्ये असून स्वच्छ सर्वेक्षण 2020 अंतर्गत देशामध्ये कराड शहराचा प्रथम क्रमांक आला आहे.



मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते आय.एस.ओ. प्रमाणपत्र वितरण



52 स्कूल बस.



स्व. यशवंतराव चव्हाण समाधीस्थळ.



शालेय विद्यार्थी (2389)

सन 2011 मध्ये कराड नगरपरिषद शाळा क्र. 3 चा मुख्याध्यापकाचा मी पदभार स्विकारला. यावेळी शाळेची पटसंख्या 267 होती. शाळेमध्ये कोणत्याही भौतिक सुविधा नव्हत्या. शाळेला संरक्षक भिंत व गेट नव्हते. काही समाजकंटक शाळेमध्ये उपद्रव करायचे. सार्वजनिक पार्किंगसाठी शाळेच्या क्रीडांगणाचा वापर केला जात असे. शाळेचा परिसर भकास झालेला होता. शाळेच्या इमारतीला रंगरंगोटीही नव्हती. त्यामुळे सुरवातीला परिसर सुशोभित करण्यासाठी वृक्षारोपण करण्यात आले. मात्र समाजकंटकांनी लावलेली झाडे उपटून टाकली. पुन्हा झाडे लावण्यात आली मात्र पुन्हा ती समाजकंटकांनी उपटून टाकली. असे वारंवार घडले. त्यामुळे समाजप्रबोधन करण्याची गरज निर्माण झाली. यासाठी परिसरातील ज्येष्ठ व्यक्तींची सभा आयोजीत करण्यात आली. घडलेल्या घडामोडी

संदर्भात चर्चा करण्यात आली. या लोकांनी पुढाकार घेतला आणि शाळेमध्ये पुन्हा वृक्षारोपण करुन वृक्षसंवर्धनाची जबाबदारीही घेतली.

शाळेच्या परिसरामध्ये उत्तर व दक्षिण बाजूला झोपडपट्टी तसेच वीटभट्टी कामगार राहत असल्याने या परिसरातून अनेक विद्यार्थी शाळेमध्ये दाखल होत होते. मात्र या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण अत्यल्प होते. अनेक मुली भावंडाचा संभाळ करण्याकरिता शाळेत येत नसत. तसेच मुले वीटभट्टीवर आई वडीलांना कामात मदत करत असत. त्यामुळे ही मुले शाळेमध्ये उपस्थित राहत नव्हती. या कारणास्तव हे विद्यार्थी शैक्षणिकदृष्ट्या अप्रगत होते. या विद्यार्थ्यांना नियमित शाळेमध्ये आणून त्यांची गुणवत्ता वाढवणे हे आमच्यासमोर आव्हान होते. यासाठी या विद्यार्थ्यांच्या पालकांची पालक सभा आयोजत करण्यात आली. मात्र या सभेस केवळ 2 पालक उपस्थित होते. पुन्हा पालक सभा आयोजीत करण्यात आली. मात्र यास फारसा प्रतिसाद मिळाला नाही. पालक शाळेत येत नाहीत मग यावर उपाय म्हणून आम्ही झोपडपट्टीमध्ये सायंकाळी पालक सभेचे आयोजन केले. यावेळी मात्र पालकांचा प्रतिसाद थोडासा चांगला होता. पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटविण्यात आले. त्यामुळे पालकांमध्ये शिक्षणासंदर्भात आस्था निर्माण झाली. ज्या मुली भावंडांचा सांभाळ करण्यासाठी घरी राहत होत्या त्यांना शाळेच्या वेळेत त्यांच्या सोयीनुसार येण्यास परवानगी देण्यात आली. त्यामुळे या मुलींच्या उपस्थितीचे प्रमाण वाढले. तसेच वीटभट्टीवर काम करणा-या मुलांच्या पालकांचे प्रबोधन केल्यामुळे ही मुलेदेखील नियमित शाळेत येऊ लागली. तसेच देहविक्री करणा-या महिलांची मोठी वस्ती शाळा परिसरात असल्याने त्यांची मुले शाळेच्या हजेरी पटावर होती. मात्र प्रत्यक्षात ती शाळेमध्ये गैरहजर असत. या मुलांचे एकूण प्रमाण 30 होते. या मुलांसाठी रात्रीच्या वेळी पालकसभा घेऊन त्या महिलांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले. यामुळे उपस्थितीचे प्रमाण वाढले.तसेच खाजगी शाळांचे मोठे आव्हान आमच्यासमोर होते . विविध आमिष दाखवून ते आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांना आपल्याकडे दाखल करून घेत होते. खाजगी शाळेच्या तुलनेत आमच्याकडे कसल्याही भौतिक सुविधा नसल्याने पालक या शाळेत मुलांना दाखल करण्यास तयार होत नव्हती.

या शाळेमध्ये आजपर्यंत अनेक विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा देत होते मात्र एकही विद्यार्थी गुणवत्ता यादीत येत नव्हता. त्यामुळे सर्वप्रथम 2011 साली पदभार स्विकारल्यानंतर शिष्यवृत्ती परीक्षेचे नियोजन केले. त्या वर्षी 30 विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेस बसले होते. शंकर ढेरे या नवनियुक्त शिक्षणसेवकावर ही जबाबदारी देण्यात आली. त्यांनी नियोजनबद्धपणे विद्यर्थ्याना अतिरिक्त मार्गदर्शन केले. याचाच परिणाम म्हणून झोपडपट्टीमध्ये राहणारा प्रथमेश पवार हा विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये चमकला. यामुळे नगरपालिका शाळांमधील विद्यार्थी देखील गुणवत्ता यादीत येऊ शकतात हा आत्मविश्वास विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये निर्माण झाला. पुढील वर्षी नियोजनबद्ध पद्धतीने शिष्यवृत्ती परीक्षेसाठी स्वतंत्र वर्ग तयार करून वर्षभर अध्यापन करण्यात आले. त्यामुळे या वर्षी 5 विद्यार्थी हे जिल्हा व राज्य गुणवत्ता यादीत चमकले. या पद्धतीने आज अखेर शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मार्गदर्शन केले जाते.

शाळेमध्ये इयत्ता पहिलीमध्ये दाखल होणा-या विद्यार्थ्यपैकी काही विद्यार्थी हे अंगणवाडीतून येत असत. तर काही कोणत्याही अंगणवाडीत शिक्षण न घेतेलेले असत. त्यामुळे या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया कच्चा राहिलेला असे. त्यामुळे शाळेला आपल्या स्वत:चा पूर्व प्राथमिक विभाग असावा ही बाब लक्षात घेऊन शाळेने स्वतःची बालवाडी सुरू केली.ही राज्यातील शाळेने स्वतः सुरू केलेली पहिली बालवाडी होती. सन 2014-15 मध्ये या शाळेने 5 ते 6 या वयोगटासाठी पूर्व प्राथमिक विभाग सुरू केला. या सत्रात 40 विद्यार्थ्यांनी या गटात प्रवेश घेतला. समाजसहभागातून या वर्गासाठी एक शिक्षिका व एक मदतनिस यांची नेमणूक करण्यात आली. यांचे मानधन समाजसहभागातून करण्यात आले. या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वर्षभरामध्ये अपेक्षित प्रतिसाद दिसून आला. त्यामुळे या वर्गाविषयी पालकांचा प्रतिसाद वाढलेला दिसला. त्यामुळे सन 2015-16 मध्ये 4 ते 5 या वयोगटासाठीही वर्ग सुरू करण्यात

आला. विद्यार्थ्यांमध्ये होणारा अपेक्षित बदल पालकांच्या लक्षात आला. शाळेची गुणवत्ता पालकांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. याचा परिणाम म्हणून इयत्ता पहिलीसाठी याच शाळेमध्ये प्रवेश मिळावा यासाठी पालकांची चढाओढ सुरू झाली. तसेच पूर्व प्राथमिक विभागामुळे पहिलीचा पाया भक्कम होण्यास मदत झाली. समाजातील अनेक पालकांचा ओढा इंग्रजी माध्यमाकडे होता. त्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये मुले दाखल करण्यासाठी पालक फारसे इच्छुक नव्हते. पालकांचा मतप्रवाह लक्षात घेता शाळेने मराठी व इंग्रजी या दोन्ही विषयांवर प्रभुत्व संपादन करण्यासाठी सेमी इंग्रजी माध्यमाचा स्विकार केला. पूर्व प्राथमिक विभाग सेमी इंग्रजी माध्यमातून सुरू करण्यात आला. त्यामुळे जे पालक इंग्रजी माध्यमांमध्ये आपली मुले दाखल करत होते असे पालक या शाळेमध्ये मुले दाखल करण्यासाठी पुढाकार घेऊ लागले. समाजातील अनेक सुशिक्षित पालक कराड नगरपरिषद शाळा क्र. 3 मध्ये आपली मुले दाखल करू लागले. त्यामुळे या मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची जबाबदारी निर्माण झाली. यासाठी इयत्ता पहिलीपासून विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षांना विद्यार्थ्यांना बसविण्यात आले. तसेच वर्षभर मार्गदर्शन करण्यात आले. अनेक विद्यार्थी राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत चमकू लागले. गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी शाळा अशी या शाळेची ओळख निर्माण झाली.

या शाळेमध्ये पालकांचा प्रवेशासाठी ओढा निर्माण झाला. प्रवेशासाठी शाळेमध्ये रांगा लागू लागल्या. याच शाळेमध्ये प्रवेश मिळावा म्हणून पालकांची गर्दी सुरू झाली. शाळेची पटसंख्या वाढू लागली. यामुळे काही भौतिक सुविधा अपु-या पडू लागल्या. विद्यार्थ्यांना बसण्यास बेंचेस नव्हते, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृह कमी पडू लागले. तसेच शाळेला व्यासपीठ, प्रवेशद्वार, संरक्षक भिंत , रंगरंगोटी या सुविधा उपलब्ध नव्हत्या. यासाठी पालक सभा आयोजित करून पालकांना मदतीचे आवाहन करण्यात आले. तसेच समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींना शाळेमधील विविध कार्यक्रमांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले. त्यांना शाळेतील गुणवत्ता दाखविण्यात आली. तसेच भौतिक सुविधांचा अभावही दाखवण्यात आला. या व्यक्तींनी पुढाकार घेऊन या भौतिक सुविधा पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केले. तसेच नगरपालिकेच्या माध्यमातून स्वच्छतागृहांची निर्मिती करण्यात आली. तसेच पालक सहभागातून बेंचेस उपलब्ध करुन देण्यात आले. यावेळी फक्त 12 नियमित शिक्षक शाळेमध्ये कार्यरत होते. पटसंख्येनुसार 34 शिक्षकांची आवश्यकता शाळेला होती. नियमित शिक्षक उपलब्ध होत नव्हते त्यामुळे शाळेने समाजसहभागातून 22 शिक्षकांची नेमणूक केली. यांचे मानधन समाजसहभागातून देण्यात आले.मानधनापोटी वर्षाला 10,00,000/ रू खर्च येत होता. तो खर्च समाज सहभागातून देण्यात आला. असे सलग चार वर्ष खर्च करण्यात आला. तसेच वाढत्या पटसंख्येमुळे वर्गखोल्याही कमी पडू लागल्याने 2 वर्गखोल्यांचे बांधकाम शाळेने समाजसहभागातून केले. तसेच सन 2017-18 साली नगरपालिकेच्या माध्यमातून परिसरात स्वतंत्र दुस-या इमारतीत इयत्ता 5 वी ते 7 वी चे वर्ग सुरू करण्यात आले. या इमारतीमध्ये देखील भौतिक सुविधांचा अभाव होता. समाजसहभागातून आवश्यक भौतिक सुविधांची पूर्तता करण्यात आली.



शाळा प्रवेशासाठी पालकांच्या रांगा.



डिजीटल क्लासरूम.



2014 साली मा. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासमवेत गुणवत्ताधारक विद्यार्थी



2019 साली मा. शिक्षणमंत्री आशीष शेलार यांच्यासमवेत गुणवत्ताधारक विद्यार्थी



अद्ययावत संगणक कक्ष.



पालक मेळावा.

कराड नगरपरिषद शाळा क्र. 3 मध्ये मुख्याध्यापक पदी रूजू झाल्यानंतर शाळेचे अंतरंग व बाह्यांग बदलण्यास सुरूवात केली. यामध्ये प्रामुख्याने पट्संख्या ,उपस्थिती व गुणवत्ता ही प्रमुख आव्हाने होती. पालकसभा व गृहभेटी यामुळे उपस्थिती वाढवण्यात यश मिळाले. गुणवत्ता वाढीसाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखून जादा तासाचे नियोजन केले. तसेच बालवाडीवे वर्ग सुरू केल्याने इयत्ता पहिलीचा पाया भक्कम होण्यास मदत झाली. याचा परिणाम म्हणून शाळेची पटसंख्या वाढू लागली. याचा गोषवारा खालील प्रमाणे.

इयत्ता पहिली ते सातवी ची पटसंख्या -

अ.क्र	सन	पटसंख्या (1 ली ते 7 वी)
1	2011-12	267
2	2012-13	320
3	2013-14	334
4	2014-15	379
5	2015-16	532
6	2016-17	786
7	2017-18	1166
8	2018-19	1388
9	2019-20	1623

बालवाडी ची पटसंख्या -

अ.क्र	सन	पटसंख्या
1	2014-15	40
2	2015-16	250
3	2016-17	472
4	2017-18	544
5	2018-19	666
6	2019-20	681

पटसंख्या वाढीबरोबर गुणवत्ता वाढीसाठी इयत्ता पहिली पासून स्पर्धा परीक्षांचे नियोजन करण्यात आले. विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षांमुळे विद्यार्थ्यांचा स्पर्धा परीक्षांचा पाया भक्कम झाला. यामुळे प्राथमिक , उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करणे विद्यार्थ्यांना सहज शक्य झाले. खाजगी माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता पाचवीपासून गुरूकुल प्रकल्प राबविला जातो. याचे पालकांना खास आकर्षण होते. ही बाब लक्षात घेऊन शाळेने सन 2017-18 साली इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती वर्गासाठी ' गुरूकुल प्रकल्प ' सुरू केला. हा वर्ग 1 जुलै पासून स. 7.30 ते सायं. 5.30 या वेळेत सुरू करण्यात आला. या वर्गामध्ये शिष्यवृत्ती, नवोदय व सैनिक स्कूल या स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेण्यात आली. यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक व सहायक शिक्षकांचे नियोजन करण्यात आले. शिष्यवृत्ती परीक्षा होईपर्यंत हा वर्ग सुरू राहिला. यामुळे यावर्षी शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत येणा-या विद्यार्थ्याच्या संख्येत वाढ झाली. शिष्यवृत्ती परीक्षेत सन 2011-12 पासून या शाळेमधील विद्यार्थ्यांनी जिल्हा व राज्य गुणवत्ता यादीत यश संपादन केले आहे. याचा गोषवारा खालील प्रमाणे.

अ.क्र	सन	गुणवत्ताधारक विद्यार्थी संख्या	नवोदय पात्र विद्यार्थी
1	2011-12	**1**	-
2	2012-13	**5**	-
3	2013-14	**12**	-
4	2014-15	**12**	-
5	2015-16	-	-
6	2016-17	-	-
7	2017-18	**5**	**2**
8	2018-19	**11**	**2**

आधुनिक युगात विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान व्हावे यासाठी शाळेमध्ये अद्ययावत 'संगणक कक्ष ' निर्माण करण्यात आला आहे. यामध्ये 15 संगणक असून दोन संगणक शिक्षिकांची नेमणूक करण्यात आली आहे. या संगणक कक्षासाठी कराड शहराचे माजी उपनगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांनी 2,50,500/ रु.मदत दिली आहे. तसेच सनबीम संस्थेने शाळेला 5 संगणक भेट दिले आहेत. तसेच लोक सहभागातून 4 प्रोजेक्टर शाळेला मिळालेले आहेत. संगणक कक्षामुळे विद्यार्थी सहजपणे संगणक हाताळू लागले. आपल्या पालकंनाही संगणकाबद्दल माहिती सांगू लागले. पालकांना संगाणकाचे महत्त्व समजू लागले. त्यामुळे अनेक पालकांनी आपल्या घरामध्ये संगणकाची सोय केली. त्यामुळे विद्यार्थ्यांना घरीच ऑनलाईन परीक्षा देणे सोयीचे झाले. राज्य शासनाच्या वतीने शाळेमध्ये नाविण्यपुर्ण विज्ञान केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. या प्रयोग शाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण होण्यास मदत झाली. विद्यार्थी नवनवीन साहित्य तयार करू लागले. तसेच निसर्गात घडणा-या घटनांमागील कार्यकारणभाव शोधण्याची वृत्ती त्यांच्यामध्ये निर्माण झाली. संगणकाबरोबर स्मार्ट टी.व्ही. च्या माध्यमातून दर्जेदार शिक्षण देता यावे यासाठी पालकांना आवाहन करण्यात आले. पालकांनी सुमारे 6,40,000/रू. निधी स्मार्ट टी.व्ही. खरेदीसाठी शाळेला दिला. आज शाळेमध्ये **32** स्मार्ट टी.व्ही. असून त्यामाध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते.

विद्यार्थी मनोगत – कृष्णाली पवार (इयत्ता – ६ वी)

माझे आई वडील शिक्षक आहेत. त्यांनी कोणत्याही खाजगी शाळेत दाखल न करता मला या शाळेत दाखल केले. त्यांचा विश्वास या शाळेने सार्थ करून दाखवला . मी पहिली पासून चौथीपर्यंत वेगवेगळ्या खाजगी स्पर्धा परीक्षेत राज्य गुणवत्ता यादीत आले.तर 2019 च्या इ. पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेच्या राज्य गुणवत्ता यादीत 15 वी येण्याचा मान मिळाला .मला या शाळेचा खूप अभिमान आहे.या शाळेतील सर्व शिक्षक चांगले अध्यापन करून आमच्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी सतत झटत असतात.

पालक मनोगत – श्री. सूरज गुरव (पोलीस उपअ धिक्षक , कराड)

मी सन 2018-19 साली कराड येथे पोलीस उपअधिक्षक पदाचा पदभार स्वीकारला. माझ्या दोन्ही मुलांना कोणत्या शाळेत दाखल करावे हा माझ्यापुढे प्रश्न होता. एकीकडे इंग्रजी माध्यमांच्या शाळा भौतिक सोयी सुविधांनी युक्त असताना देखील मी कराड नगरपरिषद शाळा क्र. 3 ची निवड केली. माझी मुलगी इयत्ता पहिली मध्ये शिकते. सुरुवातीच्या दोन महिन्यामध्ये मला तिच्यात बदल झालेला दिसून आला. तिच्यामध्ये स्वयंशिस्त तसेच अभ्यासाची आवड निर्मण झालेली दिसून आली. आज माझी दोन्ही मुले कराड नगरपरिषद शाळा क्र. 3 मध्ये शिकतात याचा मला सार्थ अभिमान आहे.



डी.वाय.एस.पी.श्री.सूरज गुरव -- शाळेचे पालक

कराड नगरपरिषद शाळा क्र.3 आज पटसंख्या आणि गुणवत्तेत राज्यात अग्रेसर असल्याचा मला अभिमान आहे. या शाळेसारख्या राज्यात अनेक शासकीय शाळा निर्माण व्हाव्यात यासाठी मी प्रयत्न करीत आहे. शाळा हे माझे कुटुंब समजून मी सहकारी शिक्षकांशी वागतो. मी नेता असलो तरी माझे सहकारी शिक्षकही शाळेचे नेते आहेत असा विश्वास मी त्यांच्यामध्ये निर्माण केला आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी माझी धडपड आहे. या शाळेने मला राज्यात ओळख निर्माण करून दिली याची मला जाणीव आहे. विद्यार्थी , पालक व शिक्षक यांच्यामध्ये प्रेमाचे नाते निर्माण करू शकलो याचा मला अभिमान आहे.

कराड नगरपरिषद शाळा क्र.3 ही गुणवत्ता नसल्याने व शाळेत दुपारनंतर वियार्थी शाळेत उपस्थित राहत नसल्याने ही शाळा बंद पडते की काय अशी स्थिती निर्माण झाली होती.यापूर्वी मी शाळा क्र.2 ही संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान या उपक्रमात राज्यात 2 री आणली होती.तसेच शाळेची पटसंख्या 250 वरून 750 इतकी वाढवली होती. तर शाळा क्र. 11 येथे कार्यरत असताना सर्वांगीण गुणवत्ता विकास कार्यक्रमात या शाळेला कोल्हापूर विभागात प्रथम क्रमांक मिळवून दिला होता. 2011 साली पदाधिकारी व प्रशासनाने माझ्यावर शाळा क्र. 3 ची जबाबदारी सोपवली. या शाळेची दयनीय अवस्था पाहून ही शाळा राज्यात नव्हे तर देशात नंबर 1 करण्याचा निश्चय केला. यासाठी मी शिक्षक पालक व समाज यांची मदत मिळवली. तर प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळावे यासाठी पहिलीच्या वर्गावर लक्ष केंद्रीत केले. यासाठी काही समाज शिक्षकांची मदत घेतली. तसेच शिक्षकांच्या अध्यापनाच्या चांगल्या व कमकुवत बाबी यांचा अभ्यास केला. शाळेव्यतिरिक्त जादा वेळेचे नियोजन करण्यात आले. तसेच सुशिक्षित पालक आपल्या शाळेत मुले का दाखल करीत नाहीत याचा अभ्यास करून स्वतःचे व शिक्षकांचे मूल्यमापन करण्यात आले. समाजाचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्यासाठी गुणवत्ता व स्पर्धा परीक्षांवर भर देण्यात आला. भौतिक सुविधांवर भर देण्यापेक्षा गुणवत्तेवर लक्ष केंद्रीत करण्यात आले. यासाठी पुढील तीन वर्षाचे सुक्ष्म नियोजन करण्यात आले. राज्यातील अनेक उपक्रमशील शाळांना भेटी देण्यात आल्या.तर शिक्षकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी मुख्याध्यापक व शिक्षक याच्यातील दरी कमी करून आपुलकीचे नाते निर्माण केले. शिक्षकांच्या आवडीनिवडीनुसार कामाचे नियोजन करण्यात आले.

शाळेची-" गुणवत्तापुर्ण शाळा " म्हणून ओळख निर्माण झाल्यानंतर शाळेला भौतिक सुविधा मिळवण्यासाठी समाज सहभाग घेण्यात आला. याद्वारे शाळेचे रूपडे पालटले. आजअखेर समाज सहभागातून शाळेला सुमारे 60,00,000/ रू मदत मिळविण्यात यशस्वी ठरलो आहे. यामुळे ही शाळा पटसंख्या व गुणवत्ता यामध्ये राज्यात अग्रेसर ठरली आहे .

ही शाळा देशात सर्वोच्च शिखरावर नेण्याचा माझा मानस आहे व त्यासाठी वाटेल ते करण्याची माझी तयारी आहे.



शाळेतील शिक्षक वृंद



महाराष्ट्र शासनाचा राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार स्विकारताना मुख्याध्यापक.

धन्यवाद

जगदीश कुडे
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, श्रीराम तांडा तालुका.मंठा,जिल्हा.जालना
इमेल आयडी - jagdishkude199@gmail.com



श्रीराम तांडा... जालना जिल्ह्यात जालना-परभणी हायवेवरील वाटूर फाटा या ठिकाणापासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावरच्या माळरानी वसला आहे श्रीराम तांडा. या छोट्याशा तांड्याची लोकसंख्या जेमतेम साडेचारशे. या ठिकाणी सर्व बंजारा समाजाचे लोक राहतात. त्यांचा प्रमुख व्यवसाय मजूरी. गावात केवळ दोन चार सधन शेतकरी वगळता बाकीचे 75 टक्के लोक मजूरीसाठी स्थलांतरीत होतात. आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या हे गाव मागासलेलेच होते.

डोंगराच्या कुशीत वसलेल्या पक्का रस्ता नसलेल्या गावात 1993 साली शिक्षणाची पहाट उगवली. गावात शाळेला जागा नसल्यामुळे शाळा मारोतीच्या मंदिरात भरत होती. नंतर गावकऱ्यांनी शाळेसाठी जागा उपलब्ध करून शाळा खोली बांधली व शाळा त्या ठिकाणी भरू लागली. सुरूवातीला शालेय वातावरण व पालकाचे शाळेकडे दुर्लक्ष असल्यामुळे स्थलांतराचे व शाळा बाह्य विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त होते. मात्र जुलै २००४ साली माझी (जगदीश कुडे) नियुक्ती झाली आणि पाहता पाहता पाच-सहा वर्षात या तांड्यातील विद्यार्थी जिल्ह्यातील कुठल्याही शाळेच्या तोडीस तोड बनला.

गावात वीज नाही, पाणी नाही, मुलांचे निरक्षर आईवडील, अठरा विश्व दारिद्र्य, स्थलांतराचे प्रश्न, शालेय परिसरात कसलीही भौतिक सुविधा नाही, डोंगरावर शाळा, सगळीकडे खडकाळ जमीन अशा परिस्थितीत या तांड्यातील शाळेची स्थिती मला सुधरावयाची होती. थोड्याच दिवसात माझ्या लक्षात असे आले की, इथल्या लोकांच्या कामाचे स्वरूपच असे होते की, या ठिकाणाचे लोक कामाच्या शोधात मुलांना घेऊन वर्षाचे काही महिने ऊसतोडीचे, वाळू उपसा किंवा इतर कामे करण्यासाठी परगावी, परराज्यात जायचे. यामुळे अशा मुलांच्या शिक्षणात जो खंड पडतो त्याबाबत काय करायचे हा मोठा प्रश्न मला पडला. हे प्रश्न सोडवायचे असतील तर बंजारा समाजात मिसळल्याशिवाय हे प्रश्न सुटणार नाहीत हे मी ओळखले व प्रथम मी त्यांची भाषा शिकण्यास प्रारंभ केला. तांड्यात जाऊन सामाजिक कार्यात भाग घेऊ लागलो.

शाळेत बदल करण्यासाठी व पालकांचा संपर्क शाळेत वाढविण्यासाठी मी पालक मेळावा व महिला मेळाव्याचे आयोजन केले. सुरूवातीला पालकांनी, गावकऱ्यांनी, महिलांनी प्रतिसाद दिला नाही व मी निराश न होता माझे कार्य चालूच ठेवले. पालक मेळावा व महिला मेळाव्याला जेव्हा अपेक्षीत संख्या आली त्यावेळेस मी

गावकऱ्यांना शिक्षणाचे महत्व पटवून सांगितले. शिक्षण न घेतल्यामुळे तुमच्यावर स्थलांतराची वेळ आली आहे हे लक्षात घ्या आणि बाहेरगावी जातांना मुलांना आजी-आजोबांकडे ठेवा असा आग्रह पालक सभेत केला. इथल्या पालकांना माझ्या सर्व संकल्पना, शुध्द विचार व हेतू हळूहळू पटू लागला.

आणि ह्या सर्व गोष्टी घडत असतांना शाळेत नविन सहकारी शिक्षक म्हणून नसिरखॉ पठाण नावाचे शिक्षक रूजू झाले. पठाण सरांची पुर्वीची शाळा सुध्दा चांगली होती व त्यांचे कार्य देखील चांगले आहे हे मला समजल्यावर खुप आनंद झाला .आम्ही दोघांनी गावकऱ्यांच्या समस्या, शैक्षणिक गुणवता, भौतिक साधने, शैक्षणिक साधने, विद्यार्थी उपस्थिती, अल्पवयीन मुलींचे विवाह, व्यसनाधिनता अशा विविध समस्यांवर काम करायला सुरूवात केली. बोलीभाषा बंजारा असल्यामुळे मुलांना शिकवतांना खुप त्रास झाला परंतु ती भाषा मी स्वतः शिकल्यामुळे हळूहळू हा त्रास देखील खुप कमी झाला.

सर्वप्रथम माझी शाळा पाच वर्षानंतर कशी असायला हवी याचे एक स्वप्न पाहिले- व्हिजन ठरवले.

पाच वर्षानंतर माझी शाळा निसर्गाने झाडे वेलीनी सजलेली असावी, शाळेच्या परिसरात 100 ते 150 झाडे असावी, शाळा डिजीटल असावी, माझ्या शाळेत एकही मुल शाळाबाह्य किंवा स्थलांतरीत असू नये, गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देणारी जिल्हा परिषदेची श्रीराम तांडा शाळा असावी, तसेच इतर शाळांना प्रेरणादायी व आदर्श ठरणारी माझी शाळा असावी असे मी स्वप्न पाहिले. हे शाळे संदर्भात मी पाहिलेले स्वप्न मी माझे सहकारी शिक्षक पठाण सरांना सांगीतले .सरांनी सुध्दा हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण दोघे रात्र-दिवस काम करू व शाळा याच पध्दतीने घडवू असा मला शब्द दिला व आम्ही दोघांनी मिळून गावाच्या व शाळाच्या प्रगतीसाठी कार्य करण्यास सुरूवात केली.

खरे पाहता हे स्वप्न पूर्ण होऊ शकणार नाही अशी या श्रीराम तांड्याची परिस्थिती होती. श्रीराम तांडा गावात जायला रस्ता नाही, गावातील बोली भाषा बंजारा, गावात लाईट (वीज) नाही, गावात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नव्हती, शाळा खडकावर डोंगरावर असल्यामुळे गवताला सुध्दा उगवण्यासाठी संघर्ष करावा लागतो त्या ठिकाणी झाडे कशी उगवणार ? ज्या गावाची विद्यार्थी संख्या कधीच 25 ते 30 पुढे जाणार नव्हती तिथे 100 मुले शाळेत कशी दाखल होणार ? गावाची मुले शाळेत येत नव्हती, गावातच लाईट वीज नाही तिथे शाळा डिजीटल कशी करता येईल ? लोक वर्गणी जमा होऊच शकणार नव्हती.,कारण बहुतांश मजूर वर्ग . अशा परिस्थितीमध्ये मी खुप मोठे स्वप्न पाहिले होते. अशक्य वाटणारी गोष्ट शक्य करावयाची होती. लोकांनी वेड्यात काढले. तुमचे स्वप्न पूर्ण होऊच शकणार नाही हे बरेच जण मला सांगत होते. परंतु मी हे ठरवले होते की परिस्थिती पुढे मी झुकणार नाही. तर परिस्थितीला माझ्या पुढे झुकवणार आणि परिस्थिती सोबत तिथल्या भौतिक व सामाजिक बाबींसोबत झुंज देत आम्ही दोन शिक्षकांनी आमच्या स्वप्नाच्या दिशेने कार्याला सुरूवात केली.

जे स्वप्न मी पाहिले ,ज्या स्वप्नांच्या दिशेने जाण्यासाठी संकल्पपुर्तीसाठी मी सर्व प्रथम शाळेत सर्व गावकऱ्यांची पालक सभा बोलावली. तांड्यात घरोघर जाऊन प्रत्येक व्यक्तीला, महिलेला पालक सभेचे निमंत्रण दिले. ज्या प्रमाणे आपण घरी एखादे कार्य आयोजित करून पाहूणे मंडळींना निमंत्रण देतो त्याचप्रमाणे हक्काने व आग्रहाने पालक सभेचे निमंत्रण दिले व सकाळी 8.00 वाजता पालक सभा आयोजित केली. जवळपास पूर्ण तांड्यातील लोक या सभेला आले. या पालक सभेत मी लोकांना एक आवाहन केले की, तुमची आर्थिक मदत नको, मात्र कृपया तुम्ही तुमची मुले शाळेत पाठवा. शैक्षणिक कार्य पूर्ण करण्यासाठी देशाचा व गावाचा आदर्श नागरीक घडविण्यासाठी मुलांना शाळेत पाठवा अशी विनंती केली व पालकांनी ती मान्य केली.

पालकसभा घेतल्यानंतर व पालकांनी मुले शाळेत पाठवण्याची हमी दिल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून मी व पठाण सरांनी शिक्षण विभागाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक गुणवत्ता विकासाच्या कामाला सुरूवात केली. जालना जिल्हा परिषदेचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था प्राचार्य व सर्व अधिव्याख्याता जालना, मा.शिक्षणाधिकारी, मा.उपशिक्षणाधिकारी, मा.गट शिक्षणाधिकारी, मा.गट विकास अधिकारी, मा.केंद्र प्रमुख व सर्व जिल्हा परिषदेचे सन्माननीय पदाधिकारी, अधिकारी तसेच शालेय व्यवस्थापन समिती श्रीराम तांडा, ग्रामपंचायत श्रीराम तांडा यांचे मार्गदर्शन घेऊन शैक्षणिक गुणवत्ता विकास करण्यासाठी सुरूवात केली.





श्रीराम तांडा- या तांड्यावरील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती, शेती कसली, मोल मजूरीसाठी वर्षाचे काही महिने पालक कामाच्या शोधात परगावी, परजिल्हा, परराज्यात जात असतात सोबत मुलांना देखील घेऊन जात होते. दिवाळीनंतर शाळेतील शाळा बाह्य मुलांचे प्रमाण वाढत होते. यावर उपाय काय करावा हा सर्वात मोठा प्रश्न होता. जोपर्यंत मुलं शाळेत टिकत नाहीत तोपर्यंत ते शिकत नाहीत त्यामुळे आम्ही मुलांची उपस्थिती वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले. स्थलांतराचे प्रमाण कमी करून शून्य टक्क्यावर आणणे हे आमचे ध्येय होते व त्या दृष्टीने आम्ही वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू केले.

या अगोदर पालक मेळावा, महिला मेळावा घेऊन मुलांना सोबत कामासाठी घेऊन जाऊ नका असे आवाहन पालक मेळाव्यामधून करीत होतो. तरीही पालकवर्ग ऐकण्याच्या स्थितीत नव्हते. गुरूजी आम्हाला शिक्षणापेक्षा पोटापाण्याचा मोठा प्रश्न आहे, आम्ही कोणाच्या भरवश्यावर मुलांना येथे ठेवून जायचे ? त्यांची काळजी कोण घेईल ? मला एकुलता एक मुलगा आहे त्याला कोण सांभाळेल? त्याचे नेहमी दुखते, त्याला दवाखान्यात कोण नेईल ? असे एक ना अनेक प्रश्न पालक आम्हाला विचारायचे व निरूत्तर करायचे व मुलांना गावात ठेवायला तयार नव्हते तरीही मी हार मानली नाही.

मुलांच्या आईवडीलांना विनंती करायचो की आज जी वेळ तुमच्यावर आली आहे ती तुमच्या मुलांबाळावर येऊ देवू नका .त्यांना शिक्षण द्या, आम्ही त्याला शिकवू त्याला येथे ठेवा. पण तरीही पालक ऐकण्याच्या स्थितीत नव्हते तेव्हा मी ही ठरवले की, आता काहीही झाले तरी आपल्याला पालकाचे मन वळवायचे व मुलांचे स्थलांतर रोखायचेच मग मी पूर्ण गावासमोर मारोतीच्या मंदिरात सर्व महिला व पुरूषासमोर सांगीतले की, शालेय व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने व गावकऱ्यांच्या मदतीने आम्ही स्वतः तुमच्या मुलांची काळजी घेऊ, आमच्या भरवशावर मुले सोडून तुम्ही कामाला जा ,मुलांच्या सुरक्षीततेची जबाबदारी पूर्ण माझी राहील. तेव्हा लोकांनी सांगीतले की, गुरूजी शाळेला उन्हाळी सुटी लागेपर्यंत मुले तुम्ही सांभाळाल पण पुढे उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांना कोण सांभाळेल ? तेव्हा मी त्यांना स्पष्टपणे सांगीतले की, तुम्ही जर मुलांना येथे सोडून जाणार असाल तर शाळेला उन्हाळ्याच्या सुट्ट्या देखील देणार नाही, तुमच्या मुलांसाठी आम्ही उन्हाळ्याच्या सुट्टीत देखील शाळा सुरु ठेऊ, , पण मुलांना सोबत घेऊन जाऊ नका.

या माझ्या बोलण्याचा परिणाम असा झाला की काही पालक सुरूवातीला मुले ठेवून जाण्यास तयार झाले. हळूहळू पालकात शाळेबद्दल गोडी निर्माण झाली व प्रत्येक वर्षी स्थलांतराचे प्रमाण थोडे थोडे कमी होत गेले. आज मी अभिमानाने सांगू शकतो की, माझ्या तांड्यातील एकही मुलगा स्थलांतरीत होत नाही व शाळा बाह्य होत नाही, पण शाळा बाह्य मुलांचे स्थलांतराचे प्रमाण कमी करायचे असेल तर आपल्यालाही शाळेची गुणवत्ता व पालकांमध्ये विश्वास निर्माण करावा लागतो .

आजही दिवाळीनंतर पालक ऊसतोडी, वाळू उपसा किंवा इतर कामाला परजिल्हा किंवा परराज्यात जातात तेव्हा मुले गावातच आजी आजोबा किंवा इतर नातेवाईकांकडे सोडून ते पालक जातात व त्या मुलांची पूर्ण काळजी शाळा घेते. त्यांचे दुखत असेल तर त्यांना दवाखान्यात नेतो , वही, पेन मोफत देतो , शालेय पोषण आहार उन्हाळी सुट्टीतसुध्दा आम्ही त्यांना देतो म्हणूनच पालक आमच्या भरवश्यावर मुलांना सोडून स्थलांतरीत होतात.

या ठिकाणी मला एक मुद्दा आवार्जून सांगावसा वाटतो की, शाळाबाह्य किंवा विद्यार्थी स्थलांतर रोखायचे असेल तर त्यावर एकच उपाय आहे, तो म्हणजे शाळेची गुणवत्ता व शालेय आनंददायी वातावरण याच्या आधारेच आपण स्थलांतर थांबविण्यात यशस्वी होवू शकतो. हे मी माझ्या स्वतःच्या शाळेच्या कामावरून सांगू शकतो. दिव्यांग, गरीब, दरिद्री, पालकांचे स्थलांतर यावर उपाय म्हणून आपण गुणवत्तापूर्ण शिक्षण देवून व प्रत्येक मुल समजून घेवून प्रत्येकाकडे माणूस म्हणून पाहिल्यास प्रत्येक मुल शाळेत टिकू शकते व प्रत्येक मुल शिकू शकते हे मी माझ्या शाळेत सिध्द केले आहे.

विजू सिताराम राठोड हा दिव्यांग मुलगा, राहणार पाकणी ता.मंठा जि.जालना या चार किलोमिटर अंतरावरून माझ्या श्रीराम तांडा या शाळेत शिक्षणासाठी आला. विजूची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर विजूला डॉक्टरांनी सांगीतले की, तो बोलू शकणार नाही, तो विजू माझ्या शाळेत दाखल झाल्यानंतर बोलायला शिकलाच परंतु अभ्यासात सुध्दा त्याची चांगली प्रगती झाली होती. याचे कारण एकच की, मी विजूकडे फक्त माणूस म्हणून पाहिले होते व विजू सुध्दा इतर मुलांप्रमाणे एक मुल आहे व तेही शिकू शकतो या आत्मविश्वासाच्या जोरावरच

विजूला आम्ही बोलायला व लिहायला शिकवले होते. गुणवत्तापूर्ण शिक्षण, शाळेतील आनंददायी वातावरण, शिक्षकांनी सुलभकाच्या भूमिकेतून काम करून मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहीत करणे, प्रत्येक मुल माणसाचे मुल आहे व प्रत्येक मुल शिकू शकते हा आत्मविश्वास निर्माण करून प्रत्येकाकडे माणूस म्हणून पाहिल्यास शाळाबाह्य व स्थलांतरित बालकाचे प्रमाण शून्य टक्के व्हायला वेळ लागणार नाही.

जोपर्यंत शाळा समाजात जात नाही व समाज शाळेत येत नाही तोपर्यंत शाळेचा सर्वांगीण विकास होत नाही. हे माहित असल्यामुळे समाजातील गावातील लोकांचा सहभाग शालेय कामकाजात वाढवला, पालक मेळावे, महिला मेळावे, सांस्कृतिक कार्यक्रम, सण उत्सव साजरे करणे असे एक ना अनेक उपक्रम शाळेत राबवण्यास सुरूवात केली. गावकऱ्यांना देखील शाळेबद्दल आकर्षण निर्माण झाले. स्वतःहून गावकरी शाळेकडे यायला लागले. विद्यार्थ्यांची गुणवत्ता, कलागुण पाहून आनंदी व्हायला लागले व त्यांच्या मनात शाळेला मदत करण्याची इच्छा मनोमन तयार झाली तोपर्यंत आपण त्यांना काहीच म्हणायचे नाही हे मी ठरवलेच होते. मी सर्वप्रथम विद्यार्थी स्थलांतर रोखले, एकही विद्यार्थी शाळाबाह्य होऊ दिला नाही. 100 टक्के पटनोंदणी, 100 टक्के उपस्थिती हे उद्दिष्ट पूर्ण केले. गुणवत्ता वाढीकडे लक्ष दिले. शालेय परिसर स्वच्छ केला, शालेय परिसरात झाडे लावली, शालेय वातावरण प्रफुल्लीत केले, शालेय रंगरंगोटी, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी, शालेय पोषण आहार, पूरक पोषण आहार, शालेय परिपाठ याकडे लक्ष देवून चांगल्या दर्जाचे काम केले. विद्यार्थी लिहायला, वाचायला लागले ,संस्कार चांगले व्हायला लागले. विद्यार्थ्यांमध्ये बदल दिसू लागला. तसाच बदल मग पालकात दिसायला लागला जो पालक 100 रू. लोकवर्गणी द्यायला तयार नव्हता, तो आज शाळेसाठी काहीही करायला तयार आहे. ह्या साऱ्या गोष्टी आपल्या कार्यावर अवलंबून असतात. लोक सहभाग मिळतो परंतु लोकांना अगोदर आपण आपले कार्य दाखवायला हवे व त्यांच्यात एक विश्वास निर्माण करायला हवा.

इ.1 ते 4 वर्ग असणाऱ्या माझ्या शाळेच्या पटसंख्येचा आलेख वाढत तो 102 इतका झाला. 102 या पटसंख्येपैकी फक्त 32 विद्यार्थी हे श्रीराम तांडा या गावातील व 70 विद्यार्थी मंठा व इतर आजुबाजुच्या गावातून खाजगी स्कूल बसने येवू लागले. संख्यात्मक आलेखाबरोबर गुणवत्तेच्या विविध उपक्रमाच्या अंमलबजावणीतून शाळेची गुणवत्ता वाढत होती. शाळेत राबवत असलेल्या विविध उपक्रमाची पाहणी करण्यासाठी अनेक पर्यवेक्षीय अधिकारी, पदाधिकारी, तालुक्यातील शाळा व्यवस्थापन समित्या, शिक्षक, मुख्याध्यापक, प्रसार माध्यम प्रतिनिधी यांच्या भेटी झाल्या. तसेच शाळेचे उल्लेखनिय कार्य व शाळेच्या माध्यमातून शाळाबाह्य व स्थलांतरीत विद्यार्थी या संबंधी मिळालेले यश याचे तत्कालीन महाराष्ट्र राज्याचे प्रधान शिक्षण सचिव मा.नंदकुमार साहेब यांच्यासमोर सादरीकरण झाल्यानंतर त्या कार्याचा गौरव म्हणून 9 जानेवारी 2017 रोजीच्या जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णयाच्या अनुषंगाने माझी महाराष्ट्र राज्याचे प्रथम बालरक्षक म्हणून घोषणा झाली. त्यामुळे शाळेबरोबर महाराष्ट्रातील शाळाबाह्य व स्थलांतरीत मुलांसंबंधी काम करण्याची संधी मला मिळाली. बालरक्षक चळवळीमुळे शाळेचा नावलौकीक वाढत गेला, वर्तमानपत्रांनी शाळेची दखल घेतली त्याचा परिणाम म्हणून मंठा, परतूर तालुक्यातील पालकांचा श्रीराम तांडा शाळेत पाल्यांचा प्रवेश घेण्यासाठी ओढा वाढला.

सर्व काही व्यवस्थीत सुरू असतांना 25 मे 2018 रोजी ऑनलाईन बदली प्रक्रियेचे आदेश प्राप्त झाले. यामध्ये दोन सहकारी बांधवांची बदली झाली व त्यांच्या बदल्यात एक जागा भरली गेली व एक जागा रिक्त राहिली. नवीन सहकारी म्हणून माझेच मित्र श्री.अविनाश राजेंद्र लोमटे यांची नेमणूक झाली. शाळेत मनुष्य बळाची खुप मोठी समस्या निर्माण झाली तरी पण आम्ही दोघांनी सहविचारानी इयत्ता 1 ते 4 वर्ग असणाऱ्या शाळेत 5 वा वर्ग वाढवून शाळा 1 ते 5 करण्याचा धाडसी निर्णय घेतला. सन 2018-19 या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी 15 जून 2018 रोजी शाळेमध्ये प्रवेशासाठी पालकांच्या रांगा लागल्या. दोनच शिक्षक व दोनच वर्ग खोल्या असल्याने आम्ही इच्छा असताना देखील आलेल्या सर्व पालकांच्या पाल्यांचे प्रवेश घेऊ शकलो नाही. फक्त पहिलीचे 20 व इतर वर्गाचे 25 असे एकूण 45 विद्यार्थ्यांचे प्रवेश केले. सन 2017-18 या शैक्षणिक वर्षात 102 असणारी पटसंख्या सन 2018-19 या शैक्षणिक वर्षात 147 इतकी झाली. त्यापैकी 122 विद्यार्थी बाहेर गावावरून येतात व 25 इतके गावातील विद्यार्थी होते.

147 पटसंख्या व शाळेत आम्ही दोघेच शिक्षक त्यात माझ्याकडे बालरक्षक चळवळीचे राज्याचे नेतृत्व अशी प्रतिकुल परिस्थिती निर्माण झाली. परिस्थितीला शरण न जाता परिस्थितीला सामोरे गेले पाहिजे या

सुविचाराप्रमाणे निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीतही शाळेची गुणवत्ता टिकविण्यासाठी व वाढवण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्टा केली. यासाठी आम्ही ज्ञानरचनावाद, गटअध्ययन, गटचर्चा, इ-लर्निंग, पीयर लर्निंग, विषय मित्र, दुपारच्या सुट्टीमध्ये विद्यार्थी राजदरबार या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली. या उपक्रमामुळे शिक्षक संख्येची कमतरता जाणवली तर नाहीच पण याद्वारे विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनाची सवय लागली. तसेच 2018-19 या शैक्षणिक वर्षात जिल्हा, परजिल्ह्यातील अनेक शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, मुख्याध्यापक, विद्यार्थी तसेच प्रशासकीय अधिकारी व पदाधिकारी यांनी भेटी देवून आमच्या शाळेतील विविध उपक्रमांचे, विद्यार्थी गुणवत्ता व शालेय नियोजनाचे कौतुक केले व त्या सर्व गोष्टींची त्यांच्या शाळेत अंमलबजावणी केली. श्रीराम तांड्यावरची ही छोटीशी शाळा जिल्हा व परजिल्ह्यातील इतर शाळांसाठी प्रेरणादायी व दिशादर्शक ठरत आहे.

सन 2018-19 या शैक्षणिक वर्षातील शाळेसाठी व आम्हा शिक्षकांसाठी अभिमानाची घटना म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने शिक्षणाची वारी 2019 चे नांदेड येथे आयोजन केले होते. या वारीमध्ये जालना जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी आमच्या शाळेला मिळाली. त्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने व समता विभाग पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली **'माळरानावर नंदनवन फुलले'** या विषयावर आधारित स्टॉल देण्यात आला. या स्टॉलला राज्याच्या शिक्षण विभागातील अधिकारी, पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षणतज्ञ, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी यांनी भेटी दिल्या. शाळेची यशोगाथा ऐकुन व पाहुन अनेक प्रेरणादायी अभिप्राय दिले. ते अभिप्राय आमच्यासाठी उर्जास्त्रोतच ठरले.

सन 2019-20 या शैक्षणिक वर्षाची सुरूवात 17 जुन 2019 रोजी झाली. संचमान्यतेमध्ये तीन मान्य पदाचे रूपांतर चार मान्य पदामध्ये झाले. पण त्यापैकी दोन पदे रिक्तच राहीली. तसेच कमी वर्ग खोल्या व कमी शिक्षक अभावी इच्छा असताना देखील पटसंख्या वाढवता आली नाही. तर पालकांच्या इच्छेनुसार प्रवेश दिले असते तर पहिल्या दिवशी 300 ते 350 प्रवेश झाले असते. चालु शैक्षणिक वर्षात बाहेर गावच्या मोजक्याच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले व पटसंख्या 145 इतकी स्थिर ठेवली. नंतर ऑनलाईन बदली प्रक्रियेमध्ये दोन रिक्त जागा भरल्या गेल्या. श्रीमती सुषमा शेळके व श्रीमती सुनिता दुभळकर या दोन शिक्षक भगीनीची श्रीराम तांडा येथे नेमणूक झाली. त्यामुळे शाळेमध्ये सोनेरी पहाट उगवली गेली. शिक्षकांच्या पुरेशा संख्येमुळे नेहमीच्या उपक्रमाबरोबर नवोदय, शिष्यवृत्ती, एम.टी.एस., आर.टी.एस.ई. या स्पर्धा परीक्षाचे तयारी वर्ग सुरू केले. यामध्ये नवोदय, शिष्यवृत्ती परीक्षेचा पाठ्यक्रम ऑक्टोंबर महिन्यात पूर्ण केला. दिवाळीपासून ते आतापर्यंत 125 सराव परीक्षा घेण्यात आल्या. त्याचा परिणाम म्हणून यावर्षी सदर स्पर्धा परीक्षेमध्ये 100 टक्के यश मिळेल.



जि.प.प्रा.शाळा श्रीराम तांडा ता.मंठा जि.जालना येथील विद्यार्थी पटसंख्येचा वाढता आलेख



तसेच चालु शैक्षणिक वर्षात दरमहा सामान्य ज्ञान परीक्षांचे आयोजन केले आहे. त्याचा परिणाम म्हणून पाठ्यक्रमातील ज्ञानाबरोबर शाळेतील मुले राज्य व देशातील घडामोडी बद्दल सजग बनत आहेत. जिल्हा प्रशासनाकडून घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये आमच्या शाळेचा सर्वप्रथम क्रमांक आला आहे. तसेच वादन व गीतगायन स्पर्धेमध्ये देखील आमच्या शाळेने सर्वप्रथम क्रमांक पटकवला आहे.

या लोकसहभागामुळे माझी शाळा एक समृध्द शाळा झाली आहे. लोक सहभागातून लोकांनी शारिरीक कष्टाची कामे करून झाडांसाठी खड्डे खोदणे , काटेरी कुंपण तयार करणे व इतर कामे केली व शाळेच्या वैभवात भर पाडली आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेची गोडी लागावी म्हणून आदर्श परिपाठ शाळेत घेण्यास सुरूवात केली. ज्या शाळेचा परिपाठ चांगला होईल त्या शाळेतील विद्यार्थी नक्कीच सुसंस्कारीत होतात हे मी माझ्या शाळेवरून सांगू शकतो. परिपाठामध्ये राष्ट्रगीत, प्रतिज्ञा व इतर सर्व गोष्टी तसेच श्यामची आई मधील एक कथा रोज सांगितली जाते. सर्वप्रथम वर्गातील विद्यार्थी अभ्यासात रमतील यासाठी चार मुलांचा एक मित्र गट तयार केला. स्वयंअध्ययन कार्डाद्वारे झालेल्या अभ्यासक्रमावर कार्ड त्यांना सोडवायला दिले. हळूहळू याचा परिणाम दिसायला लागला. मुलांना इंग्रजी शब्द, गणितातील बेरीज, वजाबाकी, भागाकार, सम, विषम संख्या या संकल्पना स्वतःहून समजायला लागल्या. तसेच प्रत्येक आठवड्याला घटक वार घटक चाचणी घेवून त्या अनुरूप आम्ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व विद्यार्थी घडत गेले.

शाळेची गुणवत्ता सुधारल्यानंतर पालकांचा आमच्यावरचा विश्वास वाढला. विद्यार्थी पुस्तक वाचू लागले, गणित क्रिया करू लागले, इंग्रजी शब्द सांगू लागले. त्यामुळे तांड्यातील पालकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसू लागला व स्थलांतराचे व शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी झाले.

शाळा माळरानावर असल्यामुळे व खडक, दगड असल्यामुळे शाळेत झाडे लावता येत नव्हती पण मला असे वाटत होते की, झाडाशिवाय शाळेला शोभा नाही,आपण झाडे लावली पाहिजेत परंतु सर्वात मोठा प्रश्न होता की झाडे लावायची कशी ? कारण शाळेच्या अवती भोवती सर्व खडक दगड होती. पण मी हार मानली नाही. गावकऱ्यांच्या व सहकाऱ्यांच्या मदतीने तो खडक फोडला सर्वप्रथम, खडकाला पाणी घातले तो मुरुम भूसभूसीत केला. खड्डे खोदले व काळी माती भरून त्यामध्ये झाडे लावली. शाळेमध्ये फक्त सुरूवातीला एकच झाड होते, परंतु आज घडीला जवळपास दिडशे झाडे आहेत. त्याच झाडाखाली मुले आज अभ्यास करतात. सर्व शाळा दाट

झाडीने नटून गेलेली आहे. माणसाने ठरविले तर कोणतीच गोष्ट अशक्य नाही हे यावरून ठरते. या शाळेत सर्व शासकीय योजना प्रभावीपणे राबवल्या जातात. शाळा उन्नत अभियानाची यशस्वी अंमलबजावणी या ठिकाणी झालेली आहे. शब्दकोडी सोडविणे, वैयक्तिक व सांघिक स्पर्धा, बचत बँक, बचतीचे महत्व, शालेय मंत्रीमंडळ, जो वार तो पाढा, पुण्यतिथी, जयंती, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, आठवड्यातून एक कोरडा दिवस पाळणे, अवांतर वाचनाची आवड, अपघाताच्या वेळी मदत करणे, पर्यावरण संवर्धन, सांस्कृतिक कार्यक्रम, बंजारा समाजाचा होळी सण शाळेत साजरा करून संस्कृती दर्शन असे एक ना अनेक उपक्रम या शाळेत राबवले जातात.

तसेच शालेय व्यवस्थापन समिती व शाळा यामध्ये समन्वय असणे तेवढेच महत्वाचे आहे. शालेय व्यवस्थापन समिती व गावाचे सहकार्य जर चांगले तर नक्कीच चांगला बदल घडवून आणता येतो हे आम्ही शालेय व्यवस्थापन समिती व गावकऱ्यांच्या सहकार्याच्या जोरावरच या सर्व गोष्टी करू शकलो. शालेय व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने मी माझ्या शाळेत तालुकास्तरीय शाळा व्यवस्थापन समितीची सुसंवाद कार्यशाळा घेतली व माझ्या गावच्या शाळेत व्यवस्थापन समितीने मला सहकार्य केल्यामुळेच मी माझी शाळाबाह्य मुक्त व स्थलांतर मुक्त बालक शाळा, गुणवत्तापूर्ण शाळा बनवू शकलो. हे सर्वांसमोर मांडले व याचा आदर्श घेवून आज तालुक्यातील इतर गावात सुध्दा शालेय व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून शालेय गुणवत्ता पुरक उपक्रम व स्थलांतर मुक्त बालक शाळासाठी प्रयत्न चालू आहेत.

चालु शैक्षणिक वर्षातील वैशिष्ट्यपुर्ण गोष्ट म्हणजे विद्यार्थी स्थलांतर रोखण्याबरोबर पालकांचे स्थलांतर कमी करण्यात आम्हाला यश मिळाले आहे. या यशामध्ये संजीवनी सक्षमीकरण व विकास संस्था औरंगाबाद या संस्थेचा सिंहाचा वाटा आहे. या संस्थेच्या माध्यमातून गाव व परिसरात जलसंधारणाची अनेक कामे सुरू आहेत. त्यामुळे गावातच रोजगार निर्मिती झाली तसेच अनेक स्थलांतरीत होणाऱ्या कुटुंबांना गृह उद्योगासाठी, स्वयंरोजगारासाठी भांडवल पुरविले गेले. त्यामुळे श्रीराम तांडा गावात कुक्कुटपालन, शेळी पालन, ससे पालन, किराणा दुकान, मोबाईल दुरुस्ती, वेल्डींग व्यवसाय असे अनेक रोजगार निर्मिती केंद्र सुरू झाले आहेत. त्याचा परिणाम म्हणून गावातच उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध झाले. त्यामुळे या संस्थेच्या सहकार्यामुळे विद्यार्थी बरोबरच पालकांचे स्थलांतर कमी करण्यात यश मिळाले आहे व त्याचा चांगला परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होत आहे. तसेच या संस्थेच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी 1,75,000 रूपयाचे वाटर फिल्टरची व्यवस्था उपलब्ध झाली आहे. त्याचा विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर खुप चांगला परिणाम झाला. विद्यार्थी आजारी पडण्याचे प्रमाण शुन्य झाले आहे व 100 टक्के विद्यार्थी उपस्थिती टिकवून ठेवण्यामध्येही यश मिळाले आहे. तसेच शाळेतील माजी विद्यार्थी संजय रामजी चव्हाण यांनी शाळेसाठी एलईडी स्मार्ट टीव्ही व दहा खुर्च्या शाळेस भेट दिल्या .



अशा एक ना अनेक गोष्टी जि.प.प्रा.शाळा श्रीराम तांडा ता.मंठा जि.जालना या ठिकाणी अधिकारी व पदाधिकारी वर्गाच्या मार्गदर्शनाखाली व शालेय व्यवस्थापन समिती, सहकारी शिक्षक बांधव यांच्या मदतीने मी या ठिकाणी सर्व करू शकलो. मी पाहिलेले स्वप्न पूर्ण झाल्यामुळे आज आनंद होत आहे. आपण कोणतेही काम करत असतांना ते काम आपण समाधान व आनंद मिळविण्यासाठी करीत असतो ,मला माझ्या या कार्यातून नेहमी आनंद मिळतो. शेवटी मला या ठिकाणी सांगावेसे वाटते की, आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टीकोन, परिस्थितीशी लढण्याचे सामर्थ्य व प्रत्येकाकडे माणूस म्हणून आपण पाहिल्यास आपण जीवनात किंवा कोणत्याही कार्यात नक्कीच यशस्वी होवू शकतो.

शिक्षणाद्वारे संपादन केलेल्या ज्ञानाने हे मिणमिणते विद्यार्थी रूपी दिवे पुढे तेजाने प्रकाशित होतील आणि समाजातील अज्ञानरूपी अंधकार नाहीसा करतील ही मुलांकडून अपेक्षा आहे.

धन्यवाद

मुबारक उमरअली सैय्यद
जिल्हा परिषद सेमिइंग्रजी प्राथमिक शाळा खराशी, तालुका.लाखनी, जिल्हा भंडारा
ईमेल आयडी – mubaraksaiyyad37@gmail.com



खराशी हे गाव भंडारा जिल्ह्याच्या लाखनी तालुक्यात अगदी टोकावर असलेले नक्षलग्रस्त भागातील 800 लोकसंख्येचे गाव. सन 2008 मध्ये मी या शाळेत बदलीने रुजू झालो.

या पूर्वी माझ्या सुरू नोकरीच्या गावी मी 12 वर्ष नोकरी केली, शिक्षण घेत असताना मी शिक्षक होणार असे कधीही मनातही आले नव्हते , परंतु माझ्या वडिलांची इच्छा होती की मी शिक्षक व्हावं. माझे वडील जिल्हा परिषदेत लिपिक होते आणि गीत रामायणचे उत्कृष्ठ गायक आहेत आणि सर्वधर्माचा त्यांचा अभ्यास उत्तम आहे, त्यामुळे माणूस म्हणून जन्माला आल्यावर भूतलावर शिक्षक म्हणून त्याची भूमिका इतर सर्व कार्यापेक्षा मोठी आहे असे त्यांचे नेहमी विचार असायचे. त्यांना शिक्षक होता आलं नाही म्हणून मला शिक्षकाच्या रुपात त्यांना पाहायचे होते आणि कदाचित म्हणूनच त्यांच्या अपेक्षेप्रमाणे मी शिक्षक झालो.

मी 12/12/1995 रोजी साकोली तालुक्यतील मुरमाडी तुपकर या गावी रुजू झालो आणि गावातच भाड्याची खोली करून राहायला सुरुवात केली, अविवाहित होतो, तरुण होतो , काही वेगळे आणि उत्तम करून दाखवण्याची इच्छा होती. त्यामुळे समाजात लवकरच मिसळलो, मोठं गाव 2500 लोकसंख्या, मोठी शाळा 200 पेक्षा जास्त पट त्यामुळे शिक्षक संख्या सुद्धा बरीच होती . परंतु पारंपरिक अध्यापन पद्धती मुळे माझे विचार किंवा उपक्रम यांना नेहमी विरोध मला जाणवला, परंतू गावकरी, समाज व पालक मात्र मला सहकार्य करीत होते मला इतरांपेक्षा जास्त महत्व देत होते यामुळे मला विरोधाचा तगादा सुरू झाला आणि गावातील काही स्वार्थी राजकारणी लोकांना मला

विरोध करण्याचा मार्ग मिळाला. परंतु मी मात्र माझ्या शैक्षणिक कार्यात स्वतःला झोकून टाकले होते, परंतु अनेकदा माझ्या खोट्या तक्रारी करण्याची विकृत मानसिकतेच्या लोकांची सवय वाढत चाललेली होती. शेवटी बारा वर्षे नंतर अश्याच एका तक्रारीचा उपयोग करून मी स्वतः माझी बदली स्वतः करून घेतली. खराशी हा अगदी तालुक्याच्या टोकावर असलेला गाव स्वतः मागून घेतला. त्यावेळी खराशीमध्ये सुद्धा शाळेतील शिक्षकाने पोषण आहाराच्या स्वयंपाकी महिला निवडीत राजकारण केले असा आरोप लावून त्याची बदलीसाठी शाळा बंद केली होती, त्याच गावी त्या शिक्षकाच्या ठिकाणी मी बदलीने रुजू झालो.

आपल्या परिवारासह मी खराशी या गावी भाड्याची खोली करून शाळेत रुजू झालो, गाव अगदी छोटस व गोरगरीब शेतकरी ,मजूर अश्या लोकांचे. त्यामुळे भाड्याचे घर सुद्धा अगदी छोटेसे मातीच्या भिंतीचे कवेलूचे होते. पहिल्या दिवसापासून पूर्ण गावात आपला परिचय करून घेतला, लहान मुलांना मला खूप शिकवायचं आहे फक्त आपल्या मदतीची, सहकार्याची गरज आहे अशी विनंती करू लागलो , परंतु पाहिजे तसे सहकार्य मला मिळाले नाही. तेव्हा शाळेत पालक सभा बोलावली असता 50 मुलांच्या 8 पालकांनी हजेरी लावली ,मला खूप वाईट वाटले, परंतु मी न थांबता पुढे जाण्याचा विचार केला आणि पालकांची भेट घ्यायला शेतावर, रोजगार हमीच्या कामाच्या ठिकाणी जाऊन पालकांची भेट घेऊ लागलो.

दररोज सायंकाळी 7 वाजता देवळात राष्ट्रसंताच्या ग्रामगीतेचे वाचन व्हायचे त्या ठिकाणी गावातील बरेचसे लोक गोळा व्हायचे त्या ठिकाणी जाऊन मी बोलण्याचा वेळ मागून मी माझ्या शाळेतील नवीन उपक्रमाविषयी माहिती देऊ लागलो,प्राथमिक शिक्षणाचे महत्व पटवून देऊ लागलो. त्याकरिता गावातील सेवानिवृत्त शिक्षकांची, सुशिक्षित लोकांची मार्गदर्शना करिता मदत घेऊ लागलो,हळू हळू मला समाजात परिवर्तन दिसू लागले ,त्याचवेळी माझी मोठी मुलगी सहा वर्षाची झाली असताना मी तिचा वर्ग पहिलीत पहिला प्रवेश माझ्या शाळेत नोंदविला यामुळे समाजाचे लक्ष वेधले गेले की शिक्षकानी आपल्या मुलीचा प्रवेश आपल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत केला यामुळे काही इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या मुलांच्या पालकांनी माझ्या शाळेत प्रवेश घेतला.

वर्ग 1 ते 4 असल्यामुळे आम्ही 3 शिक्षक होतो तेव्हा एक वर्गाची जबाबदारी माझ्या पत्नीने घेतली ती बीए बीएड असल्याने तिची मला विद्यार्थी विकासात मोलाची मदत झाली. सुटीच्या दिवशी ती घरी सर्व गावातील विद्यार्थ्यांचे निशुल्क वर्ग घेऊ लागली, शाळा सुशोभित करण्याचे कार्य, स्वच्छता कार्य, पोषण आहार शिजवण्यासाठी मदत, महिला जागृती, माता पालकांना गृहपाठ घेण्यासाठी मार्गदर्शन असल्या अनेक बाबीसाठी माझी पत्नी सदैव माझ्या पाठीशी उभी राहिली.

माझे सहकारी शिक्षक राम चाचेरे हा अगदी तरुण विवाहित होता माझ्या सारखा तो पण गावातच भाड्याची खोली करून राहायचा. मला तरुण शिक्षक म्हणून जे पूर्व अनुभव आले होते त्यातून मी बराचसे शिकलो होतो. तो अनुभव मी माझ्या सहाय्यक शिक्षकाला येऊ दिला नाही. उलट त्याच्या विचारांना प्रेरणा दिली सहकार्य केले आणि त्यामुळे आम्हाला वेगाने प्रगती साधता आली.

आम्ही सर्वप्रथम विद्यार्थ्याच्या उपस्थितीवर लक्ष केंद्रित केले. बरीच मुले आई वडिलांच्या सोबत शेतावर किंवा जंगलात शाळेला बुट्टी मारून जायचे, पालकांना संपर्क साधला तर शाळेबद्दल उदासीनता दिसली. तेव्हा प्रत्यक्ष

शेतावर आणि जंगलात जाऊन त्यांना समजावून शाळेत आणू लागलो. दर दिवशी दोन मुले या प्रमाणे आळीपाळीने मी आणि माझे सहाय्यक राम सर यांनी ही चळवळ चालविली . अश्या मुलांच्या कडे शाळेत विशेष लक्ष दिले जात होते त्यांना शाळा आवडावी म्हणून मनोरंजन व आनंददायी पद्धतीने अध्यापन केले. या मुलांना शालेय कामात गुंतवण्यासाठी त्यांना नेतृत्व दिले गेल्याने नंतर त्यांच्या अनुपस्थितीचा प्रश्नच निर्माण झाला नाही

गावात गरीब समाज असल्याने कामासाठी बरेच कुटुंब महिना, दोन महिन्यासाठी स्थलांतर करायचे व पूर्ण परिवारासह आपल्या लहान मुलांनाही घेऊन जायचे, त्यामुळे बरेच मुले या कालावधीकरिता शाळेला मुकायचे. या परिवाराना समजावण्याचा प्रयत्न अनेकदा केला, तेव्हा आम्ही मुलांना ठेवायचे कुठे असा त्यांचा प्रश्न असायचा तेव्हा एकदा मी स्वतः त्यांना म्हणालो की, ' मी तुमच्या मुलांना आपल्या घरी ठेवतो पण त्यांना शाळेपासून दूर नेऊ नका,' आणि एकदा दोन मुलींना माझ्याकडे व दोन मुले राम चाचेरे सरांनी आठवडाभर आपल्या घरी ठेवले. तेव्हा त्यांच्या परिवाराने आपल्या दूरच्या नातेवाईकांना गावी आणले व मुलांना शाळेत जाण्यासाठी गावीच ठेवले. फक्त आठवडाभर त्या मुलांना आम्ही शिक्षकांनी आपल्या घरी ठेवल्याने शिक्षणाचे महत्व आणि शिक्षकाची इच्छाशक्ती त्यांनी हेरली. यामुळे पुढे या मुलांबाबत अशी समस्या आली नाही.

पटसंख्येप्रमाणे 100 टक्के मुले दररोज उपस्थित राहू लागले, आता गरज होती प्रसन्न वातावरण, भौतिक सोयी सुविधांची , कारण जुनी शाळा इमारत जीर्ण झालेली दोन वर्ग खोल्यांची होती. मातीच्या जुडाईच्या भिंती आणि छतावर कवेलू, पावसाळ्यात अक्षरशः मुलांना सुरक्षितता म्हणून सुट्टी द्यावी लागे, मैदानावर एक ते दीड फूट पाणी साचायचे, वर्ग खोल्यात पाणी शिरायचे. तेव्हा सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत नवीन वर्ग खोली मागणीसाठी मी स्वतः शाळा इमारतीचा फोटो घेऊन माननीय मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांच्या कडे गेलो , त्यांनी माझा परिचय विचारला तेव्हा मुख्याध्यापक स्वतः वर्गखोलीसाठी येतोय नाहीतर फक्त ठेकेदार लोक मागणी घालायला येतात असे बोलून मुख्य कार्यकारी अधिकारी मॅडम खुश झाल्या व मला लगेच एक वर्गखोली मंजूर करून दिली आणि इथूनच सुंदर शाळा इमारतीच्या निर्माणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. जुनी इमारत पाडून त्यांच्या निघालेल्या चांगल्या विटा गोळा करण्यासाठी गावातील महिलांनी प्रत्येक दिवशी शाळेला निशुल्क एक तास दिला. त्या विटा मधुन काही लोकवर्गणी करून शालेय आवरभिंतीचे बांधकाम सुरू केले आणि शाळा चारही बाजूनी सुरक्षित झाली. पहिल्या वर्ग खोली बांधकामातून काही रक्कम शिल्लक उरली कारण कुठल्याही ठेकेदाराला काम न देता गाव पातळीवर शाळा व्यवस्थापन समितीच्या मार्गदर्शनात शाळेतच बांधकाम करण्यात आल्याने शिल्लक रकमेतून शाळेजवळ असलेला हाताने हलवून पाणी काढण्याच्या बोअरवेलवर पाण्याची मोटरपम्प बसवली. काही लोकवर्गणी करून पाण्याची टाकी बसवून पिण्याच्या पाण्यासाठी नळओटा बनवला.दुसऱ्या वर्ग खोली बांधकामातून बगीचा व लाँन तयार केला, एक मुलींसाठी शौचालय बांधले. आज शाळेची पटसंख्या वाढल्याने पाच वर्ग खोल्याचे बांधकाम झाले आहे व त्या बांधकामातून एक मुख्याध्यापक खोली, एक डिजिटल वर्गखोली,स्वयंपाक गृह असे अतिरिक्त बांधकाम झालेले आहे.

भौतिक सुविधा, क्रीडा साहित्य, मैदान या सर्व बाबीसाठी मला उत्कृष्ठ सहभाग समाजाने दिला .यात गावचे सरपंच सुभाष ढोके आणि उपसरपंच योगराज झलके ही जोडी माझ्या शाळा विकासाचे प्रमुख भागीदार आहेत हे मी

कधीच विसरणार नाही, कारण माझ्या प्रत्येक निर्णयास सकारात्मकपणे स्विकारून हे दोघेही नेहमी चांगल्या किंवा कठीण प्रसंगी माझ्या पाठीशी उभे राहिले कदाचित असे चित्र बऱ्याच गावी दिसत नाही आणि त्यामुळे शाळा विकासात अडचणी निर्माण होतात असे मला वाटते.

दिवसा अध्यापन व रात्री दररोज पाच मुलांच्या घरी गृह भेटी हा आमचा दोन्ही शिक्षकांचा नित्यनियम त्यात माझी पत्नी आलिया सुद्धा मदत करायची. दररोजच्या गृहभेटीमुळे मुले अभ्यासाकडे वळू लागली. कसा व किती अभ्यास करायचा, लेखन केव्हा करायचे आणि आज नेमका कोणता अभ्यास आहे हे घरच्या पालक मंडळींना कळायला लागले आणि गुरुजी येतात म्हणून मुले नियमित अभ्यास करू लागले. आज या उपक्रमामुळे मुलांना अभ्यासाची सवय अशी जडली की एक ते चार वर्गाची सर्व मुले रात्री 10 पर्यंत झोपत नाही, 9 वाजेपूर्वी पालक जेवण देत नाही आणि 7 नंतर टीव्ही सूरु राहत नाही. या त्रिसूत्री चे पालन पालक व मुले करतात आता आम्हा शिक्षकांना निरीक्षण करण्याची गरज राहिली नाही .

शैक्षणिक साहित्य निर्मिती व बोलक्या वर्गखोल्या या करिता गृहभेटी नंतर शाळेत मी, माझी पत्नी , सहाय्यक शिक्षक राम चाचेरे व गावातील काही तरुण सुशिक्षित मिळून रात्री बारा वाजे पर्यंत भिंतींवर चित्र काढणे , चार्ट तयार करणे, थर्माकोलचे साहित्य बनवणे इतर कामे करायचो .माझी पत्नी शाळेतच स्वयंपाक करायची सर्व जण तिथेच जेवण करायचो तो प्रसंग आजही माझ्या स्मरणात आहे. या सर्व कामाची पावती समाज पण देऊ लागला , आम्ही शिक्षकांनी शाळा घरात नेली आणि घर शाळेत आणले .

आज गावकऱ्यांनी देवळातील दानपेटी शाळेत आणून ठेवली आहे, शाळेला कुलूप लावले जात नाही , दररोज दोन महिला किंवा पुरुष पालक शाळा उघडून शाळा परिसर स्वच्छ करण्याची जबाबदारी नित्य नियमाने पार पाडतात.शालेय बागेला पाणी घालणे त्याची काळजी घेणे या सर्व बाबी पालकांनी स्वीकारल्या आहेत. प्रत्येक महिन्यातुन दोन वेळा गवंडी, प्लंबर, इलेक्ट्रिशियन शाळेत येऊन कुठलंही काम असल्यास निशुल्क करून देतात. शाळा हे समाजाच्या शिक्षणाचे मंदिर आहे हे माझ्या खराशीच्या गावकऱ्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

भौतिक सुविधांनी नटलेली शाळा निर्माण झाली , समाज व पालकांचा सहभाग मिळू लागला ,आता सुरुवात झाली नवनवीन कृतीयुक्त उपक्रमांची, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त, स्वावलंबन, प्रामाणिकता,सृजनशीलता व शाळा व अभ्यासाची आवड या बाबींचा अंतर्भाव केला गेला.

त्यावेळी सरकारी नियमानुसार शाळा सुरू साडेदहा वाजता व्हायची आणि पाच वाजता सुट्टी. परंतु खराशी शाळा साडेनऊ वाजता भरायला लागली व सहा वाजता सुटायला लागली या करिता सर्वप्रथम शाळेची घंटा नदीत विसर्जित केली. त्यामुळे सर्वजण घंटे वर अवलंबून न राहता स्वयंप्रेरित होऊन एक तास अगोदर येऊ लागलो आणि एक तास नंतर घरी जाऊ लागलो , या सकाळ आणि सायंकाळच्या दोन वेळच्या अतिरिक्त एक एक तासाचा उपक्रमासाठी उपयोग केला गेला. जसे 9 ते 9.30 पर्यंत शिक्षक, विद्यार्थी व पाळी पाळीने नेमलेले पालक मिळून शाळा परिसर , वर्गखोल्या, शौचालय, वॉशबेसिन ,मैदान स्वच्छता करायला लागलो. 9.30 ते 10 पर्यंत गृहकार्य तपासणी. यात संपूर्ण 148 विद्यार्थ्यांच्या गृहकार्य तपासण्यासाठी वर्गात मुलांचे गट तयार करण्यात आले, शिक्षकांच्या नेतृत्वात प्रत्येक गटातील गटप्रमुख आपल्या गटाचे गृहकार्य तपासणी करून ज्याच्या अडचणी आहेत अश्या मुलांचे

गृहकार्य तपासणी साठी वर्ग शिक्षकां कडे दिले जाते . त्यामुळे अर्ध्या तासात संपूर्ण मुलांचे गृहकार्य मैदानावरच तपासणी करण्यात येते आणि याच कालावधीत सर्वांना आपले केलेले गृहकार्याचे वाचन करावे लागते.

10 ते 10.30 या दरम्यान थेंबे थेंबे तळे साचे पद्धतीने विद्यार्थी बँक व्यवहार सुरू करण्यात येतो. ज्यामध्ये मुले घरून शाळेत येताना आई वडिलांकडून खाऊसाठी पैसे आणायचे आणि शाळेबाहेर बसलेल्या लोकांकडून उघड्यावरचे पदार्थ विकत घेऊन खायचे. त्यामुळे त्यांची अनेकदा प्रकृती बिघडायची आणि शाळेबाहेरील विक्रेत्यावरही आपण बंधन घालू शकत नव्हतो. तेव्हा या विद्यार्थी बँकेची कल्पना मला सुचली आणि मी स्वतः सर्व मुलांच्या नावाचे छान पासबुक प्रिंट करून घेतलं त्यावर त्यांचे फोटो चिटकवले आणि त्यांना सांगितलं की, ' आपण जर आपले खाऊचे पैसे यात गोळा करीत असाल तर ही सुंदर पासबुक आपणांस देण्यात येईल.' सुरुवतीला काही मुलांनी ती स्वीकारली आणि बँक सुरू झाली मुलांच्या बचतीचे फलित असे झाले की 100 टक्के मुलांनी बँकेत बचतीचा निर्धार केला. पालकांनी सहकार्य केले गरीब विद्यार्थी एक, दोन व पाच रुपये दररोज आणू लागला. विद्यार्थी स्वतः कॅशियर , मॅनेजर, लेखनिक बनले आणि आज घडीला 148 मुलांचे 5 लक्ष 72 हजार रुपये जमा झाले. यातून वर्ग 4 मधून उत्तीर्ण झाल्यावर त्याची व्याजासह सर्व रक्कम परत दिली जाते. परंतु पूर्वीच्या तीन वर्षाला मिळवणाऱ्या सर्व व्याजातून मुलाच्या इतर शैक्षणिक साहित्य व गरजा पालक सभेच्या परवानगीने पूर्ण केल्या जातात. आई वडिलांना त्या करिता त्रास न देता शाळा पातळीवरच सर्व मुलांसाठी सारखे साहित्य, अवांतर वाचनासाठी मासिके, प्रश्न पत्रिका, सहल फी, नोटबुक, वह्या अश्या आवश्यक त्या सर्व बाबी शाळेतच प्राप्त करून दिल्या जातात, याखेरीज विद्यार्थीच बँक व्यवहार सांभाळत असल्याने बेरीज- वजाबाकीची क्रिया अगदी सहजतेने करतात. पहिल्या वर्गातून मुलांना या उपक्रमाचे महत्व कळायला लागले आणि या उपक्रमाचे फलित म्हणजे अनेक वर्षांपासून सुरू या उपक्रमात एकही रुपयाची हेराफेरी झालेली नाही अगदी प्रामाणिकपणे मुले ही जबाबदारी पार पाडीत आहे



माझ्या शाळेत 10.30 ला शालेय परिपाठाला सुरुवात होते परिपाठ हा ज्ञान संवर्धनासाठी उत्कृष्ठ माध्यम. त्याचा अगदी योग्य उपयोग माझ्या शाळेत केला जातो. यामध्ये आनंददायी पद्धतीचा वापर करून मनोरंजक पद्धतीने संपूर्ण विद्यार्थ्याचा सहभाग होईल असे प्रयत्न केले जातात. परिपाठात राष्ट्रगीत इंग्रजी व मराठीतून प्रतिज्ञा व संविधान झाल्यावर पहिला घटक असतो, दिनांक तो पाढा या मुळे महिन्याच्या तारखा प्रमाणे मुलांना मराठीतून व इंग्रजीतून पाढे पाठ झाले आहेत, दुसरा घटक असतो दिनविशेष, यातील एक घटक घेऊन शिक्षकांनी आधी कृतीद्वारे माहिती सादर करायची नंतर एक आठवडाभर त्यावर मुले माहिती गोळा करून चर्चा करतात. (या साठी गुगल, वाचनालयातील पुस्तके, वर्तमानपत्र यांचा वापर करतात, 75 टक्के मुले गुगल बॉय म्हणून ओळखले जातात) उदा. दिनविशेष आहे गॅलिलिओने गुरू या ग्रहाचा शोध लावला. या घटकावरून आधी पृथ्वी गोलाच वापर करून पृथ्वी, चंद्र यांची संकल्पना स्पष्ट करून सूर्यमाला , सूर्यमालेतील ग्रहांची मराठी इंग्रजीत नावे , प्रत्येक ग्रहाची कक्षा क्रमांक, ग्रहांच्या आकाराची तुलना, त्यांचा व्यास, त्यांना स्वतः भोवती फिरण्यास व सूर्या भोवती प्रदक्षिणा घालण्यास लागणारा अवधी, त्याचा शोध लावणाऱ्या व्यक्ती अशा अनेक बाबी मुले स्वतः शोधून आणून आठवडाभर सादर करतात.



त्यामुळे इयत्ता 1 ली ते 4 थी वर्गाला अनेक विषयाची सखोल माहिती अद्ययावत झालेली आहे. त्यात पौराणिक, ऐतिहासिक, वर्तमान व भविष्यातील घडामोडीवर सर्व मुले परिपाठात मोकळेपणाने चर्चा करतात आणि ही सर्व माहिती ऐकून लहान वर्गातील मुले पण बोलके होतात यामुळे या मुलांची MPSC ची अर्धी तयारी चौथ्या वर्गात होऊन गेली आहे असे अनेक भेटी देणारे व्यक्त करतात.

या नंतरचा घटक असतो सामान्य ज्ञान यात अद्यावत झालेल्या ज्ञानाला पुन्हा प्रश्न विचारून जागृत केले जाते. त्या नंतर घटक असतो मी इंग्रजी बोलणार यामध्ये मराठी वाक्याचे इंग्रजीतून भाषांतर विद्यार्थी करतात उदा .

वर्ग पहिली साठी ती मुलगी आहे, दुसरीला ती मुलगी आहे व ती झाडाकडे जात आहे, तिसरी ला ती मुलगी आहे ती झाडाकडे जात आहे तिने झाडाची फुले तोडली, चौथी साठी ती मुलगी आहे ती झाडाकडे जात आहे तिने झाडाची फुले तोडून वेणी बनवली आणि आपल्या केसात माळली या पद्धतीने सराव करतात. त्या नंतर घटक असतो आजचे सुविचार या मध्ये सुविचाराचे अर्थ बोधकथा किंवा चर्चा करून मुले स्पष्ट करतात. त्या नंतर मला माहित आहे या घटकानुसार एखाद्या विषयावर माहिती गोळा करून सांगणे उदा . कोरोना चा उगम , प्रसार, बाधित देश, प्रतिबंधात्मक उपाय.या नंतरचा घटक माझा प्रश्न या मध्ये उदा. आकाश निळे का दिसते ? सूर्य किरणातील रंग, रमण इफेक्ट , नोबेल पारितोषिक , विज्ञान दिन, आकाशाचा खरा रंग , पृथ्वी निळी का दिसते? इत्यादी सर्व बाबी बद्दल त्यांना माहिती झालेली आहे. या नंतर "सोडवा बघू" यामध्ये एक शाब्दिक गणिताचा प्रश्न लवकरात लवकर कोण सोडवतो हे बघून विजेता घोषित केला जातो. परिपाठ सादर करणाऱ्या चमूला मुले गुणांकन करतात किंवा परिपाठ मधील नवीन आणि महत्वाच्या बाबी टिपतात किंवा झालेल्या चुका पण लक्षात आणून देतात यामुळे मुलांचे अवधान वाढविता येते. परिपाठ सप्ताहात दोन दिवस मराठी, दोन दिवस हिंदी , दोन दिवस इंग्रजी भाषेतून होतो.



इंग्रजी संभाषण कौशल्य वाढविण्याकरिता इंग्रजीचा भाषा म्हणून उपयोग केला जातो. मुलांना कोणतेही कार्य सांगताना, सूचना देतांना किंवा कुठलही संभाषण करीत असतांना शब्दांचा , वाक्यांचा जास्तीत जास्त वापर शिक्षकांनी केला , कृतीयुक्त शब्दांचा जास्तीत जास्त वापर केल्याने शिक्षक विद्यार्थी, विद्यार्थी – विद्यार्थी , विद्यार्थी - पालक यांच्यातील संभाषण साधतांना काही वाक्याची निश्चिती करून इंग्रजी भाषा कौशल्य वृद्धीसाठी वातावरण तयार केले आहे. त्यामुळे वर्ग 1ली ते 4 च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा सोपी वाटायला लागली तसेच परिसर अभ्यास

वर्ग तिसरी व चौथीला मराठीत असतो. त्या विषयाला मराठीत समजावून देऊन त्याला इंग्रजीतून कसे मांडावे याचे कौशल्य मुलांना सहजतेने हाताळता येण्याचा सराव देण्यात आला आहे.पालकांना पालक भेटीत किंवा पालक सभेत मुलांशी दैनंदिन जीवनात मराठीतील बोलले जाणारे वाक्य इंग्रजीतून कसे बोलावे या बद्दल मार्गदर्शन केल्याने घरी सुद्धा इंग्रजीचे वातावरण तयार झाले आहे.

पूर्व प्राथमिक शाळा (अंगणवाडी) ला जिल्हा परिषदेचे प्ले स्कूल बनविले आहे . प्राथमिक शाळेला लागूनच अनेक ग्रामीण भागात 3 ते 5 वयोगटाच्या मुलांसाठी अंगणवाडी असते , तिच्या वर ICDS विभागाचे नियंत्रण असते. त्यामुळे बरेचदा प्राथमिक शाळा व अंगणवाडीचा काहीही सहसंबंध दिसत नाही. परंतु खऱ्या अर्थाने मुलांच्या शैक्षणिक जीवनाचे पहिले पाऊल अंगणवाडीतूनच पडत असते, त्यांचे विचार, शिक्षणाबद्दल आवड, बोलण्याची क्षमता, शिस्त यासारख्या बाबी हसत खेळत व आनंददायी पद्धतीने या वयात आत्मसात केले गेले तर पुढील प्राथमिक शिक्षण प्रवाहात ती मुले अगदी सहजतेने येतात. त्यामुळे खराशीच्या अंगणवाडीला प्राथमिक शाळेचा भाग समजून त्यांच्या भौतिक सुविधा , शैक्षणिक साहित्य,डिजिटल वर्ग , अंगणवाडी पालकांच्या सभा या सर्व बाबीवर आम्ही लक्ष घातले आहे. अंगणवाडी सेविकासुद्धा आमची सहाय्यक शिक्षिका असून तिचे महत्व आमच्यापेक्षाही जास्त आहे असे वातावरण निर्माण केले. त्यामुळे प्रत्येक प्राथमिक शाळेच्या उपक्रमात अंगणवाडी हा घटक अनिवार्य झाल्याने पहिल्या वर्गात येणारा विद्यार्थी हा लेखन, वाचन, संभाषण कौशल्य अद्ययावत असलेला मिळू लागला आहे. त्याचबरोबर शिस्त आणि शाळेवर प्रेम करणारा विद्यार्थी लहानपणी तयार होत असल्याने प्राथमिक शिक्षण अगदी सहजतेने व 100 टक्के उपस्थितीत होऊ लागले आहे.



लहान वयातच स्पर्धा परीक्षेची समज मुलांना प्राप्त झाली पाहिजे.आमच्या शाळेत पहिली पासून शाळा स्तरावर अशा परिक्षाचे आयोजन शाळा पातळीवर उपक्रमाद्वारे केले जाते. त्यामुळे लहानपणापासूनच मुलांना

शिष्यवृत्ती व नवोदय (केंद्रीय विद्यालय) अशा स्पर्धा परीक्षा ची आवड निर्माण होते त्यामुळे आमच्या शाळेतून चौथ्या वर्गातून शाळा सोडल्यानंतरही आसपासच्या शाळेत 5 व्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या मुलांचे निशुल्क मार्गदर्शन वर्ग शाळेत सुरू केले आहे कारण या दोन्ही परीक्षा 5 व्या वर्गातच होत असतात यासाठी आमच्या शाळेत नव्याने रुजू झालेले तरुण शिक्षक सतीश चिंधालोरे यांची मोलाची भूमिका आहे .सतीश सरांची हातोटी आणि आम्हा इतर शिक्षकांच्या सहकार्याने मागील 7 वर्षात नवोदयला 23 मुलाची निवड झाली आणि शिष्यवृत्तीचा निकाल 100 टक्के लागत आहे. त्यामध्ये राज्यातून अव्वल येणाऱ्या मध्ये खराशीची मुले दिसू लागली आहेत . या वातावरणामुळे येणाऱ्या काही वर्षात खराशी शाळेचे मुले UPSC आणि MPSC च्या यादित दिसणार हा विश्वास आम्हाला आहे.



जिल्हा परिषदेची एक उपक्रमशील शाळा , शिस्त,संस्कार व सर्वांगीण गुणवत्ताधारक विद्यार्थी तयार करणारी शाळा म्हणून आमची शाळा लवकरच जिल्ह्यात व राज्यात नावारूपास आली आहे. सन 2011मध्ये शासन स्तरावर झालेल्या गुणवत्ता विकास मूल्यमापनात खराशी शाळेचा नागपूर विभागात अव्वल क्रमांक आला आणि शाळा प्रकाश झोतात आली. त्यामुळे जिल्हा व जिल्हयाबाहेरील अभ्यासकांच्या भेटीचे सत्र सुरू झाले.आजपावेतो 2 लक्ष पेक्षा जास्त अभ्यासकांनी खराशी शाळेला स्वेच्छेने भेटी दिल्या आहेत. शाळा प्रवेशासाठी अनेक पालक इंग्रजी माध्यमातून आपल्या मुलांना काढून खराशी शाळेत प्रवेशा साठी रांगा लावतात. पुढील दोन वर्षांचे प्रवेश आताच निश्चित झाले आहेत, वर्ग चौथीतुन बाहेर पडणाऱ्या मुलांच्या प्रमाणातच वर्ग पहिली मध्ये प्रवेश देण्याचा निर्णय शाळा समितीने घेतला आहे. ,आजूबाजूच्या जिल्हा परिषदेच्या शाळा बंद पडू नयेत म्हणून हा निर्णय घेतला आहे अन्यथा खराशी शाळेची पटसंख्या केव्हाचीच हजारापेक्षा जास्त झाली असती,

एकूण 20 ते 25 किलोमीटरच्या परिसरातून 24 गावातील विद्यार्थी खराशी शाळेमध्ये येतात. प्रत्येक गावातून दोन किंवा तीन मुलांना जो पहिला प्रवेशाकरिता अर्ज करतो अशा विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो, त्याचे पालक मिळून वाहनांची व्यवस्था करतात. काही मुले 80 ते 90 किलोमीटर वरून प्रवेशासाठी येतात आणि भाड्याच्या खोल्या करून खराशी मध्ये परिवारासह वास्तव्य करतात. खराशी शाळेमुळे गावातील व गावाजवळील चार ते पाच इंग्रजी शाळा बंद झाल्या आहेत. इंग्रजी माध्यमातून जास्तीत जास्त विद्यार्थी खराशीच्या मराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतल्याबद्दल हिवाळी अधिवेशनात मान. मुख्यमंत्री यांच्या हस्ते मुख्याध्यापक म्हणून माझा गौरव झालेला आहे.

शाळेला प्राप्त पारितोषिके

1) शाळासिद्धी उपक्रमात राज्यात मानांकित शाळा
2) राज्यातील 7 नामांकित शाळा मधून विदर्भातील एकमेव शाळा
3) गुणवत्ता विकास कार्यक्रमात नागपूर विभागात अव्वल
4) नागपूर विभागातील स्वछ व सुंदर शाळा
5) माझी शाळा व माझी मुले या उपक्रमात जिल्ह्यात सतत अव्वल
6) भंडारा जिल्ह्यातील पहिली सेमीइंग्रजी माध्यम स्वीकारणारी व डिजिटल होणारी व 100 टक्के उपस्थिती

मी शिक्षक असल्याने शिक्षणाचा प्रसार व प्रचार यात माझी भूमिका महत्त्वाची आहे, ग्रामीण भागातील मुलांचे गावातील शाळेतच उत्कृष्ठ शिक्षण होऊ शकते आणि ते आपण देऊ शकतो ही बाब खराशी शाळेच्या प्रगती वरून समाजापुढे आलेली आहे त्यामुळे असे प्रयत्न करणाऱ्या ग्रामीण भागातील शाळांचे मी पालकत्व स्विकारलेले आहे. विदर्भातील जवळपास 400 गावातील शाळाना मी सुटी कालावधीत भेटी देऊन विद्यार्थी , पालक ,शिक्षक व समाज यांना मार्गदर्शन व सहकार्य करीत असतो. खराशी शाळेच्या उपक्रमाची दखल घेऊन अलिबाग, सांगली सारख्या जिल्ह्यातील काही शाळांनी मला बोलावून मार्गदर्शन घेतले आहे.

एकंदरीत मला विश्वास आहे की शिक्षक शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडवून आणू शकतो. फक्त स्वतःवर विश्वास असायला पाहिजे. परिस्थिती कसलीही असो ,बदल नक्कीच होतो फक्त प्रयत्नात निरंतरता असायला पाहिजे.

धन्यवाद

अभिमन नामदेव कोळी
जिल्हा परिषद शाळा,कोळपांढरी, तालुका.शहादा,जिल्हा.नंदुरबार
ईमेल आयडी - abhimankoli1111@gmail.com

प्रास्ताविक-

प्राथमिक शिक्षण मानवी जीवनाला कलाटणी देणारे आहे. प्राथमिक शिक्षण ही माणसाच्या बदलाची गुरूकिल्ली आहे. ६ ते १४ वयोगटातील मुलांचे किमान उच्च प्राथमिक पर्यंतचे शिक्षण पूर्ण करता यावे म्हणून ते सक्तीचे व मोफत करण्यात आलेले आहे.

प्राथमिक शिक्षण सर्वाना पूर्ण करता यावे व शिक्षणातील सामाजिक अडसर दूर व्हावेत व प्रत्येक बालकाला शिक्षण घेण्याची संधी मिळावी हे यात गृहीत धरलेले आहे. त्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीची जबाबदारी व अधिकारही वाढविण्यात आलेले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा परिषद शाळा कोळपांढरी येथे लोक सहभागातून व लोकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जात आहे व तो यशस्वी होतांना दिसत आहे.

मात्र वरील शिक्षणाची उदिदष्टे ही सहजासहजी पूर्ण झालेली नाहीत. त्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती यांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागला.

1. विद्यार्थ्यांची १००% पटनोंदणी व उपस्थिती.
2. विद्यार्थ्याच्या मनातील इंग्रजी विषयाची भिती दूर करणे.
3. गावात शाळा व शाळेत गाव उदिदष्ट पूर्ण करणे.
4. भौतिक सुविधांचा कतरतेमुळे निर्माण होणाऱ्या अडचणींवर मात करणे.
5. पालकांचे व पर्यायाने विद्यार्थ्याचे स्थलांतर थांबवणे.
6. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे.
7. सर्व विद्यार्थी प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेत पूर्ण करतील यासाठी प्रयत्न करणे.

बहुतेक सर्व शाळामध्ये विशेषत: आदिवासी बहुल भागात वरील सर्व समस्या निर्माण होतांना दिसतात. त्याच समस्या जिल्हा परिषद शाळा कोळपांढरी येथे सुध्दा निर्माण झाल्या होत्या त्यातील प्रमुख दोन समस्या पुढील प्रमाणे आहेत.

गावात शाळा व शाळेत गाव उद्दिष्ट पूर्ण करणे. प्राथमिक शिक्षणात शाळा व लोक सहभाग यांना खूप महत्वाचे स्थान आहे. कारण दोघांच्या सामंजस्यावर गावाचा विकास अवलंबून असतो. कारण आज शाळेत शिक्षण घेणारा विद्यार्थी उदयाचा गावाचा पर्यायाने देशाचा सुज्ञ नागरिक तयार होणार आहे. प्रत्येक गाव व कुटुंबाच्या समस्या वेगवेगळया असतात. त्याची सोडवणूक स्थानिक पातळीवरून म्हणजे गावातच होऊ शकते.

कोळपांढरी गावात शाळा होती मात्र शाळेत गावाच्या म्हणजेच लोकांचा सहभाग अत्यल्प होता. कारण शाळा व तिचा दर्जा गावातील लोक सहभागावर अवलंबुन असतो. जि.प. कोळपांढरी शाळेत लोकांचा सहभाग कमी असण्याचे कारण म्हणजे शालेय वातावरण उदासीन असणे होय.

शाळेतील सहभाग वाढवण्यासाठी तीन वर्षा पूर्वी चांगली सुरूवात झाली त्याला कारण म्हणजे त्यावेळचे मुख्याध्यापक श्री प्रकाश चंद्रकांत मोरे सर. त्यांनी पालक सभा घेतल्या,पालकांच्या भेटीगाठी घेतल्या,तुमची मुलं शिकतील असा विश्वास पालकांच्या मनात निर्माण करायला सुरूवात झाली व शाळेत लोकांचा सहभाग वाढण्यास सुरूवात झाली. तदनंतर मागील वर्षापासून मी व इतर सर्व शिक्षक यांनी पालकांच्या मनात शाळेबद्दलचा आदर निर्माण करण्यास सुरूवात केलीव त्यात आम्ही यशस्वीही झालो.

त्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठीत केली. या समिती मध्ये ७५% पालक सदस्य असतात. हे पालकांना समजावून सांगितले. शाळा व्यवस्थापन समिती शाळा विकासात व पर्यायाने गाव विकासात किती मोठी जबाबदारी पार पाडते याचे महत्व समजावून दिले. त्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीच्या सहाय्याने पालकांचा शाळेच्या उपक्रमात , कार्यक्रमात , पटनोंदणी, स्थलांतर, शाळा समृध्दी , मुलांची गुणवत्ता वाढ यात सहभाग घेता येतो यांची मांडणी केली.

त्यासाठी लोकांसोबत बोलणे त्यांच्याशी चर्चा करणे आवश्यक होते. पालकांचा सहभाग आणि शिक्षणाची जबाबदारी परिसरातील घटक, शाळा , यांच्याशी संपर्क, त्यांचा सहभाग, शेतकरी, कष्टकरी व गरीब सामाजिक कार्य करणाऱ्या सर्व लोकांना शाळेने सामावून घेतले शिक्षणाचे महत्व पटवून दिले व यांच्या सहभागातूनच शाळा विकासाच्या मार्गावर कशी येऊ शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे जिल्हा परिषद शाळा कोळपांढरी ता.शहादा जि.नंदुरबार. आज पालकांना विद्यार्थ्यांच्या गुणवत्ते बाबत, इतर उपक्रमाबाबत माहिती देण्यासाठी शाळेत आमंत्रित केले जाते. त्यांना वैयक्तिक मुलांच्या जमेच्या बाजु व कच्चे दुवे यासंबंधी चर्चा करून गुणवत्ता तपासणी करण्यास सांगितली जाते. त्यासाठी मिडीयाचा वापर थोडया फार प्रमाणात केला जातो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व्हिडीओ व फोटो पालकांना पाठवण्यात येतात. त्यावरून विद्यार्थ्यांची प्रगती पालकांना समजू शकते. वरील विविध कारणांमुळे पालकांना जिल्हा परिषद शाळा आपली वाटू लागली आहे.



इंग्रजी विषयाची भिती विद्यार्थ्यांच्या मनातून गायब झाली. आज ७०% समाज ग्रामीण भागात आहे.इंग्रजीच्या भीतीमुळे या विषयासंबंधी शिक्षणाची अनास्था जास्त असल्याचे पाहावयास मिळते. तीच

परिस्थिती जिल्हा परिषद शाळा कोळपांढरीची होती. मात्र मागील दोन ते तीन वर्षापासून ही भिती आपणास कमी होवू लागल्याचे पाहावयास मिळते.

इंग्रजी भाषा ही परकीय भाषा आहे, त्यातच या गावात व परिसरात बोलीभाषा पावरी ही आदिवासी भाषा आणि शिक्षण मराठी भाषेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाबद्दल जास्तच भिती वाटत होती. व पर्यायाने विद्यार्थी या विषयात मागे पडत होते. पुढे माध्यमिक शिक्षणात या भाषेमुळे अनेक मुले मध्येच शिक्षण सोडतांना दिसायचे .

वरील बाबींचा विचार करून मागील दोन तीन वर्षापासून इंग्रजी विषय सुलभपणे व विद्यार्थी या विषयाला आत्मविश्वासाने पेलू शकेल यासाठी अध्ययन अध्यापनात विद्यार्थ्यांना समजेल, रूची वाढेल व त्यांचा आत्मविश्वास वाढेल या पध्दतीने शिकवण्यास सुरूवात झाली. त्यासाठी सचित्र बालमित्र या पुस्तकाचा आधार घेण्यात आला. व विद्यार्थ्यांना एकाच वेळी मराठी व इंग्रजी विषयाचे अध्ययन व अध्यापन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यासाठी विद्यार्थ्यांना १ ली व २रीतच इंग्रजी मुळाक्षरांची ओळख, चित्रे व शब्दोच्चारणाचा सराव देण्यात येऊ लागला. परिपाठात सुध्दा त्याची तयारी करण्यात येऊ लागली. त्यामुळे विद्यार्थ्यांना या विषयात आवड निर्माण झाली. आम्हा सर्व शिक्षकांचे मुख्य उद्दिष्ट होते ते म्हणजे इंग्रजी विषयाची विद्यार्थ्यांमध्ये रूची निर्माण होऊन या विषयाची त्यांच्या मनात असणारी भिती दूर करणे, व यात आम्ही काही प्रमाणात यशस्वी झालेलो आहोत.

आमच्या शाळेतील शिक्षीका श्रीमती रेखा सोनवणे, श्रीमती ज्योत्सना निकुंभ व श्रीमती कल्पना रावताळे मॅडम यांचे इंग्रजीचे cursive लिपीतील अक्षर सुंदर आहे. त्याचा उपयोग विद्यार्थ्यांना cursive लिपीत सुध्दा लेखन करता यावे यासाठी त्यांनी भरपुर प्रयत्न केले व त्याचा चांगला उपयोग झाला. आज 3 री ते 6 वी पर्यतचे बरीच मुले त्याप्रमाणे लिहीण्याचा प्रयत्न करतात. ३ री ते ६ वी ची बरेच विद्यार्थी इंग्रजी वाचन करण्याचा चांगला प्रयत्न करतात ही आमच्यासाठी खुप अभिमानास्पद बाब आहे. ज्याठिकाणी अतिदुर्गम डोंगराळ भागात भाषा, गणित या मुख्य विषयांशी विद्यार्थ्याचे नाते जुळत नाही त्याठिकाणी जिल्हा परिषद शाळा कोळपांढरीचे विद्यार्थी इंग्रजी विषय आवडीने शिकण्याचा प्रयत्न करतात.



जिल्हा परिषद कोळपांढरी शाळा आधी व्दिशिक्षकी शाळा होती. मात्र २०१६-२०१७ पासून ही शाळी तीन शिक्षकी झाली. त्याला कारण म्हणजे शाळेची पटसंख्या २०१६-२०१७ पासून वाढतच गेली व २०१८-२०१९ पासून ही शाळा आता चार शिक्षकी शाळा आहे आज आम्ही चार शिक्षक या शाळेवर कार्यरत आहोत.

अ.क्र	वर्ष	मुले	मुली	एकुण	शिक्षक संख्या
1	2015-16	24	32	56	2
2	2016-17	46	52	98	3
3	2017-18	61	53	114	3
4	2018-19	57	43	100	4
5	2019-20	60	51	111	4

सन २०१६ -२०१७ पर्यत या शाळेत इयत्ता १ ली ते ५ वी चे वर्ग होते मात्र २०१७-२०१८ पासून विद्यार्थ्याच्या व पालकांच्या आग्रहाने या शाळेत इ.६ वीचा वर्ग सुरू करण्यात आला. कारण या शाळेतून विद्यार्थी इतरत्र शाळेत जाण्यास तयार नव्हते. आज या शाळेत ६ वी चा ८ मुले व ४ मुली असा एकुण १२ पट आहे.

जिल्हा परिषद शाळेला 3 वर्गखोल्या आहेत त्यातच एक वर्गखोली दुरूस्ती करणे आवश्यक होते. अशा परिस्थितीत विद्यार्थी शाळेत चांगल्या पध्दतीने शिकत आहेत. आम्ही जास्त कृतीला प्राधान्य देतो शिकवण्यापेक्षा मुले जास्त कृती करण्याचा प्रयत्न करतात. कृती करण्यासाठी आमच्याकडे भरपुर साधने आहेत. त्यात स्वयंअध्ययन कार्डस, शब्द कार्डस, परिच्छेद कार्ड, गोष्टीचे कार्ड आहेत , काही साहित्य शिक्षकांनी तयार केलेले आहे. आता शासनाकडून भाषा गणित, साहित्य पेटी व इंग्रजी साहित्य पेटी पुरवण्यात आलेली आहे. त्याचा वापर आम्ही दैनंदिन अध्ययन , अध्यापनात करतो. शैक्षणिक साधनांचा वापर केल्यामुळे विद्यार्थी मागे पडत नाही. विद्यार्थी हेच आपुले दैवत त्यामुळे गुणवत्ता वाढीसाठी विविध शालेय व सहशालेय उपक्रम राबवले जातात.आणि ज्ञानरचनावादावर आधारीत अध्ययन केले जाते. त्यासाठी सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी नेहमी कृतीशिल असतात.

विद्यार्थ्याना मराठी व गणित या विषयांची आवड आहे. मात्र आता इंग्रजी हा विषय सुध्दा आता आवडीचा झाला आहे. या शाळेत १ ली ते ६ वी चे वर्ग असल्याने विद्यार्थ्याना त्यांच्या क्षमतेनुसार शिकता यावे, वर्गखोल्या कमी आहेत तो अडसर दूर व्हावा यासाठी सकाळच्या सत्रात वर्गपध्दत न ठेवता गट पध्दतीने अध्ययन अध्यापन केले जाते त्यासाठी विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार इयत्ता २ री ते ६ वी चे परिच्छेद गट, शब्द गट व अक्षर गट करण्यात आले. व पहिलीचा वर्ग स्वतंत्र ठेवण्यात आला. त्यानुसार परिच्छेद गट - 1. श्री. अभिमन नामदेव कोळी यांच्याकडे, 2. शब्दगट - श्रीमती ज्योत्सना सुभाषराव निकुंभ यांच्याकडे 3. अक्षरगट - श्रीमती. कल्पना घुसायडा रावताळे यांच्याकडे व 1 लीचा वर्ग श्रीमती रेखा हिंमतराव सोनवणे यांच्याकडे आहे.

विद्यार्थी त्यांच्या क्षमतेनुसार शिकत असल्याने खुप समाधानी व आनंदित आहेत. विद्यार्थ्याची घरची परिस्थिती गरीबीचीच आहे. त्यामुळे शैक्षणिक साहित्याची उणीव भासते. मात्र आम्ही सर्व शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती यांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी साहित्य देऊन ती अडचण दूर केलेली आहे.

आधी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण कमी होते. मात्र आता विद्यार्थी उपस्थिती ९५ ते १००% असते. विद्यार्थ्याना बाहेरगावी जायचे असेल तर पालक परवानगी घेऊनच मुलांना गावाला घेऊन जातात. जर मुले आजारी असतील

तर पालक शाळेत येऊन तशी माहिती देतात. विद्यार्थी शिस्तप्रिय व आज्ञाधारक आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना अध्ययन, अध्यापन करणे सोपे जाते.

कोळपांढरी गावात वयानुरूप विद्यार्थ्यांचा प्रश्न बिकट झाला होता. कारण मध्यप्रदेश राज्याची सिमा गावालगतच आहे. त्यामुळे या राज्यातील कुटुंबे शेती करण्यासाठी कोळपांढरी गावात स्थायिक होतात. त्यांच्या मुलांना वयानुरूप जि.प.शाळा कोळपांढरी येथे २०१७-२०१८ साली दाखल करण्यात आले होते. २ मुले इयत्ता ४ थीत व २ मुले ५ वीत व १ मुलगा ६ वीत दाखल करण्यात आला होता. वयानुरूप दाखल झालेली ही मुले भाषा गणित या विषया बरोबरच इंग्रजी विषयात सुध्दा इयत्ता ६ वी पर्यंत पारंगत झाली. त्यामुळे चांगल्या प्रकारे इंग्रजी वाचन करू लागली. त्यामुळे ही मुले आता पुढील शिक्षण समर्थपणे घेत आहेत व त्यामुळे परिसरातील पालकांना कोळपांढरी शाळेबाबत अभिमान आहे.

आज समाजाच्या शाळेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदललेला आहे. त्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ,सदस्य सर्व शाळेची कामे सहकार्याने करतात. शाळेबद्दल त्यांचा मनात आदर निर्माण झालेला आहे. वेळोवेळी सहकार्यही करतात व शाळा विकासात महत्वाची भूमिका बजावतात.

२३ जानेवारी २०२० रोजी मुंबई येथे मा. शालेय शिक्षण मंत्री यांच्या समोर शैक्षणिक गुणवत्ता सादरीकरण कार्यक्रमातंर्गत नंदुरबार जिल्हयातुन जिल्हा परिषद शाळा कोळपांढरीची निवड झाली होती. त्यावेळी शिक्षक व अधिकारी सोबतच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री बाबुलाल पावरा हे ही उपस्थित होते. त्यांनी मा. मंत्री महोदया समोर आपले मनोगत शाळेसंबंधी योग्य व समर्पक शब्दात केले व शाळेचा गौरव वाढवला. शाळा शिक्षक विद्यार्थी या सर्व बाबी संबंधी त्यांनी माहिती दिली.



जिल्हा परिषद शाळेच्या गुणवत्ता वाढीत तालुका क्षेत्रीय अधिकाऱ्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यात तत्कालिन गटशिक्षणाधिकारी मा.श्री पाटील साहेब , आताचे गटशिक्षणाधिकारी मा.श्रीमती पेंढारकर मॅडम, शिक्षण विस्तार अधिकारी मा. श्री. वळवी साहेब व केंद्र प्रमुख श्री भैय्यासाहेब यांनी शाळेला वेळोवेळी भेटी दिल्या व मार्गदर्शन केले आणि शाळेच्या गुणवत्ता वाढीत मोलाचे सहकार्य केले आहे. तसेच केंद्रातील शिक्षकांनी सुध्दा आम्हाला वेळावेळी मदत व मार्गदर्शन केलेले आहे.



आज रोजी मला या शाळेत येऊन दोन वर्षे होतील. या दोन वर्षात माझे सहकारी शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती व पालकांना सोबत घेऊन विद्यार्थ्यांचा शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केल्याचे समाधान आहे. कारण जिल्हा परिषद शाळा कोळपांढरी तालुक्यापासुन २८ किलोमीटर अंतरावर दुर्गम भागात आहे. याठिकाणी भौतिक सुविधांची निश्चितच कमतरता होती व आहे. मात्र यावर्षी त्यासुध्दा पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरी सुध्दा या बाबतीत बराच पल्ला गाठायचा बाकी आहे.

विद्यार्थी जेव्हा गुणवत्ताधारक होतात. त्यावेळी आम्ही केलेल्या प्रयत्नांना फळ आले. याचे खूप मोठे समाधान आम्हा सर्वाना मिळते. दुर्गम भागातील माझ्या शाळेतील मुले भाषा व गणित विषया बरोबरच इंग्रजी विषयाला सुध्दा आपलेसे केले आहे. मुलं व्यवस्थितपणे इंग्रजी वाचन करण्याचा प्रयत्न करतात. विशेषत: cursive लिपीत सुध्दा लेखन करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे सर्व शिक्षकवृंद समाधानी आहेत. तरी सुध्दा अजून आम्ही प्रयत्न करीत राहणार आहोत. विद्यार्थी गुणवत्तेत कशी वाढ होईल, त्यासाठी काय प्रयत्न करावे लागतील, या विषयी नेहमी चर्चा करून मार्ग काढण्याचा प्रयत्न करणार आहोत.

आज जिल्हा परिषद शाळा कोळपांढरी ता. शहादा या शाळेकडे गावकरी, पालक, अधिकारी व परिसरातील शिक्षक यांचा बघण्याचा दृष्टिकोन खूप बदललेला आहे. व त्याचे आम्हाला खुप समाधान आहे. आज चांगले शिक्षण देणारी शाळा म्हणून शाळेकडे बघितले जाते व या सर्व गोष्टींमुळे शाळेचा मुख्याध्यापक म्हणून मी खूप समाधानी व आनंदी आहे. मात्र शेवटी अजून बराच पल्ला गाठायचा बाकी आहे. याची जाणीवही आहे त्यासाठी आम्ही सतत प्रयत्न करणार आहोत.





आदिवासी पावरा समाज होळी सण साजरा करतांना.

धन्यवाद

प्रस्तावना -

कागल पासून जवळच ५ कि.मी. अंतरावर असणारे करनूर गाव दुधगंगा नदीच्या काठावर वसले आहे. सन १९८३ साली या नदीला महापूर आला.महापुराचे पाणी गावात शिरले व काठावरची वस्तीच तेथून हलविण्यात आली.ही वस्ती माळभागावर स्थिर झाली व रामकृष्णनगर ही वसाहत निर्माण झाली.या वसाहतीमध्ये २०० ते २५० घरे आहेत. घरांची रचना आमने सामने,गल्लीप्रमाणे वसाहत निर्माण झाली आहे. सुंदर, हिरवेगार, दारासमोर फुलझाडे परसबागेने नटलेली ही वसाहत खूपच सुंदर आहे.

शाळानिर्मिती -

याच वेळी,येथील लहान मुलांसाठी इ.१ ली व २ री. चे वर्ग श्री.बी.टी.कांबळे सर यांच्या घरी मोफत सुरु करण्यात आले ,तेथूनच शाळा निर्मितीची सुरवात झाली.पुढे कालांतराने डोंगरी विकास निधीतून सन १९९२/९३ मध्ये २ खोल्यांचे बांधकाम झाले व या नवीन इमारतीत शाळा गजबजली.त्यानंतर भाडेतत्वावर दोन खोल्या घेऊन ३ री./४ थी.चे वर्ग सुरु केले.विद्यार्थी संख्या हळूहळू वाढू लागली.पुन्हा दोन खोल्या सन १९९४/९५ डोंगरी विकास निधीतून बांधून मिळाल्या.त्यानंतर ५ वी ते ७ वी चे वर्गही सुरु झाले.

वृक्षारोपण -

या माळ रानावर शाळेला नटविण्यासाठी झाडे जगविण्यासाठी गावामध्ये शोषखड्डयासाठी असलेल्या कुंड्या इतरत्र पडल्या होत्या.त्या पालकांशी संपर्क साधून त्या झाडांना पाणी घातल्याने झाडे जगली आहेत.गारवा,हिरवळ निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी गावकऱ्यांच्या मदतीने वृक्षारोपण करून शाळेसमोर हिरवळ निर्माण केली. विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय करून दिली.

इमारत रंगरंगोटी -

मज आवडते ही मना पासुनी शाळा .....

लाविते लळा जसा माउली बाळा.....

या उक्ती प्रमाणे गावकऱ्याना ही शाळा मनापासून आवडू लागली. भौतिक सुविधेचा अभाव असला तरी येथील लोक खूप चांगल्या प्रकारे शाळेची काळजी घेतात व सहकार्य करतात. या लोकांचा मुख्य हेतू फक्त या वसाहतीतील मुलांच्या मनावर चांगले संस्कार होऊन येथील मुलांना चांगले शिक्षण मिळावे हाच एक उद्देश आहे. त्यामुळे येथील पालकांच्या सहकार्याने थेंबे थेंबे तळे साचे उक्ती प्रमाणे आपल्या कुवतीप्रमाणे आर्थिक मदत करून जवळ जवळ अडीच लाखाची रंगरंगोटी पूर्ण केली.शाळेला उर्जित अवस्था आणण्यासाठी मदत केली.

बोलक्या चित्रमय भिंती रंगरंगोटी करून शाळेला उर्जित अवस्था प्राप्त करून देण्यासाठी मी आणि माझे सहकारी कार्यरत झालो,. लोकांशी संवाद साधून शाळेसाठी लागणाऱ्या वस्तूंची मागणी करून नवीन तंत्रज्ञानाचा वापर शाळेतील विद्यार्थी करतील या उद्देशांनी संगणक मागणी करून वस्तू रूपाने मदत मागून शाळेच्या गरजा हळू हळू भागवू लागलो.

लोकसहभाग -

लोकसहभागातून प्रत्येक वर्गात पंखा,संगणक,उपलब्ध करून दिले. शाळेच्या आवारात झेंडा कट्टा व पोल तसेच शाळेसाठी स्टेज बांधकाम अशी एक लाखाची मदत वस्तू रूपाने लोकांच्या सहकार्यातून मिळवून शाळेचा कायापालट करण्यात आला. शिक्षक विद्यार्थी ज्ञानाचे धडे गिरवू लागले.ज्ञान रचनावादी वर्गाची निर्मिती केली. नवनवीन शैक्षणिक साहित्य निर्मिती करून शिक्षक ज्ञानदान करू लागले.

शाळेचे नवे रूप -

आज या शाळेत पहिली ते सातवी साठी स्वतंत्र सात खोल्या आहेत कार्यालयासाठी स्वतंत्र खोली नाही. तरीपण व्हरांड्यात एक छोटी खोली बांधून स्वतंत्र कार्यालय केले आहे. शाळेच्या आवारात मुलांना खेळण्यासाठी क्रीडांगण आहे.घसरगुंडी,झोपाळा इत्यादी खेळणी आहेत. मध्यान्ह भोजनाच्या सोयी साठी किचन शेड आहे. सुंदर रुचकर चविष्ट भोजनही मुलांना मिळते.

सन २०१५/१६ साठी शाळेला राजषी शाहू पुरस्कार मिळून केंद्रात प्रथम क्रमांकाचा मान देऊन चेक रुपये ३०००/-व प्रशस्तीपत्र देऊन शाळेचा सन्मान करण्यात आला.

शिक्षक सक्षमीकरण व नेतृत्व विकास -

या शाळेमध्ये मी प्रशासकीय बदलीने मुख्याध्यापिका म्हणून दिनांक ०१ जून २०१६ मध्ये रुजू झाले.याच साली 'शालेय नेतृत्व विकास' हे प्रशिक्षण झाले.या प्रशिक्षणाने मुख्याध्यापकाना ऊर्जा मिळाली. नवनिर्मितीचा आनंद मिळाला.विद्यार्थ्यांना १०० % प्रगत करण्यासाठी शिक्षकाकडून कसे काम करून घ्यावे ? शिक्षकांच्या आवडी

निवडी जाणून त्यांचा उपयोग विद्यार्थ्यांसाठी कसा करावा ? शाळा व्यवस्थापन समितीची मदत कशी घ्यावी ? पालकांचे सहकार्य कसे घ्यावे ? विद्यार्थी विकास कसा साधावा ? याची दिशा या प्रशिक्षणातून मिळाली. त्याप्रमाणे शिक्षकांचे सक्षमीकरण करून मनोबल वाढवून विद्यार्थी सर्वांगीण विकास साधण्यासाठी धडपड सुरु झाली. सर्वच शिक्षक चांगले काम करतात पण आदर्श शिक्षक सन २०१७/१८ मध्ये विशेष काम करणाऱ्या शिक्षकांच्या पाठीवर शाबासकीची थाप मारण्यासाठी माझा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रस्ताव तयार झाला. खरच या शाळेला उर्जित अवस्था प्राप्त करून देण्यासाठी लोक संपर्क व बोलण्याचे कौशल्य हे गुण उपयोगात आणल्याने शाळेचा कायापालट करण्यासाठी खूप मदत झाली , शाबासकीची थाप म्हणून जिल्हा परिषद कोल्हापूर कडून आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला.

नवोपक्रम -

पुन्हा जबाबदारी वाढली व मार्गदर्शन घेऊन विद्यार्थी सर्वांगीण विकासासाठी शाळेमध्ये वेगवेगळे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना आदर्श करण्यासाठी सर्वच शिक्षक मेहनत करू लागले. जयंती,पुण्यतिथीनिमित्त भाषण स्पर्धा ,चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा,घोषवाक्य स्पर्धा,रांगोळी स्पर्धा,सहल ,वनभोजन,आठवडी बाजार,विद्यार्थी शिक्षक दिन,वेशभूषा स्पर्धा अशा वेगवेगळ्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षणाची सुरवात झाली.या स्पर्धेतून विद्यार्थी स्पर्धेत कसा टिकेल याची काळजी शिक्षक घेऊ लागले. त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून विद्यार्थी स्पर्धेत टिकवून ठेवले, शिक्षकांना प्रेरणा व विद्यार्थ्यांना दिशा दाखवून विद्यार्थी सर्वांगीण विकास साधला.



ज्ञानरचनावाद -

रचनावादातून नवनिर्मितीचा आनंद घेत विद्यार्थी, शिक्षक, पालक जवळीकता साधून ज्ञान रचनावादी शिक्षणाची सुरवात झाली.विद्यार्थी उपस्थिती वाढली व आनंदाने स्पर्धेमध्ये भरपुर संख्येने विद्यार्थी सहभागी होऊ लागले.स्पर्धेची आवड निर्माण झाली.यासाठी प्रभारी गटशिक्षण अधिकारी मा.चंद्रकांत बोधरे यांचे सहकार्य लाभले.

अप्रगत विद्यार्थी -

अध्ययननस्तर निश्चिती प्रमाणे १४ विद्यार्थी अप्रगत होते त्यापैकी ७ विद्यार्थी प्रगत झाले असून उर्वरित ७ विद्यार्थी प्रगतीच्या मार्गावर आहेत. अध्ययनात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यासाठी कृती आराखडा तयार करून विद्यार्थी निहाय ज्ञानदानाचे कार्य शिक्षक करत आहेत.विद्यार्थी प्रयत्नाने अध्ययनात पुढे येत आहेत.

शाळेसमोरील आव्हाने -

शाळेचे आवार मोठे असल्याने मोठ्या निधीच्या अभावाने संरक्षक भिंत नाही, परसबाग करता येत नाही, फुलझाडे लावता येत नाहीत. शाळेस प्रवेशद्वार नाही ही खंत आहे. तरीसुद्धा याही गोष्टींची पूर्तता करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती सरपंच, गावकरी, शिक्षक यांचे अथक प्रयत्न सुरु आहेत.

सांकृतिक स्पर्धा व क्रीडा स्पर्धा -

१.सन २०१७-१८ साली नाट्यीकरणात या शाळेतील विद्यार्थ्यांनी कोल्हापूर जिल्ह्याचे नेतृत्व करून सहभाग दर्शविला.तसेच केंद्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये शाळा अग्रेसर म्हणजेच प्रथम क्रमांकावर आहे.

२. सन २०१८-१९या साली केंद्र स्तरीय सांस्कृतिक स्पर्धेसाठी लोकसहभागातून प्रथमच या शाळेत रुपये २०,०००/- प्रथमच स्पर्धेचे आयोजन शाळेमध्ये केले. शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने शिक्षकांच्या मेहनतीने या सांस्कृतिक स्पर्धेमध्ये शिल्ड व प्रमाणपत्र वाटप स्पर्धकांना देण्यासाठी आर्थिक मदत झाली.





या स्पर्धेमध्ये सुद्धा लहान गट,मोठा गट दोन्ही मध्ये या शाळेतील विद्यार्थी जनरल चम्पियनशिप मिळवून गावाचा, शाळेचा आदर्श मान राखला आहे. तसेच तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये प्रथमच या शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले होते. तरी सुद्धा श्री.सांगले सरांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थी उत्कृष्ट सादरीकरणाने तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले. स्पर्धेच्या युगात विद्यार्थी टिकवण्यासाठी शिक्षक खूप मेहनत घेत आहेत.

डिजिटल वर्ग संकल्पना -

सन २०१७-१८ या सालात कोल्हापूर जिल्हा परिषदेने डिजिटल वर्ग संकल्पना सुरु केली.सर्व शाळा डिजिटल करण्यासाठी प्रयत्न सुरु झाले.याही प्रयत्नात आम्ही यशस्वी झालो.

१.आमच्या शाळेतील शिक्षक श्री.के.डी.पाटीलसर दरवर्षी राष्ट्रीय सणाला झेंडा बांधण्यासाठी RTO कार्यालय कागल येथे जातात त्या निमित्त आमच्या शाळेस मदत व

भेट म्हणून श्रीमती नीता सुभाष शिबे RTO यांनी रुपये ३०,०००/- रुपयांचा android दूरदर्शन संच देऊन शाळेस मदत केली.

२.या नंतर दानशूर व्यक्ती शोधून श्री करणसिह घाटगे वंदूर यांच्याकडून ३२ इंची दुसरा android दूरदर्शन संच मिळवला.

३.तसेच मा. श्री अमरीशदादा घाटगे अध्यक्ष शिक्षण विभाग कोल्हापूर जिल्हा परिषद यांचे कडून तिसरा android दूरदर्शन संच मिळवला.

४. या गावाचे सरपंच श्री.सचिन घोरपडे ग्राम पंचायत करनूर यांच्या सहकार्याने चौदाव्या वित्त आयोगातून दोन दूरदर्शन संच व एक TAB मिळाला असे एकूण पाच दूरदर्शन संचाद्वारे डिजिटल वर्गाची सुरवात झाली.विद्यार्थी गुणवत्तापूर्ण सर्वांगीण शिक्षणाचा आनंद घेताना पाहून शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य यांनीही दोन TAB शाळेस देऊन सहकार्य केले. तसेच श्री.देवेंद्र चौगुले, सिनेकलाकार या शाळेचे माजी विद्यार्थी यांनीही दोन TAB देऊन विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घातली.

याप्रमाणे आज पाच दूरदर्शन संच व पाच TAB असे दोन लाखाचे साहित्य देऊन लोकांनी शाळेची डिजिटल वर्ग संकल्पना पूर्ण केलेली आहे. याचा वापर करून विद्यार्थी गुणवत्ता पूर्ण ज्ञानाचा पुरेपूर आनंद घेत आहेत. शिक्षकांनी दूरदर्शन संच, मोबाईल व TAB चा वापर करून टेक्नोसेवी शिक्षणास विद्यार्थ्यांचा गुणवत्तापूर्ण सर्वांगीण विकास साधत आहे.

फलश्रुती--

परिपाठ -

या शाळेत मराठी हिंदी इंग्रजी तिन्ही भाषेतून परीपाठाने शाळेची सुरुवात होते.वरील सर्व साधनाच्या वापराने आज या शाळेतील विद्यार्थी तिन्ही भाषेतून संभाषण करतात.

कवायत -

१.सर्वांगसुंदर व्यायाम प्रकार म्हणून या शाळेतील कवायत अतिशय आदर्श व सुंदर आहे.

२.विनाआदेश ढोल वाद्यांच्या सहाय्याने येथील विद्यार्थी ४५ मिनिटे कवायतीचे सादरीकरण करतात.या कवायतीत विशेष म्हणून मुख्य कवायत व मानवी मनोरे ही प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

या शाळेचा विद्यार्थी १५४ असून एक मुख्याध्यापक व पाच शिक्षक असून १६० लोकांचा परिवार येथे आहे. शिक्षक स्वतःचे ज्ञान वाढवून विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन कार्यासाठी सक्षमपणे,आनंदी मनाने शाळेत प्रवेश करून ज्ञानार्जन करतात. एकमेकांशी सहकार्याची भावना खूप चांगली आहे.गावकऱ्यांची मदत शाळा व्यवस्थापन समितीचे सहकार्य शिक्षकांची मेहनत यामुळे ही शाळा अल्पावधीतच आदर्श झाली आहे.

धन्यवाद

रुपेशकुमार दिगंबर नागलगावे

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काल्लेखेतपाडा (उमराणी बु.),तालुका.धडगाव,जिल्हा.नंदुरबार

ईमेल आयडी - rdnagalgave@gmail.com

मुळचे सोलापूर जिल्ह्यातील श्री रुपेशकुमार नागलगावे घरापासून ७०० ते ८०० किलोमीटर अंतरावरील नंदुरबार जिल्ह्यातील डोंगरी, दुर्गम भागातील काल्लेखेतपाडा या जिल्हा परिषदेच्या शाळेत जून २००९ मध्ये अतिशय आनंदाने रुजू व्हायला आले. मात्र तेथील भाषेची अडचण, पालकांच्या व्यसनाधीनतेमुळे होणारा त्रास, शाळेत जाण्यास रस्ता नाही गावापासुनचे लांब अंतर या अतिशय प्रतिकूल परिस्थितीने उद्विग्न होवून आपल्याला येथे काम करणे शक्य नाही असे समजून राजीनामा देवून निघून लगेच निघून गेले. पण काही तांत्रिक कारणामुळे त्यांचा राजीनामा नामंजूर झाला, त्यामुळे आता काहीच करणे शक्य नाही पदरी पडले पवित्र झाले असा विचार करून ते पुन्हा माघारी फिरले ते पुन्हा मनाची तयारी करूनच. राजीनामा नामंजूर झाला म्हणजे आपल्या हातून नक्कीच काहीतरी चांगले काम होणे अपेक्षित आहे अशी मनाची समजूत घालीत व काहीतरी नवीन करून दाखविण्याची खुणगाठ बांधून त्यांनी कामाला सुरुवात केली. अडचणी खूप होत्या, समस्या आ वासून समोर उभ्या होत्या पण हळूहळू आपले नेतृत्व कौशल्य वापरून जिद्दीने प्रयत्नपूर्वक आपल्याला हवे तसे बदल घडवून आणत ते शाळेचा सर्वांगीण विकास करीत तेथील आदिवासी बांधवांच्या गळयातला ताईत बनले व १० वर्षाच्या कालावधीत जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त केला.

आवश्यक बदल घडवायचा असेल तर तेथील मुलांशी/समाजाशी भावनिक जवळीकता साधणे आवश्यक असते त्यासाठी नागलगावे सरांनी स्थानिक सहकारी शिक्षक श्री तेगा पावरा यांच्या मदतीने मुलांची भाषा शिकण्यास सुरुवात केली. पालकांशी/ समाजाशी जवळीक साधण्यासाठी गावातील सण-उत्सव, सुख-दुःख यात सहभागी होवून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. सहकारी शिक्षकांना सोबत घेत प्रत्येक मुलांचे आरोग्य व स्वच्छता राखण्यासाठी मुलांना आंघोळ घालणे, केस कापणे, नखे काढून देणे, कपडे शिवणे इत्यादी पालकत्वाच्या भूमिकेतून केलेल्या कामांमुळे पालकांमध्ये शाळेबद्दल व शिक्षकांबद्दल ओढा व आपलेपणा वाढत गेला. लोकांना शिक्षक आपले वाटायला लागले. त्यांचे म्हणणे त्यांना पटायला लागले. सुरुवातीला दारूसाठी पैसे मागणारे/ त्रास देणारेही आता शाळेसाठी काही मदत देण्यास पुढे येवू लागले.



पालक व विद्यार्थ्यांशी भावनिक जवळीकता निर्माण होण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या शिकण्याकडे, प्रगतीकडे लक्ष देणे आवश्यक होते. त्यासाठी श्री नागलगावे सरांनी, एकही मुलगा शिक्षणापासून वंचित राहणार नाही हे उद्दिष्ट समोर ठेवून "भविष्य उद्याचे इथेच किलबिलते" या थीमद्वारे काम चालू केले.





सर्वप्रथम त्यांनी इ १ ली चे प्रवेश १ मार्च पासूनच सुरु केले त्यामुळे मुलांची शाळापूर्व तयारी होवू लागली.शाळेचे सत्र संपण्यापूर्वी ही मुले इतर मुलांसोबत दोन महिने शाळेत असल्यामुळे शाळेची रुची त्यांच्यात निर्माण होऊ लागली. पुढच्या सत्राची पूर्वतयारी या दोन महिन्यात होत असल्याने पहिलीत जेव्हा मुलं प्रत्यक्ष यायला लागली तेव्हा त्यांची पूर्वतयारी झाली असल्याने पुढचं सर्वच काम सोपे जाऊ लागले. मुले शाळेत येवू लागली पण ती नियमित शाळेत येणे सुद्धा तितकेच महत्वाचे होते. मुलांची दैनिक उपस्थिती वाढावी यासाठी त्यांनी दर महिन्याला ग्रामशिक्षण समिती व पालकांची सभा घेवून मुलांच्या शिक्षणाबाबत व शाळेच्या गरजांबाबत चर्चा करायला सुरुवात केली. या चर्चेमध्ये अनुपस्थित पाल्याच्या अनुपस्थिती बद्दल पालकांना विचारणा करून त्याबाबतच्या जाणीवजागृती करण्याचे धोरण सुरु केले.ग्रामशिक्षण समितीतील पदाधिकारी सुद्धा याची जबाबदारी घ्यायला लागले.



यासाठी गावातील शिकलेल्या / शिक्षणाचे महत्व पटलेल्या पालक व तरुणांना सोबत घेवून प्रत्येक घरापर्यंत पोहचून माता पालकांचे उद्बोधन करण्यास सुरुवात केली.पाल्याच्या नियमित शाळेत येण्याचे महत्व जर आईला कळले तर अर्धी लढाई जिंकली असे सरांचे म्हणणे होते.या भेटीचा फायदा सरांना लगेच दिसून यायला लागला. मुले शाळेत नियमित यायला लागली. सरांचे प्रयत्न हळूहळू सर्वांसमोर यायला लागले.

लोकमत



कालल्लेखत पाडा येथील जिल्हा परिषद शाळेत झालेल्या आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थांची पौष्टिकता पहताना तहसीलदार सपकाळे, गटविकास अधिकारी बोढरे आदी मान्यवर.

दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना परेदशातून मिळाली मायेची ऊब

आनंद मेळावा : काल्लेखतपाडा शाळेत उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

मोखाडा : सोशल मीडियाद्वारे देशासह परदेशातील दात्यांकडून डिजिटलसाठी मदत करत दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मायेची ऊब दिली. तालुक्यातील पाचवे सुसज्ज डिजिटलीकृत विविध जिल्हा परिषद शाळांच्या विद्यार्थ्यांना डिजिटल पाटप करण्यात आल्यानंतर त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. काल्लेखतपाडा जिल्हा परिषद शाळेत झालेल्या आनंद मेळाव्यात तहसीलदार आणेराव सपकाळे यांच्या हस्ते डिजिटल पाटप करण्यात आले.

अध्यक्षस्थानी झालेल्या कार्यक्रमाच्या मुख्यमंत्री सौगी डिजिटल पाचारा होती. काल्लेखतपाडा शाळेच्या शिक्षकांनी सोशल मीडियाद्वारे दुर्गम भागातील मुलांना डिजिटल शिक्षणाचे महत्त्व पालकांसाठी सादरीची साद घालली होती. शिक्षकांच्या या साद देत राज्य आणि देशासह अमेरिका, ब्राझिलिया, सिंगापूर, दुबई येथील भारतीय नागरिकांनी सढळ हात देत आर्थिक मदत दिली होती. यात आकाशलकोट येथील चंद्रकांत सहस्त्रबुद्धे यांनी तब्बल २० हजार रुपयांची मदत दिली होती. यातून विद्यार्थ्यांसाठी टॅबेट खरेदी करून उपस्थित एकूण विद्यार्थ्यांची संख्येनुसार टॅबेटचे पाटप करण्यात आले.

यावेळी झालेल्या आनंद मेळाव्यात या टॅबेटचे पाटप प्रमुख गटविकास अधिकारी चंद्रकांत बोढरे, गटशिक्षणाधिकारी जे. एन. चौरे, पंचायत समिती सदस्या ज्योतीताई पाचारा, उपसरपंचपदा सरपंच आसराबाई पाचारा, शिक्षण विस्तारअधिकारी शिलवंत चाफळे, मोगेश सावळे, डी. डी.राजपूत, केंद्रप्रमुख भी.डी.पाडवी, सरपंच पतेपार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नेरसिंग पाचारा, डॉ.राजपाल वाघ्य, प्र. चेरसिंग पाचारा , पोलीस पाचारा, तेगा पाचारा उपस्थित होते.

मेळाव्यात विद्यार्थ्यांनी पारंपरिक मेळाव्यांचे भाले, सौगे, चौरे, हातचा, डौरा, चौडी, चाणे, विणपाराली सादरीकरण यासह विविध खाद्यपदार्थांचे विद्यार्थिनी आणली होती. मेळाव्यात शाळा उभारणी मुलुक ४ खुर्ची, लाइटनसाठीपाडा, कुमटीपाडा, आमला शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

Nasik Navdurbar
Page No. 3 Jan 25, 2020
Powered by: erelego.com

यानंतर त्यांनी पुढचे पाऊल उचलले. ग्राम पंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्य यांच्या वारंवार भेटी घेवून भौतिक सुविधा मिळविण्यासाठी प्रयत्न सुरु केले, लोक सहभागातून विद्यार्थ्यांसाठी स्वेटर, संगणक कक्ष, उपलब्ध करून घेतले . विविध सामाजिक संस्थांकडून शाळेच्या भौतिक सुविधांसाठी भरीव मदत मिळविली. त्यासाठी whatsapp,facebook यासारख्या सामाजिक माध्यमांचा यशस्वी उपयोग करून घेतला. अगदी परदेशातूनही यासाठी मदत मिळवता आली त्यातून शाळेला शैक्षणिक साहित्य, tablet इत्यादी बाबी त्यांना उपलब्ध करून घेता आल्या.



शाळेमध्ये मुले नियमित येत होती अभ्यास करीत होती. पण तेवढे पुरेसे नव्हते , घरी जाऊन पण त्यांनी अभ्यास करणे गरजेचे होते. पण घरी अभ्यासाचे मुळीच वातावरण नव्हते त्यामुळे यावर उपाय करण्यासाठी सरांनी मुलांच्या अभ्यासासाठी गावात अभ्यासकेंद्र सुरु केले. घरच्या अभ्यासासाठी व स्थलांतरित पालकांच्या मुलांसाठी तर या अभ्यासकेंद्राची खूप मदत होऊ लागली. गावातील सुशिक्षित मुले या कामात सरांना मदत करू लागली त्यामुळे आता मुलांच्या गुणवत्ता विकासात पुन्हा वेग आला.अभ्यासकेंद्रामुळे मुलांना आता शाळेतून गेल्यावर संध्याकाळी सुद्धा अभ्यास करण्याची सवय लागली होती. आता पुढचा टप्पा होता घरी अभ्यास करण्याची सवय लावणे त्यासाठी सरांनी पुन्हा पालक सभेमध्ये पालकांना आव्हान केले, घरी अभ्यासाचे महत्व पटवून दिले.त्यातून प्रत्येक घरी विद्यार्थीनिर्मित अभ्यासकोपरा तयार करण्यात आला.या सर्व प्रयत्नामुळे गावात अभ्यासाचे वातावरण तयार झाले विद्यार्थी गुणवत्ता विकासात हे महत्वाचे पाऊल होते.

विद्यार्थी आता प्रत्यक्ष अनुभवातून ही काही बाबी शिकत आहेत. यात ग्राम सभेला भेट, ग्रामपंचायतीला/ पंचायत समितीला भेट, अगदी येथून ६० किलोमीटर अंतरावरील शहादा येथे खाजगी वाहनाने एकत्रित जावून तानाजी हा ऐतिहासिक चित्रपट पाहण्याचा अनुभव, बाल संसद कार्यक्रमांतर्गत प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेचा अनुभव इत्यादी बाबी नव्याने शिकत आहेत.


नागरिकशास्त्र विषय समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी राबविली

निवडणूक प्रक्रिया

कालेखेतपाडा जि.प.शाळेचा स्तुत्य उपक्रम

योगी पावरा बनली "मुख्यमंत्री"

अशा प्रकारे अनेक सकारात्मक बदल घडवून आणण्यात श्री नागलगावे सरांना यश मिळाले आहे. आज शाळेला स्वतःची पक्की इमारत आहे, १० वर्षापूर्वी एक ते चार वर्ग असलेली १५ पट संख्येची द्विशिक्षकी शाळा आज एक ते सात पर्यंत एकूण ४ शिक्षकांसह १४० पटसंख्येची शाळा झाली आहे. यात शाळेच्या पाड्यावरील केवळ ३६ विद्यार्थी आहेत. बाकीचे इतर ठिकाणाहून शाळेत येतात. स्थलांतर तर नाहीच उलट काही मुले गावातील मामा,आत्या,काका यांच्या घरी पाहुणे म्हणून राहतात. शिक्षक संख्येच्या प्रमाणात शाळा खोल्या आहेच पण गावकऱ्यांच्या मदतीने शाळेसाठी सुंदर मैदानही उपलब्ध झाले आहे. शाळेत digital माध्यमातून तसेच ज्ञानरचानावादी प्रक्रियेद्वारे अध्ययन अध्यापन चालते. शाळेबद्दल विद्यार्थी, पालक, शिक्षक, लोकप्रतिनिधी व पर्यवेक्षकीय अधिकारी समाधानी आहेत.

या यशाबाबत श्री नागलगावे त्यांचे सर्व सहकारी, वेळोवेळी प्रेरणा व सहकार्य देणारे डायटचे तसेच शिक्षण विभागाचे पर्यवेक्षकीय अधिकारी, गावातील सरपंच, ग्राम शिक्षण समिती सदस्य,पालक व तरुण मुले यांचा ते आवर्जून उल्लेख करतात.

धन्यवाद

मदन मारोती गायकवाड

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देव्हारी केंद्र-सावळदबारा तालुका-सोयगाव जि-औरंगाबाद

ई-मेल आयडी –zppszppszppszpzpps@gmail.com



प्रास्ताविक -

आमची शाळा औरंगाबाद जिल्ह्यापासून सर्वात दूर असलेल्या सोयगाव तालुक्यात असून जिल्ह्यापासून शाळेचे अंतर १८० किलोमीटर तर तालुक्यापासून ७० किलोमीटर दूर आहे. शाळेत एकूण इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंत वर्ग असून शिक्षक संख्या -९ व पटसंख्या – मुले १४४ + मुली १३२ एकूण २७६ आहे .

शाळा विकासासाठी मिळालेली प्रेरणा –

जिल्हा सातत्यपूर्ण व्यावसायीक विकास संस्था औरंगाबाद चे प्राचार्य, शिक्षणाधिकारी(प्राथ.) जि.प. औरंगाबाद सर्व जेष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनातून तसेच गटशिक्षणाधिकारी ,शिक्षण विस्तार अधिकारी ,केंद्र प्रमुख ,विषय साधन व्यक्ती यांचे शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम अंतर्गत प्रशिक्षण झाल्यामुळे त्या प्रशिक्षणातून प्रभावित होऊन या सर्वांनी वेळोवेळी शाळा भेटीदरम्यान,केंद्र परिषदेमधून सर्व मुख्याध्यापकांना प्रोत्साहन दिले. आपण सुद्धा शाळेचा विकास करू शकतो ही भावना गटशिक्षणाधिकारी श्री. विजय दोतोंडे साहेब , श्री. राजू फुसे (शिक्षण विस्तार अधिकारी) तसेच गट साधन केंद्र , सोयगाव येथील विषय साधन व्यक्ती श्री.परमेश्वर कठोरे यांच्या शाळा भेटीतील मार्गदर्शनामुळे निर्माण झाली. मुख्याध्यापक या नात्याने आपण शाळेचा प्रमुख असतो.आपण मनावर घेतले तर शाळेचा कायापालट करू शकतो ही भावना त्यांनी निर्माण केली. त्यातून मी प्रेरित होऊन शाळा विकास करण्यास प्रवृत्त झालो .

- शाळा विकासाची गरज-

आमच्या शाळेची भौतिक व गुणवत्तेच्या बाबतीत परिस्थिती फारशी चांगली नव्हती. शाळेमध्ये अनेक समस्या होत्या.मुख्याध्यापक या नात्याने आपण व आपले नेतृत्व कुठेतरी कमी पडत आहे याची जाणीव यामुळे मला झाली.शाळेच्या खोल्यांची झालेली पडझड, शाळेची रंग रंगोटी नसणे, विद्यार्थी गुणवत्तेमध्ये शाळा इतर शाळांच्या तुलनेने मागे, शालेय कामकाजाचे नियोजन नसणे, शाळेमध्ये झाडे, फुलांच्या झाडांचा अभाव,शालेय व्यवस्थापन समितीच्या सहकार्याचा अभाव, शालेय सहकारी यांच्यात सांघिक भावना नसणे, शाळा विकासात लोकसहभागाचा अभाव, विद्यार्थी उपस्थिती या सर्व गोष्टी मुळे मला शाळा विकासात अडचणी येत होत्या.एकूणच शाळेमध्ये आनंदी वातावरण नव्हते.या सर्व गोष्टीचा परिणाम विद्यार्थी उपस्थिती वर होत होता .

या सारख्या अनेक समस्या होत्या.त्या सोडवण्यासाठी कुठेतरी प्रयत्न केले पाहीजे ही भावना शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून वरील सर्वांनी माझ्यामध्ये निर्माण केली . या सर्व गोष्टीचा परिणाम माझ्या मनावर झाला. यातूनच प्रेरित होऊन शाळा विकास

करण्यास प्रवृत्त झालो.आणि कोणत्याही परिस्थितीत शाळेचा विकास करायचा याची खूणगाठ मनाशी बांधली.

➢ शाळेचा पूर्व इतिहास –

शाळा खोल्यांची पडझड ,संरक्षक भिंत नसणे,स्वच्छता गृह नसणे ,पिण्याच्या पाण्याची सुविधा नसणे,यासारख्या अनेक समस्या होत्या .

तसेच विद्यार्थी गुणवत्तेच्या बाबतीतही परिस्थिती फारशी चांगली नव्हती.शालेय व्यवस्थापन समिती, लोकप्रतिनिधींचा सहभाग नव्हता. कोणीही पालक सहकार्य करण्यास उत्सुक नव्हते. शालेय परिसरात झाडाझुडपांचा अभाव, शिक्षकांच्या सहकार्याचा, सांघिक भावनेचा अभाव होता, शाळेच्या वर्ग खोल्यांना रंगरंगोटी नसून सर्वत्र घाणीचे साम्राज्य होते. त्यामुळे शाळेतील वातावरण प्रसन्न नसल्याने शाळेतील विद्यार्थी उपस्थितीचे प्रमाणही अनियमित होते. साहजिकच या सर्व गोष्टींचा परिणाम विद्यार्थी गुणवत्तेवर होत होता. हे सगळे आपण बदलू शकतो ही भावना माझ्यामध्ये निर्माण झाली.

शाळा विकास नियोजन आणि अंमलबजावणी –

मुख्याध्यापक या नात्याने मी सर्व प्रथम आपल्या सहकारी शिक्षकांसोबत बैठक घेऊन शाळा विकास करण्यासाठी विचारविनिमय केला परंतु सुरुवातीला शिक्षकांनी मला पाहिजे तेवढे सहकार्य दाखविले नाही. शिक्षकांच्या या भूमिकेत बदल करणे हा मोठा प्रश्न माझ्यापुढे होता. माझ्यातल्या नेतृत्वगुणाने शिक्षकांच्या या भूमिकेत हळूहळू बदल करण्यास सुरुवात केली. सुरुवातीला स्वत: पासून कामाला सुरुवात केली. हळू हळू सर्व शिक्षक सहभाग घेऊ लागले. सांघिक वृत्तीने जर काम केले तर काम यशस्वी होते हि सांघिक भावना शिक्षकामध्ये निर्माण केली. सुरुवातीला मी शाळा विकासाचे शिक्षकांच्या मदतीने नियोजन केले. नियोजनाशिवाय कोणतेही कामकाज पूर्ण होऊ शकत नाही, याची जाणीव केंद्रप्रमुख गटशिक्षणाधिकारी, विषय साधनव्यक्ती यांनी करून दिल्यामुळे सर्वप्रथम नियोजनाला प्राधान्य देण्यात आले. शाळेच्या अत्यावश्यक गरजा कोणत्या, कोणत्या बाबींमध्ये बदल करायचा याबाबत यादी तयार करून प्राधान्य क्रम देण्यात आला. त्यामध्ये शालेय परीसर स्वच्छता विद्यार्थी उपस्थितीसाठी पालक भेटी नियोजन,शालेय परिसरात वृक्षारोपण,

शाळेची रंगरंगोटी,शालेय सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन यासारख्या कामकाजा विषयीचे नियोजन करण्यात आले.



शालेय परिसरात वृक्षारोपण व बाग

शाळेच्या विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी गावकऱ्यांची साथ असणे आवश्यक आहे.कारण गावातील काही लोक शाळेत येऊन घाण करत होते.शाळेच्या परिसरात घाण आणून टाकत होते.शाळेविषयी कोणत्याही प्रकारची आस्था त्यांच्या मनात नव्हती.त्यामुळे त्यांच्या मानसिकतेत बदल घडवून आणणे आवश्यक होते.त्याशिवाय शाळेचा विकास शक्य नाही.म्हणून आम्ही सर्वप्रथम शाळेत पालकसभेचे आयोजन केले.



पहिल्याच वेळी पालकांचा पाहिजे तेवढा प्रतिसाद मिळाला नाही. नंतर आम्ही पालक भेटीचे नियोजन करून सर्व शिक्षकांनी पालक भेटी केल्या. पालक भेटीतून पालकांचे प्रबोधन केले. शाळेत विद्यार्थी रमले पाहिजे त्यासाठी शाळेत आनंददायी वातावरण असणे आवश्यक आहे .त्यासाठी विद्यार्थ्यांच्या मदतीने वृक्षारोपण करण्यात आले. त्या वृक्षांची संगोपनाची

जबाबदारी विद्यार्थ्यांवरच देण्यात आली त्यामुळे विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक झाडांचे संगोपन केले. तसेच स्वत:हून काही फुलांच्या झाडांची लागवड केली.



हळूहळू शाळेमध्ये हिरवीगार झाडे फुलांची झाडे बहरून आली. शाळेला देखभाल दुरुस्ती अनुदानातून तसेच काही लोकसहभाग मिळवून दुरुस्ती व रंगरंगोटी करण्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीची बैठक बोलाविण्यात आली.मी सदस्यांचे प्रबोधन केले या कामात त्यांचे सहकार्य मिळविले. शाळेला मिळालेले अनुदान पुरेसे नव्हते म्हणून शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष , उपाध्यक्ष व सदस्य यांनी स्वत:हून लोकसहभाग मिळवून रंगरंगोटीसाठी मदत केली. अशा पद्धतीने शाळा विकासाची मुहुर्तमेढ रोवली गेली.



लोकसहभाग मिळवून रंगरंगोटी

समता-समानता –

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर शाळेत समता व समानता निर्माण करणे आवश्यक वाटले .कारण शाळेमध्ये यापूर्वी समता व समानता याकडे दुर्लक्ष केले जात होते. विद्यार्थी विकासासाठी ही बाब पूरक नसल्याचे निदर्शनास आले. करून त्यांचे प्रबोधन करण्यात आले.

शाळा संरक्षण आणि सुरक्षा –

शाळा व शाळेतील इतर सर्व बाबी सुरक्षित ठेवायच्या असतील तर त्यासाठी आवार भिंत अत्यंत महत्वाची आहे.कारण शाळेला आवार भिंत नव्हती. त्यामुळे शाळेच्या सुरक्षिततेचा मोठा प्रश्न आमच्या पुढे होता. कारण शाळेत लावण्यात आलेली झाडे बागबगीचा , शालेय वर्गपरीसर , खेळाचे साहित्य या सर्व गोष्टी आवार भिंतीशिवाय सुरक्षित राहू शकत नाही याची जाणीव झाली. कोणत्याही परिस्थिती शाळेला आवार भिंत करणे क्रमप्राप्त होते. त्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीची बैठक बोलावण्यात आली व त्यामध्ये शाळेच्या सुरक्षिततेसाठी आवार भिंत किती महत्वाची आहे याची जाणीव समितीला करून देण्यात आली. समितीच्या या बैठकीत सर्व शिक्षा अभियानातून शाळेला आवार भिंत मिळविण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचा ठराव घेण्यात आला व तो प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाला पाठवून , त्याचा पाठपुरावा करून आवार भिंत मंजूर करून घेण्यात आली. व संपूर्ण शाळेला आवार भिंत तातडीने पूर्ण करण्यात आली. त्यामुळे शाळेत लावण्यात आलेली झाडे बागबगीचा , शालेय वर्गपरीसर , खेळाचे साहित्य या सर्व गोष्टी सुरक्षित राहू लागल्या.

त्याचप्रमाणे शाळेच्या वेळेव्यतिरिक्त शाळेची निगा राखण्याची जबाबदारी शाळेतील विद्यार्थी , शाळेशेजारील व्यक्ती ,शालेय व्यवस्थापन सदस्य , शाळेचे काही माजी विद्यार्थी यांच्यावर सोपविण्यात आली. व त्यांचा शाळेविषयीचा जिव्हाळा वाढविण्यात आला. शाळेत विद्यार्थ्यांचे सुरक्षापथक तयार करण्यात आलेले आहे. आगीपासून शाळेची सुरक्षा करण्यासाठी शाळेत अग्निशामक यंत्र अद्ययावत ठेवण्यात आले आले असून वेळप्रसंगी त्याचा वापर करण्याविषयी अगोदर त्याचे प्रशिक्षण स्वत: मी अगोदर घेतले व नंतर सर्व शिक्षकांना दिले.

आपत्ती व्यवस्थापनासंबंधीचे सर्व शिक्षकांनी प्रशिक्षण घेऊन वेळोवेळी विद्यार्थ्यांना त्याविषयी मार्गदर्शन केले जाते.

विद्यार्थी सहभागाची संधी उपलब्ध करून देणे, विविध सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेण्याचे स्वातंत्र्य यासारख्या बाल अधिकाराकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले जाते. विद्यार्थी सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी व त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात.त्यासाठी शाळेत कला रंगमंच व भव्य सांस्कृतिक सभागृह तयार केले आहे.




कलागुणांना वाव देण्यासाठी बाल रंगमंच व सांस्कृतिक सभागृह

शाळेत नियमित सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येतात.त्यामुळे विद्यार्थी स्वत: कार्यक्रमात भाग घेऊ लागले.




शालेय वातावरण

पूर्वी शाळेत झाडेझुडपे , फुलांचा बागबगीचा , शाळेची रंगरंगोटी नव्हती. त्यामुळे शालेय वातावरण, परिसर, प्रसन्न व आनंददायी वाटत नव्हता साहजिकच विद्यार्थीसुद्धा

शाळेत टिकत नव्हते व शिकताही नव्हते. परंतु शालेय नेतृत्वाने प्रभावित होऊन सर्व विद्यार्थी शाळेत यावे , शाळेत टिकावे , शिकावे यासाठी शालेय वातावरण हा घटक अत्यंत महत्वाचा आहे हे लक्षात आले. निरागस बालमनावर प्रसन्न आणि आनंददायी वातावरण निर्माण होण्यासाठी शालेय परिसरसुद्धा प्रसन्न आणि आनंददायी असणे आवश्यक आहे. याच दृष्टीने विचारविनिमय करण्यात आला. व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी रूपरेषा तयार केली. यासाठी पालक सभेचे आयोजन करून त्यांचा सहभाग घेण्यात आला. त्यातूनच शाळेत विविध प्रकारची झाडे झुडपे फुलांची झाडे , शालेय रंगरंगोटी ही कामे मी पूर्ण करून घेतली. शाळा सुशोभित व आकर्षित दिसण्यासाठी शिक्षकांचासुद्धा सहभाग घेण्यात आला.



झाडांना पाणी घालतांना विद्यार्थी

शाळेतील झाडेझुडपे बागबगीचा यांच्या संगोपनाची जबाबदारी विद्यार्थ्यांवर सोपविली त्यामुळे ते काळजीपूर्वक जोपासना करू लागले . शाळा भरण्यापूर्वी झाडांना पाणी घालतात , शाळा परीसर वर्ग परिसर स्वच्छ करून कचरा कुंडीमध्ये कचरा टाकतात.



कचरा साठविण्यासाठी कचरा कुंडी

ही कामे विद्यार्थी स्वत हून नियमितपणे करतात. त्यामुळे आज रोजी शाळेतील वातावरण प्रसन्न व आनंददायी असून विद्यार्थी शाळेत नियमित येतात व शिकतात.

शाळेची दृष्टी (VISION) VISआणि ध्येय (MISSION)

कोणत्याही बाबतीत विकास साधायचा असेल तर दृष्टी आणि ध्येय हे घटक महत्वाचे असतात. vision डोळ्यासमोर ठेऊन ध्येय ठरविले तर ती साध्य करण्यासाठी प्रयत्न करणे सोपे जाते व ध्येयाप्रती निष्ठा ठेवली तर ती पूर्ण होण्यासाठी वेळ लागत नाही हा दृष्टीकोन माझ्यामध्ये निर्माण झाला . सर्व प्रथम केंद्रात भौतिक सुविधेच्या बाबतीत परिपूर्ण अशी एक नंबरची शाळा बनविण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवण्यात आले.RTE चे सर्व निकष पूर्ण करण्याचे ठरविले.त्यामध्ये सर्व वर्गांना स्वतंत्र वर्ग खोली ,शाळेला आवारभिंत ,पिण्याच्या पाण्याची सुविधा ,मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह ,क्रीडांगण इ.गोष्टीकडे जाणीवपूर्वक लक्ष देले.सर्व शिक्षा अभियानातून या सर्व गोष्टी पूर्ण करण्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने पाठ पुरावा करून त्यापूर्ण करून घेण्यात आल्या.ग्रामपंचायत च्या १४ व्या वित्त आयोगातून आरओ च्या पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून घेण्यात आली.



पिण्याच्या पाण्याची सुविधा

मुला-मुलींसाठी काही स्वच्छतागृह लोकसहभागातून तयार करून घेण्यात आली.





मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह

लोकसहभागातून सर्व शाळेला रंग –रंगोटी करून घेण्यात येऊन सर्व भिंती बोलक्या करण्यात आल्या.शाळेच्या आवारात वृक्ष लागवड करण्यात आली. शाळेच्या परिसरात ठिकठिकाणी फुलांच्या झाडांची लागवड,फुलांची बाग तयार करून शाळा सुशोभित करण्यात आली.लोक सहभागातून शाळेच्या प्रवेशव्दारावर शाळेच्या नावाची कमान तयार करण्यात आली.



शाळेचे भव्य प्रवेशव्दार

तसेच मुले शाळेत रमली पाहिजे,आनंदी राहिली पाहिजे यासाठी शाळेत लोकसहभागातून घसरगुंडी ,झोका,यासारखे साहित्य उपलब्ध करून घेण्यात आले.



या खेळण्याच्या सुविधेमुळे विद्यार्थी आनंदाने शाळेत येऊ लागली व खेळू लागली

अध्ययन अध्यापन प्रक्रियेत झालेला बदल –

- पोषक अध्ययन वातावरण विकसित करणे –

शाळेमध्ये पोषक अध्ययन वातावरण निर्माण करण्यासाठी शाळेतील शिक्षकांना विविध शैक्षणिक साहित्य निर्माण करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्याचप्रमाणे शाळा स्तरावर प्राप्त भाषापेटी , गणित पेटीतील साहित्य वापराविषयी शिक्षकांना मार्गदर्शन केले. तसेच वर्गात विद्यार्थ्यामध्ये गटचर्चा घडवून आणण्यासाठी शिक्षकाना प्रोत्साहित केले. याबाबत शिक्षकांच्या तसेच पालकांच्या बैठका घेऊन त्यात वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येते. वर्गामध्ये तसेच वर्गाच्या बाहेर अध्ययन क्षमतेनुसार रंगरंगोटी करून घेण्यात आली.

सक्रीय अध्यापन तंत्राचा वापर करणे –

अध्यापनाची नवनवीन तंत्रे वापरले तर अध्ययन अध्यापन प्रक्रिया अतिशय प्रभावी होऊ शकते. हा विश्वास असल्याने सर्वांनी अध्यापनात नवीन तंत्र , पद्धतीचा वापर करण्यास सुरुवात केली. ज्ञानरचनावादी दृष्टीकोनाचा वापर, बहुवर्ग अध्यापन पद्धती ,गट पद्धती यांचा नियमित वापर शाळेत केला जात आहे. तसेच इ लर्निंग साहित्याचा अध्यापनात वापर करण्यासाठी शिक्षकांना तंत्रस्नेही बनविण्यासाठी प्रयत्न केले. व आज शाळेत LCD , मोबाईल, यासारख्या इ लर्निंग साहित्याचा वापर अध्ययन अध्यापनात केला जात आहे.

- शाळेचा दैनंदिन आढावा घेणे -

अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभाबीपणे राबविण्यासाठी घटक नियोजन व वार्षिक नियोजन दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे चालविले जावे म्हणून शाळेच्या शिक्षकांची सहविचार सभा घेऊन सूचना दिल्या जातात. तसेच सर्व वर्गशिक्षकांना आपापल्या वर्गात घटक नियोजन , वार्षिक नियोजन , शाळेचे वेळापत्रक लावणे व त्यानुसार अध्ययन अध्यापन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व वर्गात घटक व वार्षिक नियोजन लावण्यात येऊन शाळेच्या वेळापत्रकाप्रमाणे शाळेचे कामकाज चालते. त्याचप्रमाणे शालेय कामकाजाचे वाटप शिक्षकांमध्ये केलेले आहे ते दिलेल्या वेळेत झाले किंवा नाही , अध्ययन अध्यापन घटक नियोजन , वार्षिक नियोजनाप्रमाणे चालते किंवा नाही याचा दैनंदिन आढावा घेतला जातो. तसेच वर्गातील अध्ययन अध्यापन प्रक्रिया व्यवस्थित चालू आहे किंवा नाही याची खात्री करण्यासाठी मुख्याध्यापक या नात्याने वर्गात भेटी दिल्या जातात. यामुळे शालेय गुणवत्ता वाढीस लागण्यास मदत झाली.



मुख्याध्यापक यांची वर्ग भेट

- शाळेचे स्वयं मुल्यांकन करणे , पुनरावलोकन आणि सुधारणा करणे –

शाळेचे स्वयंमूल्यांकन केले तर आपली प्रगती किती झाली , काय करणे बाकी आहे व त्यामध्ये काय सुधारणा करण्याची आवश्यकता आहे या विषयी जाणीव निर्माण होते शाळेचा एकूण आरसाच आपल्या समोर उभा राहतो. त्यामुळे माझी समृद्ध शाळा , शालासिद्धी , प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत २५ मुद्यांच्या आधारे शाळेचे मुल्यांकन करण्यात आलेले आहे . त्यामुळे शाळा सुधारण्यासाठी दिशा मिळाली. कमतरता असलेल्या बाबींची पूर्तता करण्यासाठी प्रयत्न केले जातात . कमतरता असलेल्या बाबांची प्राधान्यक्रमाने यादी तयार करून त्या पूर्ण करण्यासाठी जबाबदारी निश्चित करून त्या पूर्ण करण्यसाठी प्रयत्न केले जातात त्यासाठी सर्व शिक्षक , शालेय व्यवस्थापन समितीचे सहकार्य घेतले जाते आणि आवश्यक त्या ठिकाणी प्रशासकीय कामांसंबंधी वरिष्ठ कार्यालयाची मदत घेतली जाते . त्यामुळे शाळेच्या विकासात सुधारणा झाली.

प्रगती चाचण्या –

शाळेच्या भौतिक सुविधेबाबत ज्याप्रमाणे स्वयं मूल्यमापन करण्यात येते त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमतांची पडताळणी करण्यासाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन अंतर्गत प्रगती चाचण्या घेण्यात येतात. त्यामध्ये पायाभूत चाचणी , संकलित चाचणी १ व २ यांचा समावेश होतो. या चाचण्यांमध्ये विद्यार्थ्यांची प्रगती जाणून घेऊन त्यामध्ये प्रगती करण्यासाठी प्रयत्न केले जातात. त्यासाठी अतिरिक्त पूरक मार्गदर्शन केले जाते.

अध्ययन स्तर निश्चीती –

औरंगाबाद जिल्ह्यात मागील वर्षापासून सर्व शाळेतील विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमतांची पडताळणी करण्यासाठी मागील वर्षी अध्ययन स्तर निश्चितीच्या ३ चाचण्या घेण्यात आल्या. तर या वर्षी आत्तापर्यंत २ चाचण्या घेण्यात आल्या. या चाचण्यांच्या आधारे विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतांची पडताळणी करून माहितीचे विश्लेषण करण्यात आले. वर्गनिहाय किती विद्यार्थी कोणत्या क्षमतेमध्ये आहेत याचे विश्लेषण करून विद्यार्थ्याच्या क्षमतेमध्ये वाढ करण्यासाठी प्रयत्न केले जातात. ज्या त्या वर्गाच्या अंतिम स्तरावर विद्यार्थी जाण्यासाठी केंद्रासम्मेलनामधून आराखडा तयार देण्यात आला. तसेच अध्ययन अध्यापन

सुकर होण्यासाठी कोणत्या संकल्पना वापराव्यात , कोणती तंत्र वापरावीत याविषयी माहिती घेण्यासाठी शिक्षकांना केंद्रसम्मेलनात भाग घेण्यासाठी प्रेरित केले व विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केले जात आहेत. तसेच विषय साधन व्यक्ती यांनी सुद्धा विद्यार्थ्यांच्या क्षमतेमध्ये वाढ करण्यासाठी मार्गदर्शन केले.



श्री.परमेश्वर कठोरे विषय साधन व्यक्ती यांचे विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन

विषय साधन व्यक्ती व केंद्रप्रमुख यांचा शाळा विकासात सहभाग –

विषय साधनव्यक्ती व केंद्रप्रमुख यांचे SLDP शाळा नेतृत्व विकास कार्यक्रम प्रशिक्षण झाल्यामुळे त्या प्रशिक्षणातून प्रभावित झाले होते.प्रशिक्षणातून मिळालेल्या नेतृत्व गुणाविषयी त्यांनी सुलभक या नात्याने शाळा भेटीतून वेळोवेळी मार्गदर्शन केले. यशस्वी शाळांच्या यशोगाथा आम्हाला दाखविल्या .त्यामुळे माझ्यामध्ये नेतृत्व विकासाचे गुण निर्माण झाले. तसेच श्री.परमेश्वर कठोरे, विषय साधन व्यक्ती व केंद्रप्रमुख यांनी शाळेला दिलेल्या वेळोवेळी भेटीतून शाळा विकासाबाबत प्रेरणा दिली. त्याचप्रमाणे केंद्र संमेलनामधून, तालुका गुणवत्ता कक्षाच्या बैठकीतून आम्हाला प्रेरित केले.

शाळा विकासासाठी अंतर्भूत असणाऱ्या घटकाविषयी तसेच विविध शाळांची उदाहरणे देवून शाळा विकास कसा घडवावा याविषयी मार्गदर्शन दिले. त्याचप्रमाणे ज्या बाबी पूर्ण करण्यासाठी किंवा साध्य करण्यासाठी अडचणी येत होत्या त्याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. आपण सुद्धा शाळेचा विकास करू शकतो असा आत्मविश्वास साधनव्यक्ती व केंद्रप्रमुख यांनी शाळाभेटी दरम्यान केला त्यामुळे आणखीनच प्रोत्साहन मिळाले. श्री.परमेश्वर

कठोरे विषय साधन व्यक्ती व श्रीम.राठोड मॅडम,केंद्रप्रमुख यांनी शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकांना उपस्थित राहून मार्गदर्शन केले आणि त्यांचेसुद्धा सहकार्य मिळवून दिले.



केंद्रस्तरीय गुणवत्ता सक्षमीकरण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना केंद्रप्रमुख श्रीम.राठोड व श्री.परमेश्वर कठोरे विषय साधनव्यक्ती

शाळेत राबविले जाणारे नवोपक्रम –

विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये रांगोळी स्पर्धा,सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, वाढदिवस साजरा करणे, सांस्कृतिक कार्यक्रम व मूल्यवर्धन यासारखे नवोपक्रम राबविले जातात.त्यात सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले जाते, स्पर्धेमुळे विद्यार्थ्यामध्ये जिंकण्याची जिद्द निर्माण होते तर अपयश पचन करण्याची क्षमता निर्माण होते.या नवोपक्रमासाठी वर्गनिहाय नियोजन केले जाते.



परिपाठाअगोदर व्हरांड्यामध्ये विद्यार्थी गटामध्ये बसून अभ्यास करतांना



मूल्यवर्धन उपक्रम घेताना शिक्षक

त्याचप्रमाणे परिपाठाअगोदर जे विद्यार्थी लवकर येतात त्या विद्यार्थ्यांचा व्हरांड्यामध्ये अभ्यास घेतला जातो.त्याची जबाबदारी दिवसनिहाय शिक्षकावर सोपविण्यात आली .विद्यार्थी स्वतःहून आपल्या गटामध्ये बसून अभ्यास करतात.साहजिकच विद्यार्थ्यांनाही अभ्यासाची सवय लागली.

- विद्यार्थी विकासात तंत्रज्ञानाचा वापर-

विद्यार्थी गुणवत्ता सुधारण्यासाठी शाळेत तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यासाठी शाळेत संगणक प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आली आहे.त्यामध्ये ५ संगणकाचा समावेश आहे.

- शालेय व्यवस्थापन समितीचे सहकार्य-

शालेय व्यवस्थापन समितीचे सहकार्य अनमोल असल्यामुळे शाळेची प्रगती मोठ्या प्रमाणात होऊ शकली. पूर्वी शालेय व्यवस्थापन समितीचे सहकार्य लाभत नव्हते, त्यांचे शाळेकडे दुर्लक्ष होते, त्यामुळे शाळा विकासात खिळ निर्माण झाली. यासाठी काहीतरी केले पाहिजे असा विचार माझ्या मनात आला व त्यांची बैठक बोलावली.त्यामध्ये शालेय व्यवस्थापन समितीची कार्य, महत्व, शाळा विकासात त्यांचा सहभाग याविषयी प्रबोधन करण्यात आले. विद्यार्थी आणि शाळा आपलीच आहे असे समजून जर शाळेला सहकार्य केले तर शाळेचा विकास होऊन पर्यायाने गावचा विकास होतो ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली.त्यासाठी शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रम राबवून शालेय व्यवस्थापन समितीच्या

सर्व सदस्यांना आमंत्रित करण्यात येवू लागले हळूहळू त्यांच्यामध्ये बदल होत जाऊन ते स्वतः शाळेत येवून विचारविनिमय करू लागले. शालेय कार्यक्रमात सहभाग घेवू लागले.



शालेय व्यवस्थापन समिती सदस्य

आता तर मोठ्या प्रमाणात त्यांचे सहकार्य लाभत आहे. शाळेसाठी तन-मन-धनाने सहकार्य करत आहे, शाळेची देखभाल ते करू लागले. त्यामुळेच तर आज शाळा यशाची शिखर गाठत आहे.

- शिक्षण विभागाच्या अधिकार्यांच्या शाळा भेटी-
- शाळेचा होत असलेला विकास पाहण्यासाठी व त्यांना आणखी प्रोत्साहन देण्यासाठी अधिकार्यांनी शाळेला भेटी दिल्या.जिल्हा परिषद ,औरंगाबाद च्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीम.पवनीत कौर मॅडम ,गटशिक्षणाधिकारी श्री.दोतोंडे साहेब ,शिक्षण विस्तार अधिकारी श्री.फुसे साहेब यांनी शाळेला भेट देऊन प्रोत्साहन दिले.



मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीम.पवनीत कौर मॅडम यांची शाळा भेट

➢ इतर उल्लेखनीय कार्य-

शाळेच्या विकासात लोकसहभाग महत्वाचा आहे त्यासाठी शाळेची लहान मोठी आर्थिक गरज असणारी कामे लोकसहभागातून पूर्ण केली जाते.त्यासाठी पालकांचे प्रबोधन केले जाते व आर्थिक सहभाग मिळविला जातो. शाळेची पूर्वीची स्थिती व आताची स्थितीत झालेला बदल त्यांना निदर्शनास आणून दिला जातो, शाळेत होत असलेला बदल त्यांच्या सहज लक्षात येतो त्यामुळे ते शाळेसाठी पाहिजे तेवढी आर्थिक मदत करायला तयार असतात. पूर्वी शाळेची गुणवत्ता चांगली नसल्यामुळे बरीच मुले दुसऱ्या गावात शिकण्यासाठी जात होती तर काही मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जात होती परंतु आता शाळेची गुणवत्ता सुधारल्यामुळे कोणताही विद्यार्थी बाहेरगावी शिकण्यासाठी जात नसून यावर्षी १९ विद्यार्थी परत या शाळेत दाखल झाले . त्यात इंग्रजी माध्यमाच्या मुलांचा देखील समावेश आहे. प्रभावी नेतृत्व ,शालेय व्यवस्थापन समितीचे सहकार्य,शिक्षकांची सांघिक काम करण्याची भावना ,लोक सहभाग,जिल्हा सातत्यपूर्ण व्यावसायीक विकास संस्था औरंगाबाद, गटशिक्षणाधिकारी,शिक्षण विस्तार अधिकारी,केंद्र प्रमुख,विषय साधन व्यक्ती यांचे प्रभावी मार्गदर्शन या सर्व गोष्टी मुळे मला शाळा विकास करण्यास मदत होऊन आज शाळा प्रगती पथावर आहे.



धन्यवाद

राजेंद्र पाटील
जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा, किन्होळा
मु.किन्होळा, पो.पान्हेरा खेडी, तालुका.मोताळा, जिल्हा.बुलडाणा -४४३१०३
ई-मेल आयडी - patilrajendra434@gmail.com

प्रस्तावना -

जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा मु.किन्होळा,पो.पान्हेरा खेडी,तालुका मोताळा जिल्हा बुलडाणा येथे मी मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहे.शाळेच्या प्रगतीबाबत विचार करताना काही सुविधा उपलब्ध नसल्याने शाळा प्रगतीत अडचणी येत आहेत असे जाणवले.ज्यात काही समस्या भौतिक सुविधांसंदर्भात आहेत, काही नियोजनासंदर्भात,व्यवस्थापन संदर्भात, तर काही विद्यार्थ्यांसंदर्भात आहेत. ही शाळा गावाबाहेर असल्याने काही समस्या जाणवत होत्या. यामध्ये शाळेला संरक्षण भिंत नसणे,विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने शुद्ध पेयजलाची व्यवस्था नव्हती.समाजातील लोकांचे किंवा पालकांचे सहकार्य कमी प्रमाणात होते.मुख्य रस्त्यापासून शाळेकडे जाण्याची व्यवस्था नव्हती,त्यातून 100% विद्यार्थ्यांची उपस्थिती नाही ही समस्या मोठी होती.



समस्या दूर करण्याची गरज :- भौतिक सुविधा परिपूर्ण असल्यास विद्यार्थ्यांचे मन शाळेत रमते, त्यांची शैक्षणिक प्रगतीची गती वाढते.शिक्षणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी मदत होते म्हणून या समस्या दूर होणे अत्यावश्यक आहे. मुलांचे आरोग्य टिकविण्यासाठी शुद्ध पाण्याची व्यवस्था असणे गरजेचे आहे. एकंदरीत या समस्यांचे निराकरणासाठी पालकांचे सहकार्य पूर्ण मिळणे आवश्यक आहे,तसा प्रयत्न शाळेचा सुरु आहे.

मुख्याध्यापक सहविचार सभा



शाळेची दृष्टी (VISSION) -

केंद्रातील प्रत्येक शाळेस आय. एस. ओ. नामांकन प्राप्त करून देणे.

MISSION:-

भौतिक सुविधा पूर्ण करणे.शाळा डिजिटल करणे, पटसंख्या वाढवणे.शाळेसाठी पक्क्या रस्त्याची व्यवस्था करणे.



शाळा विकासासाठी पालकांची उपस्थिती

शाळा विकासासाठी केलेले नियोजन व अंमलबजावणी :-शाळेच्या सर्व समस्या शाळा व्यवस्थापन समिती समोर ठेवणे व त्याचे निराकरण करण्यासाठी योग्य पाऊल उचलणे,सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था यांच्याशी संपर्क सुरु आहे. गावातील प्रतिष्ठित नागरिक यांना शाळेमध्ये असलेली भौतिक सुविधांची कमतरता व त्यांचा होणारा विपरीत परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनावर कसा होतो, हे सविस्तर समजून सांगितले .तसेच समस्या निवारणासाठी ग्रामपंचायतकडे पाठपूरावा करण्यात येऊन त्याचा समावेश ग्रामविकास आराखड्यात करण्यात आला. 14 व्या वित्त आयोगातून शाळेसाठी उपरोक्त सुविधांसाठी शाळा व्यवस्थापन समिती सहकार्याने आम्ही यासंदर्भात वेळोवेळी पाठपुरावा केला .

शाळा प्रगतीसाठी अवलंबलेली तत्वे :- शाळेच्या विविध उपक्रमांतर्गत मुला-मुलींना समान संधी देण्यात येते. मुलांच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देण्यात येते. बालसुरक्षा या मुद्द्यांतर्गत विद्यार्थ्यांच्या मनातील भीतीचे वातावरण दूर करण्यात आले आहे.सर्व मुलांना आनंददायी पद्धतीने अध्यापनप्रक्रियेत सहभागी करून घेतले जाते.शालेय पोषण आहार संदर्भात धान्य माल चांगल्या कोठ्यामध्ये सुरक्षित ठेवला जातो. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अग्निशामक यंत्रणेची व्यवस्था शाळेत आहे. शालेय पोषण आहार देताना कोणत्याही स्वरुपाची अनुचित घटना घडणार

नाही, याची काळजी घेतली जाते. शाळा डिजिटल व प्रगत झालेली आहे.शाळेचा पट 138 आहे. शाळेच्या प्रगतीसाठी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, माता-पालक समिती, शिक्षक-पालक समिती, इतर गावातील नागरिक यांच्याशी आम्ही चांगले संबंध निर्माण केले आहेत.



डीजिटल शाळा

शालेय वातावरण व कार्यसंस्कृती :- शालेय वातावरण व परिसर रम्य असून स्वच्छ व सुंदर आहे.शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले असून विविध फळांची आणि फुलांची झाडे लावलेली आहेत. वर्गाबाहेरील आणि आतील सर्व रंगरंगोटी करून मुलांसाठी आकर्षित व बोलक्या करण्यात आलेल्या आहेत.विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक आरोग्याच्या दृष्टीने प्रत्येक आठवड्याला मुलांची वैद्यकीय तपासणी केली जाते. तसेच विद्यार्थ्यांनी वैयक्तिक स्वच्छता जपावी म्हणून हँडवॉश स्टेशनचा वापर शाळेत विद्यार्थी करतात. शाळेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याचा वाढदिवस साजरा केला जातो. तसेच विविध भारतीय सणांचे महत्व व माहिती विद्यार्थ्यांना कळावी म्हणून शाळेत सणांचे आयोजन करून साजरा केले जातात. याप्रसंगी शाळेमध्ये पालकांना विविध समित्यांच्या माध्यमातून प्रतिष्ठित नागरिकांना आमंत्रित केले जाते. सर्व शिक्षक आपल्या वर्गातील सर्व मुलांना शिक्षणाचे अनुभव आनंददायी पद्धतीने देतात. शैक्षणिक साहित्याचा वापर करून मुलांची प्रगती करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असतो. शाळेमध्ये विविध उपक्रम राबवून समाज शिक्षक यांना एकत्रित करण्याचा प्रयत्न केला जातो. शाळेमध्ये उपलब्ध असलेले साहित्य

आणि त्यांचे योग्य नियोजन करून दैनंदिन अध्ययन-अध्यापनात वापर करण्यात येतो. भविष्यात शाळेला आय. एस. ओ.दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.



स्व-विकास व त्यातून शालेय विकास आणि संघबांधणी : - जोपर्यंत आपण स्वत:हून कोणतेही काम करत नाही, तोपर्यंत आपले सहकारी मंडळी किंवा इतर लोकही ते काम करणार नाही. कामाला यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी स्वतःची मानसिक तयारी असणे आवश्यक आहे.त्याशिवाय कार्य प्रभावीपणे करता येणार नाही.केंद्रप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही शाळा प्रगतीकडे नेण्याचा प्रयत्न करीत आहोत.शाळेमध्ये विविध समित्या गठीत होत्या, पुनश्च कार्यान्वित करण्यात आल्या. जसे - शाळा व्यवस्थापन समिती,परिवहन समिती, शालेय पोषण आहार समिती, माता पालक संघ,शिक्षक-पालक संघ, शालेय मंत्रीमंडळ,शिक्षक मित्र मंडळ, अशा विविध संघाची बांधणी करून विकासाकडे वाटचाल सुरू झालेली आहे.यामुळे विद्यार्थी पट वाढविण्यासाठी प्रयत्न करत आहोत. सातत्याने पालकांशी संपर्क करण्यात आल्याने शिक्षक-विद्यार्थी-पालक असे वेगळीच शृंखला तयार करून समन्वय साधला जातो. “100% मुल शिकलेच पाहिजे” या हेतूने प्रत्येक शिक्षक तन-मन-धन अर्पण करून ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहेत. याचाच पुढचा टप्पा म्हणजे शाळेचा विकास. विद्यार्थी-शिक्षक-पालक-समाज एकत्र आलेच पाहिजे. एकमेकांच्या सहकार्याने कामाची गती वाढते व कामाचे प्रत्याभरण चांगल्या प्रकारे मिळते.

शिक्षकांना त्यांच्या आवडीनुसार इच्छेनुसार शालेय दैनंदिन काम, व्यवस्थापनस्तरीय काम, नेतृत्वाची जबाबदारी या सर्वाची विभागणी करण्यात आली. आता प्रत्येक शिक्षक स्वतःहून घेतलेले कार्य मनापासून करत आहेत.



शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकवृंद

शाळेतील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत झालेला बदल :-ज्ञानरचनावाद,प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र, ई-लर्निंग , डिजिटल शाळा, शैक्षणिक साहित्याचा जास्तीतजास्त वापर, कृतीयुक्त शिक्षण, विद्यार्थ्यांची आसन व्यवस्था यांमध्ये सकारात्मक बदल झालेले आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थी स्वयंअध्ययन पद्धतीने अध्ययन करण्याचा प्रयत्न करीत असून प्रसंगी शिक्षकांचीही मदत घेत आहेत. यासाठी ते स्वतःहून शैक्षणिक साहित्याचा जास्तीत जास्त वापर करीत आहे तसेच विद्यार्थी देखील स्वतःची शैक्षणिक साधने तयार करण्याचा प्रयत्न करीत आहेत. यातूनच नवनिर्मितीची कल्पना सुदधा त्यांच्या मनामध्ये रुजवली जात आहे. शाळेमध्ये ग्रामपंचायत 14 व्या वित्तआयोगातून २ LED टी. व्ही. बसविलेले असून त्याचा उपयोग शैक्षणिक कार्यक्रमासाठी केला जातो. आनंददायी पद्धतीने प्रत्येक शिक्षक मुलांशी चर्चा करून मुला-मुलींचे एकत्र गट करून वेळेनुसार कधी वर्गात कधी वर्गाबाहेर बसवून त्यांना शिक्षणाचे अनुभव देत आहेत. शिक्षकांची मानसिकता सकारात्मक झालेली आहे. आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत आढावा घेऊन संपादणूकीत मागे असलेल्या विद्यार्थ्यांना पूरक मार्गदर्शन दिले जाते.



अध्ययन प्रक्रियेत झालेला बदल

शाळेतील पालक व समाजाचा सहभाग प्राप्ती : शाळेमध्ये व्यवस्थापन समिती, शालेय पोषण आहार समिती, परिवहन समिती, शिक्षक-पालक संघ, माता-पालक संघ स्थापन झालेले असून शाळेमधील प्रत्येक सांस्कृतिक शैक्षणिक कार्यक्रमात वरील सर्व समिती सदस्यांचा गावातील प्रतिष्ठित नागरिकांचा सहभाग व सहकार्य घेण्याचा प्रयत्न असतो. आम्ही सर्वांच्या सहकार्याने वरील उपक्रम यशस्वीरित्या राबवितो. गावातील नागरिक आपल्या वाढदिवसानिमित्त शाळेला शालोपयोगी भेट देऊन साहित्य वाटप करतात. त्यांचाच आदर्श घेऊन विद्यार्थीही त्यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्याचे वाटप करू लागले. यांतून विद्यार्थ्यांची ग्रामस्थांची शाळेविषयी केवळ आस्थाच नव्हे तर ही माझी शाळा असून या शाळेसाठी माझीही काहीतरी जबाबदारी असल्याबाबत जाणीव निर्माण झाल्याचे दिसून येते. यातूनच शाळा व समाज एकत्रित आणण्याचा प्रयत्न यशस्वी झालेला आहे.



शालेय गुणवत्तेच्या अनुषंगाने राबवलेले उपक्रम : शाळेचे दैनंदिन काम करत असताना विविध प्रकारचे नवोपक्रम योजना आम्ही व पालक चर्चा करून अमलात आणतो. अप्रगत मुलांसाठी यादी करून त्यांच्यासाठी योग्य ते मार्गदर्शन करून उपचारात्मक वर्ग घेऊन करण्यात येते. दैनिक परिपाठात आठवडाभर विविध विषयाचे नवनवीन उपक्रम घेण्याचे ठरले आहे. यामध्ये इंग्रजी विषयासाठी शब्द वाचन, वाक्यरचना तर गणित विषयासाठी पाढे तयार करून त्यांचा गणिती वापर, विविध भौमितिक आकार समजून त्यांचे त्रिमितीय प्रतिकृती तयार करून किंवा त्यांच्या सभोवताली असणाऱ्या वस्तूंचे लांबी, रुंदी, उंची मोजणे आणि त्यांचे क्षेत्रफळ, घनफळ, परिमिती काढणे आदि सराव सहजपणे करू लागले. खेळाच्या तासिकांमध्ये क्रीडा शिक्षण देण्यात येत आहे. विद्यार्थी आसन व्यवस्थेमध्ये बदल केला असून विद्यार्थी मुले-मुली एकत्रित गटात बसण्याची पद्धत शाळेमध्ये सुरू केली आहे. शिक्षक-विद्यार्थी एकत्रित चर्चा करून आवश्यकतेनुसार बसण्याची व्यवस्था ठरवतात. शैक्षणिक साहित्य मुलांना वापरण्यासाठी देऊन त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देण्याचा प्रयत्न केला जातो. अभिव्यक्ती, चित्रलेखन, व्याख्यान वर्ग घेण्यात येतात.



विद्यार्थ्यांसमवेत वृक्षारोपण

अपेक्षित शाळेचे काल्पनिक चित्र व त्यासाठी आपण पार पाडत असलेली भूमिका :सर्वप्रथम शाळेच्या भौतिक सुविधा परिपूर्ण करण्याचा मानस आहे. यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व शाळेतील इतर समित्या तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक यांना त्याचे महत्त्व सांगण्यात आले असून लवकरच शक्य होतील तेवढ्या सुविधा प्राधान्याने पूर्ण करण्याचे ठरले. त्यानुसार शाळेतील सर्व शिक्षक प्रयत्न करू लागले. याचसोबत शाळेचा होत असलेला हा कायापालट ग्रामस्थांनी बघितल्यावर तेही स्वयंस्फूर्तीने यात सहभागी झाले व लोकसहभागातून शाळेस अजून निधी प्राप्त होण्यास सुरू झाली. व्यवस्थापन समितीद्वारे शाळेच्या आवाराजवळच असलेली पाच गुंठे जमीन लोकसहभागातून शाळेला मैदान म्हणून उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. शाळेसाठी गावाच्या रस्त्यापासून शाळेला जोडणारा रस्ता करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. शाळेच्या भौतिक सुविधा विद्यार्थ्यांची शिक्षणातील प्रगती, शाळा डिजिटल करणे, शाळा आयएसओ नामांकनप्राप्त करण्याचा प्रयत्न सुरू आहे. हे कार्य आदरणीय केंद्रप्रमुख यांच्या मार्गदर्शनात सुरू असून लवकरात शाळा विकास होईल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



पालक आणि विद्यार्थ्यांसमवेत वृक्षारोपण कार्यक्रम

शाळा प्रगतीचे पुनरावलोकन व प्रत्याभरण यासाठीची कारवाई : कामाचे नियोजन यशाची गुरुकिल्ली असते. नियोजनाप्रमाणे कार्यवाही होते किंवा नाही याची पडताळणी प्रत्यक्ष करणे अत्यावश्यक असते. शाळेत सुरू असलेले विविध शालेय परिपाठ, शालेय पोषण आहार, स्वच्छता, वृक्षारोपण, वर्ग पाचवी व वर्ग आठवी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी आयोजित ज्यादा तासिका व विद्यार्थी प्रगती यांचा वेळोवेळी घेतलेला आढावा यासाठी सर्व शिक्षकांचे विचार घेऊन विद्यार्थ्यांच्या प्रगती तसेच गुणवत्ता वाढीसाठी सतत पाठपुरावा करून अपेक्षित बदल केला जातो. वेळोवेळी परीक्षा घेऊन अपेक्षित गुणवत्ता संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षीस दिले जाते.

समारोप :- तणावमुक्त वातावरणामध्ये काम करावे जेणेकरून कामात आनंद मिळेल यासाठी विविध कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे, जसे सकारात्मक विचार, एकाच वेळेत अनेक कामाची विभागणी, कामाची यादी असेल तर प्राधान्य क्रम देऊन नियोजन केले तर विद्यार्थ्यांची प्रगती होते आणि शाळा नावारूपाला येते, याचा प्रत्यय येऊन प्रत्यक्ष कामातून शाळेस फायदा झाला.

धन्यवाद

यशवंती शामकांत घरत

रायगड जिल्हा परिषद शाळा,हनुमानपाडा,केंद्र.कोपर,पोस्ट.जोहे,तालुका.पेण, जिल्हा.रायगड

ईमेल आयडी - yashwantigharatg@rediffmail.com



शाळा एक अध्ययन संस्था -

हनुमानपाडा शाळा आनंदायी नवोपक्रमशिल तसेच डिजिटल शाळा लोकसहभाग व माजी शाळाप्रमुख श्री.मनोहर ठाकूर यांच्या सहभागातून समृध्द झाली आहे. शाळेला शाळा सिद्धी अंतर्गत सातत्याने दोनवर्ष 'अ' श्रेणी मिळाली आहे.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत विद्यार्थी निहाय भाषा व गणित विषयांचे स्तर निहाय **मुल्यांकन** केंद्रप्रमुखांच्या अध्यक्षतेखाली केंद्रियस्तर निश्चिती मुल्यांकन समन्वय समिती स्थापन करुन शाळेचे मासिक मुल्यांकन करुन मार्गदर्शन **केले जाते.** त्यामुळे भाषा विषयाच्या प्रारंभिक स्तरापासुन स्वलेखनापर्यंत विद्यार्थ्यांचा विकास झालेला आहे. गणित

विषयातसुध्दा प्रारंभिक १ ते ९९ पर्यंतच्या संख्या वाचन, लेखन तसेच गणिती क्रिया यांचा सर्व विद्यार्थ्यांमध्ये विकास घडून आला आहे. वर नमूद केल्याप्रमाणे शाळा ही एक अध्ययन संस्था आहे. या संस्थेचा विकास म्हणजे 'स्व' विकास हा प्रामुख्याने प्रत्येक विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास झालेला आहे. शारीरिक, बौध्दीक व मानसिक विकास होण्यासाठी विविध उपक्रमांची अंमलबजावणी केली आहे. **शिक्षण विभागाचे क्षेत्रीय** अधिकारी**,** पदाधिकारी, पालक, ग्रामस्थ यांच्या भेटीअंतर्गत विद्यार्थ्यांची चाचणी घेतली जाऊन विद्यार्थ्यांमध्ये सभाधीटपणा आला असे दिसून आले.

दृष्टी (VISION) -

१) १००% प्रगत शाळा

२) गुणवत्तापूर्ण शिक्षण

३) नवोपक्रमशिल शाळा

४) शाळा सिद्धी 'अ' श्रेणी कायम ठेवणे

५) अध्यापनात डिजीटल साहीत्याचा वापर करणे.

६) विद्यार्थ्यांचा स्तर उंचावणे

ध्येय (MISSION) -

१) १००% विद्यार्थी प्रगत करणे. (प्रत्येक वर्गातील विद्यार्थी प्रगत करणे)

२) शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर करणे.

३) शैक्षणिक विद्यार्थ्यांची साहित्याची निर्मिती करणे व त्यांचा वापर दैनंदिन अध्यापनात करणे.

४) प्रत्येक विद्यार्थ्याची गुणवत्ता व त्याच्या क्षमतांचा विकास करणे.

५) विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे व त्यांचा विकास करणे.

६) शाळा सिध्दीमध्ये 'अ' श्रेणी प्राप्त करुन आदर्श शाळा घडविणे.

शाळा विकास नियोजन व अंमलबजावणी -

सर्व प्रथम **शाळा व्यवस्थापन समितीच्या** मदतीने लोकांमध्ये शाळेच्या विकासाचे महत्व पटवून दिले. गावात प्रभात फे-या, दिंडया तसेच पालकांना वैयक्तिक भेटी देवून शिक्षणाविषयी जनजागृती करण्यासाठी माजी विद्यार्थी, केंद्रप्रमुख, माजी शाळा प्रमुख यांच्यासह भाग घेतला. त्यानंतर वरील सर्वांच्या सहकार्यातून नियोजन आराखडा तयार करण्यात आला.



शाळा व्यवस्थापन समिती सभा -

दरमहा नियोजन करून मासिक सभा घेतली जाते. सभेमध्ये जास्तीत जास्त पालकांची उपस्थिती असते. विषयनिहाय ठराव घेतले जातात.

ज्ञानरचना वाद -



प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अ■र्गत ज्ञानरचनावादी अभ्यासक्रमाची अ■लबजावणी होण्याकरिता कोपर केंद्रातील मुख्याध्यापक अभ्यास दौरा **आयोजित करून** रायगड जिल्हयातील तळा तालुक्यातील शाळां■ा भेटी देवून आपलीही शाळा ज्ञानरचनावादी करण्यासाठी शैक्षणिक साहित्य निर्मिती करण्यात आली. विशेषत: वर्गात फरशीवर विषय निहाय रेखा■न करुन शैक्षणिक साहित्य इयत्तानिहाय, विषयनिहाय व घटक निहाय वापरात आले. विद्यार्थ्यांना गं■त वाटू लागली व कृतिशिल अध्ययन अध्यापन **होऊ** लागले. त्यामुळे विद्यार्थी केंद्रबिंदु होऊन शिक्षक मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन करु लागले.



डिजीटल शाळा

डिजीटल शाळा-

केंद्रप्रमुखांच्या समवेत रायगड जिल्हयातील अलिबाग तालुक्यातील पेझारी शाळेस शाळाप्रमुख व शिक्षकवृन्द यांनी भेट दिली. शाळा डिजीटल करण्यासाठी आर्थिक बाब, कालावधी व फायदा काय होतो याविषयी मुख्याध्यापकांकडून माहिती मिळविली. त्या शाळेतील प्रत्येक वर्गांना भेटी देवून अध्ययन-अध्यापनात झालेला बदल पाहिला. पालकांना विश्वासात घेवून लोक सहभागातून शाळा डिजीटल करण्यात आली .शाळेतील अध्ययन अध्यापनात, स्वयंअध्ययनात विद्यार्थ्यांकडून उस्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे.

शिक्षण पालखी, दिंडी-



पालकांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण करण्यासाठी व शिक्षणाची जनजागृती करण्यासाठी व शाळाप्रमुख, पालक, विद्यार्थी व केंद्रप्रमुख या सर्वांच्या उपस्थितीत शाळेच्या पहिल्याच दिवशी दरवर्षी शिक्षण पालखी, शिक्षण दिंडी काढली . त्यामुळे लोकांना

आपल्या पाल्याला गावच्याच शाळेत पाठविण्याची भावना निर्माण झाली व दाखलपात्र विद्यार्थी पालखीत सहभागी होवून शाळेत दाखल झाले. पटसं[redacted]या वाढली .

शाळा परिवर्तनाची तत्वे -

१) शासनाच्या परिपत्रकान्वये निकषानुसार सक्षम शाळा व्यवस्थापन समिती गठण करणे.

२) माता पालक सं[redacted], शिक्षक पालक सं[redacted], माजी विद्यार्थी सं[redacted] स्थापन करणे.

३) इयत्ता निहाय, विषय-घटकानिहाय शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना सहभागी करुन तयार करणे.

४) विद्यार्थ्याच्या कलागुणां[redacted] वाव देण्यासाठी वेगवेगळे उपक्रम, स्पर्धा व सां[redacted]कृतिक कार्यक्रम घेणे.

५) विद्यार्थी केंद्रित शिक्षण प्रक्रियेचा अंर्तभाव करणे .

६) शिक्षकां[redacted]ी सं[redacted]भावना आणि ग्रामस्थांची शाळेच्या प्रगतीसाठी एकजुट निर्माण करणे.

७) विद्यार्थी गुणवत्तेत वाढ करणे.

या बाबींचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला.

समता -

१) ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले 'लेक शिकवा अभियान' शाळा स्तरावर साजरा केला जातो.

२) सर्व मुलींना मुक्त शिक्षण मिळण्यासाठी प्रयत्न. CWSN मुलां[redacted]ा चां[redacted]ले शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न.

३) विद्यार्थ्यांचा बौध्दीक स्तर ओळखून गटवार मार्गदर्शन

४) थोर पुरुषां[redacted]या चरित्रावर आधारित व्याख्यान आयोजन.





समानता -

१) रक्षाबंन, दहीहंडी, भोंडला, आषाढी, एकादशी निमित्त वारकरी दिंडी, हातावर मेंदी काढणे, रंपंमी या कार्यक्रमातून प्रबोधन.

२) लिंग समभाव, सर्वधर्म समभाव, मीना कॅबिनेट मं या उपक्रमातून साध्य झाले.

दहीहंडी-



रंगपंचमी-



लिंगसमभाव **आणि सामाजिक समावेश-**

१) बालिका दिन, बेटी बचाव, बेटी पढाओ, रांगोळी स्पर्धा, जागतिक महिला दिन, हळदीकुंकू

२) महिला मेळावा, महिलांचा व्यक्तिमत्व विकास या माध्यमातून गावातील सर्व महिलांचा सहभाग घेण्यात येतो.

३) माजी विद्यार्थी संघ स्थापन करुन डिजीटल शाळेसाठी इंटरनेट कनेक्शन व साउंड सिस्टिम उपलब्ध केले.

बालिका दिन -



रांगोळी प्रदर्शन-



शाळासंरक्षण आणि सुरक्षा -

१) इमारत सुरक्षागेट व संरक्षक भिंत माजी शाळाप्रमुख यांच्या सहकार्यातून निर्माण करण्यात आले.

२) शाळेचे वीज बील भरण्यासाठी लोकसहभागातून आर्थिक मदत

३) शालेय परिसरात पालक व माजी शाळाप्रमुख यांच्या उपस्थितीत विद्यार्थी शिक्षक यांनी वृक्षारोपण कार्यक्रम राबविला.

४) स्वच्छ भारत पंधरवडा गावातील ग्रामस्थ, महिला, विद्यार्थी व शिक्षक यांच्या सहभागातून संपूर्ण गाव स्वच्छता मोहिम राबविली. यात मंदिरे, शाळा व गावाच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली.

५) आपत्कालीन व्यवस्थापन याबाबत केंद्रप्रमुखांमार्फत मार्गदर्शन करण्यात आले.

वृक्षारोपण-



स्वच्छ भारत पंधरवडा -



बालअधिकार -

१) शैक्षणिक साहित्याची निर्मिती करुन शालेय वातावरण आनंदायी बनविण्यात आले.

२) दप्तराविना शाळा- मुक्त वातावरण बालसभा ,एक दिवस इंजीचा, इत्यादी कार्यक्रम शाळेत राबविले जातात.

३) विद्यार्थी केंद्रित शिक्षण पध्दतीचा शाळेत वापर केला जातो.

४) शाळेत बालकां■ मं■मं■ळ स्थापन केले आहे.

५) शाळेत जि.प.शाळा सहकारी बँक विद्यार्थी चालवितात.

६) बालकां■या उत्तम आरोग्यासाठी स्वच्छ, शुध्द पाणी पुरवठा, पुरक आहारयुक्त मध्यान्ह भोजन, गोवर रुबेला लसीकरण व्यवस्थीतपणे होतात.

७) विद्यार्थी प्रश्नमं■ुषा, कविता तयार करणे, गोष्ट तयार करणे इत्यादी उपक्रम राबविले आहेत.

शैक्षणिक साहित्य निर्मिती -



स्वच्छ व शुध्द पिण्याचे पाणी-



शालेय संस्कृती -

१) शाळा सुरु होण्या अगोदर शालेय इमारत व परिसर स्वच्छता केली जाते. तसेच सभा घेऊन गावात दाखल पात्र विद्यार्थ्यांच्या घरी भेटी दिल्या जातात, जेणेकरुन गावच्याच शाळेत विद्यार्थी दाखल झाले पाहिजेत.

२) राष्ट्रीय दिनी सांस्कृतिक कार्यक्रम आणि शालेय गुणवत्ता विकास आणि लोकसहभाग याबाबत सादरीकरण केले जाते.

३) राष्ट्रीय दिनी गावातील प्रतिष्ठित वरिष्ठ मंडळींचा उत्स्फुर्त प्रतिसाद असतो.

४) वाचन प्रेरणा दिन साजरा होतो.

५) वाचन कट्टा - वाचण्यासाठी विविध पुस्तके उपलब्ध करुन देतात.

६) ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो.

७) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र संविधानासाठी त्यांचे योगदान याबाबत मार्गदर्शनपर शिबिराचे आयोजन.

८) मुलींच्या शिक्षणास प्राधान्य

९) त्यांच्या सुरक्षेसाठी तक्रार निवारण समितीची स्थापना केली आहे.

शालेय सांस्कृतिक कार्यक्रम -



शालेय वातावरण आणि शाळेतील कार्य संस्कृती -

१) शाळेच्या पहिल्या दिवशी शाळा सुरु होण्याअगोदर गावातील महिला पालक शाळा इमारत खोल्या व परिसराची स्वच्छता करतात.

२) प्रवेशोत्सवाच्या दिवशी शाळेत रांगोळी काढून आंब्याच्या पानांची तोरणे व फुलांच्या माळी **बांधून** प्रवेशोत्सवाची तयारी केली जाते.

३) लोकसहभागातून विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करतात.

४) सर्व मुलांचे गुलाबपुष्प देवून स्वागत केले जाते.

५) शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठयपुस्तक व गणवेश वाटप केले जाते.

६) २१ जून रोजी पालकांचा सहभाग घेवून योगदिन साजरा केला जातो.

७) प्रत्येक शनिवारी विद्यार्थ्यांची साधनरहित व साधनयुक्त सांघिक कवायत घेतली जाते.

नवागतांचे स्वागत -



पाठयपुस्तक वाटप कार्यक्रम -



योगदिन -



अध्ययन अध्यापन प्रक्रियेत बदल घडवून आणणे-

१) अध्ययन अध्यापन प्रक्रिया आनंदायी व विद्यार्थी केंद्रित करण्यासाठी अध्ययन अध्यापन प्रक्रियेत पुढील प्रकारचे बदल करण्यात आले.

i. पोषक अध्ययन वातावरण विकसित करणे.

ii. अध्ययन अध्यापनात तंज्ञानाचा वापर करणे.

iii. प्रशिक्षणाचा लाभ घेवून त्याचा वापर दैनंदिन अध्यापनात करणे.

iv. अध्यापनात इंटरनेटचा वापर करणे.

v. स्वयंअध्ययनासाठी शैक्षणिक टॅबचा वापर करणे.

vi. कृतितून शिक्षण

vii. ज्ञानरचनावाद संकल्पनेचा उपयोग करुन विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनासाठी प्रवृत्त करणे.

प्रोजेक्टरचा वापर -



शाळेचा दैनंदिन सर्वांगीण आढावा घेणे किंवा फेरफटका मारणे-

१) परिसरातील बोलक्या भिंतीद्वारे विविध विषयांचे ज्ञान मिळते.

२) शालेय बागेतून विविध प्रकारच्या वनस्पतींची ओळख होते.

३) शाळेच्या मळयातून वेगवेगळया भाज्या प्रत्यक्ष कशा पिकविल्या जाता याचे ज्ञान मिळते.

४) गांडूळ खत प्रकल्पाची प्रक्रिया पाहणी करुन मेहनत, मशागत व गांडूळ खताचा पिकांसाठी होणारा फायदा याचे ज्ञान होते.

५) ध्यानकुटीद्वारे विद्यार्थ्यांना ताणतणावापासून मुक्त होण्यासाठी संधी मिळते.

रायगड जिल्हा परिषद शाळा हनुमानपाडा ही शाळा पेण तालुक्यामध्ये अग्रगण्य अशी शाळा असून शालेय गुणवत्ता दर्जा व स्पर्धा परिक्षा हयामध्ये पेण तालुक्यामध्ये विशेष प्राविण्य मिळविले, त्यांचे तालुका स्तरावरुन अभिनंदन करण्यात आले. हनुमानपाडा ही पेण तालुक्यातील शाळा असून एक चांगल्या प्रकारचे काम शाळा व्यवस्थापन समितीने केले

आहे. आर्थिक साहय,श्रमदान, शालेय पोषण आहार ,गणवेश वाटप, शैक्षणिक साहित्य वाटप यामध्ये व्यवस्थापन समितीने चां■ल्या प्रकारचे काम केले आहे. शिष्यवृत्ती परीक्षा गणित परीक्षा यामध्ये विद्यार्थ्यानी प्राविण्य सं■ादन केले आहे, शाळेत एक आदर्श व्यवस्थापन समिती कार्यरत असून विविध प्रकारे साहय करण्याचे श्रेय समितीला आहे व ग्रामस्थ आणि शिक्षक यांच्या सहकार्यामुळे शाळा स्वयं■ुल्यां■नामध्ये पेण तालुक्यामध्ये शाळेला प्रथम क्रमां■ाचे पारितोषिक रु.५०००/- मिळाले. शाळेचा प्रत्येक घटक शाळा पुढे नेण्यात उत्तम कामगिरी करत आहे, त्यात सन्माननीय केंद्रप्रमुख यांची मोलाची भूमिका आहे.

धन्यवाद

प्रभाकर हरी पाटील
शाळा विद्या मंदिर पोहाळे,बोरगांव,तालुका पन्हाळा,जिल्हा.कोल्हापूर
ईमेल आयडी- kendrashalapohale@gmail.com

प्रस्तावना -

पेठनाका येथील शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमाचे निवासी प्रशिक्षण झाले आणि कित्येक दिवसापासुन मनाच्या सुप्त कोप-यात तेवत ठेवलेल्या ठिणगीला ज्योत करण्याचे ठरवले. एव्हाना एक नाही दोन नाही तर तीन-तीन केंद्राचा चार्ज सांभाळण्याची जबाबदारी येवून पडली होती. प्रशासकीय कामाचा बोजा वाढला होताच. परंतु त्यातूनही एक चांगलं काम करण्याची संधी चालत आली होती. संधी होती पोहाळे/ बोरगाव केंद्रशाळा. संधी समोर उद्दीष्ट तर ठरले होते. शाळा डिजीटल करण्याचे मग झाली सुरवात एका ध्यासपर्वाची.त्यासाठी मा. केंद्रप्रमुख - श्री.कुंडलिक भोरु गभाले यांच्या सहकार्य व मदतीतून शाळा digital झाली. शाळेतील कार्यरत शिक्षक वृंद,मी मुख्याध्यापक आणि सर्वात महत्वाची शालेय व्यवस्थापन समिती,आणि सन्माननीय केंद्र प्रमुख यांची साथ मिळाली. सर्वप्रथम सर्वांची संयुक्त मिटींग घेवून शाळा 100 टक्के डिजीटल करण्याचे स्वप्नवत उद्दिष्ट सर्वांसमोर ठेवले. प्रथमदर्शनी समोर ठेवलेले उद्दिष्ट अशक्यप्राय वाटू लागले. परंतु 'पंगू लंघयते गिरीम् ' हे उदाहरण समोर ठेवून सर्वांनी कामाला लागण्याचे ठरवले. शाळेचे इन्फ्राक्स्ट्रक्चर, शाळेतील वर्गखोल्या, विद्युत व्यवस्था आणि सर्वात महत्वाची अर्थिक तरतुद याबाबत शुन्यातुनच सुरुवात होती.

शाळेसाठी केलेले प्रयत्न –

संधी आणि आव्हाने यांची सांगड घालून एकदा कामाला सुरवात केली की आपोआप रस्ते तयार होतात, फक्त मार्गक्रमणाची गरज असते. ठरलेल्या उद्दिष्टानुसार शाळा व्यवस्थापन समिती (SMC) कामाला लागली होतीच. निधी संकलनाचे विविध

मार्ग शोधायला सुरु होते. SMC पोहाळे/बोरगावचे अध्यक्ष यांनी कामाला सुरवात केली होतीच. स्थानिक जि.प.सदस्या सौ.सुजाता पाटील यांच्या कानावर ठरलेली गोष्ट त्यांनी त्याचवेळी घातली होती.

SMC अध्यक्ष व जि.प.सदस्या सौ.सुजाता पाटील यांच्या प्रयत्नातून जि.प.कडून निवडक शाळांना मिळणारा LED TV पोहाळे /बोरगांव शाळेस मिळाला. भला मोठा 40 इंची सॅमसंग टी.व्ही.शाळेस मिळाला खरा पण त्यासाठी लागणारे SOFTWARE उपलब्ध करणे खर्चिक होते. संधीसाठीचा राजमार्ग शोधणे हे अगोदर ठरले होतेच. याचीही शोधाशोध सुरु झाली. शाळेतील कोल्हापूरचे TECHNOSAVY शिक्षक श्री.जगदाळे सर यांनी ROTARY च्या SMART CITY CLUB कडून SOFTWARE मिळवण्यासाठी धडपड सुरु केली, त्यांना त्यामध्ये यश आले सुध्दा. पुण्याच्या KOMPKIN कंपनीचे रु.30000/- चे SOFTWARE रोटरीकडून शाळेस 15000 रुपयात मिळाले. SMC अध्यक्षांनी जमवलेल्या लोकवर्गणीतून हे 15000/- रुपये उपलब्ध केले. SMART CITY चे चेअरमन श्री.बाळासाहेब कडोलकर व सन्मानणीय सदस्यांकडून KOMPKIN चे SOFTWARE व 40 इंची SAMSUNG चा LED TV यांच्या उद्घाटनाचा भरगच्च कार्यक्रम शाळेत संपन्न झाला. सदर कार्यक्रमास जि.प.सदस्य, सरपंच यांना बोलवून उर्वरीत वर्गही डिजीटल करण्याचा संकल्प सोडला.

- सुरुवात तर झाली- उर्वरित ?

पोहाळे शाळा 1 ते 7 वी पर्यंत वर्गखोल्याही तितक्याच. एक क्लासरुम डिजीटल झाली. उरलेल्या वर्गखोल्यांचे काय? शोध सुरुच होता. शाळेतील TECHNO SAVY शिक्षक जगदाळे सर सतत याच प्रयत्नात होते. त्यांच फिरणं सुरु होतच. SLDP च्या प्रशिक्षणातील KUSAI इथे वापरात आणण्याचं कौशल्य वापरलं. आपल्या

माणसांजवळील KNOWLEDGE, UNDERSTANDING, SKILL, ATTITUDE आणि INTEREST या गोष्टींचा मेळ घातला व लगेच पुढील संधी अध्यक्षांनी व जगदाळे सरांनी शाळेत आणून ठेवली. स्थानिक खासदार श्री.धनंजय महाडीक यांच्या खासदार फंडातून सरकारी शाळांना संगणक देण्याचे निश्चित झाले होते. पोहाळे गावातील खासदारांचे कार्यकर्ते श्री.शशिकांत पाटील यांच्या अथक प्रयत्नांतून खासदारांच्या संगणक वाटप यादीमध्ये विद्यामंदिर पोहाळे/बोरगावचे नाव समाविष्ट करण्यासाठी लागणारा विहित प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे जगदाळे सरांनी यापूर्वीच दिला होता.

दुसरा टप्पा यशस्वी -

एके दिवशी खासदारांच्या कार्यालयातून श्री.जगदाळे सर निरोप घेवून आले. शाळेला 2 संगणक संच मिळणार आहेत, आपण तात्काळ यावे. शाळेत सर्वांना आनंद झाला. आता आमच्या आणखी 2 वर्गखोल्या डिजीटल होणार होत्या. सर्कीट हाऊस मधून श्री.जगदाळे सरांनी 2 संगणक संच आणले. आणि आमचा दुसरा टप्पा अल्पावधीतच यशस्वी झाला. याचाही एक छोटासा कार्यक्रम शाळेत श्री.शशिकांत पाटलांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सदर कार्यक्रमास सर्व पालकांना बोलवून उर्वरीत उद्दिष्ट सर्वांसमोर ठेवले. सदर प्रसंगी मी स्थानिक लोकप्रतिनिधी व पालकांना अतीव तळमळीने भावनिक आवाहन केले.

माझ्या आवाहनाला त्याचवेळी सर्वांनी सकारात्मक प्रतिसाद दिला व सर्वजण आपआपल्या पातळीवर कामाला लागले.

- येणा-या ग्रामसभेमध्ये सुज्ञ पालकांनी शाळेतील उर्वरीत खोल्या डिजीटल करण्याचा ठराव मांडुन 14 व्या वित्त आयोगामध्ये तशी तरतुद करण्याचा ठराव मांडुन 14 व्या वित्त आयोगामध्ये तशी तरतुद करण्यास सांगितले.

- ग्रामपंचायत पदाधिका-यांनी आपल्या मासिक मिटींगमध्ये खर्चास मंजूरी घेतली व शाळेस या माध्यमातून 1 संगणक संच व 4 सयामधील स्मार्ट टी.व्ही.साठी लागणारे पेन ड्राईव्ह स्वरुपातील सॉफ्टवेअर्स विक्रांत पाटील नावाच्या तरुण सॉफ्टवेअर इंजिनिअरकडून अत्यल्प अशा चारशे रुपयांत मिळाले. ज्या अभ्यासक्रमांच्या सॉफ्टवेअरसाठी अगोदर पंधरा-पंधरा हजार इतकी रक्कम लागत होती. ते काम तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे 400 रुपयांचा पेनड्राइव्ह करु लागला.

आणि परिपूर्ण डिजीटल शाळा उदयास आली -

तीन केंद्राचा कार्यभार, प्रशासकीय कामांचा बोजा, पन्हाळा तालुक्यातील दुर्गम असा पश्चिम भाग, दळणवळण गैरसोयीचे, साधा निरोप पोहचवणे अडचणीचे, तुलनेने कमी शिक्षित पालक वर्ग, शाळेतील अपुरा शिक्षक वृंद, या आणि अशा अजुन भरपूर सांगता येतील अशा अडचणी पण चिमुकल्या मुलांचा या बाबींशी काय संबंध, त्यांना तर हवे होते दर्जेदार शिक्षण, अदययावत शिक्षण, नवनवीन सॉफ्टवेअर्स, संगणक या माध्यमातून त्यांना शिकायचं होतं. शाळेत गेल्यावर चिमुकल्यांच्या नजरा रोखायच्या, साहेब आले, साहेब आले, वाटायचं या शाळेत यांच्या अपेक्षा पूर्ण करायच्याच. मनात पडलेल्या ठिणगीने केव्हाच ज्योतीरुप घेतलं होतं. आता आव्हान होतं प्रशासकीय बाबींच. एव्हाना शिक्षकांच्या बदल्या येवू घातल्या होत्या. मनात भितीची पालं चुकचुकली. एवढा पसारा मांडला खरा, पण याची अंमलबजावणीही तितक्याच ताकतीने करायची. शिक्षकांना शाळा स्तरावर, केंद्रस्तरावर प्रशिक्षण दिली आणि कार्यवाही सुरु होते जे व्हायला नको होतं तेच घडलं. शाळेतील जाणत्या तंत्रस्नेही दोन शिक्षकांची बदली झाली. अनपेक्षितपणे घडलेल्या बदली प्रकरणामुळे शाळेचा स्टाफ मरगळून गेला. पण आम्ही जिद्द सोडली नव्हती.

पुन्हा शाळा व्यवस्थापन समिती -

सद्यस्थितीतून मार्ग तर काढायचा होताच, मग काय कार्यतत्पर SMC मदतीला धावली. शाळा व्यवस्थापन समितीच्या कानावर सदर गोष्ट घातली. शाळा पूर्णपणे डिजीटल झाली आहे. पण दोन शिक्षकांची बदली झाल्याने दोन डिजीटल वर्ग बंद पडले आहेत. शाळा व्यवस्थापन समितीमार्फत पालकसभा आयोजित करण्यात आली. सर्व पालकांनी पालक सभेस हजेरी लावली. जगदाळे सरांनी सर्वांना आवाहन केले की आपणं गावातीलच तरुण पदवीधरांना शाळेत तात्पुरत्या स्वरुपास नेमणुक देवूया. त्यांच्या मानधनाचा प्रश्न आला. सर्व शिक्षकांनी दर महिन्याला स्वत: वर्गणी काढण्यास ठरवले. मग SMC चे सर्व सदस्य ही यात सामील झाले मग काय पालकांनीही या प्रस्तावास उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. प्रत्येक पालकांनीही सदर शिक्षकांच्या मानधनास वर्गणी देण्याचे मान्य केले, ते पण एकदा नव्हे, प्रत्येक महिन्याला न चुकता.

स्वत:मध्ये बदल –

अशा प्रकारे एका पाठोपाठ एक अशा येणा-या अडचणींना मात करत पोहाळे/बोरगाव शाळेला 100 टक्के डिजीटल शाळा करण्यात यश आले. केलेल्या कामाचे समाधान मिळत गेले. SLDP च्या प्रशिक्षणातील TEAM BUILDING करत असताना नवनवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. एकमेकांकडून आणि एकमेकांसोबत शिकण्याची संधी मिळाली. हे काम करत असताना वेळोवेळी तज्ज्ञांकडून सल्ला घ्यावा लागला.

प्रत्येकाकडे असणारे नवनिर्मितीचे कौशल्य शोधून त्यांना प्रत्यक्षात उतरवण्याचे स्वप्न साकारण्यासाठी लागणारे प्रयत्न करताना आनंद मिळत गेला. स्वत:च्या वैयक्तिक पात्रतेत वाढ केल्याशिवाय काळाच्या ओघात आपण टिकणार नाही याची जाणीव झाली. तंत्रस्नेही होणं ही काळाजी गरज आहे हे लक्षात आले. येणा-या काळात या माध्यमातून

आपण पुढे गेलेच पाहिजे अन्यथा आपण OUTDATED होणार याची जाणीव माझ्याबरोबर प्रत्येकाला झाली. या माध्यमातून प्रत्येकाला स्वत:च्या मर्यादा समजुन आल्या. मागे राहणा-यांना विद्यार्थ्यांकडून असा प्रतिसाद मिळतो. TEACHING ची वेगळीच गंमत काय आहे, याचा अनुभव घेता आला. स्वत:मधील ऊर्जा ओळखता आली. मी हे करु शकतो हा आत्मविश्वास स्वत: बरोबर सर्व शिक्षकांच्यामध्ये रुजवता आला. अचूक निर्णय क्षमता विकसित करता आली. वेळोवेळी येणारी आव्हाने कशी स्वीकारायची, त्यावर मात कशी करायची याबाबत प्रत्येकजण जागरुक वाटु लागला. आपल्या कामाबाबत आपली किती बांधिलकी आहे या गोष्टीची तुलना सर्वजण आपसुकच करु लागले. मागे राहणा-याला याबाबत कमीपणा वाटू लागला. DEVOTION हवे ही भावना वाढीस लागण्यास मदत झाली. येणा-या अपयशाचा पुनर्विचार करुन अपयशाचे यशात रुपांतर करण्याची मजा काही औरच असते. याचा प्रत्यक्ष अनुभव या माध्यमातून घेता आला. प्रत्येकाला आपआपल्या कार्यपध्दतीत सुधारणा करणे गरजेचे वाटू लागले.

शाळेबरोबर आम्हाही डिजीटल झालो या समाधानात शालेय नेतृत्व विकास प्रशिक्षण आणि डायट यांची मोलाची साथ,यातूनच ठळक सुधारणा झाली.

धन्यवाद

संभाजी भाईदास पाटील

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा.आजमपूर, केंद्र.गल्ले बोरगाव, तालुका.खुलताबाद,जिल्हा.औरंगाबाद

ईमेल आयडी - sambhajipatil751@gmail. com

शाळेबद्दल थोडेसे....

खुलताबाद तालुक्यातील आजमपुर हे ४१५ लोकवस्ती असलेले हे छोटेसे गाव या गावातील आमची शाळा जि. प. प्रा. शा. आजमपूर. शाळेचा U-DISE क्रमांक २७१९०४०००२०१ असून शाळेचा एकूण पट ४५आहे. त्यापैकी १८ मुले व २७ मुली आहेत

परिवर्तनाची गरज :

२१ व्या शतकात जग झपाट्याने बदलत असताना बदलत्या काळाची पावले आपण वेळीच ओळखली नाही तर आपल्या अस्तित्वालाच धोका निर्माण होऊ शकतो, असच काहीसं जि. प. प्रा. शा. आजमपूर, केंद्र.गल्लेबोरगाव, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद या शाळेबाबत ही घडत होतं . गावाच्या फाट्या लगतच एक इंग्रजी माध्यमाची शाळा उघडली आणि समाजात एकूणच इंग्रजी शाळा आणि त्या भाषेविषयी असलेल आकर्षण याला आझमपुरचे गावकरीही अपवाद नव्हते.



शाळेचा पट कमी होऊन विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल होऊ लागले. ही धोक्याची घंटा माझ्या लक्षात आली की स्पर्धेत टिकल नाही तर कालांतराने जिल्हा परिषद शाळेच अस्तित्व धोक्यात येऊ शकत. दरम्यानच माझे आणि गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख व साधन व्यक्ती या पर्यवेक्षीय यंत्रणेच शालेय नेतृव विकासाचे प्रशिक्षण पूर्ण झाले होते. मी इंग्रजी माध्यमाची शाळा आणि आपल्या शाळेचा कमी होणारा पट अशी कित्येक आव्हाने आमच्यासमोर होती. आज शाळांकडून समाजाच्या तसेच पालकांच्या अपेक्षाही वाढलेल्या आहेत. स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी व त्यांच्या अपेक्षा पूर्तीसाठी आजच्या पिढीतील विद्यार्थ्यांसाठी

शाळेमध्ये तसेच दैनंदिन अध्ययन पद्धतीमध्ये आवश्यक ते व विद्यार्थी सहजपणे शिक्षणाकडे आकर्षित होतील असे बदल करणे आवश्यक आहे.

माझ्या नेतृत्वाचा विकास :

विद्यार्थी, पालक, शिक्षक, पर्यवेक्षीय यंत्रणा व अधिकारी वर्ग यांच्यातील सर्वात महत्वाचा दुवा जर कोणी असेल तर तो मुख्याध्यापकच असून तो जर सक्षम झाला तर शाळा विकसित होण्यास वेळ लागणार नाही, ही बाब केंद्र प्रमुख व साधन व्यक्ती यांच्या लक्षात SLDP प्रशिक्षणामुळे चांगलीच लक्षात आली होती. यासाठी मग केंद्र प्रमुख व साधन व्यक्ती यांनी शालेय नेतृत्व विकास प्रशिक्षणातील काही महत्वाच्या बाबींचा आधार घेत मला पर्यायाने शाळेला सक्षम बनविण्यासाठी प्रयत्न सुरु केले. यासाठी शाळा भेटी दरम्यान शाळेच्या गरजा वसमस्या या **LEARNING WALK** द्वारे समजून घेणे, वेळेचे व्यवस्थापन, **दृष्टी (VISION), ध्येय (MISSION),** संघ बांधणी, अध्ययन – अध्यापनातील नव-नवीन तंत्र अशा अनेक बाबींवर चर्चा करण्यात आली.

दृष्टी (VISION), ध्येय (MISSION) :

कोणतेही ध्येय योग्य दृष्टी असल्याशिवाय साध्य होणारच नाही हे लक्षात घेत, **शाळा विकासाचा एक आराखडा** तयार करण्यात आला व त्यात विकासाचे काही महत्वपूर्ण टप्पे तयार करण्यात आले. प्रत्येक ध्येय साध्य करण्यासाठी त्याची योजना व कालावधी निश्चित करण्यात आला. ज्यात शाळेची रंग रंगोटी करून बाह्य रूप बदलणे, शाळा DIGITAL करणे, शाळेचे कंपाऊंड तयार करणे, मुलांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची (RO) व्यवस्था करणे, स्वच्छ आणि सुंदर किचन शेड तयार करणे, HANDWASH STATION तयार करणे, मुलांमुलीसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध करणे, विविध झाडे लावून शालेय परिसर फुलविणे, अध्ययन-अध्यापनात नव-नवीन तंत्रांचा वापर करत विद्यार्थांना अध्ययनाची गोडी लावणे, विद्यार्थ्यांचा अध्ययनातील गुणात्मक दर्जा उंचावणे, अध्ययन स्तर निश्चितीत शाळेचा स्तर केंद्रात व तालुक्यात उंचावणे, या सर्व माध्यमातून शाळेस ISO मानांकन प्राप्त करून देणे आणि सर्वात महत्वाचे हे सर्व साध्य करण्यासाठी एक चांगल्या संघाची बांधणी करणे. मी, माझे शिक्षक आणि पर्यवेक्षीय यंत्रणेच्या डोळ्यातील हे स्वप्न SMC सद्स्य, पालक आणि गावकरी यांचा डोळ्यातही दिसणे गरजेचे होते. अस म्हणतात की, कोणतीही गोष्ट दोनदा अस्तित्वात येते, प्रथम ती स्वप्नात व नंतर प्रत्यक्षात. यासाठी स्वप्नांचा पहिला टप्पा पार करण्यासाठी SMC सद्स्य, पालक आणि गावकरी यांच्या वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या व एका सुंदर

शाळेचे स्वप्न त्यांनाही दाखविण्यात आले, पण केवळ स्वप्न पाहूनच ते अस्तित्वात येणार नाही यांची जाणीव आम्हा सर्वांना ती होतीच. ते स्वप्न सत्यात आणण्यासाठी आम्ही, केंद्र प्रमुख व साधनव्यक्ती यांनी तयार केलेला कच्चा आराखडा त्यांच्या समोर ठेवण्यात आला व त्यात आवश्यक ते बदल चर्चेद्वारे करण्यास्तव ठेवण्यात आले असता **चार प्रमुख ध्येये (MISSION)** निश्चित करण्यात आली.

१. **शाळेस ISO मानांकन मिळवून देणे.**

२. **शाळेचा अध्ययन स्तर उंचावणे.**

३. **जिल्हा परिषद शाळेतील इंग्रजी माध्यमात दाखल झालेली मुले परत जि. प. शाळेत आणणे.**

४. **शाळा पूर्णपणे DIGITAL करणे.**

आमच्या प्रामाणिक प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळाला. या स्वप्नपूर्तीसाठी भरपूर निधी लागणार होता तो उभा करणे हे एक आव्हानच होते.

शालेय व्यवस्थापन समिती बैठक

संघ बांधणी:

"सामर्थ्य आहे चळवळीचे, जे जो करील तयाचे" कोणतीही चळवळ एका व्यक्ती द्वारे होणे शक्य नाही, त्यास आवश्यकता असते ती एका मजबूत संघाची. आमची ही शैक्षणिक चळवळही त्यास अपवाद नव्हती. आम्हास पुरेपूर ठाऊक होते, अपेक्षित ध्येय साध्य करण्यासाठी मजबूत संघ बांधणी फार गरजेची होती. **संघ बांधणीसाठी प्रामुख्याने दोन घटक गरजेचे होते**. एका घटकात **शिक्षक, मुख्याध्यापक, SMC सद्स्य, पालक व गावकरी** अशी मंडळी होती जी मुलांशी आणि शाळेशी रोज संपर्कात होती व दुसऱ्या घटकात शाळेस वेळोवेळी भेट देणारी पर्यवेक्षीय यंत्रणा होती ज्यात **गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, विषय व विशेष साधनव्यक्ती व विशेष शिक्षक** यांचा समावेश होता. या दोन्ही घटकांना मी(मुख्याध्यापक श्री. पाटील) एक संघ करण्याचे यशस्वी काम केले आणि स्वप्नपूर्तीसाठी पहिले पाऊल टाकले व शाळा विकासासाठी पहिली बैठक शाळेत आयोजित करण्यात आली. कार्याची दिशा, दृष्टी व ध्येय सर्वांच्या समोर जेव्हा आम्ही ठेवली, त्यास आमच्या अपेक्षेहूनही अधिक सकारत्मक प्रतिसाद मिळाला आणि स्वप्नपूर्तीसाठी लागणाऱ्या निधीचे आव्हान सर्वांसमोर ठेवण्यात आले होते. पालकांना व गावकरी मंडळीना आवाहन करण्यात आले की जिथे तुम्ही मुलांना इंग्रजी माध्यमात दाखल

करण्यास तयार आहात तसेच शिकवणी, वाहतूक, पुस्तके व गणवेश यांवर भरमसाठ खर्च करण्यास तयार आहात तर मग जिथे जिल्हा परिषद शाळा या सर्व बाबी मोफत पुरवत असतांना अल्पसा निधी आपल्या मुलांच्या व शाळेच्या विकासासाठी लोकसहभाग अंतर्गत देऊ शकणार नाही का? हे आवाहन करत असताना सर्वांना ही खात्री देण्यात आली की इंग्रजी माध्यमांपेक्षाही उत्तम दर्जाची शाळा निर्माण करण्यात येईल. खात्री पटताच **पहिल्याच बैठकीत या आवाहनास प्रतिसाद देत १२,०००/- रुपयांचा निधी बैठकी दरम्यान जमा करण्यात आला** पण हा निधी येताना भरपूर मोठी जबाबदारी व बरीच आव्हाने देखील घेऊन आला . आता त्या जबाबदारी आणि आव्हानांवर खरे उतरणे ही फार महत्वाचे होते अन्यथा जो विश्वास कमावला होता तो धुळीस मिळाला असता व ही चळवळ पुन्हा कधीच उभी राहिली नसती.



वेळेचे व्यवस्थापन : मी आणि माझ्या गटाने नेतृत्व कौशल्याच्या बळावर ध्येय निश्चित करून संघ बाधणीही केली पण खऱ्या अडचणी अजून पुढे येणे बाकीच होत्या. कामाला सुरवात करताच लक्षात आले की ध्येय मोठे आहे आणि त्यासाठी वेळ मात्र कमी, एकीकडे शाळा ISO ही करायची आहे आणि त्याच बरोबर शाळेचा अध्ययन स्तर सुद्धा उंचावायचा आहे. शाळेच्या भौतिक सुविधांची पूर्तता करत असताना मूल्यांच्या अध्ययन प्रक्रियेकडे दुर्लक्ष होऊ लागले पण याने आपले अध्ययन स्तराचे लक्ष साध्य होणार नाही हे लक्षात येताच आम्ही केंद्र प्रमुख व साधन व्यक्तींशी चर्चा केली आणि चर्चेतून ही बाब लक्षात आली की या सर्व बाबी केवळ **शाळेच्या निर्धारित वेळत पूर्ण होणारच नाहीत यासाठी शाळेच्या वेळे व्यतिरिक्त वेळ द्यावा लागेल.** या बाबत शिक्षकांना विचारले असता त्यांनीही अतिरिक्त काय वेळ देण्यास सहमती दर्शवली. **तेव्हा आम्ही कामाचे नियोजन पुन्हा नव्याने केले सर्व प्रथम कामाचा प्राधान्यक्रम ठरविला.** काही लवकर बदल दिसतील अशा बाबी आम्ही अगोदर केल्या ज्यामुळे आमचा उत्साह तर वाढलाच पण त्याचबरोबर शाळेत होणारा बदल पालकांपर्यंत ही पोहचला. शिक्षकांना शाळा सुटल्यानंतर ही काम करतांना पाहून त्यांच्या मदतीसाठी गावकरी सुद्धा पुढे सरसावले. गावकऱ्यांच्या मदतीमुळे आमच्या कामाला वेग आला. काही कामांची जबाबदारी SMC, पालक व गावकरी यांच्यावरही सोपविण्यात आली आणि त्यांनी ती सहजपणे स्वीकारून पारही पाडली. अशा प्रकारे समाजाचा सक्रीय सहभाग नोंदविण्यात यश मिळू लागले.

प्रभावी वर्ग व शाळा भेट: प्रत्येक शाळाभेटी दरम्यान माझ्यासोबत आमचे साधनव्यक्ती **LEARNING WALK** घेत होते. त्यामुळे ध्येयाची पूर्तता कितपत झाली, कोणते बदल अपेक्षित आहेत याबाबी आमच्या लक्षात येत होत्या यामुळे शाळेचे भौतिक रूप बदलण्यास बरीच मदत झाली. एकीकडे शाळेचे बाह्यरूप झपाट्याने बदलत होते पण त्याच बरोबर शाळेचे अंतर्रंग ही बदलणे गरजचे होते. वर्गात डोकावल्यानंतर लक्षात आले की शाळेत घडणारा भौतिक बदल मुलांचाही उत्साह वाढवत होता. मुलांशी आमचे प्रत्येक भेटीत हितगुज वाढतच होते त्याच वेळेस **आम्ही ERAC या अध्ययन अध्यापन तंत्राशी शिक्षकांना अवगत केले.** अध्ययन अध्यापन प्रकीयेत विद्यार्थ्यांना अध्ययनाचा प्रत्यक्ष **अनुभव (EXPERIENCE),** त्यावर त्यांचे **चिंतन (REFLECTION),** प्राप्त ज्ञानाचा दैनंदिन जीवनात **उपयोजन (APPLICATION)** आणि या सर्व बाबींचे एकत्रित **संकलन (CONSALIDATION)** करून ज्ञानाच्या निर्मितीकडे वळविणे हे किती गरजचे आहे हे शिक्षकांना स्पष्ट करून प्रत्यक्ष **ERAC तंत्राचा अनुभव अध्ययन अध्यापन प्रक्रियेतून दिला.** त्याच बरोबर **ERAC** तंत्र हे **शाळेचा अध्ययन स्तर उंचावणे** हे ध्येय गाठण्यासाठी किती उपयुक्त आहे हे ही भेटी दरम्यान वारंवार सांगण्यात आले. **ERAC** तंत्राचा अध्ययन अध्यापन प्रक्रियेत वापर करण्यासाठी विविध शैक्षणिक साहित्याची गरज भासत होती त्यामुळे भरपूर शैक्षणिक साहित्यांची निर्मिती करण्यात आली. त्याच बरोबर विविध गटकार्य, कृतियुक्त अध्ययन अध्यापन पद्धतींचा शोध घेण्यात आला व अध्ययनात रंजकता निर्माण करण्यात आली. शाळा मुलांना आनंददायी वाटू लागली आणि जी मुले जिल्हा परिषद शाळा सोडून इंग्रजी माध्यमात दाखल झाली होती त्यांच्यापर्यंत ही या झालेल्या बदलांच्या गोष्टी पोहचू लागल्या. बऱ्याचदा शाळेच्या प्रांगणात काही कृतियुक्त अध्ययन-अध्यापन, गटकार्य चालू असायचे आणि त्याच वेळेस इंग्रजी माध्यमाच्या शाळेची गाडी तेथून जायची. गाडीतील मुले कुतूहलाने शाळेकडे पाहायचे आणि बऱ्याचदा चालकास गाडी थांबवण्यास लावायचे आणि जि. प. शाळांतील विविध कृतींचा, गटकार्यांचा आनंदही घ्यायचे. हळूहळू जि. प. शाळा सोडून इंग्रजी माध्यमात दाखल झालेल्या मुलांच्याही हे लक्षात आले आपली जिल्हा परिषद शाळा खरच खूप बदलली आहे.



शेवटी गावातील सर्व मुले जी जिल्हा परिषद शाळा सोडून इंग्रजी माध्यमात दाखल झाली होती ती सर्व मुले परत जिल्हा परिषद शाळेत दाखल झाली. अशा प्रकारे मुलांना परत आणण्याचे एक ध्येय पूर्ण झाले आणि आम्ही पुन्हा एक मैलाचा दगड पार केला.





आणि शाळा DIGITAL झाली....

एकीकडे ERAC या तंत्राचा अध्ययन अध्यापनात वापर सुरु असताना मुलांना गंमत तर वाटतच होती पण त्याच बरोबर आम्हाला हेही लक्षात येत होते की मुलांच्या प्रगतीसाठी केवळ एवढ्यावरच थांबून चालणार नाही अजून काही तरी करावच लागेल. तेव्हा आम्ही दोन बाबीवर विचार केला.

1. शाळा लवकरच DIGITAL करणे

2. मुलांसाठी स्वतंत्र शिष्यवृत्ती वर्ग सुरु करणे.

शाळा DIGITAL करण्यासाठी पुन्हा एकदा आम्ही पालकांची बैठक घेतली, आमचा मानस बोलून दाखवला आणि त्याच बरोबर पालकांना लोकसहभागासाठी आवाहन केले. एव्हाना पालकांची शाळेविषयीची भूमिका आम्ही केलेल्या कामामुळे सकारात्मक झाली होती आणि त्यामुळे लोकसहभाग मिळविणे आता सहज शक्यही झाले. प्रथम आम्ही एक संगणक व एक प्रोजेक्टर घेण्याचे ठरवले आणि लोकसहभागातून मिळालेल्या निधीतून आम्ही तो आणलाही. संगणक व प्रोजेक्टर जेवढया सहज मिळविला होता खरा पण सुरु झाल्यानंतर त्या बाबतच्या अडचणी लक्षात आल्या. गावात आणि शाळेत विद्युत सुविधेचा दाब हा

फारच अनियमित होता. अशा परिस्थितीत आम्हाला संगणक बंद पडण्याची भीती वाटत होती. यावरही आम्ही SMC आणि पालकांच्या मदतीने मात केली. लोकसहभागातून ६०० फुटाचे स्वतंत्र वायर घेण्यात आले व एका स्वतंत्र पोल वरून नव्याने वायरची जोडणी करण्यात आली. पालक मात्र एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी





लोकसहभागातून शाळेस BATTERY आणि INVERTER ही उपलब्ध करून दिले. आता आमचा एक वर्ग सर्व सुविधांयुक्त असा झाला होता. आता आम्ही दोन्ही वर्गखोलीतील मुलांना आळीपाळीने त्या वर्गात बसवून शिकण्यातील आनंद देत होतो. DIGITAL वर्ग खोलीत बसण्यासाठी वर्गांमध्ये चढाओढ लागायची आणि ज्यांना संधी नाही मिळाली तो वर्ग मात्र नाराज होत असे. त्यामुळे दुसरीही वर्गखोली DIGITAL करण्याचे ठरविण्यात आले. दुसऱ्या वर्ग खोलीत आमदार निधीतून गावकऱ्यांनी संगणकासोबतच एक प्रिंटर मिळविला आणि अशा प्रकारे आमची शाळा पूर्णतः DIGITAL झाली. SMC व पालकांच्या या उत्तम प्रतिसादामुळे आमची जबाबदारी आता वाढतच होती व एक प्रकारचा सकारात्मक दबावही आमच्यावर येत होता आणि त्या जबाबदारीस खरे उतरण्यासाठी आम्ही शिष्यवृत्ती वर्ग सुरु केले आणि वर्गातील सर्व 6 विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत चांगल्या गुणांनी उतीर्ण झाले.

शाळा सुरक्षा आणि शालेय वातावरण - शाळेच्या समोरच्या बाजूने लागुनच रोड आहे व त्यावर होणारी गाड्यांची वाहतूक मुलासाठी धोकादायक होती. ही बाब लक्षात घेऊन शाळेसाठी तारांचे कुंपण मंजूर करून घेण्यात आले व कुंपण झाल्यामुळे शालेय परिसरात विविध फुलांची झाडे लावण्यात आली व त्यामुळे शालेय परिसर प्रसन्न वाटू लागला. आज या सर्व झाडांची आणि फुलांची जबाबदारी शाळेची सर्व मुले घेत असतात. वर्गात व परिसरात कोणत्याही प्रकारचा कचरा किंवा अस्वच्छता होणार नाही याची दक्षता सर्व मुले घेत असतात आणि कधी चुकून वर्गात किंवा शालेय परिसरात कचरा आढळलाच तर तो कोणी केला याचा शोध घेण्यापेक्षा तो त्वरित कचरा पेटीत कचरा टाकला जातो. वर्गात गटकार्य करत असताना विविध प्रकारचे साहित्य शिक्षकांच्या मदतीने हाताळतात तर कधी स्वतः स्वेच्छेने हाताळतात पण गटकार्य पूर्ण झाल्यानंतर सर्व साहित्य व्यवस्थितपणे योग्य ठिकाणी मुले जबाबदारीने ठेवत असतात. मुले अतिशय शिस्तीत रांगेत भोजनाचा लाभ घेतात.





ताटांचे व्यवस्थापन मुलांकडे देण्यात आले आहे. मुले ती जबाबदारी आनंदाने व चोखपणे पार पडतात. दिवाळी व उन्हाळ्यातील सुट्ट्यांदरम्यान शाळा व शालेय परिसर याची जबाबदारी मुलांसमवेत SMC, गावकरी, पालक यांच्यावर टाकण्यात येते आणि ही सर्व मंडळी प्रामाणिकपणे ही जबाबदारी पार पडतात.

समता आणि समानता व बालअधिकार:

कु. प्रियंका चंदन काकस ही इयत्ता 2 री तील विद्यार्थीनी तीचा वयानुरूप जो मेंदूचा विकास अपेक्षित होता तो होऊ शकला नाही त्यामुळे ती थोडी स्वमग्न, कुठल्याही प्रश्नांना प्रतिसाद न देणे या सर्व बाबीमुळे सर्वाना ती वर्गात सर्वात वेगळी

अशीच वाटायची तिच्या या परिस्थितीमुळे तिचा स्वतः विषयीचा आत्मविश्वास घटू लागला व तिला सर्वांमध्ये मिसळण्यास अडचणी येऊ लागल्या त्यामुळे तिचे शाळेत मन रमेनासे झाले. परिणामी शाळेतील तिची गैरहजेरी वाढू लागली, एकूणच ती शाळाबाह्य होण्याच्या मार्गावर होती. अशातच विशेष शिक्षक श्री. शेख सर व विशेष साधनव्यक्ती श्री. भोजने सर यांची शाळेस भेट झाली असता त्याच्या निदर्शनास ती मुलगी आली. त्यांनी शिक्षकांशी चर्चा करून तिच्याकडे विशेष लक्ष पुरवून तिला आपुलकी, प्रेम व सुरक्षितता दिल्यास ती शाळाबाह्य होणार नाही असे सुचविले. तसेच तिच्याशी संवाद साधताना तो कशा प्रकारे साधावा याविषयी शिक्षकांना मदत केली. परिणामी आता तिची शाळेतील उपस्थिती नियमित झाली परंतु तिच्या शैक्षणिक प्रगती बाबत अजून बराच मोठा पल्ला गाठणे बाकी आहे पण एक मात्र नक्की तिला आज शाळाबाह्य होण्यापासून वाचविण्यात आले.

प्रत्येक बालकास गुणवत्तापूर्ण शिक्षण, आनंददायी शालेय वातावरण व सुरक्षा मिळणे हा अधिकारच आहे आणि तो मिळवून देण्यास जि. प. प्रा. शा. आजमपूर शाळेतील माझे शिक्षक, SMC सदस्य, पालक व पर्यवेक्षीय यंत्रणा सर्वतोपरी प्रयत्नशील आहेतच आणि काही प्रमाणात यांत यशही लाभले आहे. केंद्रात शाळेचा अध्ययन स्तर उंचावलेला दिसून आला व त्याच बरोबर अध्ययन स्तर निश्चितीत इयत्ता 1 लीच्या वर्गाची गुणवत्ता केंद्रात प्रथम क्रमांकाची असल्याचे दिसून आले.

शाळेचे विशेष उपक्रम:

१. **वाचन कट्टा :** दुपारी मध्यान्ह भोजनाच्या नंतर सर्व मुले व मुली भोजनाच्या ठिकाणची स्वच्छता करून घेतात व त्यानंतर शालेय वाचनालयातून आपआपल्या आवडीची गोष्टीची पुस्तके घेतात व त्यांचे वाचन करतात. त्यांनी वाचलेल्या पुस्तकाविषयी आपल्या मित्र, मैत्रिणींना सांगतात. यातून मुलांना समजपूर्वक वाचनाची सवय लागण्यास मदत झाली. वाचलेला मजकूर समजून घेऊन तो इतरांना सांगताना त्यांच्या अभिव्यक्ती कौशल्यांचाही विकास झाला.



२. **दिनांकानुसार पाढे :** परिपाठा दरम्यान रोज मुले पाढे म्हणतात. महिन्याची जी तारीख असेल त्या तारखेचा पाढा रोज परिपाठात घेण्यात येतो. या उपक्रमामुळे मुलांचे सहजतेने 30 पर्यत पाढे पाठ होण्यास मदत झाली व त्याचा सकारात्मक परिणाम मुलांच्या गणित अध्ययनात दिसून आला. अध्ययन स्तरात मुले गणितात इतर शाळांच्या तुलनेत पुढे जातांना दिसून येत आहेत.



३. **इतर उपक्रम :** शाळेत नियमितपणे नवनवीन उपक्रम घेण्यात येतात. अशातच पळसाच्या पानांपासून विविध वस्तूंची निर्मिती करणे हा उपक्रम घेण्यात आला. ज्यात मुलांनी विविध वस्तू बनविल्या जसे ताट, टोपी, द्रोण इ. वस्तू बनविल्या.

अशा प्रकारचे विविध उपक्रम शाळेत सातत्याने घेण्यात येतात व याचा मुलांवर सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. मुले शाळेत नियमित येत असून त्यांना शाळेची गोडी निर्माण झाली आहे.



शाळेच्या भावी योजना:

शाळेत आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर होत असतो जसे - संगणक, प्रोजेक्टर यांचा सातत्याने वापर होतो परिणामी विजेचे बिल हे बऱ्याच प्रमाणात येते यासाठी शाळास्तरावर आर्थिक तरतूद उपलब्ध नसल्याने लोकसहभागातून याची पूर्तता आजपर्यत करण्यात आली. वीज सातत्याने लागणारी गरज असून ती भागविण्यासाठी स्वस्त व कायमस्वरूपी पर्याय शाळेस हवा होता त्यासाठी SMC सदस्य व पालकांशी चर्चा केली असता सौर उर्जेचा पर्याय पुढे आला. भविष्यात शाळेत सौर उर्जेचा वापर करून शाळेतील सर्व विद्युत उपकरणे चालविण्याची शाळेची भावी योजना असून त्यादृष्टीने शाळेचे प्रयत्न सुरु आहेत. लवकरच सर्वांच्या मदतीने आमचे हेही स्वप्न सत्यात उतरेल.



आमच्या यशाची परिणामकारकता:

जि. प. प्रा. शा. आजमपूर शाळेने निश्चित केलेली चार प्रमुख ध्येये .

१. शाळेस ISO मानांकन मिळून देणे.

२. शाळेचा अध्ययन स्तर उंचावणे

३. जिल्हा परिषद शाळेतील इंग्रजी माध्यमात दाखल झालेली मुले परत जि. प. शाळेत आणणे

४. शाळा पूर्णपणे DIGITAL करणे

हे साध्य केल्यानंतर शाळेचा नावलौकिक केंद्रात व तालुक्यात झाला

Collaboration: यातून प्रेरित होऊन इतर शाळाही प्रगतीच्या वाटा शोधू लागल्या यात प्रामुख्याने जि. प. प्रा. शाळा अंधारमळा ह्या शाळेनेही जि. प. प्रा. शा. आजमपूर शाळेपासून प्रेरित होऊन शाळा DIGITAL करण्याचा ध्यास घेतला. त्यांनी ही आजमपूर शाळेप्रमाणे SMC व पालकांच्या बैठका घेऊन शाळेस विकसित करण्यास पुढाकार घेण्यास आवाहन केले व त्यांच्या या हाकेस SMC व पालकांनीही चांगला प्रतिसाद दिला व बघता बघता **जि. प. प्रा. शाळा**

अंधारमळा ही शाळा कॉम्पुटर व प्रोजेक्टर यांनी युक्त अशी DIGITAL शाळा झाली. जि. प. प्रा. शा. आजमपूर शाळेची गुणवत्ता वाढल्याने पालकांचा जिल्हा परिषद शाळांप्रती विश्वास वाढला आज आजमपूर गावातील सर्व विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेत दाखल आहेत तसेच 5 वी पासून पुढील शिक्षणासाठी खाजगी शाळेत जाणारी मुलेही आता गावा लगतच्या जि. प. उच्च प्रा. शाळा पिंप्री येथे दाखल होत आहेत. पालकांनी दाखविलेला हा विश्वास पाहता आता जि. प. उच्च प्रा. शाळा पिंप्री शाळाही अध्ययन स्तर उंचावण्यास तत्पर झाली आहे.

आम्ही चालवू हा पुढे वारसा:

जि. प. प्रा. शा. आजमपूर शाळेच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवणारे मी (श्री. पाटील सर) आणि माझे सहकारी व श्री. गावित सर यांची या वर्षी बदली जरी झाली असली तरी नवीन मुख्याध्यापक श्रीम. काळे व सहशिक्षिका श्रीमती शिंदे यांनी ही त्याच पद्धतीने कामाची गती ठेवली असून विकासाचा हा वारसा पुढे चालवत आहेत.

धन्यवाद

खुर्शीद कुतुबुद्दीन शेख
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा झिंगानूर,पंचायत समिती. सिरोंचा, जिल्हा गडचिरोली
ईमेल आयडी - Khurshidkapila123@gmail.com



प्राथमिक शिक्षण हा सध्या अतिशय महत्वाचा विषय आहे. प्राथमिक शाळा या सगळ्या गावांपर्यंत पोहचल्या आहेत. त्या शाळांमधील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे अशी अपेक्षा आहे. वर्गातील मूल शिकले पाहिजे. त्यासाठी शिक्षकाची भूमिका खूप महत्वाची असते.

गडचिरोली जिल्ह्यातील पंचायत समिती सिरोंचा येथील अतिदुर्गम व नक्षलग्रस्त आदिवासी भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या झिंगानूर या गावातील शाळेत श्री खुर्शीद सर रुजू झाले. सर मोठ्या आनंदाने व उत्साहाने शाळेत रुजू झाले पण जेंव्हा ते वर्गात गेले आणि त्यांनी वर्गातील मुलांसोबत संवाद साधण्याचा प्रयत्न केला तेंव्हा मात्र त्यांचा उत्साह मावळला कारण सरांना येत असलेल्या मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषा मुलांना समजत नव्हत्या. आणि मुलांना येणाऱ्या माडिया, तेलगु या भाषा त्यांना समजत नव्हत्या. त्यामुळे शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये संवाद होणेच कठीण होऊन बसले होते. त्यामुळे मुलांना शाळा, शिक्षक आपलेसे वाटत नव्हते. शाळेमध्ये यावे, बसावे, शिकावे याबाबत त्यांच्यामध्ये आवड निर्माण होत नव्हती. फार मोठ्या आव्हानाला खुर्शीद सरांना सामोरे जायचे होते. भाषिक समस्येमुळे बालकांच्या हृदयाचा ठाव घेणे, अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत त्यांना सहभागी करून घेणे कठीण जात होते. बराच विचार

केल्यानंतर सरांनी ठरविले की मुलांची भाषा प्रथम शिकावी. त्या दृष्टीने खुर्शीद सर कामाला लागले ज्या भाषेमुळे मुलांच्या आणि त्यांच्या संवादात दरी निर्माण झाली होती ती दूर करण्याचे त्यांनी ठरविले.

त्यांनी माडिया, तेलगु भाषांमधील गीते मुलांच्या मदतीने शिकण्याचा प्रयत्न केला. गाणी गातांना मुलं जवळ आली. त्यांना शिक्षक आपले वाटू लागले. गुरु शिष्यातील दुरावा नाहीसा झाला. खुर्शीद सर माडिया, तेलगु भाषा शिकले. आता शाळेमध्ये मुले आनंदाने यायला लागली. शाळेमध्ये रुळू लागली. खुर्शीद सरांसोबत शिकू लागली. आणि त्यांनी अर्धी लढाई जिंकली. आता गरज होती मुलांना बोली भाषेतून प्रमाण भाषेकडे नेण्याची. त्यासाठी त्यांचे पुन्हा प्रयत्न सुरु झाले. शाळेत विविध उपक्रमांचे नियोजन व आयोजन त्यांनी केले. मुलांसोबत काम करतांना ते पालकांपर्यंत पोहचले. गावातील सर्वांसोबत त्यांनी संवाद साधणे सुरु केले. त्यामुळे गाव आणि शाळा यातील सहसंबंध वाढले. गावकऱ्यांना शाळा आपली वाटू लागली. शिक्षकांबद्दल प्रेम व आदर गावकऱ्यांच्या मनात वृद्धिंगत झाला.

माडिया व तेलगु भाषा शिकण्यासोबत विविध उपक्रमांचे आयोजन त्यांनी गावात केले. सर्वप्रथम विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सहभागी करवून घेणे गरजेचे होते. त्यासाठी प्रथम त्यांनी खालील कार्यक्रमांचे आयोजन केले.

१. तेलगु - माडिया गीत गायन स्पर्धा

२. तेलगु - देशभक्तीगीत नृत्य स्पर्धा

३. तेलगु - बालचित्रपट व कार्टून

४. तेलगु - मुलाखती घेणे.

५. भाषेतील (मराठी) कवितांना तेलगुमध्ये भाषांतरित करणे.

६. बाहुली नाट्यातून तेलगु नाटिका भाषांतरित करणे.





वरील उपक्रमांमुळे विद्यार्थी बरेच बोलके झाले होते. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांसोबत राहून शिकण्या-शिकविण्याचे अनेक मार्ग खुले झाले. कारण त्यांच्या मध्ये निर्माण झालेली ऊर्जा ही मुलांना मराठी, इंग्रजी व हिंदी भाषा शिकण्यास उपयुक्त ठरली. विद्यार्थी आता मराठी व हिंदी बोलायला लागली. विद्यार्थ्यांचे शिक्षकांवरील प्रेम, विश्वास यामुळे हे सर्व सहज शक्य झाले. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल होत होता. विद्यार्थ्यांना आता तेलगु, माडिया, गोंडी सोबतच मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषा पण बोलता येऊ लागल्या. विद्यार्थी बहुभाषिक झाले. व त्यांच्या सोबत शिक्षकांना संवाद साधता येणं शक्य झालं.

हा शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा उत्साह असाच कायम टिकून राहावा यासाठी शिक्षकांनी अनेक सहशालेय उपक्रमांचे नियोजन व आयोजन केले. त्यापैकी काही खालीलप्रमाणे आहेत.

१. शाळा - एक शैक्षणिक उपक्रम संशोधन केंद्र

२. व्यसनमुक्ती अभियान

३. भाषीक विकासासाठी - *'मी रिपोर्टर'* उपक्रम

४. शालेय लघुपट निर्मिती (Guru तेलगु short film.)

५. डॉ बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालय

६. शालेय पुस्तक प्रकाशन (School Books Publication)

७. शालेय बाहुली नाट्यमंच

८. प्रेरणा व्यक्तिमत्व मुलाखत

९. नाविन्यपूर्ण विज्ञान प्रयोग

१०. चालता फिरता बोलता खुला वर्ग





शाळेतील काही विद्यार्थी अनेकदा व्यसनांच्या आहारी गेलेले दिसले जसे खर्रा, गुटखा, तंबाखू खाण्याची सवय मुलांना आहे असे सरांना जाणवले. तेंव्हा विद्यार्थ्यांसाठी "व्यसनमुक्ती अभियान" राबवून विद्यार्थी तंबाखूमुक्त व गुणवत्तायुक्त कशी बनतील याकडे सरांनी कटाक्षाने लक्ष पुरविले. विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना मिळावी त्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकास व्हावा म्हणून ' मी रिपोर्टर ' यासारखे उपक्रम घेण्यात आले. वाचन विकासासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालय तयार केले. त्याद्वारे मुलांची वाचनाची गोडी वाढीस लागली. विद्यार्थ्यांच्या कला कौशल्याला वाव देण्यासाठी तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांच्या मनात मूल्यवर्धनाचे बीज रोवण्यासाठी शालेय लघुपटाची निर्मिती केली. त्यातून उत्कृष्ट अभिनय करणाऱ्या कलाकारांचा शोध लागला. एका दुर्गम भागातील शाळेमध्ये ज्या शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी, हिंदी या भाषा येत नाही, समजत नाही अशा विद्यार्थ्यांच्या विकासासाठी खुर्शीद सर तन मन धनाने काम करू लागले. व त्यांनी शाळेचे नंदनवन बनविले.

गुरु नावाचा तेलगु भाषेतील शालेय लघुपट सरांनी तयार केली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभिनय क्षमतेला वाव मिळाला. एखाद्या यशस्वी व्यक्तिमत्वाची विद्यार्थ्यांसमोर मुलाखत घेतली जाते. ही मुलाखत विद्यार्थी महिन्यातून एकदा घेत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते. व आपण ही मोठे होवून असेच यशस्वी व्हायचे या विचारांना खतपाणी मिळते.

विद्यार्थ्यांच्या शोधक बुद्धीला चालना देण्यासाठी नाविन्यपूर्ण विज्ञान प्रयोग हा उपक्रम घेण्यात येतो. निसर्गावर प्रेम करणारे, निसर्गाच्या सानिध्यात असणारे झिंगानूर गावातील विद्यार्थ्यांनी खुर्शीद सरांच्या सोबत प्रगतीच्या दिशेने वाटचाल केली आहे.

एक स्वच्छ सुंदर शाळा ही गावासाठी अभिमानाची बाबा असते. म्हणून ती समस्येत अडकून तिची विकासगती कमी होवू नये म्हणून प्रत्येक समस्येचे उपाय शोधण्यासाठी शाळा एक केंद्रच बनली. समस्या जाणवली की तिचे निरसन करणे या केंद्रामुळे अर्थात सकारात्मक शालेय नेतृत्वामुळे शक्य झाले आहे.



धन्यवाद

फिरोज खान मुसा खान

श्री. राजाभाऊ बोन्द्रे नगर परिषद माध्यमिक विद्यालय,चिखली,तालुका,जिल्हा बुलडाणा

ईमेल आयडी-fmik555@gmail.com



शाळेचा दर्शनी फोटो

प्रास्ताविक -

मी मुख्याध्यापक श्री राजाभाऊ बोन्द्रे नगर परिषद माध्यमिक विद्यालय चिखली जिल्हा बुलढाणा,जेव्हा वर्ग भेटीस जात असे तेंव्हा मला शाळेतील विद्यार्थ्यांची भाषा विषयातील विद्यार्थ्यांची प्रगती समाधानकारक वाटली नाही. त्यासोबतच गणित विषयाची विद्यार्थ्याची शैक्षणिक गुणवत्ता पातळी तपासण्याचा प्रयत्न केला असता त्यातही विद्यार्थ्यांची प्रगती समाधानकारक वाटली नाही मग मी शिक्षकांना उर्दू विभागाच्या वर्गाची शैक्षणिक पातळी संदर्भात चर्चा करण्यासाठी

कार्यालयामध्ये बोलावून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी 100% प्रगत करण्याबाबत आपल्या स्तरावर काय काय नियोजन करता येईल त्यासंबंधी चर्चा केली.

शाळेच्या विकासाच्या दृष्टीने ध्येय -

उर्दू विभागातील सर्व विद्यार्थ्यांना भाषा विषयात गणित विषयात 100% प्रगत करणे याकरिता केलेले नियोजन व त्याची अंमलबजावणी.

1) अनुभवी शिक्षकांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देणे.

2) विद्यार्थ्यांची वर्गात शंभर टक्के उपस्थिती ठेवणे.

3) विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे.

4) विद्यार्थ्यांचा भाषाविषयक पाया कमकुवत राहण्याच्या कारणांचा शोध घेणे.

5) विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक परिस्थितीचा आढावा घेणे.

6) विद्यार्थ्यांमध्ये भाषा विषयाची रुची निर्माण करण्यासाठी विविध शाळा स्तरावर उपाययोजना करणे.

7) विविध उपक्रमाची अंमलबजावणी करणे

8) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकास करण्याच्या दृष्टीने अतिरिक्त तासिकांचे नियोजन करणे.

विद्यार्थी विकासासाठी केलेले नियोजन व त्याची अंमलबजावणी -

विद्यार्थ्यांना वर्गामध्ये नियोजना अंतर्गत विविध संदर्भ साहित्य उपलब्ध करून देणे विद्यार्थ्यांना भाषा पट्ट्या , डिजिटल साहित्य याद्वारे विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापन करून त्यांच्या मधल्या उणिवा दूर करण्याचा प्रयत्न करणे. सर्वप्रथम विद्यार्थ्यांमध्ये भाषा विषयाची गोडी नसण्याचे कारण शोधून

विद्यार्थ्यांमध्ये त्या विषयाची गोडी निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमाची अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक असल्याने रचनावादी साहित्याचा वापर वर्गात सुरु केला.




विद्यार्थी -- चाचणी सोडवितांना

विद्यार्थ्याच्या प्रगतीसाठी अवलंबलेली तत्वे-

सुरक्षितता -

विद्यार्थी संरक्षण महत्वाचे असल्याने शाळा स्तरावर शाळेच्या आवारात CCTV कॅमेरे लावण्यात आले.



शालेय वातावरण व कार्यसंस्कृती-

सर्वप्रथम विद्यार्थ्यांमध्ये भाषा विषयाची गोडी नसल्याचे कारण शोधून विद्यार्थ्यांमध्ये त्या विषयाची गोडी निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली.

स्व -विकास व त्यातून शालेय विकास आणि संघबांधणी

नेतृत्व विकास कार्यक्रम- या कार्यक्रमाअंतर्गत घेतलेल्या ट्रेनिंग मध्ये मला शाळेतील सर्व शिक्षकांचे संघटन करण्यामध्ये खूप मार्गदर्शन मिळाले. सुरुवातीला मी माझेच मत शिक्षकांसमोर मांडत होतो परंतु शिक्षकांची मत जाणून घेण्याचा मी कधी प्रयत्न केला नाही परंतु ट्रेनिंगच्या माध्यमातून मला इतरांचे विचार जाणून घेण्याची जाणीव निर्माण झाली. त्यातून आमच्या शाळेचे संघटन अत्यंत मजबूत झाले.सर्व मुलानां स्वत्वाची जाणीव करुन दिली, आत्मसन्मान जपण्याची जाणीव जागृती केली.

शालेय अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत झालेला बदल-

1. अनुभवी शिक्षकांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

॥. विद्यार्थ्यांचा भाषाविषयक पाया कमकुवत राहण्याच्या कारणांचा शोध

।।।.विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास करण्याच्या दृष्टीने अतिरिक्त तासिकांचे नियोजन

या पद्धतीने कामास सुरुवात झाली.

शाळेसाठी पालक व समाजाचा सहभाग प्राप्ती-

शाळेच्या विकासामध्ये समाजाचा सहभाग महत्वाचा असतो, या गोष्टीची मला जाणीव होती. करिता मी सर्वप्रथम शाळेच्या इमारतीबाबत या विद्यार्थ्यांच्या प्रगतीच्या दृष्टीने भौतिक सुविधांचे महत्च शाळा व्यवस्थापन समितीच्या लोकांना समजावून सांगितले व शाळेलं डिजिटल करण्यासाठी समाजाकडून मदत कशी मिळवता येईल यासाठी आम्ही शाळा स्तरावर चर्चा केली. मग माननीय आमदार श्री राहुल भाऊ बोंद्रे यांच्याशी भेट घेतल्यानंतर आम्हाला गरुडझेप प्रकल्प अंतर्गत शाळेसाठी प्रोजेक्टर मिळाले.

शालेय गुणवत्तेच्या अनुषंगाने शाळेत राबवलेले विविध उपक्रम नवोपक्रम व विविध योजना -

डिजिटल शाळेची अंमलबजावणी करताना सर्व वर्गखोल्या डिजिटल करून विदयार्थ्यांना आवश्यक असलेल्या भाषा विषयातील शैक्षणिक साहित्याची निर्मिती करण्यात आली . भाषा विषयाच्या संदर्भात विविध चित्रपट्टया,तक्ते.चित्रे असे ज्ञानरचनावादी साहित्य तयार करून वापर सुरु झाला.

अपेक्षित शाळेचे कल्पनाचित्र व त्यासाठी पार पाडत असलेल्या विविध भूमिका -

माझ्या शाळेची निर्मिती 1931 मध्ये झालेली असून त्यानंतर या शाळेस सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत आम्हाला काही खोल्या मिळाल्या परंतु तेवढया खोल्या माझ्या शाळेसाठी पुरेश्या नाहीत. म्हणून मी

सर्वप्रथम शाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्यास प्राधान्य दिले .त्या अनुषंगाने नगरपालिकेचे माननीय मुख्याधिकारी तसेच माननीय नगरपालिका अध्यक्ष सौ. प्रियाताई कुणाल बोंद्रे यांच्याशी या विषयावर चर्चा केल्यानंतर याचा सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर आमच्या शाळेची इमारत मंजूर झाली. या इमारतीच्या बांधकामाकरिता अनुदान मंजूर झाले ,त्या अनुषंगाने 26 खोल्यांचे बांधकाम करण्याचे ठरले. त्याप्रमाणे ह्या सर्व खोल्या प्रशस्त रवरुपाच्या असुन शाळेमध्ये ग्रंथालय, प्रयोगशाळा, कार्यालय, क्रीडांगण इ.बाबींचा समावेश आहे.

शालेय संघटन व्यवस्थापन व प्रशासन ची केली जाणारी कार्यवाही प्रगतीचे पुनरावलोकन व प्रत्याभरण यासाठी कार्यवाही-

मी शालेय नेतृत्व प्रशिक्षण घेण्याअगोदर केलेल्या कामाचा विचार केला असता माझ्या लक्षात आले की या प्रशिक्षणामुळे माझ्या विचारात,कृतीत बराच बदल झाला ,या बदलामुळे माझ्या कामाचे प्रत्याभरण करण्यास मला मदत झाली आणि शाळेच्या विकासामध्ये प्रशिक्षणातील अनेक घटकांचा आधार घेऊन सकारात्मक बदल करण्यासाठी मला खूप मदत झाली, यातूनच शाळेची भरभराट सतत होताना दिसत आहे.

धन्यवाद

सुनिता गोविंद राणे
जिल्हा परिषद आदर्श शाळा कोळकेवाडी,बोलाडवाडी,
मु.पो.कोळकेवाडी,तालुका.चिपळूण जिल्हा .रत्नागिरी
ईमेल आयडी - zppsboladwadi73@gmail.com

प्रस्तावना -

आमच्या शाळेत, इमारत, वर्गखोली, कार्यालय, संरक्षक भिंत, पिण्याच्या पाण्याची सुविधा, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, प्रत्येकी १ युनिट वीज, ग्रंथालय, प्रयोगशाळा, खेळाचे मैदान या पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत.तसेच शाळेच्या बलस्थानांचा विचार करता, डिजिटल वर्गखोल्या, ग्रंथालय, शिष्यवृत्ती निकाल, १००% प्रगत शाळा, शाळा सिद्धी अ श्रेणी गुणवत्ता विकास कार्यक्रम व माझी समृद्ध शाळा अ श्रेणी, प्रतिभा संपन्न विद्यार्थी, विज्ञान प्रदर्शन, इन्स्पायर अवार्ड सहभाग, स्वच्छ शाळा सुंदर शाळा उपक्रमात सहभाग, आदर्श शाळा पुरस्कार, आय एस ओ मानांकन, शिक्षकांना मिळालेले विविध पुरस्कार जिल्हा, राज्य स्तर, शोधनिबंध, १००% उपस्थिती, दर्जेदार पोषण आहार, १००% पटनोंदणी, ०% शालाबाह्य विद्यार्थी, संगणकाचा वापर, भरघोस शैक्षणिक उठाव ही शाळेची बलस्थाने आहेत. मात्र सुसज्ज प्रयोगशाळा, मैदान, खेळाचे साहित्य या शाळेच्या कमतरता आहेत.

शाळेची पार्श्वभूमी -

सह्याद्री पर्वताच्या कुशीमध्ये कोळकेवाडी धरणाच्या काठावर अतिदुर्गम भागात ३ जुलै १९७३ रोजी जि.प. शाळा कोळकेवाडी बोलाडवाडी ही शाळा सुरु झाली. कोयना प्रकल्पाच्या निधीतून या शाळेसाठी पत्र्याची शेड असणारी भूकंप टाईप दोन खोल्यांची एक इमारत उभी राहिली. सुरुवातीला शाळेमध्ये १ ली ते ४ थी पर्यंतचे वर्ग सुरु झाले. दोन वाड्यांमधील विद्यार्थ्यांची त्यामुळे शिक्षणाची सोय झाली. त्यानंतर पुढील काळात ५ वीचा वर्ग सुरु करण्यात आला. पुढे सन २००५ मध्ये डोंगरी विकास निधीतून या शाळेसाठी पक्की इमारत बांधून मिळाली आणि शाळेच्या प्रगतीला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.

परिवर्तनाच्या दिशेने सुरु झालेला प्रवास -

सन २००६ सध्याच्या मुख्याध्यापिका या पदावर मी शाळेत रुजू झाले. त्यावेळी दोन खोल्यांच्या पक्क्या इमारती व्यतिरिक्त येथे काहीही भौतिक सुविधा नव्हत्या. शेतकरी असणारा पालकवर्ग चुकूनही शाळेकडे फिरकत नव्हता. मुलांच्या शिक्षणाप्रती मोठ्या प्रमाणात अनास्था होती. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना गणवेश या संकल्पनेची ओळखच नव्हती. सुरुवातीला पालकांना विश्वासात घेवून शाळेत समानता आणण्यासाठी गणवेशाची संकल्पना पालकांसमोर मांडून त्यांचे समुपदेशन करण्याचे अवघड काम पार पाडावे लागले. सुरुवातीला फारसा प्रतिसाद न देणाऱ्या पालकांनी हळूहळू सहकार्य देत १००% विद्यार्थी गणवेशात येवू लागले. पालकांचा शाळेकडील ओढा वाढावा यासाठी शारदोत्सव साजरा करण्याची संकल्पना

अमलात आणली. मराठी माणूस हा उत्सवप्रिय असल्यामुळे त्याचा अपेक्षित परिणाम झाला व शारदोत्सवासाठी मोठ्या संख्येने पालक व ग्रामस्थ शाळेत उपस्थित राहिले.

गुणवत्ता वाढीसाठी पालकांच्या सहकार्यातून समयदान योजना सुरु केली. सकाळी व संध्याकाळी एक एक तास जादा मार्गदर्शन करण्यास शिक्षकांनी सुरुवात केली.पालकांनी विद्यार्थ्यांना वेळीच शाळेत पाठवून चांगले सहकार्य केले. आमच्या प्रयत्नांना हळूहळू चांगले यश येवू लागले. शाळेत येण्यास टाळाटाळ करणारे विद्यार्थी आवडीने शाळेत येवू लागले, अभ्यास करू लागले. पूर्वी शाळेचा इ.४ थी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल हा ०% असे. परंतु सन २००७-०८ चा शिष्यवृत्तीचा निकाल १००% लागला. प्रयत्नांना यश मिळू लागले, शिष्यवृत्तीच्या निकालाची परंपरा अखंडपणे आजतागायत सुरु आहे.

येथील विद्यार्थ्यांना ५ वी नंतरच्या शिक्षणासाठी केंद्रशाळेत जावे लागत होते. या अंतराचा विचार करता पायी जाण्या-येण्यात ते विद्यार्थी थकून जात असत. तसेच धनगरवाडीतून येणारे विद्यार्थी तर खूपच अंतर चालावे लागत असल्यामुळे अनास्थेकडे झुकू लागल्यासारखे दिसत. याचा विचार करून सन २००८ पासून नैसर्गिक वाढीच्या निकषांनुसार ६वी व ७वी चे वर्ग सुरु केले. यातून मुलांचा प्रवासाचा त्रास कमी करून तो वेळ अभ्यासासाठी देणे त्यांना शक्य झाले. पुढे सन २०१४ मध्ये आम्ही शासनाच्या धोरणानुसार इ.८वीचा वर्ग सुरु केला.

अध्ययन - अध्यापनातील बदल -

शाळेतील गुणवत्ता वाढीसाठी, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येक वर्ग डिजिटल केला आहे. मी स्वत: केलेल्या app निर्मितीमुळेच विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनाची गोडी निर्माण झाली आहे. विद्यार्थी स्वत: संगणक हाताळत आहेत. ज्ञान रचनावादी साहित्यही मुबलक प्रमाणात तयार केले आहे. हसू,खेळू, नाचू , दोस्ती गणिताशी, सापशिडी, यांचा वापर करून अध्ययन अधिक रंजक केले जाते. इंग्रजी संवाद वापर, नाट्यीकरण मुले अस्खलितपणे करतात. एवढा सकारात्मक बदल झाला आहे की, मुले गणित व भाषा विषयात प्रगत आहेत. इंग्रजी नाट्यीकरण सहज करतात. पालकांचेही अध्यापनात योगदान सर्रास घेतले जाते. तज्ज्ञ मार्गदर्शकांना शाळेत बोलावून कौशल्याधिष्ठीत शिक्षणावर आम्ही सर्वांनी भर दिला आहे. मुख्याध्यापिका म्हणून करावे लागणारे काम सहजगत्या व्हावे यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करून 'पेपरलेस वर्क' हा शाळेने एक महत्त्वाचा उपक्रम राबविला आहे. सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात संगणकाची सोय असणे ही काळाची गरज बनली आहे. हा अत्यावश्यक घटक शाळेत असणे खूप आवश्यक होते. विशेषतः दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना त्याची ओळख होणे गरजेचे होते. यासाठी सन २००७ मध्ये शाळेला एक संगणक संच उपलब्ध करून देण्यात आला. त्यातून मुलांना संगणक ज्ञान मिळू लागले. शाळेतील महात्वाची गरज म्हणजे पिण्याच्या पाण्याची उपलब्धता करण्यासाठी शासनाच्या अनुदानातून पाण्याची साठवण टाकी तर ग्राम पंचायतीकडून नळ कनेक्शन मिळवण्यासाठी प्रयत्न करून ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. वाढलेल्या वर्गांचा विचार करता इमारत अपुरी पडू लागली. त्यामुळे शासनाकडे पाठपुरावा करून पुनर्वसन निधीतून एका वर्गखोलीची एक इमारत व सर्व शिक्षा

अभियानामधून एक इमारत बांधण्यात आली. शाळेच्या भौतिक सुविधा पूर्ण करण्यासाठी पुनर्वसन निधीतून शाळेला संरक्षक भिंत बांधण्यात आली.

विद्यार्थ्यांनी कधीही शाळेच्या इमारतीबाहेर किंवा आपल्या परीसराबाहेरील जग पाहिले नव्हते. अशावेळी पालकांच्या सहकार्याने शाळेच्या इतिहासात प्रथमच शैक्षणिक सहलीचे आयोजन केले. शाळेचा पट कमी असल्यामुळे शेजारील शाळांना सोबत घेवून संयुक्तपणे ही सहल काढण्यात आली व विद्यार्थ्यांनी प्रथमच आपल्या परीसराबाहेरचे जग अनुभवले. ही शैक्षणिक सहलीची परंपराही आजतागायत सुरु असून त्याद्वारे विद्यार्थी दरवर्षी नवनवीन भागांना भेटी देवून ज्ञान व आनंद मिळवत आहेत.तसेच वेगवेगळे अध्ययन अनुभव घेण्यासाठी क्षेत्रभेटी, कारागिरांना भेटी, तज्ज्ञ लोकांचे मार्गदर्शन असे अनेक अनुभवाधिष्ठित उपक्रम शाळेत आयोजित केले.

शाळेच्या या कलाटणी देणाऱ्या प्रवासात वाढणाऱ्या वर्गांचा विचार करून शासनाकडून शिक्षकांची संख्या वाढविण्यात आली. यात प्रथमच सेवेत रुजू होणारे श्रीमती कदम व श्री. कांबळे हे शिक्षक या शाळेत रुजू झाले. अतिशय उत्साही व मेहनती असणाऱ्या या शिक्षकांमुळे शाळेच्या प्रगतीचा वेग अधिक वाढला. शाळेची गुणवत्ता वाढण्यास मदत झाली.तंत्रस्नेही शिक्षकांमुळे मुलांना अत्याधुनिक साधन तंत्रांची ओळख होवू लागली.

वर्षभर शाळेत विविध स्पर्धा व उपक्रम आयोजित केले जातच होते.त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी शाळेत विविध गुणदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यास सुरुवात केली. याच कार्यक्रमात वर्षभरातील स्पर्धांमधून यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करून त्यांचा उत्साह वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला. विद्यार्थ्यांना शाळेबरोबरच परिसरात आयोजित होणाऱ्या स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन, जिल्हास्तरापर्यंत सहभागी करण्यात आले. त्यातून त्यांचा उत्साह व आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. शाळेत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध गुणदर्शन कार्यक्रमासाठी रंगमंचाची आवश्यकता होती. शाळेतील शिक्षक श्री. गोखले सर यांच्या मदतीने श्री. आनंदराव पवार यांच्या कडून रंगमंच उपलब्ध करून घेतला. तसेच शाळेला संगणक व प्रिंटरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

शाळेच्या भौतिक प्रगती बरोबरच गुणवत्तेत वाढ होत गेल्यामुळे यु डायस, माझी समृध्द शाळा व गुणवत्ता विकास कार्यक्रमात सतत 'अ' श्रेणी शाळेला प्राप्त झाली. सन २०१४ मध्ये शासन धोरणानुसार शाळेमध्ये ६वी ते ८वी साठी श्री. मोडक व श्री. शिंदे या दोन पदवीधर शिक्षकांची नेमणूक करण्यात आली. याचवर्षी शाळेची मुख्याध्यापिका म्हणून माझा रत्नागिरी जिल्हा परीषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला. तसेच शाळेलाही जिल्हा परिषदेचा आदर्श शाळा पुरस्कार मिळाला.

शाळेमध्ये गुणवत्ता वाढीसाठी 'वाचू आनंदे' हा उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांची वाचन गोडी वाढावी व त्यांना अवांतर वाचनाची सवय लागावी यासाठी या उपक्रमाचे आयोजन केले. विद्यार्थ्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी खाऊ वाटप करण्याऐवजी त्या रकमेतून वाचनालयाला पुस्तके भेट देण्याचा उपक्रम सुरु करण्यात आला. त्यातून शालेय वाचनालय समृध्द होण्यास मदत झाली.

विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शिक्षण मिळावे यासाठी ग्रामस्थांच्या सहकार्यातून शाळा डिजिटल करण्याचा संकल्प केला. अल्पावधीतच शाळेला प्रोजेक्टर, सॉफ्टवेअर उपलब्ध होवून शाळा डिजिटल करण्यात आली. विद्यार्थी यातून अध्ययन करू लागले. एवढ्यावरच न थांबता मी तंत्रशिक्षणाचे धडे घेवून स्वतः 'माय स्कूल एक्टीव्हिटी' या app ची निर्मिती केली. तसेच 'क्रांतीज्योती सावित्री' ह्या ब्लॉगची निर्मिती करून त्यावर शैक्षणिक माहिती उपलब्ध करून दिली. विविध विषयांवर शैक्षणिक व्हिडीओ तयार करून शाळेच्या नावाने यू ट्यूब चेनल तयार करून तेही उपलब्ध करून दिले. ज्ञानरचनावादी साहित्याची निर्मिती व वापर करून विद्यार्थी अनुभव संपन्न बनविण्याचा प्रयत्न केला. 'BALA, ABL' इव्हेंट याचा अध्यापनात वापर केला.

शिकू जीवन कौशल्ये अंतर्गत, पालकांचा व्यावसायिक शिक्षणात सहभाग घेवून ज्वेलरी तयार करणे, शिवणकाम, भरतकाम, विणकाम,शोपीस तयार करणे इत्यादी गोष्टींचे शिक्षण पालकांच्या सहभागातून देण्याचा संकल्प केला आहे. तालुकास्तरावर आयोजित 'शिक्षणाची वारी' मध्ये मी सक्रीय सहभाग घेवून परिसर अभ्यास या विषयावर शैक्षणिक साहित्य तयार करून त्याची मांडणी केली.

प्रज्ञावान व प्रतिभासंपन्न विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभाग घेण्याची संधी आम्ही शिष्यवृत्ती परीक्षा इ.५ वी व महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा इ.२ री ते ४ थी या परीक्षांना विद्यार्थ्यांना बसवून,त्यांना अतिरिक्त मार्गदर्शन केले. यामध्ये प्रतिभासंपन्न विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय रंगभरण स्पर्धा व जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली व या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना पारितोषिके प्राप्त झाली आहेत. केंद्र, बीट,व तालुका पातळीवर आयोजित क्रीडास्पर्धा यांमध्ये विद्यार्थी सहभागी होतात व विशेष नैपुण्य प्राप्त करतात.











व्हा स्वयंसिद्धा -

शाळेत येणाऱ्या विद्यार्थिनी या दुर्गम व जंगल भागातून शाळेत येतात अशावेळी त्यांना स्व-संरक्षणाचे धडे देणे गरजेचे आहे हे ओळखून शाळेत विद्यार्थिनींसाठी 'व्हा स्वयंसिद्धा' हा कराटे व मार्शल आर्ट शिक्षणाचा उपक्रम राबवला .त्यातून विद्यार्थिनी निर्भय बनल्या ,त्यांचा आत्मविश्वास वाढला व उपस्थितीही सुधारली. माझ्या या नवोपक्रमाला महाराष्ट्र शासनामार्फत उत्कृष्ट नवोपक्रम पुरस्कार प्राप्त झाला आहे.

येथील पालक हे शेतकरी व अतिशय गरीब असल्यामुळे मुलांच्या शिक्षणाचा खर्च करण्याची त्यांची परिस्थिती नाही. अशा मुलांसाठी भारतीय समाजसेवा संस्थेमार्फत या मुलांना दत्तक देवून त्यांना लागणारे शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात येते. त्यातूनच कु. गीता गंगाराम वरक या विद्यार्थिनीला ऑस्ट्रेलियातील नागरिकांकडून पालकत्व प्राप्त झाले असून तिचा संपूर्ण खर्च त्यांच्या मार्फत केला जातो. आम्ही ग्रामस्थ व दानशूर व्यक्तीना संपर्क करून जवळपास १०,५०,०००/- (दहा लक्ष पन्नास हजार) रुपयांचा शैक्षणिक उठाव मिळवला आहे. संगणक, धान्य कोठी, मुख्याध्यापक कार्यालय, रंगमंच, पुस्तके, डिजिटल बोर्ड, प्रोजेक्टर, पोषण आहारासाठी भांडी, फर्निचर इत्यादी सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

शाळा व समाज यांच्यातील समन्वय -

शाळा कोळकेवाडी बोलाडवाडी येथे रुजू झाल्यानंतर सुरुवातीला येथील पालकांचा शाळेकडे बघण्याचा जो दृष्टीकोन होता तो फार उदासीन आणि निरस होता, कारण गुणवत्तेच्या दृष्टीने शाळेकडे आकृष्ट होण्याचा मूळ पायाच डळमळीत होता. या दृष्टीने विचार केला असता सुरुवातीला गुणवत्तावाढ हे एकाच मिशन डोळ्यांसमोर ठेवून सर्वांच्या सहकार्याने समयदान योजना राबवली. १००% शिष्यवृत्ती निकालाची परंपरा राखल्यावर पालकांमध्ये सकारात्मक बदलाची छटा दिसू लागली.

शाळेमध्ये राष्ट्रीय सण, जयंती,पुण्यतिथी कार्यक्रमाबरोबर विविध सण व उत्सव साजरे केले जातात. राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव, स्त्री-पुरुष समानता या मुल्यांची जोपासना करण्यासाठी शाळेत दहीहंडी, रक्षाबंधन, भोंडला, दिवाळी इ. सण साजरे केले जातात. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती जोपासण्यासाठी विद्यार्थिनींनी स्वत: राख्या व शुभेच्छापत्र तयार करून सीमेवरील सैनिकांना पाठविल्या आहेत. गावातील माजी सैनिकांना शाळेमध्ये निमंत्रित करून रक्षाबंधन करण्यात आले. त्यांनी यावेळी भारत चीन युद्धातील प्रत्यक्ष अनुभव कथन केले. विविध गुणवत्तापूर्ण उपक्रमांमुळेच शाळेला सन २०१८ मध्ये ISO मानांकन प्राप्त झाले आहे.

इथे परंपरागत शैक्षणिक साधने यावर अवलंबून न राहता अद्ययावत शाळा करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु झाला. ग्रामस्थांना अध्यापनातील तंत्रज्ञानाचे महत्त्व सहकार्याच्या सहाय्याने पटवून देण्यात आले. ग्रामस्थ, पालक यांच्या सहकार्याने digital शाळेचे स्वप्न साकार झाले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने उपक्रमांची मालिका तयार करण्यात आली. विविध उपक्रमांतून विद्यार्थी सहभागास सुरुवात करण्यात आली. पंचरंगी कवायत, झांजपथक, रांगोळी स्पर्धा, मंत्रिमंडळ निर्मिती, शालेय वस्तू भांडार, सांस्कृतिक कार्यक्रम, इत्यादी मध्ये मुला-मुलींना समान संधी देण्यात आली. शाळेमध्ये तक्रार पेटी ठेवण्यात आली. त्यामुळे शाळेमध्ये सुरक्षित वातावरण तयार झाले. शिवाय मुलींच्या सुरक्षिततेसाठी 'व्हा स्वयंसिद्धा' हा उपक्रम राबविण्यात आला. त्या उपक्रमाची नोंद महाराष्ट्र शासनाने घेवून त्यास सर्वोत्कृष्ठ नवोपक्रम म्हणून निवड केली. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना वाढदिवसाला 'एक झाड लावणे' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. याशिवाय वृक्षदिंडी, वृक्षारोपण हे कार्यक्रम पर्यावरण दिनी आयोजन करून पर्यावरणविषयक जनजागृती करण्यात येते.सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने स्वच्छता अभियान, 'स्वच्छ शाळा सुंदर शाळा' हे उपक्रम शाळेत राबवले जात आहेत. सांस्कृतिक वातावरण निर्मितीसाठी विविध सणांच्या निमित्ताने नैमित्तिक उपक्रम राबवले जातात.

याचबरोबर मी आणि माझे सहकारी ,आम्ही स्वत:ची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता वाढवली आहे. तसेच विविध प्रशिक्षणे पूर्ण केली आहेत. समावेशित शिक्षण व भाषा विकास प्रशिक्षणाची मी राज्यस्तर सुलभाक आहे, मला सन २०१८ साली महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. हा केवळ माझा सन्मान नसून,सर्व शिक्षक,विद्यार्थी यांचा हा सन्मान आहे.

धन्यवाद

संगिता ताजवे
मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, हर्सुलगांव, मनपा औरंगाबाद
ईमेल आयडी- amcpshharsulgaon@gmail.com



प्रस्तावना -

"दृढ प्रयत्नेन सिध्दते"

प्रत्येक मूल शिकू शकते असा दृढ विश्वास ठेवून प्रत्येक शिक्षकाने गुणवत्तावाढी करीता काम करावे. जे उत्तम काम करतात ते गुण हेरून त्यांचे कौतुक करावे आणि सर्व शिक्षकांनी मिळून गुणवत्तेच्या विकासाकडे आणि 100% प्रगत वर्ग, प्रगत शाळा व प्रगत केंद्र हे ध्येय साध्य करण्याकरीता मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय हर्सुल गांव या शाळेत शिक्षक व मुख्याध्यापक प्रगत शाळा व गुणवत्ता वाढीचा ध्यास मनात धरून कामास सुरूवात केली आणि त्याला शालेय नेतृत्व विकास प्रशिक्षणात मिळालेल्या ज्ञानाची जोड मिळाली. मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात प्रचंड वेगाने बदल होत आहेत.शिक्षणामुळेच मानवी जीवन अधिक परिपूर्ण बनण्यासाठी शिक्षण क्षेत्र प्रयत्नशील आहे.

शहरी भागात पालकांना असलेले इंग्रजी माध्यमाचे आकर्षण आणि या शाळांची वाढती संख्या हे आमच्यासमोर पत आणि गुणवत्ता यासाठीचे प्रचंड मोठे आव्हान होते.दरम्यान शालेय नेतृत्व विकास प्रशिक्षण प्राप्त झाले आणि शालेय नेतृत्वाचे अनेक

पैलू,आयाम,आमच्यासमोर मांडून एका नव्या दिशेने विचार,कृती,सहकार्य,उत्कृष्टता,या बाबी उलगडत गेल्या. तेव्हा हे लक्षात आले की गुणवत्तेच्या स्पर्धेत टिकायचे असेल आणि पालक व विद्यार्थी यांना पुन्हा महानगरपालिका शाळेकडे वळवायचे असेल तर सर्व बाबींनी गुणात्मक दर्जा उंचावणे आवश्यक आहे व त्यासाठी वेगळे काहीतरी करणे गरजेचे आहे.

दृष्टी (VISION), ध्येय (MISSION) -

कोणतेही ध्येय योग्य दृष्टी असल्याशिवाय साध्य होणारच नाही हे लक्षात घेत, शाळा विकासाचा एक आराखडा तयार करण्यात आला व त्यात विकासाचे काही महत्वपूर्ण टप्पे तयार करण्यात आले. प्रत्येक ध्येय साध्य करण्यासाठी त्यांची योजना व कालावधी निश्चित करण्यात आला. ज्यात शाळेची रंगरंगोटी करुन बाह्य रुप बदलणे, शाळा DIGITAL करणे, शाळेचे कम्पाऊंड तयार करणे, मुलांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची (RO) व्यवस्था करणे, स्वच्छ आणि HANDWASH STATION तयार करणे, मुलांमुलीसाठी स्वच्छ स्वच्छतागृह उपलब्ध करणे, विविध झाडे लावून शालेय परिसर फुलविणे,एकूणच भौतिक सुविधा परिपूर्ण करणे, अध्ययन- अध्यापनात नवनवीन तंत्राचा वापर करत विद्यार्थ्यांना अध्ययनाची गोडी लावणे, विद्यार्थ्यांचा अध्ययनातील गुणात्मक दर्जा उंचावणे, अध्ययन स्तर निश्चितीत शाळेचा स्तर उंचावणे, सर्वात महत्वाचे हे सर्व साध्य करण्यासाठी एक चांगल्या संघाची बांधणी करणे या बाबत विचारातून कृतीकडे प्रवास सुरु झाला,त्यासाठी पालक संपर्कावर भर दिला आणि शाळेचा अध्ययन स्तर उंचावणे हे प्रमुख उद्दिष्ट आम्ही ठरविले.





सामर्थ्य आहे चळवळीचे, जे जो करील तयाचे कोणतीही चळवळ एका व्यक्तीद्वारे होणे शक्य नाही, त्यास आवश्यकता असते ती एका मजबुत संघाची आमची ही शैक्षणिक चळवळही त्यास अपवाद नव्हती. आम्हास पुरेपुर ठाऊक होते की अपेक्षित ध्येय साध्य करण्यासाठी मजबुत संघ बांधणी फार गरजेची होती. संघ बांधणीसाठी प्रामुख्याने दोन घटक गरजेचे होते. एका घटकात शिक्षक, मुख्याध्यापक व पालक अशी मंडळी होती जी मुले आणि शाळा यांच्या रोज संपर्कात होती व दुसऱ्या घटकात शाळेस वेळोवेळी भेट देणारी पर्यवेक्षीय यंत्रणा होती ज्यात शिक्षणाधिकारी, विषय व विशेष साधन व्यक्ती व विशेष शिक्षक यांचा समावेश होता. या दोन्ही घटकांना मी मुख्याध्यापक श्रीम. संगीता ताजवे आणि सर्व शिक्षक यांनी एक संघ करण्याचे यशस्वी काम केले आणि स्वप्नपूर्तीसाठी पहिले पाऊल टाकले व शाळा विकासासाठी पहिली बैठक शाळेत आयोजित करण्यात आली आणि त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळाला. त्याच बरोबर साधन व्यक्तीच्या सहाय्याने E R A C तंत्र ज्यातून शैक्षणिक साहित्य,गटवार कृती यातून शिकणे सोपे होण्यासाठी शिक्षकांनी अवलंब सुरु केला,ज्याचा सकारात्मक परिणाम दिसू लागला.

DIGITAL शाळा -

एकीकडे ERAC या तंत्राचा अध्ययन अध्यापनात वापर सुरु असताना मुलांना गंमत तर वाटत होती पण त्याच बरोबर आम्हाला हेही लक्षात येत होते की मुलांच्या प्रगतीसाठी केवळ एवढ्यावरच थांबून चालणार नाही अजुन काही तरी करावेच लागेल. तेव्हा आम्ही दोन बाबींवर विचार केला 1. शाळा लवकरच DIGITAL करणे. 2. तंत्रस्नेही शिक्षक.यात शिक्षकांच्या सहभागातून एक एलईडी टीव्ही घेण्यात आला.

शाळेत संगणक कक्ष आहे. त्यात 12 संगणक आहे. त्यावर मुलांचे दररोज वर्ग होतात. शाळेत आमदार निधीतून 7 संगणक प्राप्त झाले व 5 महानगरपालिकेमार्फत मिळाले आहे. त्याचा उपयोग आम्हाला विद्यार्थ्यांसाठी करुन घेता येतो.

शाळेत एक प्रोजेक्टर असून त्यात शिक्षण अभ्यासक्रमाविषचीचे सॉफ्टवेअर व व्हीडीओ दाखविण्यासाठी उपयोग होतो.

आता आमचा एक वर्ग सर्व सुविधांनीयुक्त असा झाला . आता आम्ही दोन्ही वर्गखोलीतील मुलांना आळीपाळीने त्या वर्गात बसवतो. DIGITAL वर्ग खोलीत बसण्यासाठी वर्गामध्ये चढाओढ लागते अशाप्रकारे आमची शाळा DIGITAL झाली.

शाळा सुरक्षा आणि शालेय वातावरण -

शाळेच्या समोरच्या बाजुने लागुनच रोड आहे परंतू त्यावर गाड्यांची वाहतुक जरी होत असली तरी शाळेला चारही बाजुने भक्कम कंपाऊंड भिंत असल्याने मुलांना याबाबत कोणतीही असुरक्षितता भासत नाही. ते अगदी निर्धास्तपणे शाळेच्या मैदानावर खेळु शकतात. शालेय परिसरात विविध फुलांची झाड़े लावण्यात आली व त्यामुळे शालेय परिसर प्रसन्न वाटु लागला. आज या सर्व झाडांची आणि फुलांची जबाबदारी शाळेची सर्व मुले घेत असतात. वर्गात व परिसरात कोणत्याही प्रकारचा कचरा किंवा अस्वच्छता होणार नाही याची दक्षता सर्व मुले घेत असतात आणि कधी चुकून वर्गात किंवा शालेय परिसरात कचरा आढळलाच तर तो कोणी केला याचा शोध घेण्यापेक्षा तो त्वरित कचरा पेटीत टाकला जातो. मध्यान्ह भोजनाचे उरलेले अन्न याचा कंपोस्ट खत निर्मितीसाठी उपयोग केला जातो. तसेच काही मुलांकडून ताटातून सांडलेले अन्न हे पक्षांसाठी ठेवले जाते.

शाळेचे विशेष उपक्रम -

वाचन कट्टा - दुपारी मध्यान्ह भोजनाच्या नंतर सर्व मुले व मुली भोजनाच्या ठिकाणची स्वच्छता करुन घेतात व त्यानंतर शालेय वाचनालयातून आपापल्या आवडीची गोष्टीची पुस्तके घेतात व त्यांचे वाचन करतात. त्यांनी वाचलेल्या पुस्तकाविषयी आपल्या मित्र, मैत्रिण यांना सांगतात. यातून मुलांना समजपूर्वक वाचनाची सवय लागण्यास मदत झाली. वाचलेला मजकुर समजुन घेऊन तो इतरांना सांगतात.

दिनांकानुसार पाढे - परिपाठादरम्यान रोज मुले पाढे म्हणतात. महिन्याची जी तारीख असेल त्या तारखेचा पाढा रोज परिपाठात घेण्यात येतो. या उपक्रमामुळे मुलांचे सहजतेने 30 पर्यंत पाढे पाठ होण्यास मदत झाली व त्याचा सकारात्मक परिणाम मुलांच्या गणित अध्ययनात दिसून आला. अध्ययन स्तरात मुले गणितात पुढे जातांना दिसून येत आहेत.

शिकू आनंदे -

प्रत्येक शिक्षकाला वर्ग अध्यापनात असे वाटते की, माझ्या वर्गातील विद्यार्थ्यांना वाचन व लेखन आले पाहिजे. हे करत असतांना शिक्षकांचे मुलांच्या मौखिक भाषा विकासाकडे तसेच त्याच्या ध्वनी जागरुकतेकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. मुलांना शिकवित असतांना प्रथम मुलांचा मौखिक भाषा विकास तसेच ध्वनी जागरुकता करणे आवश्यक आहे. ज्यावेळी मुलांची ध्वनी ओळख पक्की होईल त्यावेळी मुलांना वर्ण किंवा अक्षरांच्या आकृतीची ओळख करावी, हे करण्यासाठी भाषिक खेळांची भूमिका किती महत्वाची आहे हे कळले.

वर्गातील 100% मुलांना लिहिता व वाचता यावे हे शासनाचे धोरण आहे. ही बाब ओळखून मा. डॉ. निपुण विनायक आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांच्या प्रेरणेतून तसेच डॉ. निधी विनायक यांच्या संकल्पनेतून शिक्षकांसाठी शिकू आनंदे ही उपक्रम पुस्तिका साकारली.यात आमच्या शाळेतील सहशिक्षिका

1) दिपाली म्हस्के - प्रसंग पूर्ण करणे
2) रोहीणी रोकडे – सर्वात खोडकर कोण
3) मंगल शिंदे – नकारात्मक विचारांना सकारात्मक करणे

यांच्या शिक्षणपुरक कृतींचा समावेश करण्यात आला आहे.

मुठभर गोष्टी –

कथा या विद्यार्थी व शिक्षकांचे भावविश्व उमलवू शकतात. कथा सांगताना शिक्षक व विद्यार्थी भेद विसरून एकाच भावनिक पातळीवर स्थिरावतात. आनंद, सुख, दुःख, भिती, त्याग, बंधुभाव, निष्ठा, प्रेम इ. भावना ते एकाचवेळी समरसून अनुभवतात. वर्गाध्यापनाच्या दृष्टीने आपला परंपरेने चालत आलेला हा ठेवा अतिशय महत्वाचा आहे. विद्यार्थ्यांचा शब्दसाठा वाढविणे, वाक्यरचना शिकवणे, भावना व्यक्त करणे, श्रवण, संभाषण या कला विकसित करणे यासाठी कथा हे माध्यम मध्यवर्ती भूमिका बजावते.

सर्व शाळा प्रगत करणे व गुणवत्ता विकास करणे हे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे. शिक्षकांमधल्या अंत:स्फुर्तीला, नवनिर्माणक्षमतेला नवे क्षितीज उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच ज्या शिक्षकांच्या क्षमतेवर गुणवत्तेचा रथ ओढावयाचा आहे ती विकसित करणेही गरजेचे आहे. ही बाब ओळखून महानगरपालिका आयुक्त मा. डॉ. निपुण विनायक तसेच श्रीमती डॉ. निधी विनायक यांच्या प्रेरणेमधून मुठभर गोष्टी हा कथासंग्रहाचा उपक्रम साकार झाला. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू भाषेतून कथा लिहिल्या आहेत. शिक्षकदिनी या पुस्तकाचे विमोचन करुन सर्व कथालेखक शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

यात आमच्या शाळेतील सहशिक्षक

हेमा वैष्णव - राजू शहाणा झाला

मनोज अग्रवाल- गर्वाचे घर खाली

मनोज अग्रवाल- अनोखी दोस्ती

मनोज अग्रवाल- कुत्ता और चिटी

मनोज अग्रवाल - Python and Rama

अद्ययावत विज्ञान प्रयोगशाळा -





शाळेमध्ये अद्ययावत विज्ञान प्रयोगशाळा आहे. विज्ञान पेटी, विविध यंत्र, साहित्य, विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष प्रयोग करण्यासाठी यंत्रणा उपलब्ध आहे. विविध विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थी सहभागी होतात.

संगणक प्रयोगशाळा -

शाळेत अद्ययावत संगणक प्रयोगशाळा निर्माण करण्यात आली. आधुनिक युगात संगणकाचे ज्ञान विद्यार्थ्यांना होण्यासाठी वेळापत्रकात तासिकेचे नियोजन करण्यात आले. नियमित विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक कार्य दिले जाते.

सांस्कृतिक कार्य -

आजचा विद्यार्थी उद्याचा क्रियाशील कर्तृत्ववान नागरिक तयार व्हावा म्हणून प्रशालेत सांस्कृतिक विभाग कार्यरत आहे. संपूर्ण शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांची मने सुसंस्कारित व्हावी या जाणीवेतून संपूर्ण वर्षभर संत, नेते इ. महान सत्पुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साज-या केल्या जातात.

बालोद्यान -





ा संकल्पनेतून साकार करण्यात आलेला

अध्ययन -अध्यापनात रंजकता यावी व

ळेची पटसंख्या वाढावी या उद्देशाने सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालकांच्या मदतीने बालोद्यानाची निर्मिती करण्यात आली.

भावी योजना -

शिक्षकांना भाषा विकासासंबंधी वारंवार प्रशिक्षण देऊन 100%गुणवत्ता आणण्यासाठी प्रयत्न करत आहोत. प्रत्येक मूल शिकले पाहिजे या दृष्टीने सतत प्रयत्न करत आहोत.

शाळेतील अभ्यासक्रमाच्या अमुर्त संकल्पना मुर्त स्वरुपात स्पष्ट होण्यासाठी अजून LED ची गरज आहे. ती मिळवण्यासाठी प्रयत्न चालु आहे.

बालोद्यानात मुले रमावित या उद्देशाने खेळाचे अधिकचे साहित्य आणण्यासाठी प्रयत्नशील आहोत.

आमच्या यशाची परिणामकारकता -

महानगरपालिका कें.प्रा.शा. हर्सुल गांव शाळा भौतिक सुविधांनी परिपूर्ण झाली,विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर उंचावला . यातून शाळेची पटसंख्या वाढली आणि पालकांचा शाळेसंबंधी सकारात्मक विचार करू लागले.






धन्यवाद

शेख गुलाम नबी शेख हबीब

जिल्हा परिषद उर्दू हायस्कूल रायपुर शाळेचा पूर्ण पत्ता:मु.पो.रायपुर तालुका जिल्हा बुलडाणा

ईमेल आयडी - gulamnabihabib@gmail.com



शाळेचा दर्शनी फोटो

प्रास्ताविक-

जिल्हा परिषद उर्दू शाळा रायपुर बुलडाणा तालुक्यात आहे.अत्यंत गरीब शेतकरी वर्ग व मोलमजुरी करणारे पालक गावात आहेत. जि प उर्दू हायस्कूल रायपुर येथे इयत्ता १० वी पर्यंत शिक्षणाची सुविधा असल्यामुळे बरेच विद्यार्थी इयत्ता १० वी पर्यंतच शिक्षण घेऊन पुढील शिक्षणास प्रवेश घेत नाहीत .शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शाळा महत्वाची आहे. इथे मिळणारे शिक्षण दर्जेदार होण्याकरिता मुख्याध्यापक,शिक्षकवृंद,गावकरी लोक प्रयत्न करतात. मुख्याध्यापक हा शाळेचा महत्वाचा घटक असल्याने जबाबदारी महत्वाची ठरते.त्याकरिता शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम प्रशिक्षण मला घेण्याची संधी मिळाली.

शाळेसमोर खालील आव्हाने व समस्या होती.

• जि प शाळेबद्दल समाजाचा दृष्टीकोन सकारात्मक करणे.

• नेतृत्व करताना शैक्षणिक,,सामाजिक,आर्थिक बाब महत्वाची असते या प्रत्येक घटकात समन्वय साधणे.

• निधीची कमतरता असल्यामुळे शाळेचा विकास करण्यास व शालेय उपक्रम घेण्यास अडथळा निर्माण होत असल्याने लोकसहभाग वाढविणे.

- शाळेत मुलींची संख्या जास्त असल्यामुळे मुलींच्या विविध समस्या दूर करण्यासाठी काम करणे.

अपुरी शिक्षक संख्या व वरील आव्हाने शाळेच्या विकासाचा दृष्टीने दूर करणे महत्वाचे होते.त्याकरिता शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम अंतर्गत घेतलेल्या प्रशिक्षणामुळे आत्म विश्वासाने शाळा विकास करण्याचा मार्ग मिळाला आहे .

शाळेने ठरवलेली उद्दिष्टे -

1: १०० टक्के शाळा डिजिटल करणे.

२: १०० % मुलांना दर्जेदार शिक्षण देणे.

३: लोकसहभाग,शासन तसेच संस्थाच्या मदतीने शाळेतील भौतिक सुविधा पूर्ण करणे.

४: जिल्हा परिषद शाळेबद्दल पालकांचा दृष्टिकोन सकारात्मक करणे

५: मुलांच्या क्षमता विकसित करण्यासाठी पालक सहभाग घेण्यासाठी जनजागृती करणे

६: हरित शाळा (GREEN SCHOOL) करणे.

शाळा विकासासाठी केलेले नियोजन व त्याची अंमलबजावणी -

उपरोक्त दृष्टी व ध्येय समोर ठेऊन शाळा विकासासाठी प्रत्येक घटकनिहाय नियोजन करण्यात आले.

१ शाळा डिजिटल करण्यासाठी निधी विविध घटक जसे लोकवर्गणी,ग्रामपंचायत वित्त आयोग शिक्षण निधी,संस्था व शिक्षक वर्ग ,पालक,ग्रामस्थ यांचेकडून जमा करण्यासाठी नियोजन करण्यात आले.

२ १००% दर्जेदार शिक्षणसाठी विविध उपक्रमांची अमलबजावणी सुरु केली. जसे LBL, ABL,ज्ञानरचनावाद.अध्ययन स्तर आधारित चाचण्या,इत्यादी उपक्रम घेऊन उपचारात्मक अध्यापन करण्याचा प्रयत्न सुरु झाले आहे.

३ क्रीडांगण,प्रयोगशाळा,डिजिटल वर्ग ,पुस्तकालय,पाण्याची व्यवस्था, इत्यादी भौतिक सुविधा प्राप्त करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

४ समाजाचा शाळेबद्दल सकारात्मक दृष्टीकोन करण्यासाठी शाळेत विविध उपक्रम घेण्यात येतात . वेळोवेळी पालकांचा सहभाग घेण्याचा प्रयत्न केला जातो.

५ मुलांच्या मुलभूत क्षमता विकसित करण्यासाठी शाळा स्तर,वर्ग स्तर तसेच वैयक्तीक लक्ष देऊन प्रयत्न सुरू झाले आहेत. त्यासाठी शाळेत अध्ययनस्तर,पायाभूत चाचणी, अध्ययन निष्पत्ती आधारित प्रश्नपत्रिका तयार करून मुलांच्या मुलभूत क्षमता विकसित करण्याचा प्रयत्न सुरु आहेत.

६ ग्रीन शाळा प्रकल्प - संकल्प शाळा समितीच्या मदतीने पूर्ण करण्यात करण्यात आला..

शाळा प्रगतीसाठी अवलंबिलेली तत्वे-

शाळा प्रगत करण्याचा दृष्टीने शाळेचे वातावरण सकारात्मक असणे गरजेचे आहे. व्यक्ती क्षमता,कल,काम व काम करण्याची इच्छा ओळखून त्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी समता.समानता व सर्वसमावेशक तत्वाचा प्रयोग करण्यात येतो.प्रत्येक व्यक्ती शाळेसाठी महत्त्वाचा घटक समजून शाळा प्रगतीसाठी मदत घेतली जाते. शाळेमध्ये बालकेंद्रित उपक्रम घेऊन मुलांच्या हक्काचे रक्षण केले जाते.

शालेय वातावरण व कार्यसंस्कृती-

सर्व समावेशक व सर्व घटकात समन्वय साधून शालेय वातावरण सकारात्मक झाले आहे. मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीने सर्व घटक काम करतात. प्रत्येक व्यक्ती शाळेसाठी महत्वाचा घटक समजून शाळा प्रगती करण्याचा प्रयत्न आहे.

स्व:विकास व त्यातून शालेय विकास आणि संघ बांधणी-

शाळा प्रगत करण्याचा दृष्टीने बाल केंद्रित व कृतियुक्त शिक्षणावर भर दिला जात आहे. नेतृत्व करताना स्वविकास महत्वाचा आहे. सहकारी व्यक्तीचा विकास होणे व त्यांच्याही क्षमता विकसित होणे, गरजेचे आहे. व्यक्तीमध्ये समन्वय साधून संघ बांधणी करून कामात सरलता येते व मुलांसाठी पोषक वातावरण निर्माण करण्यास मदत मिळते.

शाळेतील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत झालेला बदल-

आज अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत जागतिक स्तरावर होत असलेले बदलाचा प्रभाव आमच्या शाळेत दिसू लागले आहेत. आज कृतियुक्त शिक्षण, स्तरावर आधारित शिक्षण, जानरचनावाद, अध्ययन स्तर आधारित मुलभूत क्षमता विकास,क्षमता आधारित किंवा अध्ययन निष्पत्ती आधारित अध्ययन-अध्यापन प्रक्रिया होत आहे.

शाळेसाठी पालक व समाजाचा सहभाग -

पालकांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्यात आम्ही यशस्वी झालो, त्यामुळे वेळोवेळी पालकांची मदत विद्यार्थी हितासाठी घेतली जाते..

शालेय गुणवत्तेच्या अनुषंगाने शाळेत राबविलेले उपक्रम - नवोपक्रम -योजना

शालेय गुणवत्तेच्या अनुषंगाने शाळेत खालील उपक्रम-नवोपक्रम -योजना राबविले जातात.

· (ABL) कृतीयुक्त शिक्षण

• क्षमता आधारित/अध्ययन निष्पत्ती आधारित अध्ययन-अध्यापन प्रक्रिया

• प्रत्यक्ष प्रयोगातून शिक्षण

• स्तर आधारित अध्ययन-अध्यापन प्रक्रिया

• डिजिटल साहित्यद्वारे दीक्षा app च्या साहयाने ई लर्निंग

• स्काऊट गाईड पथक

• शालेय सहल

• क्रीडा स्पर्धा

• सांस्कृतिक कार्यक्रम

• वक्तृत्व स्पर्धा

• विशेष दिवस साजरा करणे.जसे भाषा दिवस/विज्ञान दिवस/गणित दिवस

शालेय संघटन-व्यवस्थापन व प्रशासनामार्फत केली जाणारी कार्यवाही -

शालेय व्यवस्थापन कमिटीद्वारे शाळा प्रगतीसाठी नियोजित बैठक घेतली जाते.शाळेचा विकास करण्यासाठी शाळा विकास आराखडा तयार करुन अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न होत आहे.विविध उपक्रम / कार्यक्रमात शालेय संघटन-व्यवस्थापनाचा सहभाग घेण्यात येतो.मुलांच्या क्षमता विकसित करण्यासाठी शासनाद्वारे विविध उपक्रम घेण्यात येतात . शिक्षकांना सक्षम करण्याच्या दृष्टीने व त्यांचा आत्मविश्वास वाढला असून अध्ययन प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

शाळा प्रगतीचे पुनरावलोकन व प्रत्याभरण यासाठी कार्यवाही -

सर्व वर्गाना नियमित भेटी देऊन शिक्षकांशी संवाद साधत प्रत्येक मुल शिकू शकते हा आत्मविश्वास निर्माण करण्यात आला.यासाठी वर्गभेट करताना वर्गामध्ये शिक्षक विदयार्थी आंतरक्रिया सुरु आहे का? प्रत्यक्ष अध्ययनात विद्यार्थी व्यस्त होते का ? याचे पुनरावलोकन व प्रत्याभरण करण्यात आले.

कोणत्याही उपक्रमाची यशस्विता त्या उपक्रमामध्ये असणारे सातत्य यावर अवलंबून आहे. त्यामुळे भाषा व गणित विषयांच्या क्षमता समृद्धीसाठी राबवले जाणारे उपक्रम नियमितपणे सुरू राहावेत,त्यातून मुलांना या विषयांची गोडी निर्माण व्हावी यासाठी नियमितपणे वर्ग भेटी करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला जातो.तसेच शिक्षकांकडून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष आढावा घेतला जातो.

समारोप

शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमामुळे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी यांच्यामध्ये समन्वय साधून आणण्यासाठी केंद्रप्रमुख यांचे मार्गदर्शन प्राप्त झाले.मुख्याध्यापक, शिक्षक, पालक प्रतिनिधी, पर्यवेक्षण यंत्रणेतील अधिकारी यांच्या एकत्रित कामातूनच गुणवत्ता संवर्धनाचे उद्दिष्ट साध्य करणे शक्य आहे .या सर्व घटकांमध्ये होत असलेला संवाद हा गुणवत्ता संवर्धनासाठी आवश्यक आहे .शालेय विकास कार्यक्रमातून संवाद कौशल्य विकास, माहिती तंत्रज्ञानाचा दैनंदिन कामकाज उपयोग यासारख्या महत्त्वपूर्ण बाबी प्रशिक्षणातून शिकता आल्या. त्याचा उपयोग कार्यक्षेत्रात तर आहेच परंतु व्यक्ती म्हणून स्वतःचे जीवन समृद्ध करण्यासाठी सुद्धा हा कार्यक्रम अतिशय महत्त्वाचा आहे असे वाटते.

धन्यवाद

चंद्रकांत पांडूरंग गुरव
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिवारे,माणगाव,तालूका.शाहूवाडी जि.कोल्हापूर
ई मेल:- chandrakantgurav64@gmailcom

प्रस्तावना-

शाळेचा पट प्रतिवर्षी कमी होत जाणे ही शाळा टिकवण्याच्या दृष्टीने चिंताजनक बाब आहे. शाळेचा पट वाढविण्यासाठी शालेय व सहशालेय उपक्रम प्रभावीपणे राबवत शालेय नेतृत्व विकासा अंतर्गत अनेक प्रयत्न करण्यात आले.

केंद्रिय प्राथमिक शाळा शिवारे माणगाव ही एक ते सात इयत्ता असणारी उच्च प्राथमिक शाळा आहे. या शाळेचा पाठीमागील दहा वर्षापूर्वीचा पट सरासरी 200 च्या वर होता. परंतू परिसरामध्ये खाजगी शाळा तसेच इंग्रजी माध्यमांच्या शाळा झाल्यामुळे सदर शाळांचे प्रमाण वाढले. या शाळांच्या इमारती ,स्कूल बस,ड्रेस कोड व इतर आकर्षक बाबीमुळे सधन पालकांचा ओढा निश्चितच या शाळांकडे वाढला व मुले हळू हळू या शाळांमध्ये दाखल होवू लागली. परिणामी गावात असणाऱ्या शाळेमध्ये पट हळू हळू कमी होवू लागला .प्रत्येक वर्षी दाखलपात्र मुले व प्रत्यक्ष दाखल मुले यांच्यात मोठया प्रमाणात तफावत आढळून यायला लागली . ही बाब चिंताजनक होती शाळेचा पट आता 200 च्या आत आला होता. ही अशीच परिस्थिती सुरू राहिली तर गावातील जिल्हा परिषद शाळा टिकवणे अवघड होऊन बसेल अशी परिस्थिती निर्माण झाली . या शाळेची पटसंख्या वाढवण्याच्या दृष्टीने आपणास काय करता येईल या संदर्भात प्रथमत: शाळेतील सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांची मा.केंद्रप्रमुख साहेबांच्या मार्गदर्शनाखाली सहविचार सभा घेतली. शिक्षक त्यामध्ये शाळेचा गुणात्मक दर्जा चांगला आहे पण खाजगी शाळेमध्ये जसे विविध उपक्रम राबविले जातात त्या मध्ये आपण कोठेतरी कमी पडतोय ही बाब समोर आली .निव्वळ बौद्धिक क्षेत्रात प्रगती म्हणजे परिपूर्ण शिक्षण नव्हे. विद्यार्थ्यांचा शारिरीक, मानसिक आणि भावनिक या तिन्ही अंगाने विकास झाला पाहिजे त्या दृष्टीने शालेय ,सहशालेय उपक्रम राबविले तरच विद्यार्थी पटसंख्या वाढेल हा विचार पुढे आला.यादृष्टीने पुन्हा शाळेचे मुख्याध्यापक , ,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य,पदाधिकारी, पालक यांची सहविचार सभा घेतली त्या मध्ये सर्वानुमते शाळेचा पट वाढवण्यासाठी सहकार्य करावयाचे ठरले.त्या दृष्टीने कालबध्द ,माहेवार शालेय व सहशालेय उपक्रम राबविण्याचे ठरले.

प्रथमत फेब्रुवारी मध्ये पटनोंदणी सर्वेक्षण करण्यात आले. प्रत्येक शिक्षकांनी प्रभाग वाटून घेतले .प्रत्येक दाखलपात्र मुलाच्या पालकांची भेट घेवून आपल्या शाळेचे महत्व पटवून दिले.शिक्षकांनी व शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांनी शाळेबाबत विश्वास निर्माण केला. जिल्हा परिषद शाळेविषयी पालकांचा दृष्टीकोन बदलण्यात काही अंशी शिक्षक व सदस्य यशस्वी झाले .गुढी पाडव्याच्या दिवशी दाखल पात्र सर्व मुले शाळेत दाखल करून घेतली आणि **"गुढी पाडवा प्रवेश वाढवा"** या उपक्रमात शाळा यशस्वी झाली .त्या पुढे नियोजनानुसार शाळेत विविध सह शालेय उपक्रमांचे आयोजन कार्यवाही सुरू झाली.

शाळेत राबविलेले विशेष उपक्रम –

नवागतांचे स्वागत –

प्रत्येक वर्षी शाळेत नवागतांचे स्वागत केले जाते.पण या वेळेस वेगळ्या पध्दतीने नवागतांचे स्वागत करावयाचे ठरले .त्या दृष्टीने अगोदरच्या दिवशी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरी जावून शिक्षकांची ओळख करून दिली.दुसऱ्या दिवशी शिवारे गावातील तरूण मंडळाने झांजपथकासह सहभागी व्हायचे ठरवले व ठीक सकाळी आठ वाजता दाखलपात्र विद्यार्थ्यांचे मिरवणूकीने शाळेत स्वागत केले यावेळी शालेय परिसर सजविण्यात आला गुलाबपुष्पे देवून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले मान्यवरांच्या हस्ते पुस्तके वाटप करण्यात आली त्याच बरोबर मुलांना गोड खाऊचे वाटप करण्यात आले या दिवशी 100%मुले शाळेत आली ती ही आनंदाने आणि उत्साहाने.पहिल्याच दिवशी आम्ही दाखलपात्र मुलांना शाळेत आणण्यात यशस्वी झालो.

गणवेश वाटप -

शासनामार्फत अनुसुचित जाती ,जमाती ,बीपीएल मुले व सर्व मुली यांना दरवर्षी गणवेश दिला जातो परंतू इतर मुलांना गणवेश वाटपाचा लाभ मिळत नव्हता .या कामी गावातील दानशूर व्यक्तींची मदत घेवून अपात्र लाभार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले त्यामुळे शाळेत सर्वांना मोफत गणवेश दिला जातो ही बातमी गावात समजल्यामुळे पट संख्या वाढू लागली.

मोफत ओळखपत्र वाटप -

खाजगी शाळेमध्ये ज्या प्रमाणे मुले ओळखपत्राचा वापर करतात त्याचप्रमाणे आपल्या शाळेतील मुलाना सुध्दा ओळखपत्र असावे या साठी गावातील फोटोग्राफर श्री.पोतदार यांनी स्वत: आपल्या जवळचे 5000 रुपये खर्च करून सर्व मुलांना व शिक्षकांना ओळखपत्रे तयार करून दिली व मुले ओळखपत्र परिधान करून रूबाबात शाळेत येवू लागली.

संगीत शिक्षण -

अभ्यासाबरोबरच मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा हा दृष्टीकोन ठेवून शाळेत गायन वादन याकडे विशेष लक्ष देण्यात आले .मुला मुलींचा नियमित संगीत शिक्षणाचा तास शाळेचे संगीत शिक्षक श्री.सुतार यांनी सुरू केला .याचाच परिणाम म्हणून शाळेतील मुले केंद्र स्तर तालुका स्तर गायन स्पर्धेत चमकू लागली.

क्रीडा स्पर्धा -

चार रविवार शाळेसाठी हा एक नवीन उपक्रम शाळेमध्ये शिक्षकांनी घ्यायचे ठरवले. आक्टोंबर महिन्यातील चार रविवारी शाळेत सर्व क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या या मध्ये वैयक्तिक व सांघिक स्पर्धांचा समावेश होता. विशेष बाब म्हणजे या वर्षी प्रथमच मुलींच्या कुस्ती स्पर्धेसाठी विशेष प्रयत्न केले गेले. सुरुवातीला फक्त एक मुलगी तयार झाली .पालकांचे उद्बोधन केल्याने बघता बघता १२ मुली कुस्ती प्रकारात सध्या तयारी करत आहेत,तालुका स्पर्धेत शाळेने कुस्ती प्रकारात सर्वसाधारण विजेते पद मिळवले आहे.

चिखल डे -

विद्यार्थ्यांनी स्वानुभावातून शिक्षण घ्यावे तसेच त्यांना स्वनिर्मितीचा आनंद मिळावा या साठी शाळेत चिखल डे साजरा करण्यात आला .मुलांची वर्गवार रचना करून त्यांना माती पुरविण्यात आली तसेच त्यांना त्यांच्या इच्छेनुसार वस्तू बनविण्यास सांगण्यात आले.मुलांनी अगदी रस घेवून अत्यंत सुबक अशा मातीच्या वस्तू बनविल्या.या उपक्रमामुळे मुलांच्या सृजनतशिलतेला चालना मिळाली.

रक्त् व हिमोग्लोबन तपासणी -

विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम असेल तरच मन सुदृढ राहील .त्यासाठी विशेषत: मुलींच्या आरोग्याकडे विशेष् लक्ष् देण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत ५ वी ते ७ वी च्या सर्व विद्यार्थीनींची हिमोग्लोबीन तपासणी करून त्यांच्या आरोग्याची परिपूर्ण् काळजी घेण्यासाठी तालुक्यात प्रथमच हा उपक्रम शाळा स्तरावर राबविला व मुलींना त्यांच्या आरोग्याबाबत जागरुक केले .

आदर्श निवडणूक पध्दत राबविणे -

शाळेने शाळेच्या जनरल सेक्रेटरी पदासाठी आदर्श गुप्त मतदान पध्दती राबवली .या मध्ये उमेदवाराने फॉर्म भरणे ,माघार घेणे,चिन्ह मिळवणे ,प्रचार करणे ,त्याचबरोबर निवडणूक यंत्रणेतील केंद्राध्यक्ष ,मतदान अधिकारी,कर्मचारी, पोलीस यंत्रणा या कामांसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देवून ज्या प्रमाणे सार्वत्रिक निवडणूक होते त्या प्रमाणे सेक्रेटरी पदाची निवडणूक घेतली. सर्व विद्यार्थ्यांनी निवडणूक प्रक्रियेविषयी स्वत: माहिती मिळवली .

दिव्यांगांना शैक्षणिक मदत मिळवूण देणे -

शाळेमध्ये इयत्ता सहावीच्या वर्गात शिक्षण घेणारी कुमारी वैष्णवी साठे ही दिव्यांग मुलगी. जिला तिच्या दिव्यांग पणामुळे कोणत्याही उपक्रमात भाग घेता येत नव्हता. या मुलीला अपंग संस्थेमार्फत जयपूर फूट मिळवून दिला .आज ती सामान्य मुली प्रमाणे सर्व उपक्रमात भाग घेत आहे. तिचा आत्मविश्वास वाढीस लावण्याचे काम या उपक्रमामुळे झाले याचा आनंद सर्व शिक्षक व पालकांना होत आहे .

या सर्व उपक्रमांमुळे शाळे बद्दल पालकांचे मत हळू हळू बदलू लागले .गावची शाळा आपल्या मुलांचा शैक्षणिक ,सामाजिक, भावनिक .शारिरीक अशा सर्व प्रकारच्या विकासात योगदान देते आहे. त्यामुळे यापुढे मुले गावातीलच शाळेमध्ये पाठवायची असा निश्चय पालकांनी केला. ज्या गोष्टी आपणास खाजगी शाळेत पैसे भ्रूनही मिळत नव्हत्या त्या गोष्टी आपणास आता अगदी मोफत मिळत आहेत. त्यामुळे यापुढे आमची मुले दर्जेदार शिक्षण देणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळेतच पाठवणार असा निर्धार पालकांनी केला.या सर्वांचा परिणाम म्हणून शाळेचा पट 180 वरून एकाच वर्षात 226 इतका झाला.हे याचेच यश म्हणावे लागेल.

अशा प्रकारे संघ बांधणीतून शाळेची पर्यायाने विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली.

धन्यवाद

विनीत बंडू पद्मवार
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोयनागुडा,तालुका भामरागड,जिल्हा गडचिरोली
ईमेल आयडी - padmavarvinit@gmail.com

जानेवारी २०१७ मध्ये श्री विनीत बंडू पद्मवार यांना नोकरीचा आदेश मिळाला. यवतमाळचे मूळ रहिवासी असणारे विनीत सर नोकरी लागल्याने आनंदी तर झाले पण शाळा मिळाली गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेजूर. शाळेचे नाव ऐकल्यावर त्यांना चिंता वाटू लागली. गडचिरोली मधील भामरागड तालुक्याचे नाव ऐकताच मनात पहिल्यांदा निर्माण होते ती भीती, पोलीस व नक्षलवादी यांच्या चकमकी व अतिदुर्गम आदिवासी भाग. पण शिक्षक होण्याचे स्वप्न पाहिले होते त्यामुळे आहे त्या परिस्थितीत नोकरी स्विकारायची असा निर्धार करून विनीत सर मुख्याध्यापकांसोबत जावून शाळेवर रुजू झाले.

एका खोलीवर शाळेच्या नावाची पाटी लावली होती म्हणून त्या पडक्या इमारतीला शाळा म्हणायचे. शाळेत एकही विद्यार्थी उपस्थित नव्हता.सर्व शेतीच्या कामासाठी किंवा जंगलात गेले असतील असे मुख्याध्यापकांनी सांगितले. शाळेत गेलेले विनीत सर शाळेच्या पहिल्या दिवशीच व्यथित मनाने काहीच न शिकविता वापस आले. पण दुसऱ्या दिवसापासून परिस्थितीत बदल करायचा हा विचार पक्का करून विनीत सर दुसऱ्या दिवशीच्या तयारीला लागले.

नऊ किलोमीटर सायकलने प्रवास करून दुसऱ्या दिवशी ते शाळेत पोहचले. नऊ वर्षे त्यांनी असाच सायकलने प्रवास केला. शाळेची घंटा वाजविली पण एकही विद्यार्थी फिरकला नाही. गावातील भाषा माडिया गोंड त्यामुळे सर गावात कोणासोबत बोलूही शकत नव्हते. शेवटी मराठी थोडंफार समजू शकणारा आणि बोलू

शकणारा एक युवक सरांना भेटला त्याच्या मदतीने सरांनी पालकांशी संपर्क सुरु केला. जिथे जिथे शक्य होईल तिथे तिथे ते पालकांना भेटायला गेले आणि त्यांच्या प्रयत्नाला थोडेसे यश मिळाले आणि दहा बारा मुले दुसऱ्या दिवशी शाळेत आली आणि त्या दिवशीपासून खऱ्या अर्थाने शाळा सुरु झाली.

हळूहळू मुले शाळेत यायला लागली खेळण्याच्या, विविध कृतींच्या माध्यमातून जमू लागली, रमू लागली. पहिले सत्र या मुलांना शाळेत नियमित आणणे व दिवसभर शाळेत टिकवणे यातच संपले. दुसऱ्या सत्रापासून शाळा नियमित भरायला लागली. त्यासाठी वारंवार पालक भेटी घेणे, शेतावर जाणे इत्यादी कामे सातत्याने करावी लागत होती. २०१२ मध्ये त्यांच्याकडे मुख्याध्यापकांचा पदभार आला व तिथूनच नेतृत्व करण्याची संधी त्यांना मिळाली. या मुलांना शाळेत टिकविण्यासाठी काय काय करायला हवे याचा अभ्यास आता सरांचा झाला होता. पालकांच्या व मुलांच्या प्राथमिक गरजा ओळखून त्यांनी नियोजनपूर्वक पावले उचलायला सुरुवात केली.

शालेय पोषण आहाराचा दर्जा सुधारला, भाजीपाल्याचा वापर पोषण आहारात नियमितपणे मुलांना द्यायला लागले. गणवेषाचा पण दर्जा चांगला ठेवला. शाळा हळूहळू नियमित होऊ लागली व मुले शिकू लागली. २०१५ मध्ये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम सुरू झाला. या कार्यक्रमांतर्गत विनीत सरांनी अनेक उपक्रम सुरु केले. २ऑक्टोबर २०१५रोजी शाळेमध्ये गावकऱ्यांची सभा घेऊन आपली शाळा लोकसहभागाच्या माध्यमातून डिजिटल करण्याचा प्रस्ताव त्यांनी सर्व गावकऱ्यांच्या समोर मांडला. अपेक्षित खर्च एक लाखाहून अधिक असल्याने गावकऱ्यांसाठी अशक्य होते. कारण गावातून प्रति कुटुंब जरी रक्कम गोळा केली तरीही पाच

ते दहा हजार रुपयांच्या वर रक्कम गोळा होणार नाही याची सर्वांना खात्री होती. तरीपण प्रयत्न करायचे ठरवले व त्याप्रमाणे सगळे जण कामाला लागले, परंतु रक्कम कोणीही देत नव्हते.

२६ जानेवारी २०१६ चा दिवस शाळेच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा ठरला त्या दिवशी प्रकल्प कार्यालय भामरागड येथे सांस्कृतिक कार्यक्रमात सरांनी उपस्थित असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना शाळेला मदत करण्यासाठी आवाहन केले लगेच प्रकल्प अधिकारी यांनी पाच हजार रुपये दिले व तेथे उपस्थित पालक, व्यापारी यांनीही एक ते दोन हजार रुपये दिले व हळूहळू रक्कम जमा होऊ लागली. लोकबिरादरी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या बक्षिसांची रक्कम रुपये पंधराशे शाळेला दिली. भामरागड येथील सर्व पोलीस स्टेशन, व्यापारी पण मदत करू लागले. या सर्वांची दखल तत्कालीन शिक्षण आयुक्त डॉक्टर पुरुषोत्तम भापकर साहेबांनी घेतली व १६ मार्च २०१६ रोजी गडचिरोली येथील शिक्षण परिषदेत त्यांनी विनीत सरांना सादरीकरण करण्याची संधी दिली व स्वतः तब्बल २० हजार रुपये मदत म्हणून दिले.



शिक्षण आयुक्त डॉक्टर पुरुषोत्तम भापकर यांचेमार्फत शाळेस मदत

सरांच्या प्रयत्नांची यशोगाथा त्यांनी त्यांच्या गुणवत्तेचे शिलेदार या पुस्तकात मध्ये मांडलेली आहे.



नवनिर्माणाचा सारथी
विनीत पद्मावार

गडचिरोली या जिल्ह्याचे नाव जरी उच्चारले, तरी आपल्यासमोर जी प्रतिमा उभी राहते ती म्हणजे नक्षलवादी भाग, तेथील घनदाट जंगल आणि त्यातल्या त्यात भामरागड तालुका हे नाव समोर आले की, अंगाचा थरकाप उडतो. सातत्याने या तालुक्यात पोलीस नक्षलवादी दरम्यान होणाऱ्या चकमकींच्या बातम्या आपण फक्त वर्तमानपत्रात वाचतो. मात्र, नक्षलवादाप्रमाणेच इतरही बाबतिकाणी काही चांगले आहे, ते म्हणजे हळूहळू भामरागडमध्ये प्राथमिक शिक्षणाचा पाया भक्कम करण्याचा प्रयत्न केला जातोय, याच नवनिर्माणाचा एक सारथी विनीत पद्मावार यांच्या नक्षलग्रस्त भागातील पहिल्या डिजिटल शाळेचा व गावबदलाचा आढावा आपण या लेखाद्वारे घेणार आहोत...

राज्याची निर्मिती झाल्यापासून कायम नक्षलग्रस्त अशी ओळख असलेल्या भामरागड तालुक्याच्या विकासाची वानवा. वर्षातील सहा महिने अध्र्याहून अधिक गावांचा संपर्क पाण्यामुळे तुटलेला. दहा-पाच गावे जर सोडली, तर कुठल्याच पायाभूत सुविधा चाळिशीनी उपलब्ध नाहीत. सोयतच नोकरी करायची म्हणजे कायम मृत्यूच्या छायेत म्हणजेच नक्षलवादी कधी हल्ला करतील सांगता येत नाही. मात्र, पाच टक्क्यांनी बदल करावा, असे एका महिला सटशिक्षणाधिकारी अधिकारी सोनवणे यांना वाटले व स्वत:तून मागील वर्षी भामरागड पंचायत समिती मागून घेतली. एका वर्षात तालुक्यातील ८० टक्के शाळा पायपीट करून शिक्षकांना या भागातील मुलांना शिक्षण द्यावे लागेल व त्यासाठी लागणारा आत्मविश्वास निर्माण केला आणि आज भामरागडमध्ये छोटी छोटी शिक्षणाची बेटं तयार व्हायला लागलीत, त्यातील विनीत यांचे बेजूर हे एक बेट.



मूळचे पंचलमाळ जिल्ह्यातील असलेले विनीत यांना जानेवारी २००७ साली गडचिरोली जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण सेवक म्हणून आदेश मिळाला. एकीकडे नोकरी लागल्याचा आनंद, तर दुसरीकडे कायम मृत्यूशी झुंज द्यावी लागणार, ही भीतीही मनात होतीच. मात्र, आईवडिलांनी लहानपणापासून सांगितले होते की, कुठलेही काम प्रामाणिक हेतू ठेवून केल्यास त्याला कुणाचाच विरोध होत नाही, हेच सूत्र मनाशी पक्के बांधून ते गडचिरोलीला आले. कुठला तालुका भेटतोय याचा विचार करत असतानाच हातात पंचायत समिती भामरागड असा आदेश पडला आणि होते नव्हते ते अवसान निघून गेले, असे त्यांना वाटले. भामरागड म्हणजे अतिदुर्गम भाग, चारही बाजूला घनदाट जंगल, आदिवासी लोक, भाषेची सर्वात मोठी अडचण, असे प्रश्न साठ किलोमीटरच्या गडचिरोली ते भामरागड प्रवासादरम्यान डोळ्यासमोर उभे ठाकले.

भामरागडच्या बसस्थानकावर कंडक्टर उतरा म्हणाले आणि विनीतचे डोळे बसस्टँड कोठे आहे, हे शोधत होते. एकाने सांगितले की, हेच तालुक्याचे ठिकाण व हे बसस्थानक, बसस्थानक म्हणजे रस्ताच. काही दिवसांवर तालुक्यापासून दहा किलोमीटर दूरवरचे 'बेजूर' हे आदिवासी गाव मिळाले. गाव जसं यरं होतं, मात्र ये-जा करण्यासाठी नाला ही मोठी अडचण होती. मुख्याध्यापिकांकडे रुजू झाल्यानंतर त्यांनी सांगितले, सर दररोज शाळेवर जाण्याची काहीच गरज नाही, कारण मुलांच शाळेत येत नाहीत. येणारही कशी माडीया ही बोलीभाषा असणाऱ्या या गावातील मुलांना प्रमाण मराठी भाषा काय समजणार. आदिवासी मुलांच्या न शिकण्यामागच्या कारणांचा शोध घेतल्यास भाषा ही सर्वात मोठी अडचण वाटते आणि अजूनही आपल्याला ती सोडवावी वाटत नाही, हे वास्तव आहे. असो दुसऱ्या दिवशी पासपोर्ट करून गावात पोलीसबंदोबस्तात पोचले, तर गरिबी, पाच पन्नास घरांचं एक छोटसं गाव. कौलारू घर दिसत होती. कित्येक दिवसांपासून बंद असलेली कौलारू शाळेची इमारत उघडली आणि आत पोचले, तर मुलेचिजी उंदीर, सिमेंटची पोती, कचरा, वाळू, लोखंड पडलेले दिसले. कारण, काम तर नवीन खोली बांधकाम चालू होते. विरस, निरव्याही वातावरण बघून आपण पैसे देऊन शाळा बंद पाडतोय ग्याकी, असा विचार विनीत यांच्या मनात आला. मात्र तसे न करता पाच टिकाणी पडत पडावका त्याने ठरविले व नवनिर्मीयाचा सारथी झाले.

१९९३ साली शिक्षणाची गंगोडी पोहोचलेल्या या गावात आपल्या नोकरीच्या तिसऱ्या दिवशी ज्यांच्याकडे जेवायची मेस लावली होती, त्यांचा सावकल मावितली व विनीत शाळेवर गेले. स्वत: पंटा चाजकली. एका तासाभागनंतर चार-पाच मुले शाळेकडे फिरकताना दिसली. त्यांना त्यांचे नाव विचारले असता ते पळून गेले. याचं कारण त्यांना मी बोललेली भाषा कळत नकती, असे विनीतला वाटले आणि तेच खरे कारण होते. या गावात जर वाटल करायचाचा असेल, तर आपल्याला या लोकांची भाषा शिकावी लागेल, ही गुणगाठ मनाशी पक्की बांधून विनीत गाव फिरायला निघाले. फिरताना गावातील एक तरुण डी.एड. झालेला आहे, अशी माहिती त्यांना मिळाली, लगेचच त्याची भेट घेऊन थोडिक दुवा साधून तू शाळेला मदत करावी, असे ठरले. लगेचच गावातील दहा-पंधरा लोकांना भेटून मी तुमच्या गावातील नवीन सुरुजी असून मी दररोज शाळेत येणार आहे. त्यामुळे तुमची मुले आता दररोज शाळेत पाठवा, अशी विनंती केली. पालकांनीही मान्य चांगला प्रतिसाद देत १६ मुलांपैकी १० मुले दुसऱ्या दिवशी शाळेत पाठविली.

असं करता करता उन्हाळे सुद्धा लागल्या, परत जूनमध्ये मजाची पालमेल सुरू झाली. खरोखरंच ही मुलं शाळेत येतील का? वसतील का? शिकतील का? असे प्रश्न त्यांच्यासमोर उभे राहिले. कायम सकारात्मक विचार करणाऱ्या विनीतला यश मिळायला लागले. जूनमध्ये ५० टक्के मुले शाळेत येऊ लागली. जंगलात शिकरीसाठी फत्यांच्या मागे त्यांच्याच गतीने फिरणारी ही मुले एक तासाही एका जागी स्थिर बसणार नाहीत, ही खंत लक्षात घेऊन खेळण्या माध्यमातून दिवसभर केवळ शाळेच्या परिसरात या मुलांना सर्वांगाचे तरविले. बघा महिने असे केल्यानंतर या मुलांच्या मनातून शाळा व शिक्षक यांची भीती निघून गेली होती. आता ही दररोज न चुकता सरांची वाट पाहत रस्त्यावर येऊन बसू लागली. आता या मुलांना काय व कसे शिकवावे, असा प्रश्न परत आव्हानम उभा होता. वेगवेगळी प्रशिक्षणे, लोकविगदरीमधील काही प्रशिक्षणे याचा आधार घेऊन या मुलांना छेटछा छेटछा कृतीतून शिकायचंचे त्यांनी ठरविले. मुलांना या कृती खूप आवडू लागल्या. आता विनीत यांनाही माडीभा भाषा थोडीफार येऊ लागली व ते मुलांना मराठीचे माडीचा धर्मचे रूपांतर करून शिकवू लागले. दरम्यान सावकलचरचा प्रवास, मात्र एक दिवस पावसामुळे नाल्याला पूर आला आणि या पुरातून सावकल पेऊन शाळेकडे जाताना सावकल व विनीत पाण्यात वाहून गेले. मात्र, काही आदिवासी बांधवांनी त्यांना वाचविले. मात्र, मुलांसाठी आपण काहीतरी करू, असा निर्धार मनाशी पक्का झाला होता.



लोकविगदरी प्रकल्पात रामदेव माळी व प्रतिभा भराडे यांची रचनाकाद्वार आधारित कार्यशाळा होती व तिथे विनीत गेले असता आपलीही आपली शाळा रचनावादी व डिजिटल करावी, असा विचार मनात आला व तो कृतीत उतरविण्याचे ठरविले. मात्र, केवळ लोकसहभागाचा आधार घेऊनच शाळा डिजिटल करायचं, असे शिक्षण विभागाला वाटत असताना आपणही थोडाफार हिस्सा उचलावा, असे अजूनही या विचारात का वाटत नाही, याचा मला प्रश्न पडतो. समाज एक पाऊल पुढे येतोय, तर शिक्षकवर्गाने एक पाऊल मागे जावोय, लोकसहभागाच्या प्रमाणावर शासन सहाय्य असावा, असे मला वाटते.

अहराविरुद्ध प्रतिरूप भोगण्याऱ्या या आदिवासी बेजूर वाचत लोकसहभागातून नक्षलग्रस्त भागातील पहिली डिजिटल शाळा कशी उभारायची, या चिंतेने विनीत यांची झोप उडाली. इथला तेथे मार्ग व उकीप्रमाणे कामाची सुरुवात तर करूयात, असे मनात ठरविले. गावातील दहा-पाच लोकांना यांचयची महिती दिली. बजेट किती लागेल, असे काही जणांनी विचारले असता एक लाख रुपये लागतील, असे विनीतने सांगितल्यावर गावकरी हकबके. धाचायी शेती व उनाड्यात मोठ वेळ करून उपजीविका करणारी गावकरी मंडळींनी कधी दहा हजारांचा आकडाही ऐकला नव्हता. त्यांनी सांगितले, गुरुजी आम्ही दोनशे रुपये प्रत्येकजण देऊन्यात, असे करून दहा हजार रुपये जमा झाले.

याकीच्या पैशाचे काय करायचे, हे त्यांना समजेना. असाअेवढे २६ जानेवारी रोजी प्रकल्प कार्यालयात तालुकास्तरीय सांस्कृतिक स्पर्धा असतात व तेथे खूप सारे अधिकारी व पदाधिकारी जमा होतात, आपण तिथेच ही संकल्पना मांडायची, असे त्यांनी ठरविले. खरी कमाई या उपक्रमांतर्गत जाळेतील मुलांचा नाण्टयाच स्टॉल लावला व्हायला दीड हजार रुपये कमाई झाली. उपस्थितांसमोर हा डिजिटल शाळेचा प्रस्ताव मांडला आणि लगेचच उपविभागीय अधिकारी संदीप वाघीत यांनी पाच हजार, तर प्रतिष्ठित नागरिकांनी दोन हजार रुपये दिले. मग त्यांनी ठरविले की, प्रत्येक पोलीस स्टेशनवर जाऊन तेथून डिजिटलसाठी वरगणी जमा करायची, मात्र पोलिसांसोबत चांगले चालले किंवा म्हणणे नक्षलवाद्यांना खपत नाही व त्यातूनच आपल्याला ते ठार मारतील, याची भीतीही त्यांच्या मनात होतीच. भामरागडमधील प्रत्येक पोलीस स्टेशनमधून चार ते पाच हजार रुपये जमा केले, तत्कालीन शिक्षण आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांनी स्वत: वीस हजार रुपये, लोकविगदरी प्रकल्पाचे संचालक अनिकेत आमटे यांनी २१ हजार रुपये देऊन ही शाळा ३० एप्रिल २०१६ रोजी डिजिटल झाली.



आजपर्यंतचा जागतिक स्तराचर टिते जाण्ये तंत्रज्ञानिर्भीत शिक्षण या आदिवासी गावातील मुलेही मोठ्या आनंदाने घेत आहेत. आज मुले नियमित टापटिप शाळेत येतात. याचा आनंद पालकांच्या व शिक्षकांच्या चेहऱ्यावर नक्कीच झळकतोय. खरोखर आपल्याला नक्षलवाद्यापासून मुक्ती हवी असेल, तर या गैरमुकल्यांना दर्जेदार शिक्षण द्या, उद्या हेच मोठे झाल्यावर नक्षलवादी न होता विकासवादी होतील!

मो. नं. ९७६३५२१०९४

त्यानंतर लोकबिरादरी प्रकल्प हेमलकसा यांनीही एकवीस हजार रुपये दिले. शेवटी ३० एप्रिल २०१६ ला एक लाखाहून अधिक रकमेतून जिल्ह्यातील पहिली डिजिटल इंटरॅक्टिव्ह शाळा तयार झाली याची दखल माननीय शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी घेतली. २६ जून २०१६ शाळेच्या पहिल्या दिवशी त्यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग साठी माननीय जिल्हाधिकारी कार्यालयात पालक, विद्यार्थी व शिक्षक यांना आमंत्रित केले.



अशाप्रकारे बंद असलेल्या शाळेत आता अभ्यास दौऱ्याकरिता बाहेरील तालुक्यातून शिक्षक-पालक येऊ लागले. ५०० पेक्षा अधिक लोकांनी थोड्याच दिवसात शाळेला भेटी दिल्या. जी मुले नाव लिहित नव्हती ती आता कविता तयार करू लागली. मराठीत गोष्ट लिहू लागली.

परंतु २०१८ मध्ये ऑनलाईन बदल्यात मध्ये अचानकपणे त्यांना शाळा सोडावी लागली. २०१८ पासून आता नवीन शाळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोयनागुडा येथील त्यांचा प्रवास सुरू झाला. या शाळेत रुजू झाल्यावर शाळा आहे की गोठा हेच समजायला मार्ग नव्हता. सकाळी शाळेत मुलं आली की पहिल्यांदा शेण उचलायचे काम करत होते. शाळेला षटकोनी इमारत होती पण तीही गळत होती. त्याचे तुकडे पडत होते.

मुलेही नियमित शाळेत येत नव्हती. गावात जातांना मोठा नाला लागत होता पावसाळ्यात कधी कधी डोंग्याने जावे लागत होते. कधी जास्त पावसामुळे जाताही येत नव्हते एकदा तर नाला पार करीत असतांना विनीत सर वाहून जात होते गावकरी जवळ होते त्यांनी त्यांना वाहून जाण्यापासून वाचविले.

येथे पुन्हा नवीन आव्हाने आली व त्यांनी ती न कुरकुरता स्विकारली. पहिल्यांदा पालक सभा घेतली. लोकांना शिक्षणाचे महत्व, शाळेत विद्यार्थ्यांना नियमित पाठविण्याचे महत्व पटवून दिले. चांगल्या शाळेची गरज. त्यांचे त्यासाठी लागणारे योगदान पालकांना समजावून दिले. लोकांनी दुसऱ्या दिवशी लगेच स्वतः जंगलातून बांबू आणून शाळेला कंपाउंड करून दिले. आधीच्या शाळेत चांगलं काम केल्याचा फायदा येथे झाला लोकांना सरांबद्दल आधीच माहिती होती. त्यामुळे त्यांनी पहिल्या दिवसापासूनच सहकार्य करायला सुरुवात केली. शाळेमध्ये विद्यार्थ्यांना आवड निर्माण व्हायला हवी यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवायला सुरुवात केली. यामध्ये दप्तर मुक्त शनिवार, पाढे पाठांतर स्पर्धा, विद्यार्थी प्रस्थान उपयोजना, क्षेत्र भेटी, संघटन प्रशिक्षण, अभ्यास वाचन इत्यादी उपक्रमामुळे मुलांमध्ये खूपच बदल झाला सुरुवातीला १०-१२ पर्यंतचे पाढे येत असणाऱ्या मुलं आता तब्बल ५५ पर्यंतचे पाढे पाठ सहज म्हणतात. तसेच वाचनाची आवड लागली असून मागील वर्षी ग्रंथालय स्पर्धेत सायनाने प्रथम क्रमांक मिळवला, विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला याची दखल तहसीलदार माननीय कैलास यांनी घेतली व मुलांना तहसील कार्यालयाच्या कामकाजाची माहिती घेण्यासाठी खास गाडी पाठवून आमंत्रित केले.मुलांचे अतिशय उत्तमरीत्या सादरीकरण बघून तहसीलदारांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. मागील वर्षी १२ जानेवारी २०१९रोजी मुलांची गुणवत्ता व आत्मविश्वास पूर्वक बोलण्याची, उत्तरे देण्याचे कौशल्य बघण्यासाठी माननीय जिल्हाधिकारी शेखर सिंह यांनी शाळेला अचानक भेट दिली. मुलांची गुणवत्ता पाहून जिल्हाधिकारी सर खूप खूश झाले व त्यांनी मुलांना नागपूर सहलीसाठी ४८,००० रुपये दिले. शाळेने

पालकांच्या मदतीने परसबाग तयार केली आहे, त्यामध्ये वांगी, मिरची, टमाटर इत्यादी भाज्यांची लागवड होते. याचा वापर शालेय पोषण आहारात केला जातो. गावकऱ्यांनी स्वतः वर्गणी गोळा करून शाळेला दहा खुर्च्या भेट म्हणून दिल्या आहेत तर नागपूर येथील रोटरी क्लबचे सदस्य त्यांनीही भेट दिलेली आहे.



शाळेला आता माननीय शिक्षणाधिकारी, डायट प्राचार्य व सदस्य, वरिष्ठ अधिकारी नियमित भेटी देतात. नोव्हेंबरमध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील ५० शिक्षकांनी पण अभ्यास दौऱ्यादरम्यान शाळेला भेट दिली. ही शाळा गुणवत्तेमध्ये कोठेही मागे नव्हती परंतु भौतिक सुविधांच्या बाबतीत अजूनही शाळा मागे होती. प्रशासनाला पत्र देऊनही मदत मिळत नव्हती. एके दिवशी कोयनागुडा येथील प्रतिष्ठित नागरिकांनी संपूर्ण शहर दुरुस्ती त्यामध्ये पेंटिंग बसवणे, बगीच्या, शौचालय, लाईट दुरुस्ती व फिटिंग, गावातील अंगणवाडी पेंटिंग इत्यादी कामे श्रमदानातून

करून दिले,त्या वर्षी नूतनीकरण झाल्यानंतर शाळेचे उद्घाटन अठरा आय. ए. एस. अधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. माननीय जिल्हाधिकारी यांनी या आय. ए. एस. अधिकाऱ्यांना शाळा बघण्यासाठी विशेष करून आमंत्रित केले होते.



लोकमत

भामरागड तालुक्याला भेट : आदिवासी संस्कृती, प्रथा, परंपरांची जाणली माहिती

१८ आयएएस प्रशिक्षणार्थ्यांची भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

भामरागड : १८ आयएएस प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांनी भामरागड तालुक्याला भेट देऊन या तालुक्यातील आदिवासी संस्कृती, समस्या जाणून घेतल्या. तसेच विविध विभागांना भेटी देऊन कामकाजाची माहिती जाणून घेतली.

प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांनी सर्वप्रथम हेमलकसा येथील लोकबिरादरी प्रकल्पाला भेट देऊन ज्येष्ठ समाजसेवक डॉ.प्रकाश आमटे व डॉ.मंदाकिनी आमटे यांच्यासोबत चर्चा केली. आदिवासी संस्कृती व त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी या अधिकाऱ्यांनी कोपनगुडा या आदिवासी गावाला भेट दिली. जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्याच्या माध्यमातून अधिकाऱ्यांचे स्वागत केले. गायकऱ्यांशी संवाद साधून संस्कृती, शेती, शेती व्यवसाय, उत्पादन, हवामान, आरोग्य विषयी जाणून घेतले. आदिवासी प्रकल्प अधिकारी मनूज जिंदाल हे प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांसोबत कोपनगुडा येथे गेले होते. तेथील विद्यार्थ्यांशी चर्चा केली. कोपनगुडा येथील नागरिकांनी श्रमदानातून जिल्हा परिषद शाळेचे नूतनीकरण केले. महिनाभर श्रमदान करून शाळेची डागडुजी करण्यात आली. प्रशिक्षणार्थ्यांनी विविध स्थळांना भेटी दिल्या. यावेळी त्यांच्यासोबत आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी मनूज जिंदाल, तहसीलदार कैलास अंडील, एसडीपीओ डॉ.कुणाल सोनवाने, बीडीओ स्वप्नील वगदूम हजर होते.

कोपनगुडा गावाला भेट दिल्यानंतर नागरिकांशी संवाद साधताना अधिकारी.

देवराई आर्ट व्हिलेज प्रशिक्षण केंद्राला भेट

- आदिवासी संस्कृतीवर आधारित बांबू, लाकूड व इतर धातू वापरापासून तयार करण्यात आलेल्या भामरागड येथील आकर्षक वास्तू देवराई आर्ट व्हिलेज प्रशिक्षण केंद्राला भेट दिली. या प्रशिक्षण केंद्रात आदिवासींच्या संस्कृतीशी संबंधित अनेक वस्तू ठेवण्यात आल्या आहेत. या सर्व वस्तूंची पाहणी केल्यानंतर प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांनी प्रशंसा केली.
- भामरागड हा जिल्ह्यातील सर्वात दुर्गम, घनदाट जंगलाने व्यापलेला तालुका आहे. या तालुक्यातील बहुतांश गावांमधील आदिवासी अजूनही पारंपरिक पद्धतीनेच आपले दैनंदिन व्यवहार पार पाडतात. येथील गरीबी व आदिवासी संस्कृती प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांसाठी संशोधनाचा विषय ठरू शकते.

Hello Gadchiroli
Page No. 4 Jan 24, 2020
Powered by: erelego.com

माननीय बाबा आमटे यांचा लोकबिरादरी प्रकल्प हेमलकसा येथेच आहे. त्यांनीही दुरुस्ती पेंटिंग व लाईट फिटिंग करून दिली .उन्हाळ्यामध्ये ही शाळा सुरू असते या दरम्यान गावातील बांबू कला जोपासली जाते. सर्व विद्यार्थ्यांना उन्हाळ्यात बांबू करण्याचे प्रशिक्षण दिले जाते तर लोक बिरादरी प्रकल्प हेमलकसा यांच्याकडून उन्हाळ्यात सर्व विद्यार्थ्यांना दोन तासाचे संगणक प्रशिक्षण दिले जाते ,त्यामुळे आमची शाळा बाराही महिने भरते. माननीय तहसीलदार यांनी शाळेला स्मार्ट TV तसेच एक संगणकही दिलेला आहे. आजूबाजूच्या गावातील गावकरी ,तसेच शिक्षण क्षेत्रातील अधिकारी शाळेला भेट देण्यास येतात.

धन्यवाद

रमेश काशिराम जाधव

जिल्हा परिषद केंद्रशाळा पाचल नं.1 पाचल (नारकरवाडी) तालुका.राजापूर, जिल्हा. रत्नागिरी

ईमेल आयडी - pachal1@gmail.com

प्रस्तावना -

गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यामध्ये शालेय नेतृवाची भुमिका महत्वपूर्ण असते. शालेय परिवर्तन आणि कायापालट करण्यासाठी शालेय नेतृत्व प्रशासकीय व व्यवस्थापकीय जबाबदार्यांच्या पलिकडे जाऊन विविध स्वयंप्रेरित कृतीचा आणि पध्दतीचा समावेश करते. विद्यार्थ्यांची कामगिरी सुधारण्यासाठी त्यामध्ये शाळेकरिता दृष्टी (Vision) करणे व त्यानुसार नियोजन असणे यासाठी आम्ही सर्वांनी विद्यार्थी,पालक सहभागी करून घेऊन त्यांच्याबरोबर सुसंवाद राखणे याचा देखील समावेश केला. शालेय नवोपक्रमाच्या माध्यमातुन अध्ययन आणि अध्यापन प्रक्रियेत सातत्यपूर्ण सुधारणा घडवून आणण्यासाठी आम्ही नेहमी प्रयत्नशिल असतो.

शालेय विकासासंबधीची ध्येये -

शाळा प्रगती करताना खालील बाबींचा आम्ही विचार केला.

1) शालेय विकास आराखडा नियोजन व अमलबजावणी करताना समाजातील सर्व घटकांना एकत्रित करणे.
2) शाळेच्या दैनंदिन कामकाजाचे नियोजन आणि व्यवस्थापन करणे,
3) अध्ययन-अध्यापन प्रक्रियेला प्रोत्साहन देऊन सर्व घटकांचा सहभाग नोंदवणे.
4) शाळा सुधारण्याकरीता शाळेच्या विकासात्मक गरजा शोधून त्यानुसार बदलाचे किंवा परिवर्तनाचे व्यवस्थापन करणे.
5) शालेय दर्जा सुधारुन गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कटीबध्द असणे,
6) अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील शिक्षकांची कामगिरी उंचावण्यासाठी खात्रीशीर उपाययोजना आखणे.
7) शाळेतील उपलब्ध भौतिक मानवी आणि आर्थिक संसाधनाचे योग्य प्रकारे नियोजन व व्यवस्थापन करणे. या प्रकारची दृष्टी (Vision) शाळेसमोर ठेवून त्यानुसार शालेय नेतृत्वात बदलाची आणि परिवर्तनाची नांदी सुरु झाली, यासाठी खालील उपक्रम राबवण्यात आले.

विकास आराखड्यावर सुसंवादी चर्चा -

शालेय विकास आराखडा हा शालेय सुधारणेचा मुख्य गाभा आहे. यानुसार शाळा व्यवस्थापन समिती, माता-पालक संघ, विविध समित्या, शालेय विकास आराखडा तयार करून त्यावर काम सुरु केले. मागील वर्षी शालेय विकास आराखडा त्यामधील अपूर्ण बाबी व यावर्षीच्या आराखड्यातील मुख्य शिफारशी, अपूर्ण राहीलेल्या बाबीची कारणमीमांसा व सांगोपांग चर्चा करण्यात आली. योग्य बदल करण्यासाठी उपयुक्त व्यक्ती व संसाधने यांच्या वापराचे नियोजन करण्यात आले. शालेय विकास आराखड्यातील उद्दिष्टांची 100% अंमलबजावणीं करण्यासाठी शालेय नेतृत्व म्हणून शाळा व्यवस्थापन समिती जबाबदारी काय आहे? तसेच समाजातील विविध घटकांना एकत्रित करून या उदिष्टांची अमजबजावणी कशी करायची? यावर करावयाचे काम ठरवण्यात आले. प्रत्येकावर जबाबदा-यांची निश्चिती करुन त्यानुसार कामाचे नियोजन करण्यात आले.



दैनंदिन कामकाजाचे नियोजन -

दैनंदिन कामकाजाचे नियोजन आणि व्यवस्थापन हा शालेय सुधारणेचा मुख्य गाभा आहे. शाळाप्रमुख म्हणून या दैनंदिन कामकाजाचे नियोजन करण्याची जबाबदारी मुख्याध्यापकावर असते. दैनंदिन कामकाजाचे योग्य नियोजन करणे. शिक्षकांना तसंच समाजातील सर्व घटकांना त्यामध्ये सामावून घेणे हा मुख्य उद्देश असतो. यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांची सभा बोलावून त्यामध्ये दैनंदिन कामकाजाविषयी नियोजन व प्रत्येकाच्या जबाबदा-या निश्चित करण्यात आल्या. सर्व शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समितीच्या सहभागाने दैनंदिन व्यवस्थापनाचा निर्णय घेण्यात आला. यासाठी कामाची विभागणी करून

प्रत्येकास त्यांच्या कामाची वाटणी व जाबाबदारी निश्चित करण्यात आली., तसेच सर्वांनी सहकार्य केले तर यशस्वी अमलबजावणी होवू शकते हा मूलमंत्र देण्यात आला.



अध्ययन अध्यापन प्रक्रियेला प्रोत्साहन -

शिक्षणप्रक्रियेत विद्यार्थी आणि शिक्षक यांचा समन्वय व त्यांच्यामधील आंतरक्रिया शिक्षण देण्यास उपयुक्त ठरतात. या शाळेतील अध्ययन अध्यापन प्रक्रिया पाहताना खालील गोष्टींचा विचार झाला.

1. शिक्षण विद्यार्थी केंद्रित असावे. शिक्षक हा केंद्रबिंदू नसावा या तत्वावर आधारीत आहे.

2. विद्यार्थ्यांच्या गरजांचा विचार करुन अध्ययन अनुभव दिले जाते.

3. अध्ययन अध्यापन प्रभावी करण्यात वातावरण निर्मिती करण्यात आली.

4. अध्यापनात सहजता व सोपेपणा होता, विदयार्थ्यानी अध्यापनात मन रमवावे यासाठी आत्मियतेने अध्यापन होते.

5. शिक्षकांची अध्यापनाची तयारी उत्तम होती. याबरोबरच शाळेमध्ये अनोखा उपक्रम राबवला तो म्हणजे विविध विषयातील तज्ञ पालकांना बोलावून त्यांचे मार्गदर्शन मुलांना दिले जाते. संगीत विषय ते हस्तकला या विषयात पारंगत पालकांचा सहभाग अध्ययन अध्यापन प्रक्रियेत प्रोत्साहन देण्यासाठी घेतला.



शाळा सुधारण्यासाठी परिवर्तनाचे व्यवस्थापन -

शाळा सुधारण्यासाठी बदलाचे जे स्रोत शाळेतून पहायला मिळाले ते खालीलप्रमाणे.

1.शाळाप्रमुख आणि शिक्षक एकत्रितरित्या चालू अध्ययन अध्यापन प्रक्रियेबाबत विचार विनिमय करत होते.

2.शाळेतील चालू कृती व प्रक्रिया सुधारण्याकरिता सर्व घटकाकडून मिळालेला मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी केली जात होती.

3.मुख्याध्यापक परिवर्तनासाठी आवश्यक गरजांबाबत सर्व पदाधिकाऱ्यांशी चर्चा घडवून आणत होते.

4.शाळेच्या संभाव्य गरजाबाबत अंदाजीत धोरणे सर्वांच्या सहमतीने पूर्ण केली जात होती .

5.मुख्याध्यापक परिवर्तनाचे नेतृत्व करताना आणि सुधारणांची नियमितपणे देखरेख करत होते.

6.याबरोबरच शाळेचा गुणात्मक दर्जा सुधारण्यासाठी शाळा स्तरावरील सर्व घटकांचे सहकार्य मार्गदर्शन घेतले गेले.



समता समानता व सामाजिक समावेश -

सर्व मुले शिकू शकतात, यासाठी विविध प्रकारची पार्श्वभूमी असणा-या बालकांचा समावेश शालेय प्रवाहात होणे आवश्यक आहे. सर्व बालकांना समान संधी देऊन समावेश करणे हे करताना खालील बाबी प्रकर्षाने जाणवल्या त्या अशा..

1.शाळेमधील पटनोंदणी झालेले विद्यार्थी विविध संवर्गातील, विविध क्षमता व पार्श्वभूमी असणारे होते.

2.विविध प्रकारची पार्श्वभूमी असणा-या बालकांना शाळा व्यवस्थापन समिती सदस्य बैठक व इतर शालेय उपक्रमात सहभाग नोंदवण्यासाठी प्रवृत्त करत होते.

3.विशेष गरजाधिष्ठीत बालके तसेच आर्थिकदृष्टया मागास बालकांना आवश्यक ते सहकार्य मिळवून देण्यासाठी स्थानिक सामाजिक संस्था, व्यक्ती, पदाधिकारी, शिक्षक यांना सहभागी करून घेतले..

4.सर्व मूली व वंचित गटाकडे शिक्षक स्वतः लक्ष पूरवितात जेणेकरुन समानता साधली जाईल.









शाळासंरक्षण आणि सुरक्षा -

शाळा संरक्षण आणि सुरक्षा याबाबतीत शाळेने खालीलप्रकारे उल्लेखनिय काम केले आहे.

1. लोकसहभागातून शाळेला संपूर्ण संरक्षक भिंत उभारली आहे.
2. शाळेमार्फत बालकांच्या सुरक्षिततेसाठी असणा-या नियमाची नियमित पडताळणी होते.
3. शाळा व्यवस्थापन समिती व समाजातील विविध संस्था व घटकांच्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने नियोजन आणि तंत्राचा नियमित आढावा घेते.

4. परिवहन समितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या वाहतूक व्यवस्थेसंबधी चर्चा व नियोजन करते.
5. शाळेत विद्यार्थ्यासाठी संरक्षण आणि सावधगिरी याबाबत कार्यशाळा आयोजित केल्या जातात. याकामी त्या क्षेत्रातील सामाजिक संस्थेचा पुढाकार घेतला जातो, शालेय वातावरण आणि शाळेतील कार्यसंस्कृती याचा मोठा प्रभाव असतो. पोषक वातावरण आणि आदर्श कार्यसंस्कृती शाळेच्या यशात मानाचा तुरा खोवत असतात. या अनुषंगाने खालील बाबी दिसुन आल्या.
6. शाळा व्यवस्थापन समिती व समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यानं शाळेसमोर सुंदर व आकर्षक अशी बाग तयार करण्यात आली आहे,
7. शाळा व्यवस्थापन समिती व पदाधिकारी यांच्या प्रेरणेने व नेतृत्वाने शाळेला भरीव अशा लोकसहभागातून डिजिटल वर्ग तयार करण्यात आलेले आहेत.
8. लोकसहभाग व श्रमदानातून शाळेच्या विविध गरजा पूर्ण करुन शाळा परिसर आकर्षक करण्यात आला आहे.

अशाप्रकारे आनंददायी, भीतीमुक्त खेळकर वातावरणात मुलांच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास व्हावा, त्याच्या चित्तवृत्ती बहरुन याव्यात आणि उद्याचा सुजाण, सुसंस्कृत असा नागरीक यातून घडावा असा एकत्रित प्रयत्न आहे. आणि त्यासाठी शालेय नेतृत्व अधिक सक्षम व कार्यप्रवण असणे गरजेचे आहे.

पोषक अध्ययन वातावरण विकास -

शाळा पाचल नं. 1 येथे इ.पहिली ते सातवी पर्यंतचे वर्ग आहेत. शाळेत 7 शिक्षक व पट देखिल भरपूर, प्रत्येक विदयार्थी वेगवेगळ्या वातावरणातून आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आवड निर्माण करणे हे एक आव्हान होते.

उद्दिष्टे-

1. शाळेतील 80% विद्यार्थी आकारिक व संकलित मुल्यमापनात 'अ' श्रेणी प्राप्त करतील या दृष्टीने प्रयत्न करणे.
2. विद्यार्थ्यांमध्ये स्वयंअध्ययनाची सवय वाढवणे.

3. विद्यार्थ्यांना अधिकाधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे,

4. विद्यार्थ्यांची उपस्थिती 100% आहे तशीच टिकवून ठेवणे.

5. सर्व प्रकारचे शैक्षणिक साहित्य पुरेशा प्रमाणात प्राप्त करणे,

6. शाळेचा दर्जा वाढवणे.

7. शाळेचा विकास करणे,

8. शाळेला जिल्हयात एक आदर्श शाळा बनविणे.

केंद्रशाळा पाचल नं. 1 या शाळेत आजूबाजूच्या परिसरातून सुमारे 1 ते 18 कि.मी वरून विद्यार्थी येतात. तसेच इंग्रजी माध्यमातून या शाळेत 15 विद्यार्थी आले आहेत. अशा या शाळेत पोषक अध्ययन वातावरण निर्माण करून त्यामध्ये आवश्यक ते बदल घडवून आणणे आवश्यक होते. केंद्र शाळा पाचल नं.1 येथे प्रथमतः सर्व शिक्षकांशी संवादसाधून चर्चासत्र घडवून आणले. पट भरपूर असल्याने अध्यापन अध्ययन प्रक्रियेत कोणत्या अडचणी, समस्या येत आहेत का ? सध्या असलेले वातावरण व त्यामध्ये काही बदल करावासा वाटतो? कोणत्या गोष्टींची, साधनांची गरज आहे. कोणती साधने कमी पडतात? याविषयी संवाद साधला.



Coaching & Mentoring -

शाळेतील सर्व शिक्षक, पालक व शाळा व्यवस्थापन समितीची एकत्रित सभा घेण्यात आली. सर्वामध्ये शाळेतील अध्यापन व अध्ययन प्रक्रियेमध्ये काही त्रुटी असतील तर त्या विचारण्यात आल्या. त्यावर उपाय शोधण्यात आले. शैक्षणिक साहित्याची उणीव जाणवली. त्यासाठी शाळेमध्ये शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा घेण्याविषयी नियोजन करण्यात आले.त्यामध्ये पालकांचा सहभाग घेण्यात आला. शाळेतील टॅब जाणि LED टि.व्ही. ही साधने उपलब्ध करून वापराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

सक्रीय अध्यापन तंत्रांचा वापर -

तज्ञ मार्गदर्शकास पाठ घेण्यास सांगून त्याचे निरिक्षण शाळेतील शिक्षकांना करण्यास सांगण्यात आले. स्वतः टॅब व एल.ई.डी टि.व्ही.चा वापर पाठ अध्यापनात कसा करावा याचे प्रात्यक्षिक करुन दाखवण्यात आले. एल.सी.डी प्रोजेक्टरचा वापर करून मनोरंजक पध्दतीने अध्यापन कसे करु शकतो याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले व शिक्षकांना देखील पाठ घेण्यास सांगुन त्याचे निरीक्षण करण्यात आले. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना अध्यापन करणे ही तशी अवघड व आव्हानात्मक जबाबदारी आहे. हे करत असताना ती कोमेजणार नाहीत याचे भान ठेवून, त्यांच्या भावविश्वाला धक्का लागणार नाही याची काळजी घेत त्याना फुलवत - खूलवत त्यांना आनंदी ठेवून अध्यापन करताना मुलांचे गृहपाठ तपासणे, इतर प्रशासकीय जबाबदाऱ्या व अनिवार्य शासकीय कामे, शिस्त लावणे, यावर काम करण्यात आले.

शिक्षक अध्यापनात तक्ते, फोटो, आकृत्या ,कात्रणे,, LED, LCD, टॅब मोबाईल, टेपरेकॉर्डर याचा वापर वाढविण्यात आला. प्रथम सत्रात 80% पेक्षा जास्त विद्यार्थी इयत्तानिहाय अ श्रेणीत असलेली आढळली. विद्यार्थी स्वयंअध्ययन करु लागलेली दिसली. अधिकारी वर्ग भेटी देऊ लागले. शाळेच्या गुणवत्तेचे कौतुक करु लागले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी मा. बामणे, साहेब यांनी शाळेस भेट दिली. विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विषयतज्ञ यांनी येऊन विद्यार्थ्यांच्या वहया तपासल्या. तोंड भरुन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेची उपस्थिती 100% राहिलेली दिसली. वर्गनिहाय पुरेसे शैक्षणिक साहित्य उपलब्ध झाले. त्यांचे शैक्षणिक साहित्य प्रदर्शन भरवण्यात आले. इतर केंद्रप्रमुखांनी देखील शाळेला भेटी दिल्या. शाळेचा दर्जा नक्कीच वाढलेला दिसला. अधिका-यांनी दिलेल्या भेटी व माझे मूल्यमापन यातून काही त्रुटी राहिलेल्या दिसल्या त्याविषयी शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले. या अंतिम मूल्यमापनात विद्यार्थ्यांची घटकनिहाय व स्तरनिहाय संपादणूक नक्कीच वाढलेली दिसली. 125 गुण शाळेस मिळाले.



शाळेचा सर्वांगीण आढावा -

शाळेत राबवलेले उपक्रम यात प्रदर्शने, स्पर्धा, शाळा परिसर विकास, शैक्षणिक साहित्य सुविधा, कार्यशाळा, चर्चासत्रे, पालकसभा, शाळा व्यवस्थापन समिती सभा, क्षेत्रभेटी, शाळा भेटी अधिकारी वर्ग भेट, सहशालेय उपक्रम, शैक्षणिक प्रगतीत मागे असणा-या विद्यार्थ्यांसाठी जादा तासिका त्यांच्या प्रगतीसाठीचे प्रयत्न, लोकसहभाग, प्रज्ञावंत विद्यार्थ्यांसाठीचे उपक्रम, पालक सहकार्य, तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर या सर्वाचा आढावा घेण्यात आला व शैक्षणिक साहित्याचा वापर आपल्या बुध्दीकौशल्याने करून आपले अध्यापन विद्यार्थ्यांना आकलन सुलभ कसे होईल यासाठी पाहणी करुन आढावा घेण्यात आला. शिक्षकांचे पाठ निरिक्षण करण्यात आले.

फेरफटका मारणे - (Learning walk)

दि. 03/08/2018 रोजी पाहणी करण्यासाठी गेली असता पहिलीतील शिक्षिका श्रीम.पाटील या विद्यार्थ्यांना LED वर कृतियक्त गीते दाखवत होत्या. इ 2 री तीन शिक्षक श्री.पाटील हे प्रोजेक्टरवर इंग्रजीतील टोनी टिकल कविता दाखवत होते. इ. तिसरीतील शिक्षिका श्रीम.वहाब या गणिताच्या पेटीचा वापर विद्यार्थ्यांना कसा करावा ते शिकवत होत्या. स्वतः विद्यार्थी साहित्य हाताळत होते. इ.4 थी च्या वर्गास भेट दिली असता श्रीम. कदम या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष क्षेत्रभेटीस घेऊन गेल्या होत्या.इ. पाचवीच्या शिक्षिका श्रीम. राठोड यांनी विद्यार्थ्यांना गटकार्य दिले होते. विदयार्थी स्वयंअध्ययन कार्डधारक गटकार्य पूर्ण करत होती. 6 वी च्या वर्गात श्रीम. शिर्के विद्यार्थ्यांकडून नकाशा भरून घेत होत्या, इ.7 वी च्या वर्गातील शिक्षक श्री. जाधव हे विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेत प्रयोग दाखवत होते.

स्वयंमूल्यमापन -

आमची प्रेरणादायी शाळा विकासाचे निकष या पुस्तिकेनुसार बौध्दीक क्षेत्रातील निकषानुसार शिक्षकांना एका महिन्यानंतर स्वयंमूल्यमापन करण्यास सांगण्यात आले, त्यानुसार स्वयं मूल्यमापन करून एकूण 127 गुणापैकी 117 गुण स्वयंमूल्यमापनातून मिळाले. 10 गुण कोठे जातात त्यावर चर्चा करण्यात आली, कमतरता, त्यामध्ये विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन, स्पर्धेसाठी निवड, मूल्यमापनातील विविध पध्दती, शाळा व्यवस्थापन समिती अंतर्गत अभिलेखे जतन यासारख्या गोष्टीमुळे काही गुण जात होते. त्यावर उपाय शोधण्यात आला. दर शनिवारी दप्तरमुक्त शाळा पेऊन अवांतर वाचनाची पुस्तके विदयार्थ्यांकडून वाचून घेणे, कौशल्यप्राप्त खेळाडू व तज्ञ पंचांची सरावासाठी निवड करण्यात आली. मूल्यमापनात विद्यार्थ्यांकडून मूल्यमापन, शिक्षकांकडून मूल्यमापन, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांकडून मूल्यमापन पध्दती राबवण्यात आली. शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांची प्रबोधन सभा घेण्यात आली. अभिलेखे उत्तम पध्दतीने जतन करण्यासाठी मार्गदर्शन घेण्यात आले. एका महिन्यानंतर सर्व घटकांची शाळा तपासणी करण्यात आली. शाळेच्या गुणवत्तेत सुधारणा झालेली दिसली.

शालेय विषयांशी संबंधित आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नावीन्यपूर्ण मार्ग शोधणे -

शाळा पाचल न. 1 ही एक ग्रामीण भागातील शाळा आहे. इ.1 ली ते 7 वी पर्यंतचे वर्ग येथे आहेत. एकूण 7 शिक्षक येथे कार्यरत असले तरी विद्यार्थ्यांचा पट देखील तसा भरपूर आहे. एका वर्गात 30 च्या वर पट आहे. वेगवेगळ्या वातावरणातून, प्रदेशातून आलेले विद्यार्थी या शाळेत शिकतात, शाळेची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी ही समस्या मोठी आव्हानात्मक होती. शिक्षणाच्या प्रवाहात या सर्व बाबी समाविष्ट करुन घेऊन विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे आवश्यक होते. यासाठी विविध उपाय केले.

1. गटपद्धतीचे अध्यापन
2. तंत्रज्ञानाचा वापर
3. स्पर्धा
4. विविध उपक्रम
5. मनोरंजनात्मक खेळ
6. शालेय परिसर सुशोभन
7. सांस्कृतिक कार्यक्रम

8. क्षेत्रभेटी

9. नाट्यीकरण

10.चित्रसंग्रह

वरीलप्रमाणे या विद्यार्थ्यांना समाविष्ट करण्यासाठी विविध मार्ग शोधण्यात आले. **विद्यार्थ्यांना** शिकण्यास मदत करण्यासाठी वेळापत्रक राबविण्यात आले. वेगवेगळ्या क्षमतेचे विद्यार्थी असल्याने त्याच्यासाठी वेळ देणे आवश्यक होते त्यासाठी अध्ययन क्षमतेत कमी असणा-या विद्यार्थ्यांसाठी जादा तासिका नियोजन करण्यात आले. सकाळी 9.30 ते 10.30 अध्ययनाच्या वेळी अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांसाठी शिक्षक तास घेतात. तसेच 5 वी व 7 वी तील विद्यार्थ्यांची नवोदय परीक्षेची तयारी घेण्यात येते. सांस्कृतिक कार्यक्रम, क्षेत्रभेटी स्पर्धा यांचे नियोजन करण्यात आले आहे. जून मध्येच सर्व उपक्रमांचे नियोजन माहेवार करण्यात आले आहे. सर्व नोंदी शिक्षकांच्या वार्षिक मासिक नियोजनात दिसून आल्या.

विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन -

विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन व त्यांच्या समस्येचे शंकेचे निरसन शिक्षक स्वतः

त्यांच्या जवळ बसून करतात.

गट पध्दती -

गणितात कमी असतील अश्या विद्यार्थ्यांचा गट वेगळा (गणितगट), वाचनात कमी असणा-या विद्यार्थ्यांचा गट वेगळा (वाचनगट), हस्ताक्षर खराब असणा-याचा गट वेगळा (हस्ताक्षर गट) यापध्दतीने योग्य नियोजनानुसार वेगवेगळे गट करुन शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. विद्यार्थ्यांना परिपूर्ण करण्यासाठी शिक्षक झटत आहेत.

स्पर्धा -

सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रवाहात समाविष्ट करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, मेहदी स्पर्धा यासारख्या स्पर्धेत सर्व विद्यार्थी अगदी आवडीने सहभागी होताना दिसले.

उपक्रम -

सण, वर्षासहल, क्षेत्रभेट, सांस्कृतिक कार्यक्रम, बाग लागवड, बाल आनंद मेळावा शाळा रंगरंगोटी, बालसभा, बुलबुल, राजूमीना मंच नाट्यीकरण पथनाट्य, संवाद सादरीकरण, कविता संग्रह, चित्रसंग्रह, प्रभातफेरी, मनोरंजनात्मक खेळ यासारख्या उपक्रमांची शाळेत अंमलबजावणी केली जाते. शनिवारी दप्तरमुक्त शाळा ठेवण्यात आली आहे. त्यावेळी विविध मनोरंजनात्मक खेळ, व्यायाम, पुस्तक वाचन, नाट्यीकरण यासारख्या उपक्रमाचे नियोजन केले आहे. कविता करणे, गोष्ट सांगणे यासारख्या उपक्रमाचेही नियोजन केले आहे. शिक्षकांचे वार्षिक नियोजन, मासिक नियोजन व टाचणवहीत नोंदी असलेल्या दिसून आल्या. अशा पद्धतीने शालेय नेतृत्व अंतर्गत संघ बांधणीतून शाळेचा विकास झाला.

धन्यवाद

सतीश सावंत

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तारू पिंपळवाडी, तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद

ईमेल आयडी - zppstambewadi@gmail.



जि.प.प्रा.शा. तारू
पिंपळवाडी. ता. पैठण

शाळेची प्रारंभिक माहिती :-

शाळेत इयत्ता 1 ते 7 वर्ग असून एकूण 5 वर्ग खोल्या आहेत. एकूण विद्यार्थी संख्या १६८ आहेत. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमांतर्गत विषय साधन व्यक्ती म्हणून श्री.बाळकृष्ण मुळे यांना प्रशिक्षण घेण्याची संधी लाभली. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र (PSM) अंतर्गत KRA नुसार निश्चित उद्दिष्ट सध्या करण्यासाठी SLDP प्रशिक्षणाची भूमिका परिणामकारक व निश्चित दिशा देणारे प्रशिक्षण म्हणता येईल.केंद्रस्तर शिक्षण परिषदांच्या माध्यमातून माझ्याशी व शिक्षकांशी संवाद व चर्चा करून कार्यक्रमाची दिशा ठरविण्यात आली. केंद्रप्रमुख यांच्याशी केंद्रस्तरीय शिक्षण परीषदांमधील विषयाबाबत चर्चा करून नियोजन करण्यात आले. शाश्वत स्वरूपाचा बदल घडविणे अत्यंत महत्वाचे वाटले. नेतृत्वाचे संक्रमण शाळा प्रमुख म्हणून माझ्यामध्ये करून प्रत्येक शिक्षकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यत पाझरत ठेवण्याचे ध्येय होते. केंद्रस्तरीय शिक्षण परीषदांमध्ये शिक्षकांच्या गुणांना शोधून सादरीकरणाची संधी देण्यात आली. चांगल्या कामासाठी सत्कार व कौतुक जाणीवपूर्वक करण्यात आले. बदलाची प्रक्रिया ही स्वतः पासून सुरु होणे आवश्यक असल्याने शिक्षकांशी सकारात्मक चर्चा करण्यात आली.

'परिणामकारक काम' हे ब्रीद समोर ठेवून काम करतांना शाश्वत स्वरूपाचा नेतृत्वात झालेला, नजरेत भरेल असा संघ बांधणीचा बदल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तारू पिंपळवाडी येथील माझे सर्व सहकारी शिक्षक यांचा तळमळीचा प्रयत्न समोर आला.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये जानेवारी २०१८ मध्ये शाळेत केंद्रस्तरीय शिक्षण परिषद जाणीवपूर्वक आयोजित करण्यात आली होती. तत्कालीन केंद्रप्रमुख श्री दत्तात्रय दाणेकर यांच्याशी सविस्तर चर्चा करून परिषदेमध्ये मुख्य उद्देश निश्चित केले. जिल्हास्तरावरील गुणवत्ता कक्षाच्या माध्यमातून मिळालेले मुख्य मुद्दे व स्थानिक पातळीवरील काही बाबी समाविष्ट करून शिक्षण परिषद निश्चित केली. भाषा व गणित विषयात अध्ययनस्तर वृद्धी, शैक्षणिक साहित्याचा वापर व निर्मिती कार्यशाळा, शाळेच्या प्राधान्यक्रमानुसार करावयाच्या

कामाबाबत प्रशिक्षण, गट कार्य पालक संपर्क, पारदर्शक कामकाज, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि शिक्षकांचा सत्कार व कौतुक यावर भर देण्यात आला.

कामातून विश्वास आणि पारदर्शकतेतून वाढता लोकसहभाग हाच मार्ग शाश्वत विकासाकडे जातो. ही संकल्पना समोर ठेवून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तारू पिंपळवाडी येथील नेतृत्वाने कामास सुरुवात केली. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये १४८ विद्यार्थी पट संख्या आणि 3 शिक्षकआमच्या शाळेत होते.. केंद्रप्रमुखानी सर्व शिक्षकाची बैठक घेवून शाळेत अपेक्षित बदल कसा करता येईल यासाठी काही ध्येय समोर ठेवून उद्दिष्टाची आखणी करण्यात आली.

VISION

एक परिपूर्ण अध्ययनार्थी शाळा निर्माण करणे. (TO CREAT A PERFECT LEARNING INSTITUTION) उपरोक्त ध्येयास अनुसरून काही उद्दिष्टे (TARGETS) निश्चित करण्यात आले.

TARGETS

1. इयत्ता ६ ते ४ वयोगटातील १०० % विद्यार्थी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तारू पिंपळवाडी येथे प्रवेशित करणे.
2. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेविषयी पालकात विश्वास निर्माण करणे.
3. विद्यार्थ्यांसाठी वाचन संस्कृती विकसित करणे.
4. विद्यार्थ्यांच्या मानसिक विकासाबरोबर शारीरिक ,सामाजिक व बौद्धिक विकासास संधी उपलब्ध करून देणे.
5. विदयार्थ्यांच्या संपादणुकीत वाढ करणे.

कार्यवाही व नियोजन :

सकारात्मक विचारातून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी एक परिपूर्ण अध्ययन संस्था निर्माण करण्याचे निश्चित करण्यात आले. यासाठी विविध उपक्रमाच्या माध्यमातून समस्या न सांगणारे, काम करणारे नेतृत्व उपजत असल्याने सर्व शिक्षकांचे संघटन होण्यास फारसा वेळ लागला नाही.

६ ते १४ वयोगटातील १००% बालकांचा प्रवेश :-

शैक्षणिक वर्षे २०१७-१८ मध्ये काही बालकांचा प्रवेश बाहेरगावच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळेत होता. स्पर्धेच्या युगात खाजगी शाळांची एक प्रकारे सरकारी शाळेशी स्पर्धाच निर्माण झाली. इंग्रजी माध्यमाच्या शाळेमुळे कमी होणारे प्रवेश , नकळत शाळेच्या विकासात तो एक अडथळा होता. पालकांमध्ये नेमके गुणवत्तापूर्ण शिक्षण म्हणजे काय? घोकंपट्टी करून अध्ययन कसे होईल? शाश्वत विकास कशाला म्हणतात ? या दीर्घकाळ चालणाऱ्या प्रक्रियेचा परिणाम समजून सांगणे कठीण होते. त्यापेक्षा महत्त्वाचे आणि प्राधान्य क्रमाने करावयाचे काम म्हणजे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देवू शकतो,खाजगी शाळेपेक्षा शाश्वत टिकणारी गुणवत्ता निर्माण करू शकतो या विषयी शिक्षकांमध्ये विश्वास निर्माण करणे.

सर्व प्रथम शाळेतील सर्व शिक्षकांची शालेय नेतृत्वाखाली बैठक आयोजित करून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये सर्वच इयत्तामध्ये सेमी इंग्रजी सुरु करण्याचे एकमताने निश्चित केले. जिल्हा परिषदेच्या शाळेत नियोजनपुर्वक पालकांच्या बैठकीचे आयोजन करून सेमी इंग्रजी विषयी कल्पना दिली. पालक व शाळा व्यवस्थापन सदस्य यांना शाळेचा एकूण पट वाढल्यास शिक्षक संख्या वाढू शकते हे पटवून देण्यात आले. पालक सभेत उपस्थित नसणाऱ्या पालकांना व्यक्तिश: भेट घेवून माहिती देण्यात आली. सर्वांच्या सहकार्याने पालकांना इंग्रजी विषयाचे व काळाच्या ओघात टिकण्याचे आश्वासन देण्यात आले. सुरुवातीस सेमी इंग्रजी बाबत भीती व संशय होता पण तो पुढे दूर करण्यात आला. गत वर्षी सुरु केलेल्या सेमी इंग्रजी वर्गाचे परिणाम खूप उत्साह वाढवणारे असे होते. प्रत्येकाचे सहकार्य लाभावे यासाठी शालेय संघटन खूप महत्त्वाचे ठरले.

परिणामी शैक्षणिक वर्षे २०१७-१८ च्या जून मध्ये शाळेची पट संख्या १४८ वरून १६८ पर्येत पोहचली. शिक्षकांच्या संख्येत वाढ होवून ०३ वरून ०५ झाली. तसेच आता पालकसभेला १००% पालकांचा सहभाग आणि उपस्थिती असते. प्रत्येक उपक्रम



मोठ्या उत्साहाने पूर्ण केले जातात.. कारण सर्वांचीच मुले जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेशित आहे. शाळेसाठी एकमताने सकारात्मक प्रतिसाद मिळतो. प्रत्येक कामात मदत मिळते. हे कुशल नेतृत्व आणि उत्कृष्ट संघटन यामुळे शक्य झाले आहे.

सर्व सोयी सुविधा परिपूर्ण असलेली आमची शाळा ग्रामीण भागात आहे. नियोजनपूर्वक केलेल्या कामाचे फळ म्हणजे आसपासच्या गावातील ३५ मुले या शाळेत प्रवेशित आहे. काही नातेवाईकानी स्वतःची मुले आत्या, मामा, मावशी यांच्याकडे म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तारू पिंपळवाडी येथे प्रवेशित केले आहेत. शाळेत प्रवेश करताच प्रत्येक व्यक्तीस आकर्षित करेल अशी एक परिपूर्ण अध्ययन संस्था निर्माण झाली आहे.

विद्यार्थ्यांसाठी वाचन संस्कृती विकसित करणे

अध्ययन स्तर टप्पा अंतर्गत वरिष्ठांच्या आदेशाने दिनांक ०७/१२/२०१८ रोजी केंद्रस्तरीय शिक्षण परिषद जि.प. उच्च प्राथमिक शाळा मुलांची वाडगाव येथे आयोजित केली होती. अध्ययन स्तर टप्पा २ मध्ये शाळेच्या वाढीचे विश्लेषण करण्यात आले. इयत्ता व विषयनिहाय झालेली वाढ त्यासाठी उपक्रमशील शिक्षकांचा सत्कार व कौतुक करण्यात आले. आणखी गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांची चर्चा घेण्यात आली. प्रत्येक शिक्षकाने चर्चेत सहभाग नोंदवून पारदर्शक व स्पष्ट मत व्यक्त केले. तत्पूर्वी चांगले काम करणाऱ्या शिक्षकांना पुस्तके देऊन गौरव करण्यात आला. विषय साधन व्यक्ती यांनी वाचन संस्कृती विकसित करणे आवश्यक असल्याचे चर्चेत मत व्यक्त केले आणि अनौपचारिक असा विषय समोर आला. शिक्षकांनी वाचन करण्याची गरज सर्वांनाच महत्वाची वाटली. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तका

शिवाय जास्तीचे संदर्भ वाचनाची सवय लागावी असे मत मांडले.



वाचनालय सुविधा

यावेळी मी अध्ययन स्तरामध्ये उतारा वाचन स्तरावर असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक शाळेत ग्रंथालय निर्माण करण्याची गरज आणि कल्पना मांडली. विद्यार्थ्यास समजपूर्वक वाचता येणे आवश्यक आहे हे सर्वच केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेस उपस्थित शिक्षकाना आवश्यक वाटले. अर्थात एक परिपूर्ण ग्रंथालय निर्माण करून त्याचा वापर करण्याची गरज आहे असे सर्वच शिक्षकांनी एकमताने मान्य केले.

सकस नेतृत्व गुणांतून स्वतः कार्यप्रवण राहून इतरांना प्रेरणा झाली. सर्व प्रथम शालेय विद्यार्थ्यांसाठी एक परिपूर्ण ग्रंथालय कसे सुरु करता येईल याबाबत सहकार्यांशी अगोदर चर्चा केली. यामध्ये अनेक कल्पना समोर आल्या. सर्व प्रथम शिक्षकांनी काही पुस्तके स्वतः आणण्याचे ठरविले. यानंतर शालेय व्यवस्थापन समिती सोबत पुन्हा बैठक आयोजित केली. SMC च्या सहकार्याने पुस्तकांसाठी रॅक बनवून देण्याची निश्चित केले. तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांनी आपल्या स्वतःच्या वाढदिवसाचा इतर बाबींवर होणारा खर्च टाळून शाळेला आपल्या इच्छेप्रमाणे .रु २०० पर्यंत पुस्तके देण्याचे ठरविण्यात आले. वाढदिवसाच्या

उपक्रमाची जोड ग्रंथालय समृद्धीसाठी करण्यात आली.डिसेंबर 2018 च्या पालकसभेत पालकांना या विषयी कल्पना देण्यात आली.पालकांना शालेय नेतृत्वावर पूर्ण विश्वास असल्याने नकारात्मक भावना किंचितही नव्हती. पालकांचा सहभाग शिक्षकांचा उत्साह वाढवून संघ निर्मितीची भावना प्रबळ करत होता. २० डिसेंबर २०१८ रोजी ग्रंथालयाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

सर्व शिक्षक विद्यार्थी, व पालक यांनी मिळून जि.प.तारूपिंपळगाव सध्याचे ग्रंथपाल पद कुमार अविष्कार ढोकळे इयत्ता ५ वी याच्याकडे सुपुर्द केले आहे. मोठ्या उत्साहाने पुस्तके देवाण घेवाणीचे काम अविष्कार करतो. वाढदिवसाच्या निमित्ताने प्राप्त पुस्तकांची नोंद घेणे ही कामे सध्याचा ग्रंथपाल पदावर कार्यरत अविष्कार नायकाप्रमाणे पार पडतो. पुस्तकांच्या संख्येबरोबर विद्यार्थ्यांची समज वाढत आहे. DIGITAL संस्कृतीच्या काळात खऱ्या अर्थाने वाचन संस्कृती टिकविण्यासाठी जि.प. प्रा शा. तारूपिंपळगाव प्रयत्नशील झाली आहे. ग्रामीण भागात सुद्धा अनेक समस्यांना समोर जाऊन मुलांना वाचनाची सवय लागावी यासाठी सतत कार्यतत्पर व बहुआयामी व्यक्तिमत्व साधन व्यक्ती श्री. मुळे सर व माझे सहकारी शिक्षकांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे .



गटकार्याची अनोखी पद्धत :

प्रगती चाचण्या आणि अध्ययन स्तर निश्चितीच्या आधारे विद्यार्थ्यांचे वर्गीकरण चार गटात तयार केले आहे. वरच्या गटात बढती मिळविण्यासाठी गटात सहभाग , कृती, स्वयंशिस्त, उस्फूर्तपणे प्रेरित होवून काम आणि अध्ययन स्तरात वाढ ह्या बाबींचा विचार केला जातो. वरिष्ठ गटात जाण्याची इच्छा प्रत्येक बालकास असते. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन नोंदी घेण्यासाठी गटकार्याचा वापर अचूकपणे केला जातो. विषयनिहाय प्रत्येक बालकाची प्रगती स्पष्टपणे दिसून येते.

प्रत्येक विद्यार्थ्यास गटात टिकून राहण्यासाठी कृतीशील राहण्याचे महत्व सहज समजते. आपण खालच्या गटात जाऊ नये म्हणून धडपड वृत्ती दिसून येते. यातून काही प्रमाणात स्पर्धा निर्माण होण्यास मदत होते. प्रत्येक शिक्षकास गटकार्य घेताना पुर्वतयारी करूनच काम द्यावे लागते. उपक्रम किंवा कृतीची सकारात्मक आणि अपेक्षित परिणाम त्यामुळे दिसून येतो.

शाळेत सध्या अध्ययन करणारे 168 पैकी 26 विद्यार्थ्यांसाठी ज्यादाचे मार्गदर्शन केले जाते. तर शिक्षकांशी चर्चा करताना एक बाब प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे वरच्या गटात असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण व आव्हानात्मक काम द्यावे लागते नाहीतर त्यांना कंटाळा येतो. शाळा प्रमुख म्हणून मी सुलभकाचे काम स्वतः स्वीकारतो त्यामुळे सहकारी शिक्षक उत्साहाने काम करतात. नेतृत्वाने दिशा देण्याबरोबरच स्वतः पुढाकार घेऊन काम केल्यास कार्यकर्ते आपोआप जोडले जातात असेच चित्र पाहण्यास मिळते.



केवळ इयत्ता १ली २ री व अध्ययनात मागे असण्याऱ्या २६ विद्यार्थ्यांसाठी ज्ञानरचनावादी साहित्याचा वापर केला जातो. बाकीचे विद्यार्थी हे स्वतः तयारी करतात. गट कार्यात स्वयंशिस्त, सर्वाना संधी, चर्चा व विचार विनिमय करून निर्णय घेण्यास सक्षम बनवले जाते. विद्यार्थी आपोआप शिकतात केवळ सुलभकाच्या भूमिकेत शिक्षकाने संयम पाळणे आवश्यक आहे. यावर सर्व शिक्षक आता सहमत आहेत.

लोक सहभाग शालेय नेतृत्व आणि संघबांधणीचा खूप मोठा फायदा शाळेस झाला. कामातून विश्वास आणि पारदर्शकता यामुळे शाळेस लोक सहभाग प्राप्त झाला आहे.

खेळामध्ये विशेष प्राविण्य

१४ वर्षा खाली खो खो मध्ये या शैक्षणिक वर्षात मुलांच्या संघाने सेमी फायनल पर्यत मजल मारली तर बुद्धिबळ स्पर्धेत कुमारी पूजा ठोकले या विद्यार्थीनीने राज्य स्तरावर प्रतिनिधित्व केले. तालुका स्तर क्रीडा स्पर्धेत शाळेस सर्व साधारण उप विजेतेपद प्राप्त झाले. शिवाय शाळेत २२ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत प्रती वर्षी क्रीडा व सांस्कृतिक सप्ताह साजरा केला जातो.



धन्यवाद

महेंद्र नारायण नाईक

रायगड जिल्हा परिषद शाळा कांबे केंद्र. मोहोपाडा, तालुका.खालापुर जिल्हा.रायगड

ईमेल आयडी – mahendranaik2008@rediffmail.com



रायगड जिल्हा परिषद शाळा कांबे

शाळा एक अध्ययन संस्था -

रायगड जिल्हा परिषद शाळा कांबे ही लोकसहभागातून डिजिटल शाळा करण्यात आली आहे.शाळेत सातत्याने वेगवेगळे उपक्रम राबविले जातात.शाळेची इमारत जुनी असून तिला रंगरंगोटी करून सुशोभित करण्यात आली आहे. शाळा पूर्वी पहिली ते सातवी पर्यन्त होती. शाळा व्यवस्थापन समितीच्या मागणीनुसार शाळेला 2017.18 या शेक्षणिक वर्षापासून आठवीचा वर्ग जोडण्यात आला आहे,तसेच सेमी इंग्रजी वर्ग सुद्धा त्याच वर्षापासून सुरू करण्यात आला आहे.

दृष्टी (Vision) -

१) १००% प्रगत शाळा.

२) गुणवत्तापूर्ण शिक्षण.

३) नवोपक्रमशील शाळा.

४) शाळासिद्धी 'अ'श्रेणी कायम ठेवणे.

५) अध्यापनात डिजिटल साहित्याचा वापर करणे.

ध्येय (Mission) :-

१) १००% विद्यार्थी प्रगत करणे.

२) शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर करणे.

३) शैक्षणिक साहित्याची निर्मिती करणे व त्याचा वापर दैनंदिन अध्यापनात करणे.

४) प्रत्येक विद्यार्थ्याच्या गुणवत्ता व त्यांच्या क्षमतांचा विकास करणे.

५) विद्यार्थ्याच्या सुप्त कला गुणांना वाव देणे व त्यांचा विकास करणे.

६) शाळासिद्धीमध्ये ' अ ' श्रेणी प्राप्त करून आदर्श शाळा घडवणे.

शाळा विकास नियोजन व अंमलबजावणी :-

शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने माजी विद्यार्थी,पालक,सर्व ग्रामस्थ मंडळ,महिला मंडळे यांची संयुक्त सभा आयोजित केली. सभेत त्यांना आमच्या संकल्पनेतील शाळा कशी असावी याची मांडणी केली. ग्रामस्थांना सदरची कल्पना खूपच आवडली. सर्वांनी शाळेला योग्य ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. शाळा डिजिटल करण्यासाठी काय काय उपाययोजना कराव्या लागतील,पैश्याचे नियोजन इ. बाबींवर चर्चा करण्यात आली.

दोन महिन्यांच्या कालावधीनंतर डिजिटल शाळा म्हणून कांबे शाळेचे उदघाटन मा.सौ.उमा मुंढे मॅडम महिला व बालकल्याण सभापती रायगड जिल्हा परिषद अलिबाग,मा.सौ.श्रद्धा साखरे सभापति पंचायत समिती खालापूर,मा.श्री.विश्वनाथ पाटील उपसभापती,पंचायत समिती खालापूर,मा.सौ.कांचनताई पारगे, सदस्या पंचायत समिती खालापूर,मा.श्री.चोपडे साहेब गटविकास अधिकारी पंचायत समिती खालापूर इ.मान्यवरांच्या उपस्थितीत डिजिटल शाळेचा उदघाटन सोहळा पार पडला .



डिजिटल शाळा उदघाटन समारंभ

१) ज्ञान रचनावादी शैक्षणिक साहित्याची निर्मिती करून त्याचा वापर दैनंदिन अध्ययन-अध्यापनात केला.

२) शिक्षक, विद्यार्थी व पालकांचा सहभाग घेऊन शैक्षणिक साहित्याची निर्मिती.

३) लोकसहभागातून शाळा डिजिटल करून अध्यापनात व स्वयं अध्ययनासाठी त्याचा वापर होत आहे.

४) शाळा वेळापत्रके तयार करणे, स्पर्धा आयोजन यात पालकांचा सहभाग घेण्यात आला.

५) माजी विद्यार्थी संघातर्फे विद्यार्थ्यांना बक्षिसे, प्रेरणा, कौतुक याद्वारे प्रोत्साहीत केले गेले.

लिंगसमभाव व समताधिष्टित उपक्रम:-

१) शाळास्तरावर महिला दिन व बालिका दिन या माध्यमातून प्रबोधन.

२) मिना राजू मंचच्या माध्यमातून शाळास्तरावर विविध उपकमाचे आयोजन

३) महिला मेळावे ,माता पालकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन

४) विद्यार्थी पथनाट्याच्या माध्यमातून समतेचा संदेश

५) मुला मुलींना समान गणवेष करून मुलींना मुक्त शिक्षणासाठी प्रयत्न

६) मुलींची शारीरिक वाढ व सुरक्षितता या संदर्भात तज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन

७) गावातील यशस्वी महिलांसोबत मुलींचा मुक्त संवाद

८) शालेय व्यवस्थापनात माता पालकांचा जास्तीत जास्त सहभाग



महिला मेळावा



मुलींसाठी आरोग्य शिबीर व मार्गदर्शन



बालिका दिनानिमित्त नाटीका सादर करताना

शाळा संरक्षण आणि सुरक्षा :-

१) शाळेला सुसज्ज अशी संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे.

२) अग्निशामक यंत्राचे प्रात्यक्षीक विद्यार्थ्यांना देण्यात आले.

३) आपत्कालिन व्यवस्थापनाचे ट्रेनिंग मुलाना देण्यात आले आहे.



ग्रामस्थांच्या मदतीने सुशोभित केलेली संरक्षक भिंत

बालअधिकार :-

१) विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धतीचा शाळेत वापर होतो.

२) शैक्षणिक साहित्याची निर्मिती करून शाळेचे वातावरण आनंददायी बनवण्यात आले.

३) दप्तराविना शाळा, एक दिवस इंग्रजीचा, मुक्त वातावरण बालसभा असे विविध उपक्रम शाळेत राबवले जात आहेत.

४) शाळेत बालकांचे मंत्रिमंडळ स्थापन केले आहे.

५) विद्यार्थ्यांना बोलके करण्यासाठी 'प्रश्न तुमचे उत्तर आमचे', प्रश्न मंजुषा, कविता तयार करणे, गोष्टी तयार करणे इत्यादी उपक्रम राबवले आहेत.



बालसभा

शालेय संस्कृती :-

१) शाळा सुरु होण्याच्या अगोदर शाळा पूर्व तयारी शालेय स्वच्छता केले जाते. तसेच शालेय परिसरातील झाडांची जोपासना.

२) राष्ट्रीय दिनी सांस्कृतिक कार्यक्रम आणि शालेय गुणवत्ता विकास आणि लोकसहभाग याबाबत सादरीकरण केले जाते.

३) राष्ट्रीय दिनी गावातील प्रतिष्ठीत वरिष्ठ मंडळीचा उत्स्फूर्त सहभाग असतो.

४) वाचन प्रेरणा दिन साजरा होतो. वाचनकट्टा, वाचण्यासाठी विविध पुस्तके उपलब्ध करून देतात.

५) डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर आधारित माहिती व पुस्तकाचे वाचन तसेच प्रसंग वाचन.

६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र, संविधानासाठी त्यांचे योगदान, शाहुमहाराज जयंती सामाजिक न्याय दिन याबाबत मार्गदर्शन शिबिराचे आयोजन.

७) प्रभात फेरी मध्ये इयत्ता १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सहभाग.

८) मुलींच्या शिक्षणास प्राधान्य.

९) मुलींच्या मासिकपाळी काळात उद्भवणाऱ्या समस्यांचे व्यवस्थापन केले आहे. तसेच मासिकपाळीबद्दल समज व गैरसमज याबद्दल मार्गदर्शन शिबिराचे आयोजन.



हात धुणे दिवस



वाचन प्रेरणा दिन

शालेय वातावरण आणि शाळेतील कार्य संस्कृती -



कवायत प्रकार करताना विद्यार्थी



योगासने करताना विद्यार्थी



खेळात पालकांचा सहभाग

१) दररोज शाळा सुरु होण्याच्या अगोदर विद्यार्थी शाळेची साफसफाई करतात.

२) प्रवेशोत्सवाच्या दिवशी रांगोळी काढून, सर्व मुलांचे फुले देऊन गावातील वरिष्ठ मंडळी कडून स्वागत केले जाते.

३) लोकसहभागातून मुलांना खाऊ वाटप केले जाते.

४) शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप केले जाते.

५) दि. ०१ जुलै ते ०७ जुलै या काळात प्रत्येक वर्षी वृक्षारोपण केले जाते.

६) २१ जून रोजी पालकांच्या सहभाग घेऊन योगदिन साजरा करतात.

७) प्रत्येक शनिवारी सांघिक कवायत होते. व योगासने होतात त्यामुळे विद्यार्थ्यांना व्यायामाची आवड निर्माण झाली.

८) ग्रामस्थांनी शाळेला देणगी स्वरुपात जी रक्कम जमा केली त्या जमा झालेल्या मदतीतून डिजिटल शाळा व शालेय रंगरंगोटी हे दोन संकल्प पूर्ण झाले.





शालेय रंगरंगोटीसाठी ग्रामस्थांनी केलेली मदत शाळेच्या विविध समस्यांची चर्चा करतांना पालक



विद्यार्थ्यांना विज्ञानाची आवड लागावी म्हणून मार्गदर्शन

वैयक्तिक आणि व्यावसायिक विकास :-



विद्यार्थी विविध खाद्य पदार्थ स्वत: बनवून ते विक्री करतांना

कागदापासून विविध वस्तु बनविताना

शिक्षकांनी स्वतःची शैक्षणिक पात्रता वाढवली असून तांत्रिक ज्ञान विकसित केले आहे. विविध प्रशिक्षणाच्या आधारे स्वतःचे अध्यापन कौशल्य विकसित केले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेचे नेतृत्व एकसंघ आहे. आणि तशीच संघ भावना त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये रुजवली आहे.

शालेय विकासाच्या दृष्टीने माजी विद्यार्थी संघ तयार करणे :-

१) शाळेमध्ये माजी विद्यार्थी संघ स्थापन केलेला आहे व तो सक्रीय आहे.

२) शिक्षकांची कमतरता असल्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी शालेय विकासासाठी वेळ देतात व शैक्षणिक प्रगतीमध्ये योगदान देतात



माजी विद्यार्थी मेळावा

अध्ययन – अध्यापन प्रक्रियेत बदल घडवून आणणे.

अध्ययन – अध्यापन प्रक्रिया आनंददायी व विद्यार्थी केंद्रित करण्यासाठी अध्ययन –अध्यापन प्रक्रियेत पुढील प्रकारचे बदल करण्यात आले.

१) पोषक अध्ययन वातावरण विकसित.

२) अध्ययन – अध्यापन तंत्रज्ञानाचा वापर.

३) शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता वाढली.

४) प्रशिक्षणाचा लाभ घेऊन त्याचा वापर दैनंदिन अध्यापनात.

५) अध्यापनात you tube चा प्रभावी वापर केला जातो .

६) कृतीतून शिक्षण.

७) ज्ञान रचनावाद संकल्पनेचा उपयोग करून विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनासाठी प्रवृत्त करणे.

वरील सर्व समित्यांच्या बैठका नियमित होतात व प्रत्येक बैठकीचे इतिवृत्त शाळेत ठेवले जाते.

शाळेविषयी वर्तमानपत्रात आलेल्या बातम्या





शाळा डिजिटल करायची असेल तर कमीतकमी निधी उभारणे गरजेचे होते. या कामीसुद्धा कांबे गावचे ग्रामस्थ शाळेसाठी धावून आले. त्यांनी तब्बल १०००००रु. चा निधी शाळेसाठी उभा केला व डिजिटल शाळेसोबत शाळेला रंगरंगोटीसुद्धा करून दिली. आज शाळेमध्ये अध्यापनात प्रोजेक्टरचा वापर केला जातो. विद्यार्थी आवडी प्रमाणे शिकतात. तसेच श्री. केतन कर्णीक व सुषमा कर्णीक यानी शाळेला डिजीट्ल बोर्ड दिला.



शाळेला इंटरएक्टिव्ह बोर्ड देणारे कर्णिक दांपत्य

शालेय गुणवत्ता सुधारण्यासाठी वेगळे विचार करून वेगळे स्त्रोत शोधणे :-

१) मुलांना स्वयंअध्ययनाची सवय लावणारे उपक्रम घेतले जातात. जसे प्रश्न तुमचे उत्तर आमचे, प्रश्न मंजुषा,विविध बौद्धिक स्पर्धा इत्यादी.

२) विद्यार्थी अभ्यासगट स्थापन करून विदयार्थी गटागटाने अभ्यास करतात.

३) विद्यार्थ्यांना शिकण्यास मदत करण्यासाठी वेळापत्रक तयार करणे.

४) वर्गाध्यापनात बदलत्या बैठक व्यवस्थेचा अवलंब केला जातो.

५) पालकांना प्रेरणा देण्यासाठी मनोरंजनात्मक खेळाचे आयोजन केले जाते .

६) परिसरात जाऊन निसर्गाचे निरीक्षण व त्याची मदत अध्यापनात करून घेतली जाते.

७) आनंददायी मेळावे, संस्कार शिबीर, सुट्टीतील शिबीर, सांस्कृतिक स्पर्धा व क्रिडास्पर्धेचे आयोजन केले जाते.



विद्यार्थ्यासमवेत परिसरभेट व वनभोजन

तंत्रज्ञानाचा वापर करून शालेय व्यवस्थापन सक्षमीकरण करणे.

शाळेच्या कामकाजासाठी सिप्ला कंपनीने शाळेला तंत्रज्ञानाचा उपयोग व्हावा म्हणून एक संगणक दिला आहे. शाळेतील संसाधनाचे योग्य प्रकारे व्यवस्थापन केले आहे. डिजिटल वर्गखोलीच्या वापराचे वेळापत्रक आहे. वेळापत्रकाप्रमाणे शिक्षक व विदयार्थी त्याचा वापर करून अध्ययन - अध्यापन करतात. इंटरएक्टीव्ह बोर्ड मुळे विद्यार्थ्यांना शाळेची आवड निर्माण झाली.

संसाधनांचे गतीशील आणि योग्य उपयोजन करणे :-

शाळेतील सर्व संसाधनांच्या वापराचे नियोजन केले आहे. मुले व मुली यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था असून पाणीपुरवठा सक्रीय आहे. विद्यार्थ्यांना स्वच्छ व शुद्ध पाणी मिळावे म्हणून फिल्टर वापरला जातो. शाळेला स्वतंत्र स्वयंपाकगृह आहे. शाळेचे मध्यान्हभोजन शाळेतील स्वयंपाक घरात शिजवले जाते.

शाळेत ई-गव्हर्नसचा वापर करणे :-

स्मार्टफोनच्या माध्यमातून शाळेत ई-गव्हर्नसचा उपयोग केला जातो. शाळेचा Email ID अस्तित्वात असून त्यावर पत्रव्यवहार केला जातो. पालकांचा व शिक्षकांचा Whats App ग्रुप असून त्यामार्फत शाळेत होणारे उपक्रम, विविध स्पर्धा, विद्यार्थ्यांची प्रगती याची माहिती वेळोवेळी प्रसिद्ध केली जाते. व त्यातून पालकांशी संवाद साधला जातो.

समग्र शिक्षा व्यवस्थापन :-

SDMIS सर्व शाळांचे online काम पूर्ण करून घेण्यात आले. अंगणवाडी ते 12 वीपर्यंतची सर्व मुले शाळेत दाखल करून घेण्यात आली. प्रत्येक शिक्षकाने गाव सर्वेक्षण करून एकही मूल शाळाबाह्य राहणार नाही याची काळजी घेतली आहे. सर्व विद्यार्थ्यांना सरकारी शाळेत दर्जेदार शिक्षण मिळत असून प्रत्येक बालकांचा व्यक्तिमत्त्व विकास साधला जात आहे. पालकांना वारंवार सरकारी शाळेचे महत्व पटवून देऊन सरकारी शाळा चांगल्या आहेत हे शाळेत साजरे होणाऱ्या विविध उपक्रमातून दाखवून देतो .





शाळा डिजिटल झाल्यानंतर मान्यवरांनी शाळेला भेटी दिल्या

खालापूर तालुक्यातील शिक्षक

शाळास्तरावरील विविध उपक्रम



क्रीडा स्पर्धा



शाळेची शैक्षणिक सहल



मनातील वाईट विचार कागदावर लिहून ते पेटवून साजरी केलेली पर्यावरण पूरक होळी



नाताळ सण शाळेत साजरा करून सर्व धर्म समभाव जपण्याचा प्रयत्न

धन्यवाद

डावखर प्रमिला कोंडीभाऊ
अनुसूचीत जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा दिवे, तालुका.पुरंदर,जिल्हा.पुणे
ई -मेल आयडी - shaskiyaniwasishaladive@gmail.com



प्रस्तावना :

आजचे युग हे स्पर्धेचे व गतिमान युग असून ज्ञानाचा प्रस्फोट व माहिती तंत्रज्ञान हे शिक्षण क्षेत्रातील दोन लक्षणीय बदल आहेत.शिक्षण प्रक्रियेतला केंद्रबिंदू असणारा विद्यार्थी या स्पर्धेत टिकणे अपरिहार्य झाले आहे. अशा स्थितीत विद्यार्थ्यांना यशस्वी व फलदायी शिक्षण मिळणे ही काळाची गरज बनली आहे.

सर्व बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी परिणामकारक शाळा व सुधारणात्मक शालेय कामगिरी यांची गरज आहे. म्हणूनच शालेय शिक्षण क्षेत्रात शाळा, त्यांची कामगिरी व सुधारणाकेंद्रीत गुणवत्ता पुढाकार घेण्याची आमच्या शाळेला गरज निर्माण झाली.

विद्यार्थी जगाविषयी व आपल्या ज्ञानाविषयी मत प्रकट करण्यास सक्षम होतील,असा उदात्त हेतू समोर ठेऊन २००५ चा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा राबवला जात आहे.या अनुषंगाने

विद्यार्थ्यांमध्ये अमूर्त कौशल्ये, जसे तर्क,सर्जनशील विचार, ज्ञानाचे उपयोजन, अर्थनिर्वचन व अनुमान इ.सहाय्याने विद्यार्थ्याने स्वत: विचार करून, समस्या निराकरणास शाळेमधील **दैंनदिन अध्यापन व उपक्रमातून** प्रोत्साहित केले जाते.

सेंटर फॉर रूरल ट्रान्सफोरमेशन,पुणे यांचे सहयोगाने समाजकल्याण खाते मार्फत सलग 2 वर्ष **जीवनकौशल्यावर** आधारित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले होते. हे प्रशिक्षण ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी देण्यात आले होते.यामध्ये पुढील बाबींवर भर देण्यात आलेला होता.वैयक्तिक नातेसंबंध यामध्ये चांगले नातेसंबंध, कोणते नातेसंबंध जपणे,स्वत:मधील गुणदोष ओळखून त्याचे नातेसंबंधांवर होणारे परिणाम इ.माहिती देण्यात आली.

गटात करण्यात येणारे सहकार्य यादवारे प्रयोगाद्वारे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. विद्यार्थिनींवर कुटुंबातून होणारे व बाहेरून होणारे अत्याचार, हिंसा, शोषण कशा प्रकारे ओळखावे याबाबत उदाहरणाद्वारे, फिल्मद्वारे माहिती देण्यात आली. दैंनदिन आयुष्यात गरजेची अशी वैयक्तिक स्वच्छता, जंतूसंसर्ग इ.बाबत घ्यावयाची काळजीबाबत माहिती देण्यात आली. एच.आय.व्ही., त्यांची लक्षणे,कारणे,गैरसमज याबाबतही मार्गदर्शन केले.

आपल्या पालकांची असणारी आर्थिक आवक त्याचे नियोजन,गरजांची ओळख,बचतीचे महत्व, कुटुंबाचे अंदाजपत्रक, वेळेचे व्यवस्थापन , प्रसारमाध्यम व त्यांचा वापर इ.बाबत उपयूक्त माहिती उदाहरणे, गोष्टी, कृतियुक्त सहभागाद्वारे देण्यात आली.

या कार्यक्रमाचा उपयोग नक्कीच **विद्यार्थ्यांच्या स्व-विकासासाठी** झालेला दिसून येतो.

अध्यापन अध्ययन प्रक्रियेत बदल घडवून आणणे:-

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ आणि राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० मध्ये अध्ययन अध्यापनातील ज्ञानरचनावादी दृष्टीकोनावर भर दिलेला आहे. यानुसार पाठ्यपुस्तका बरोबरच, पाठ्यपुस्तकाच्या बाहेर पहावे लागेल. कोठारी आयोगात, **'A destiny of India is now being shaped in her classroom'**असे म्हटले आहे.

(Report of education commission, 1964-66, pg.9)

याला अनुसरूनच शाळेची गुणवत्ता वाढविणे त्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी आमच्या शाळेत प्रयत्न सर्व शिक्षकांच्या मदतीने केले जातात.

पोषक अध्ययन वातावरण विकसित करणे :

वर्गातील मुलांचे संकल्पनानिहाय संपादणुकीच्या विश्लेषणासाठी माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर भर देण्यात येतो.

प्रभावी तंत्रज्ञानाचा वापर व्हावा यासाठी इ. ६ वी ते १० वी च्या वर्गात संगणक, स्पीकर, उपलब्ध करुन दिलेला आहे.तसेच शाळेत वाय-फाय सुविधा उपलब्ध असून, प्रत्येक विषयांतर्गत शैक्षणिक पूरक विडियो मुलांना दाखविण्यात येतात.

वर्गात मुले गटात अध्ययन(Group learning) करत असल्यामुळे तसेच समवयस्का सोबत मुक्त चर्चा करीत (Pear learning) असल्यामुळे लोकशाही मुल्यांचीही रुजवणूक व्हायला आपोआपच मदत झाली.

तसेच आमच्या शासकीय निवासी शाळा दिवे याठिकाणी DIKSHA APP वापरण्यासंदर्भात दिवे केंद्र स्तरातील सर्व शिक्षकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. त्याचा फायदा शिक्षकांना दैंनंदिन अध्यापनात ई-लर्निंग साहित्याचा वापर करण्यासाठी झाला.

- अनुसूचीत जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा दिवे,पुणे या ठिकाणी **CLR** (Center learning resource) हा इंग्रजी विषयासाठी व **'अनुपद'** कार्यक्रम हा मराठी व गणित विषयासाठी इ .६ वी व ८ वी च्या मुलांसाठी राबविला जात आहे.

- यासाठी सदर विद्यार्थ्यांची पूर्व चाचणी घेण्यात आली व अध्ययनात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांची निश्चिती करण्यात आली.

- अध्ययनात मागे असणाऱ्या मुलांसाठी दृक,श्राव्य,तसेच मुद्रित साहित्य उपलब्ध करून देण्यात आले.

- शिक्षकांचेही यांसदर्भात विशेष प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

- **'CLR'** व **'अनुपद'** कार्यक्रमाबाबत दररोज ४५ मिनिटे ३ तासिका याबाबत निश्चित करण्यात आलेल्या आहे. त्याबाबत सराव घेऊन, प्रत्येक विद्यार्थी प्रगत होईल याकडे लक्ष दिले आहे.

सक्रिय अध्यापन तंत्राचा वापर करणे -

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होत असताना मूल्यमापनातून वेळोवेळी त्यांच्या अध्ययनातील त्रुटी, अडचणी, वेळच्या वेळी दूर करून शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देणे अधिक महत्वपूर्ण असते. यासाठी काही तंत्राचा वापर अध्यापन करताना केला, कारण शिक्षकांचे विषय ज्ञान आणि त्यांचे अध्यापन कौशल्य हे अध्यापन - अध्ययन आणि मूल्यांकन यांची परिणामकारकता ठरविण्यास उपयोगी ठरली .

- मराठी विषयासंदर्भात एखाद्या पाठाचे अध्यापन केल्यानंतर त्यातील कथानकावर आधारित नाटिका / नाटक मुलांना सादर करण्यास सांगितले जाते.ज्यामुळे विद्यार्थी त्या पाठातील कथानकाशी अधिक एकरूप होऊन, त्यांचे अध्ययन प्रभावी होण्यास मदत होते.
- विज्ञान विषयांसदर्भात विद्यार्थ्यांची अभिरुचि वाढावी,तसेच त्यांना प्रयोग करण्याची, निरीक्षण करण्याची संधी मिळावी,यासाठी शाळेत 'फिरती प्रयोगवाहिनीचे आयोजन करण्यात आलेले होते.

- तालुकास्तरीय **विज्ञान प्रदर्शना**तही विद्यार्थी सहभाग घेतला,शाळा स्तरावरही **'अपूर्व विज्ञान मेळाव्याचे'** आयोजन केले.

- तसेच शालेय स्तरावर पुढील ज्ञानरचनावादी तंत्राचा वापर अध्यापनात करण्यावर भर देण्यात आला. उदा. आकलनासाठी प्रश्न, परिचितांची अधिक ओळख, चित्राचे अर्थनिर्वचन, चिंतनीय प्रश्न, जोडीत सहभागी विचार,अनामिक कल्पना, जिगसॉ,मतप्रदर्शन तंत्र , अनुभव शोध इ.

- विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हे शालेय शिक्षणाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. सर्वांगीण विकास करतांना विद्यार्थ्यांना बोधात्मक, भावनात्मक आणि कौशल्यात्मक विकासाशी कृतींमध्ये सहभाग घेण्यास प्रवृत्त केले जाते.यासाठी शाळेमध्ये विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील कृतींमध्ये सहभाग घेण्यास प्रवृत्त केले जाते आणि त्यांच्या प्रगतीचे सनियंत्रण सातत्यपूर्ण करण्यात येते.

- सुरूवातीस वर्गातील काही विद्यार्थी कार्यक्रमात सक्रियपणे भाग घेण्याचे टाळत होते. मात्र सक्रिय तंत्राचा वापर केल्यामुळे, प्रत्येकाचे विचार व मत, यालाही महत्व आहे, ही जाणीव निर्माण केल्यामुळे विद्यार्थी हे मोकळेपणाने चर्चेत व सहशालेय उपक्रमात सहभागी होऊ लागले आहेत.

- शाळा पातळीवर तसेच वर्ग पातळीवरील शालेय व्यवस्थापनात शक्य तेथे जाणीवपूर्वक विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला जातो.उदा. शाळेत पाण्याची कमतरता आहे व शाळेत जवळपास ६५०

झाडे आहेत.या झाडांच्या संवर्धनासाठी, पाण्याचा पुर्नवापर करण्यासाठी काय करता येईल? असा प्रश्न निर्माण झाल्यावर इ.९ वी च्या विद्यार्थ्यांनी **सेफ्टी टँक मधील पाण्याचा पुर्नवापर** करता येऊ शकेल, अशा उत्तराने शंका निरसन केले. तसेच पूर्ण वर्गाने त्यासाठी मोटर सुद्धा शाळेस उपलब्ध करून दिली.

- आपला मुद्दा अधिक स्पष्टपणे मांडण्यासाठी,संकल्पना स्पष्ट करण्यासाठी विद्यार्थी पूरक माहितीचा शोध घेऊ लागले.त्यासाठी ग्रंथालयीन पुस्तके, वृत्तपत्रे, इंटरनेट, इ.पूरक स्त्रोतांचा वापर विद्यार्थी करू लागले.

- तसेच गटात कार्य करण्यावर भर दिल्यामुळे त्यांच्यामध्ये सामाजिक कौशल्ये,एकमेकांच्या अध्ययन प्रक्रियेला पाठिंबा देणे,इतरांच्या मतांचा आदर करणे यात वाढ झाल्याचे दिसून आले.

- शाळेतील स्वविकास व संघ बांधणीस दिलेल्या महत्वामुळे विद्यार्थी व शिक्षकही स्वपरीक्षण करू लागले.आपल्यातील कमतरता, प्रभावी बाबी, संधी, धोके यांची जाणीव त्यांना झाली. तसेच समवयस्क मूल्यांकनातूनही विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या अचूक स्व-परीक्षणात वाढ झाल्याचे दिसून आले.

शाळेत इंग्रजी विषयासंदर्भात **CLR** (सेंटर लर्निंग रिसोर्सेस) कार्यक्रम व मराठी गणित विषयासाठी **अनुपद** कार्यक्रम दररोज राबविला जातो.यात या विषयांचा सराव लेखी,दृक व श्राव्य माध्यमातून केला जातो. विद्यार्थ्यांना गणितीय आकडेमोड तसेच व्यावहारिक ज्ञान मिळावे, यासाठी 'बाल आनंद मेळाव्याचे' आयोजन करून, त्यात विद्यार्थी स्वत: वस्तु तयार करून विक्रीस ठेवतात.तसेच नफ्या-तोट्याचे गणित प्रत्यक्ष व्यवहारातून शिकतात वर्ग सजावट करतानाही विद्यार्थी स्वत: शालेय विषयांशी संबधित शैक्षणिक तक्ते व तरंगतक्ते स्वत: बनवतात.

- तसेच विद्यार्थ्यांनी स्वतच्या अभ्यासाचे वेळापत्रक तयार केले आहे.स्वयंअध्ययनासाठी सकाळी ८.३० ते ९.३० व संध्याकाळी ८ ते ९ हा वेळ शाळेव्यतिरिक्त ठरवलेला आहे.
- अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत **'दत्तक मित्र'** हा उपक्रम राबवला जातो. ज्यामुळे विद्यार्थी सहका-याच्या मदतीने अध्यापन करण्याचा प्रयत्न करतात.

वर्गखोल्यांची पूर्ण व्यवस्था करणे -

- कोठारी आयोगाप्रमाणे भारताचे भवितव्य हे वर्गाखोल्यामंधून घडत आहे. त्यामुळे वर्गखोल्यांची पूर्ण व्यवस्था अत्यंत महत्वाची आहे. वर्गात गटचर्चा, प्रकल्प सादरीकरण, नाट्यीकरण, इ.साठी वर्गव्यवस्था गरजेप्रमाणे कधी वैयक्तिक तर कधी गटात बदलण्याची मुभा देण्यात आलेली आहे.

- तसेच डिजिटल वर्गासाठी इ. ६वी ते १०वी च्या सर्व वर्गात संगणक,स्पीकर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

- शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी गुणवत्तापूर्ण शैक्षणिक व्यवस्थापन आवश्यक असते. यासाठी सर्व शालेय घटकांमधील सुसूत्रता, समन्वय, सहकार्य आणि परस्पर सांमजस्य जितके अधिक तितके शिक्षणाचे व्यवस्थापन गुणवत्तापूर्ण ठरण्यास मदत होईल यासाठी शिक्षकांना लघूसंशोधन हाती घेण्यास प्रेरित करण्यात आले.या संदर्भात ३ शिक्षकांचे गणित, विज्ञान,व इंग्रजी विषया संदर्भात लघूसंशोधन सुरु आहे.

- इ.६वी ते १० वी च्या प्रत्येक विषयशिक्षकांना आपल्या विषयासंदर्भात ई-लर्निंग शैक्षणित साहित्य संग्रहीत करण्यास सांगण्यात आलेले आहे. तसेच अध्यापनात याचा वापर केला जाईल यांसंदर्भात व्यवस्था करण्यात आलेली आहे.

- तसेच दररोजच्या अध्यापनात व्याख्यान पद्धती व्यतिरिक्त नाटयीकरण पद्धत, संकल्पना प्राप्ती प्रतिमान, उद्गामी व अवगामी पद्धत,सृजनशील अध्यापन पद्धत, प्रश्नोत्तर पद्धत, प्रकल्प पद्धत इ.ज्ञानरचनावादी अध्यापन पद्धतीचा वापर करण्यावर नेहमीच भर दिला जातो.
- शालेय विद्यार्थ्यामध्ये जीवनकौशल्यांची रुजवणूक व्हावी यासाठी शाळेत विविध दिन साजरे केले **व** क्षेत्रभेटीचेही आयोजन करण्यात आले होते.

१.द्वारकाधीश कृषि गोविज्ञान अनुसंधान संस्था, दिवे

२.औद्योगिक प्रशिक्षण संस्था,दिवे,

३.ग्रीन हाऊस,दिवे,

४.रंगाचा कारखाना,दिवे,

५.जीवनवर्धिनी मतिमंद मुलांची शाळा, दिवे,

६.माया केअर सेंटर (वृद्धाश्रम), दिवे इ.

७.आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक हुतात्मा स्मारक भिवडी ता. पुरंदर, जिल्हा पुणे.

आषाढी एकादशी निमित्ताने पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी दरवर्षी शाळेमार्फत **खिचडी वाटपाचा** कार्यक्रम घेण्यात येतो.मुले स्वत: यात उत्स्फूर्तपणे मदत करतात.

शासकीय निवासी शाळा दिवे येथील विद्यार्थ्यानी रक्षाबंधनाच्या निमित्ताने डाळ व कडधान्यापासून राख्या तयार केल्या होत्या.तसेच सर्व विद्यार्थ्याना राखी बांधण्यात आल्या.यात काही विद्यार्थ्यांच्या बहीणींनी इतर मुलांनाही राखी बांधल्या.

विद्यार्थ्यांना गड किल्ल्यांची माहिती व्हावी यासाठी किल्ल्यांना भेटी देणे,तेथील इतिहास विद्यार्थ्यांना सांगणे इ.गोष्टी हेतुपूर्वक शाळेत केल्या जातात. यामध्ये चालू वर्षी पुढील किल्ल्यांना भेटी देण्यात आलेल्या आहेत. त्यामधून विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक वारशाची जपणूक हे मूल्य रुजवता आले.

१.'मल्हारगड', सोनोरी, दिवे,

२.'सिंहगड', पुणे,

३.'शिवनेरी' जुन्नर, पुणे.इ.

अशा प्रकारे व विद्यार्थी विकासासाठी विविध उपक्रमांची अंमलबजावणी करून शालेय विकास साधण्यात येतो.

धन्यवाद

करजवकर प्रांजली अनंत

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुसेरी नं. 2,तालुका.खेड, जिल्हा.रत्नागिरी

शाळा एक अध्ययन संस्था -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सुसरी नं. 2 ही खेड शहरापासून 4 कि.मी. अंतरावर असणारी इयत्ता 1 ली ते 5 वी पर्यंतची शाळा आहे. या शाळेचा पट मुलगे 19 व मुली 18 असे एकूण 37 आहेत. या शाळेची वैशिष्ट्यपुर्ण बाब म्हणजे या शाळेत इ. 1 ली पासून ते इ. 5 वी पर्यंतच्या सर्व मुलांना स्वयंअध्ययन करण्याची एक उत्तम सवय. शाळा प्रवेशापासुनच शाळेची मुख्याध्यापिका मी व माझ्या सहकारी शिक्षिका सौ. महाजन मॅडम, आम्ही नियोजन व कार्यवाही केली आहे.

शाळेतील सर्व मुलांना शैक्षणिक साहित्यांचा वापर कसा करावा. त्या पासुन अध्ययन सरावासाठी पूरक वातावरण निर्मिती याबाबत पोषक वातावरण शाळेमध्ये तयार केलेले आहे. चित्र तक्ता, शब्दपट्टी, वाक्यपट्टी इ. चा वापर अध्ययनासाठी मोठ्या प्रमाणात आम्ही करतो. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना जेथे आहेत तेथून पुढे जाण्यासाठी प्रेरक वातावरण निर्मिती होताना दिसून आली. शाळेची दृष्टी विज्ञानाला अनुसरून असलेली आहे. कारण ही शाळा डिजीटल आहे. एका वर्गखोलीमध्ये प्रोजेक्टरच्या साहाय्याने अध्ययनासाठी नियोजन व कार्यवाही केली आहे तर दुसरी वर्गखोली ही संगणकाच्या साहाय्याने डिजीटल झालेली आहे. या सर्व बाबींचा वापर विद्यार्थी स्वत: अध्ययनासाठी करतात. त्याच प्रमाणे विद्यार्थी मोबाईलद्वारे गतीने शिकत आहेत, इयत्ता पहिलीपासुनचे विद्यार्थी यु टयुब वर जावून आपला पाठ शोधून त्याबाबतचे व्हिडीओ पाहणे , त्यावर स्वाध्यायाबाबत अध्ययन करतात. सर्व विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाद्वारे अध्ययनासाठी एक उत्तम संधी शाळेने दिली आहे.



डीजिटल शाळा

शाळेचे ध्येय :- शाळेतील विद्यार्थी प्रगत होवून व्यावहारिक ज्ञानसंपन्न होण्यास प्रवृत्त करण्यासाठी उत्तम व्यासपीठ शाळेने देऊन विद्यार्थी घडवण्यासाठी उत्तम नियोजन केलेले आहे शाळा विकास नियोजन व अंमलबजावणी मध्ये शाळेचा भौतिक विकास व ज्ञानात्मक विकासासाठी सुबद्ध नियोजन केले आहे, भौतिक विकासात वर्गखोली विद्यार्थ्यांना विचार प्रवर्तक करण्यास भाग पाडेल या हेतूने तयार केलेली आहे. तसेच विद्यार्थ्यांना क्रियात्मक अध्ययन व अधिक प्रेरणेसाठी विविध शैक्षणिक साहित्यांची मांडणी केलेली आहे. त्याद्वारे विद्यार्थी प्रत्येक वेळी रममाण झालेले आहेत. तसेच प्रत्येक वर्गात तंत्रज्ञानाद्वारे शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध कस्न दिलेल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांनी या सर्व साधनांचा वापर स्वत: करून शिकण्यासाठी नियोजन केलेल आहे.प्रोजेक्टर, संगणक, मोबाईल, सांऊड सिस्टीम, विविध शैक्षणिक साहित्य यांचा उत्तम संगम शाळेत आहे..

शाळेच्या समोरच मैदान असून विद्यार्थ्यांना अध्ययनाबरोबरच शारिरीक विकासास चालना मिळावी यासाठी कवायत, संचलन, हे प्रकार शिकवले जातात व सतत सरावही करून घेतला जातो.. विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहाची सुविधा, पाण्याची व्यवस्था, वीज इ. सर्व

सुविधा उपलब्ध आहेत. शाळा परिवर्तन तत्वांमध्ये सगळ्यात महत्त्वाचे शिक्षक, पालक विद्यार्थी याचा समन्वय हे अत्यंत महत्त्वाचे सूत्र , आमच्या शाळेत दिसून येते.

शिक्षकांनी विद्यार्थी विकासासाठी केलेले विविध नाविन्यपूर्ण उपक्रम विद्यार्थ्यांना प्रेरणा देतात. शाळेत विदयार्थी विद्यार्थीनी यांच्या समानता प्राप्तीसाठी वर्षभरामध्ये विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचा समावेश दिसून येतो.

त्याचप्रमाणे शाळा उन्नतीसाठी समाजाचा सहभाग हा अत्यंत प्रेरक स्वरूपाचा. असल्याचे दिसून आले. शाळेसाठी समाजाची असणारी बांधिलकी मोलाची आहे.



शालेय संस्कृती - शालेय वातावरण - कार्यसंस्कृती -

शाळेतील असणारी शिस्त व संस्कृती अतिशय शिस्तबद्ध व प्रेरणादायी असल्याची दिसून आली. शाळेतील शालेय वातावरण, विद्यार्थी शिस्त, शिक्षकांचा अध्यापनाचा ध्यास या सर्व बाबींचा उत्तम समन्वय या ठिकाणी दिसून येतो. शाळा विविध सामाजिक कार्य, लोकजागृती व जनजागृती बाबत विविध उपक्रमाद्वारे सतर्क असते.

शाळेतील सहशालेय उपक्रमातून निसर्ग पर्यावरण, अंधश्रध्दा निर्मुलन , मुलगा, मुलगी समानता, प्लास्टीक बंदी, स्वच्छता याबाबत नाटक, परिसंवाद, नृत्य या द्वारे मनोरंजनाबरोबर जनमानसात संदेश देताना दिसून येतात. सहशालेय उपक्रमातून विविध

सामाजिक विषयाची समज सर्व विद्यार्थ्यांना या विविध उपक्रमातून मिळाल्याचे दिसुन येते. यामुळे शालेय वातावरण आनंदी, शैक्षणिक उन्नतीस वातावरण प्रेरणादायी असल्याचे दिसून येते, विद्यार्थ्यांच्या परिपाठामधून शालेय कार्यसंस्कृतीचे उत्तम दर्शन घडते. अध्यापन अध्ययन प्रक्रियेत बदल घडवून आणणे यासाठी शाळेने उत्तम पोषक वातावरण तयार केले आहे.

शालेय अध्यापन, अध्ययन प्रक्रियेमध्ये विकासात्मक बदल झालेला आहे. अध्यापन ज्ञानरचनावादी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यासाठी शाळा तत्पर असल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर निश्चित करून विद्यार्थ्यांना त्याप्रमाणे अध्ययन व अध्यापनामध्ये सकारात्मक बदल शाळेने केला आहे आणि लोकसहभागही वाढविला आहे. विद्यार्थ्यांची गरज ओळखून त्याप्रमाणे त्यांना अध्ययनास प्रवृत्त करणे तसेच अध्ययन करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेवून त्याप्रमाणे प्रत्याभरण करताना दिसून येते. शाळेचे स्वयंमुल्यांकन शाळा सिद्धी अंतर्गत शाळेने केलेले असून सात क्षेत्र सर्व माणके यांचा आढावा घेवून 138 पैकी गुणांकन करून शाळा अ श्रेणीमध्ये निश्चिती स्वंयमूल्यांकनाद्वारे केलेले आहे. त्यामध्ये शाळा भौतिक सुविधाबाबत असणारा शालेय आलेख उपलब्धता, उपयुक्तता यावर चांगले नियोजन केलेले दिसून आले. विद्यार्थ्यांची सद्यस्थितीतील असणारी गुणवत्ता व त्यामध्ये करून आणावयाचा बदल याबाबत विस्तृत असे नियोजन केलेले आहे. शिक्षकांची भूमिका व कार्य तसेच शालेय स्तरावर असणारे कार्य, मुख्याध्यापक -शाळा कुटुंब प्रमुख म्हणून प्रमुख भुमिका याबाबत जागरुकता तसेच मुल्यमापन शाळा स्तरावर अत्यंत मोलाची भुमिका बजावणारे साधन यांचेसुद्धा स्वयं मुल्यमापनात काम केलेले आहे. इयत्ता पहिली मध्ये मूकबधीर विद्यार्थीनी दाखल झालेली आहे. सुरुवातीला काहीच समज नसल्याचे दिसून आले. पण हळूहळू तीला समज यायला लागली आहे. तसेच लोकसहभाग, SMC सहभाग अतिशय उत्कृष्ट असल्याचे दिसुन येते कारण येथील विविध कार्यक्रम या सर्वाच्या सहकार्याने अतिशय हिरीरीने भाग घेवूनच संपन्न करतात. लोकसहभागाद्वारे विद्यार्थी गरजा पुर्ण करण्यात लोकसहभाग अग्रेसर असल्याचे दिसून आले. शाळेच्या गरजा लक्षात घेवून

शाळेसाठी सहाय्य पालक व गावकरी करतात. अग्रणी शाळा व शाळा विकासामध्ये पालक व इतर भागधारक शिक्षण प्रेमी यांचा वाटा अत्यंत अनमोल असा आहे.

जि.प.प्रा.शाळा सुसेरी नं. 2 शाळेत कोणताही कार्यक्रम असला तरी त्याचे नियोजन व कार्यवाहीसाठी पालक व शिक्षणप्रेमी यांचा पुढाकार नेहमीच अग्रेसर असतो. शालेय सांस्कृतिक कार्यक्रम असो किंवा सांस्कृतिक कार्यक्रमाची सर्व तयारी असो यामध्ये अत्यंत प्रभावशाली कार्यवाहीसाठी नेहमीच अग्रेसर असल्याचे दिसून येतात. शाळेसाठी एक दिवस कार्यक्रमात सर्व पालक शाळा व्यवस्थेसाठी व शालेय गरजा पुर्णत्वासाठी एक दिवस देतात. शालेय स्वच्छता, नीटनेटकेपणा, सामाजिक संदेश देणारे सुभाषित तसेच गावातील लोकांमध्ये स्वच्छतेसंबंधी जनजागृती करण्याचे काम शाळा शिक्षक, विद्यार्थी यांच्या मार्फत केले जाते.

शाळा डिजीटल करण्यामागे गावातील सर्व पालक ग्रामस्थांचे योगदान मिळाले आहे. तसेच शाळेच्या भौतिक सुविधा अद्ययावत ठेवण्यासाठी पालक ग्रामस्थांची वेळोवळी मदत होत असतानाचे दिसून आले. शालेय गुणवत्ता वाढीसाठी लागणारे साहय्य पुरेपूर मिळाल्याचे दिसून आले व त्याद्वारे शाळेचा विकास होण्यासाठी शिक्षकांबरोबरच ग्रामस्थ व पालक यांचाही वाटा मोठा असल्याचे दिसून आले. त्यामुळे शाळा विकासासाठी पालक ग्रामस्थ नेहमीच पुढाकार घेतात.

शाळास्तरांवर नवनविन आव्हाने येतात, या आव्हानांना बगल देण्यासाठी शाळेत विविध पद्धतीचा अवलंब केला जातो. अध्ययन, अध्यापन, विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तराबाबत असो, शालेय भौतिक सुविधा असो किंवा अध्ययनात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांना पूरक मार्गदर्शन, प्रशासकीय कामकाज सुलभ होण्यासाठी पूर्वनियोजन किंवा बहुवर्ग अध्यापन पध्दतीचा अवलंब, या सर्व बाबींना योग्य सुलभता देण्यासाठी शाळेतील शिक्षकांनी योग्य नियोजन करून नाविन्यपूर्ण मार्ग शोधण्यास नेहमीच प्रयत्नशील असल्याचे दिसुन आले. विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी वेळापत्रकाबाबत त्यांना जे आवश्यक आहे त्या पध्दतीने नियोजन,

वर्गखोल्या बोलक्या केलेल्या असुन विविध शैक्षणिक साहित्य भरपूर उपलब्ध असुन विद्यार्थी त्या साहित्याचा वापर करून गुणवत्ता वाढीसाठी नेहमी प्रयत्नशील असतात. शालेय गुणवत्ता सुधारण्यासाठी विदयार्थ्यांला जेथे आवश्यक आहे तेथे मार्गदर्शन याप्रमाणे शाळा विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी सदैव कटीबध्द आहे.

धन्यवाद

दिलीप भाऊराव जेऊघाले

जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय, तालुका.चिखली,जिल्हा.बुलडाणा.

ई मेल आयडी - dybj14763@gmail.com

प्रास्ताविक -

जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय, चिखली येथे काही विद्यार्थी नियमित शाळेत येत नाही. त्याचा परिणाम म्हणून विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण वाढले. प्रत्येक शाळेला ग्रंथालय असते. ग्रंथालयात कादंबरी, काव्यसंग्रह, ऐतिहासिक ग्रंथ असतात. ग्रंथालय हे शाळेचे भूषण असते, ग्रंथालयाच्या दर्जावरून शाळेची गुणवत्ता व प्रत समजू शकते. मुलांच्या संख्येच्या प्रमाणात पुस्तकांची संख्या असावी म्हणजे मुलांना विविध पुस्तके निवडण्यात वाव मिळतो. वाचन आवडीनुसार ग्रंथालय विकास पावत असते. अर्ध्या तासात पुस्तक वाचून संपवता येईल अशा पुस्तकांचा संग्रह गंथालयात असल्यास रिकाम्या तासाला मुलांना गुंतवून ठेवता येते, अशा तासाचा वेळ वाया जात नाही. मुलांना मनोरंजनाचा आनंद लुटता येतो अशी विविध प्रकारची व विविध विषयावरची पुस्तके अधिक संख्येने उपलब्ध व्हावीत. शाळेत विद्यार्थीसंख्येनुसार पुस्तकांची संख्या कमी होती. विदयार्थ्यांना पुस्तके वाटण्यात अनेक समस्या येत होत्या. मुख्याध्यापकांसमोर ग्रंथालयात पुस्तकांची संख्या वाढविण्याची समस्या आहे. हे एक प्रकारने मोठे आव्हान शाळेसमोर होते. तसेच ग्रंथालयासाठी स्वतंत्र खोली, पुरेसे फर्निचर असणे आवश्यक होते. तसेच पुस्तके ठेवण्यासाठी कपाटांची संख्या पुरेशी असणे आवश्यक होते. जेणेकरून पुस्तकांची देवाणघेवाण व निगा ठेवणे सोयीचे जाईल.

शाळेची दृष्टी आणि ध्येय -

1) समृद्ध ग्रंथालयाद्वारे विद्यार्थ्यांना पुस्तके वाचण्याची आवड वृद्धिंगत करणे व त्यांच्या ज्ञानामध्ये भर टाकून त्यांचा सर्वांगीण विकास साधणे.

2) थोरामोठ्यांच्या चरित्रातून विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे ,जगण्याची दृष्टी निर्माण करणे.

3) संकटावर मात करण्याची क्षमता निर्माण करणे.

4) विद्यार्थी संस्कारक्षम व राष्ट्रप्रेमी बनवणे.

5) आजच्या विद्यार्थ्यांमध्ये पुढील काळाची आव्हाने पेलण्याची क्षमता निर्माण करणे.

शाळा विकासासाठी केलेले नियोजन व अंमलबजावणी -

स्वतंत्र ग्रंथालय निर्माण करण्यासाठी खूप दिवसांपासून टाकाऊ वस्तूंनी भरलेली वर्गखोली होती. सदर खोली रिकामी करण्यासाठी यापूर्वी अनेकवेळा प्रयत्न करण्यात आले होते परंतु ते शक्य झाले नाही. मुख्याध्यापाकांसाठी शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम अंतर्गत झालेल्या प्रशिक्षणामधील चर्चेनुसार सदर प्रश्न हाताळला असता त्यामध्ये यश मिळाले. सदर प्रश्न शाळेतील सर्व शिक्षकांसमोर मांडला त्यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार शाळा व्यवस्थापन समिती मार्फत प्रशासनाकडे लेखी स्वरुपात पाठपुरावा केला. सर्वांच्या सहकार्याने त्यातील साहित्य इतरत्र हलवणे व त्यामध्ये ग्रंथालयाची मांडणी करणे यासाठी शाळेतील दोन जबाबदार शिक्षकांची नेमणूक करण्यात आली. प्रत्येक दिवशी अध्यापनास अडथळा न आणता शेवटच्या दोन तासिकांमध्ये काही सक्षम विद्यार्थ्यांच्या मदतीने जबाबदारी दिलेल्या शिक्षकांनी गरजू विद्यार्थ्यांना कामाचा मोबदला देऊन हे काम शांतपणे सुरक्षितरित्या नियोजनपूर्वक पार पडले. त्यामुळे त्यांनी आनंदाने काम पूर्ण केले. भंगार साहित्य भरलेल्या खोलीमधून काही नादुरुस्त मोडकी लाकडी कपाट तसेच प्रयोगशाळेचे मोठे टेबल, लोखंडी खुर्च्या आणि इतर शालेय उपयोगी साहित्य मिळाले.वरील साहित्य कमी खर्चात दुरुस्त करून ग्रंथालयासाठी त्याचा वापर करण्यात आला.इतर टाकाऊ साहित्य लिलावाद्वारे निर्लेखित करण्यासाठीचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर केलेला आहे. सद्यस्थिती मध्ये सदर साहित्य बाजूस काढून ठेवलेले आहे.

विविध ग्रंथांचा परिचय विद्यार्थ्यांना व्हावा म्हणून प्रार्थनेच्या वेळी मूल्यशिक्षणाच्या तासिकेत दर दिवशी एका शिक्षकाकडे ग्रंथ परिचय करून देण्याने काम सोपविण्यात आले. पुस्तकातील महत्त्वाच्या गोष्टी, कथा, कविता विद्यार्थ्यांना आवडू लागल्या. त्यांचा परिचय होऊ लागला. साहजिकच विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण झाली. आवडीची गोष्टीची पुस्तके वाचल्यामुळे त्यांच वाचनही सुधारले.

शिक्षकांची बैठक बोलावून त्यामध्ये चर्चेअंती सर्वानुमते असे ठरले की, प्रत्येक शिक्षकाने त्यांचे स्वतःचे घरी वाचून झालेली पुस्तके शालेय ग्रंथालयाला सप्रेम भेट द्यावी.त्यामुळे ग्रंथालयातील पुस्तकांच्या संख्येत भर पडेल शिक्षकांनी या योजनेस उत्तम प्रतिसाद देऊन ग्रंथालयासाठी पुस्तके दान दिली. तसेच शिक्षक समितीच्या माध्यमातून पालकांच्या सहकार्याने गावातून काही जुनी पुस्तके मिळवून शालेय ग्रंथालयात पुस्तकांची संख्या वाढवण्यात आली. शाळेमध्ये ग्रंथालय समिती निर्मिती करून या समितीने नवीन पुस्तकांच्या निवडी बरोबर शिक्षकांनी कोष व संदर्भ साहित्याचा डोळसपणे उपयोग करणे व विद्यार्थ्यांनी नियोजनपूर्वक अवांतर वाचन करणे याकडे लक्ष पुरवावे असे सर्वानुमते ठरले. ग्रंथालयामध्ये आणखी पुस्तकांची भर पडावी यासाठी आपली काही प्रयत्न करता येईल काय याची शिक्षकांशी चर्चा करून सभेमध्ये राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत काही पुस्तके विकत घेण्याचे ठरविले. त्यासाठी विद्या समितीच्या बैठकीमध्ये ग्रंथालयासाठी पुस्तके घेण्याचा ठराव मंजूर करून पुस्तके विकत घेण्याचा निर्णय झाला, अशा रीतीने आणखी काही पुस्तकांची भर ग्रंथालयामध्ये पडली, ग्रंथालयाची व्यवस्था पाहण्यासाठी एका शिक्षकाची नेमणूक करुन त्यांच्या मदतीसाठी एक सेवक देऊन त्यांच्याकरवी ग्रंथालयाची स्वच्छता , पुस्तकांची काळजी घेणे इत्यादी कामे करण्यासाठी शिक्षकांना मदत होत आहे.

दरवर्षी विशिष्ट प्रमाणात ग्रंथालयातील पुस्तके वाढतील अशी काळजी घेण्यात येत आहे. याकरिता टर्म फी मधून व शाळेच्या अनुदानातून निश्रित प्रमाणात दरवर्षी ग्रंथालयाकरीता खर्च करण्याची योजना आखण्यात आलेली आहे. तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या वाढदिवशी ग्रंथ भेट देण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. ग्रंथालयात आवश्यक तेवढया अलमारी, टेबले ,खुर्च्या,स्टूल,सूचनाफलक आधी असावे

याकरिता देखील योग्य त्या प्रमाणात दरवर्षी खर्च करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. ग्रंथालयात विविध लेखकांची छायाचित्रे व थोडक्यात माहिती लावण्यात आलेली आहे.

माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य -

शाळा मुलांना ज्ञानदान करते परंतु त्याचबरोबर मुलांची भावी जीवन समृद रहावे महणून काही संस्कारही करीत असते. मुलांच्या मनाच्या जडणघडणीत शाळेला पालकांच्या बरोबरीने किंबहुना त्यापेक्षाही अधिक सहभाग असतो. अध्ययन कौशल्य विचारांची देवाण –घेवाण इत्यादी गोष्टीचा शाळेतच पाया घातला जातो. मुले शाळा सोडुन गेल्यावर व त्यानंतर आपले जीवन जगत असताना ती शाळेतील जीवनकाल व शाळेत झालेले संस्कार विसरु शकत नाहीत यात मुख्याध्यापक व शिक्षक यांचा हातभार लागलेला असतो. हा संस्काराचा धागा पकडून माजी विद्यार्थ्यांना आवाहन केले आणि त्यांच्याकडून निश्चित चांगला प्रतिसाद मिळाला. त्यांनाही आपली शाळा उत्तरोत्तर प्रगती पथावर जावी अशी इच्छा असल्यामुळे यानंतरही त्यांच्याकडून आलेल्या योजनांवर विचार विनिमय केल्यास विकास निधी उभारणी कामी त्यांचे सहकार्य मिळू शकेल,असा विश्वास निर्माण झाला.

काही सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संस्था व सहकारी संस्था यांना आवाहन केल्यास समाजामध्ये काही व्यक्ती आर्थिक परिस्थितीने संपन्न असतात त्यापैकी काहींना सामाजिक बांधिलकीची जाणीव असते तर या बांधिलकीची पूर्तता करण्यासाठी ते काही रक्कम देणगी म्हणून देत असतात. सहकारी संस्था आपल्या नफ्यातील काही हिस्सा समाजोपयोगी कार्यासाठी कर्तव्यभावनेने राखून ठेवतात. शालेय समिती सदस्यांसोबत अशा व्यक्ती व संस्था यांच्याशी संपर्क साधल्यास शैक्षणिक कार्यासाठी निधी उपलब्ध होऊ शकतो म्हणून तेही नियोजन करण्यात आलेले आहे.

लोकसंपर्क -

शाळा समाजाचा घटक आहे. लोकांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी शाळा महत्त्वाचे कार्य करू शकते. शिक्षणाच्या रथाची शासन, पालक, शिक्षक , शाळा चालक ही चार चाके आहेत. या रथातून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी सारथी म्हणून मुख्याध्यापक काम करतो. समाजात निरनिराळे उपक्रम सादर होतात अशा उपक्रमाच्या माध्यमातून संस्थेने लोकसंपर्क वाढविला आहे. त्यांना शालेय विकासासाठी हातभार लावण्याचे आव्हान करत आहोत.

शाळेतील शिक्षकांचा आर्थिक सहभाग :-

आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे प्रथम शिक्षकाकडून ग्रंथालयासाठी मदत करण्याचे नियोजन केले. त्यानुसार शिक्षकांनी आपले वाढदिवशी इतर खर्च न करता सर्वांनी पैसे जमवून त्या पैशातून पुस्तके खरेदी करण्याचे नियोजन करून अंमलबजावणी केली.

शाळा प्रगतीची अवलंबिलेली तत्वे -

ज्याप्रमाणे आपण शाळेमध्ये मुला-मुलींना गणवेश वाटप करताना समानतेचे तंत्र वापरतो त्याच प्रमाणे शाळेच्या वाचनालयात मुला-मुलींना एकत्र कक्षात बसून त्यांना वाचन करता येईल अशी व्यवस्था केलेली आहे. ज्याप्रमाणे मुला-मुलींना वाचनाच्या वेळामध्ये समान संधी देतो त्याचप्रमाणे मुले-मुली आपापसात पुस्तकांची देवाणघेवाण करण्याची संधी दिली जाते. सांस्कृतिक कार्यक्रम किंवा जोड्या लावणे, प्रश्नमंजुषा कार्यक्रमांमध्ये मुलांमुलीमध्ये प्रश्न उत्तर स्पर्धा तसेच लेखकाची ओळख पुस्तकाची नावे इत्यादी कार्यक्रमामध्ये सर्वांचा सहभाग घेतला जातो. वाचनालयातर्फे भाषण स्पर्धा निबंध स्पर्धा आयोजित करून प्रत्येक विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाचा विकास होतो तसेच प्रत्येकाला समान संधी प्राप्त होते . शहरातील प्रसिद्ध ग्रंथालयाला भेट देऊन तेथील कार्यपद्धती समजून घेणे यासाठी विद्यार्थ्यांना एकत्रितपणे ग्रंथभेट आयोजित केली जाते ग्रंथालयामध्ये पुस्तकाची ठेवन व रचना विद्यार्थी समजून घेतात. ग्रंथदिंडी आयोजित करून सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग

घेतला जातो. कवी संमेलन, साहित्य संमेलन त्याचप्रमाणे प्रसिद्ध कवी/ लेखक यांची मुलाखत घेतल्या जाते. ग्रंथालयात अग्निशमन सुविधा अत्यंत आवश्यक आहे सुरक्षित राहण्यासाठी कपाटामध्ये गोळ्या औषध फवारणी ची व्यवस्था करणे आवश्यक आहे. ही तरतूद करण्यात येत आहे .औषध फवारणी मुळे पुस्तकांची वाळवीपासून सुरक्षित राहते. वाचनालयाच्या सहकार्यासाठी गरजू व गरीब विद्यार्थांना त्यांच्या फावल्या वेळेत काम देऊन शाळेची व त्यांची आर्थिक गरज भागवली जाते. आपल्या देशाचे माजी राष्ट्रपती डॉक्टर अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त शाळेत १५ नोव्हेबर हा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. त्या दिवशी प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांना त्यांच्या कुवतीप्रमाणे पुस्तके वाचायला दिले जातात. विशेष करून वर्ग 6 ते 8 च्या विद्याथ्यांना द्विभाषिक पुस्तके वाचायला दिले जातात. जेणेकरून काही हिंदी भाषिक विद्यार्थ्यांना पुस्तके वाचण्यास अधिक सोयीचे जाते.

वाचन प्रेरणा दिन



शालेय वातावरण व कार्यसंस्कृती -

संपूर्ण शैक्षणिक सत्रामध्ये दिन विशेष हा कार्यक्रम उपक्रमाच्या स्वरुपात घेतला जातो. विज्ञान दिन, जागतिक पर्यावरण दिन, ओझोन दिन , बाल दिवस तसेच इतर थोर पुरुष जयंती व पुण्यतिथी निमित्त विद्यार्थी स्वतःहून कार्यक्रमाचे आयोजन करतात, त्यासाठी ग्रंथालयामधील पुस्तकांचा आधार घेतात. शाळेत ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पठण करताल व दरवर्षी डिसेंबर महिन्यामध्ये किरण देवी सारडा प्रतिष्ठान नाशिक तर्फे आयोजित राज्यस्तरीय ज्ञानेश्वरी ग्रंथावर आधरित स्पर्धा परीक्षेमध्ये भाग घेतात. या शाळेचे विद्यार्थी दरवर्षी २५०० रुपये किमतीची बक्षीसे मिळवतात. यावर्षी सुद्धा या शाळेतील ३ विद्यार्थ्यांनी अशी पारितोषिके मिळवली. विज्ञान दिनाच्या दिवशी शाळेमध्ये विज्ञान दिन अनोख्या पद्धतीने साजरा केला जातो. त्यादिवशी परदेशी शास्त्रज्ञांची चरित्रे, भारतीय शास्त्रज्ञांची चरित्रे , त्यांनी लावलेल्या शोधांची पुस्तके विद्यार्थ्यांना वाचावयास दिली जातात. निबंध स्पर्धा आयोजित केली जाते. शालेय विज्ञान स्पर्धा आयोजित करून बाल वैज्ञानिकांचा शोध घेतला जातो तसेच दर शनिवारी साने गुरुजी यांच्या श्यामची आई या पुस्तकातील एखादा प्रसंग वाचून त्यातील मूल्ये विद्यार्थ्यांवर बिंबवले जातात. याप्रकारे त्यांच्यावर संस्कार केले जातात. विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी असलेल्या पुस्तकांमधून आवडलेल्या कविता महत्त्वाचे सुविचार स्वतंत्र वहीत लिहून आणायला सांगितले जातात. वृत्तपत्रातील मूल्यांवर आधारित कात्रणे विद्यार्थी कापून एका वहीत चिकटवतात . यामुळे विद्यार्थी दररोज वर्तमानपत्राच्या संपर्कात येतो वाचन करतो याविषयीची त्याला आवड निर्माण होते.अशा रीतीने तो जगातील चालू घडामोडी वाचून जगाच्या संपर्कात राहतो, समाज सुधारक सत्संगी ज्ञानवंत यांना शालेय कार्यक्रमामध्ये बोलवून विद्यार्थ्यांना त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ दिला जातो. गुणवंत विद्यार्थ्याचा त्यांच्या हस्ते सन्मान केला जातो, दरवर्षी शाळेची ऐतिहासिक सहल काढून स्थळांना भेट देऊन सांस्कृतिक माहिती मिळवली जाते. विद्यार्थ्यांना काही म्हणी किंवा वाक्य तयार

करायला सांगितले जातात उदाहरणार्थ - ग्रंथ हेच गुरु , वाचाल तर वाचाल, वाचनाचे नाव म्हणजे ज्ञानाचा झरा.



स्व विकास व त्यातून शाळेचा विकास आणि संघ बांधणी -

ग्रंथालय हे शाळेचे भूषण आहे. ग्रंथाचे महत्त्व आपल्या जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्व आहे . संतांनी घालून दिलेल्या आदर्श नुसार जीवनमूल्यांची आचरण केल्यास स्वतःचाही सर्वांगीण विकास होतो. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो.विद्यार्थ्यांमध्ये जीवन मूल्य रुजविण्यासाठी ग्रंथालय फार मोठा हातभार लावतात. मुख्याध्यापकांचे नेतृत्व विकास या प्रशिक्षणानंतर मुख्याध्यापकांनी त्यांच्या कार्यशैलीत बदल केला. सुरुवातीला मुख्याध्यापक केवळ मार्गदर्शकाची भूमिका करायचे त्यामुळे शिक्षक त्यांच्यापासून दूर राहायचे. परंतु आता मुख्याध्यापकांनी शिक्षकांची सभा बोलून त्यांना विषयाचे गांभीर्य लक्षात आणून सर्व शिक्षकांना त्यांची जबाबदारी सोपवली आहे .त्यानुसार शिक्षक दिलेले काम पूर्ण करण्यासाठी आता उस्फूर्तपणे सहभाग देतात. शिक्षकांना येणाया अडचणी सोडवण्यासाठी मुख्याध्यापक तयार असल्याने शिक्षकांनाही काम करण्यास उत्साह वाटतो. ग्रंथालय समृद्ध करणे ही बाब शाळा

समितीच्या सदस्यांना लक्षात आणून दिली. सभेमध्ये त्यांना ही बाब अतिशय महत्त्वाची वाटली त्यामुळे त्यांनी या कामासाठी हिरीरीने सक्रीय सहभाग घेतला प्रत्येक सदस्याने समाजातील व्यक्तींना याची माहिती दिली व अप्रत्यक्षपणे समाजाचा सुद्धा शाळेच्या प्रगतीसाठी चांगला फायदा झाला. शाळेमध्ये काही नवीन घडतंय या उद्देशाने समाजातील मंडळी सांस्कृतिक कार्यक्रमाला अधिक संख्येने जमा होऊ लागली. याप्रमाणे मुख्याध्यापकाला शाळेच्या प्रगतीसाठी समाजाचा उपयोग करून घेता आला.

शाळेतील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत झालेला बदल -

दररोज विद्यार्थी ग्रंथालयात जात असल्यामुळे त्यांना आता संदर्भ साहित्य हाताळण्याची सवय लागली आहे. जे साहित्य त्यांना हवे आहे ते ग्रंथालयातून उपलब्ध करतात, अन्यथा शहरातील इतर ग्रंथालयांमध्ये जाऊन शोधायला लागले आहेत .विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील ग्रंथ वाचण्याची सवय व आवड निर्माण झाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये चौकसपणा निर्माण झाला. ग्रंथालयांमध्ये न मिळणारी माहिती मिळवण्यासाठी तो आता विज्ञान व तंत्रज्ञानाचा आधार घ्यायला लागला आहे . जी माहिती हवी आहे ती माहिती मिळवण्यासाठी इंटरनेटचा वापर करून मिळवू लागला आहे. शिक्षक आता अध्यापन करण्यासाठी पूरकवाचन साठी इंटरनेटचा उपयोग करु लागला त्यामुळे अध्ययन-अध्यापन क्रिया अधिक सुलभ होऊ लागली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना प्रक्रिया सुलभ तसेच मनोरंजक वाटू लागली यामुळे विद्यार्थ्यांचे गैरहजेरीचे प्रमाण कमी होऊ लागले आणि पर्यायाने विद्यार्थ्यांची गळती थांबली. विद्यार्थी परिपाठामध्ये आपले विचार मांडू लागले तसेच कार्यक्रमांमध्ये भाग घेऊ लागले. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक रंजक होऊ लागली विद्याध्यांची परस्परांना सहकार्य करण्याची वृत्ती वाढली त्यामुळे विद्यार्थ्यांना विषय समजणे सोपे झाले.

शाळेसाठी पालक व समाजाचा सहभाग -

ग्रंथालय समृद्ध करण्यासाठी पालकांची सभा बोलावण्यात आली त्यांना ग्रंथालयाचे महत्त्व पटवून देण्यात आले. ग्रंथालयांमधून त्यांच्या मुलांना मिळणाऱ्या ज्ञानाचे महत्त्व पटवून देण्यात आले. थोर

पुरुषांच्या चरित्रातून मिळणारे संस्कार शास्त्रज्ञांची संशोधक वृत्ती यातून घडलेले जीवन यातूनच आपला पाल्य घडणार आहे सुसंस्कारित होणार आहे हे महत्व पटल्यामुळे ग्रंथालयातील ग्रंथाची संख्या वाढणे गरजेचे आहे हे महत्व पालकांना पटले. त्यातून काही पालकांनी स्वयंस्फूर्तीने त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या मुलांच्या वाढदिवसानिमित्त काही रोख रक्कम त्याच प्रमाणे स्वतः ग्रंथ खरेदी करून ग्रंथालयाला सप्रेम भेट दिले. या गोष्टीचे अनुकरण इतर पालक, शाळा समिती सदस्य यांनी सुद्धा स्वयंस्फूर्तीने स्वतःच्या आई-वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुस्तक खरेदीसाठी सहकार्य केले. काही पालकांनी श्राद्ध , वाढदिवस यावर होणारा अनाठायी खर्च न करता ती रक्कम शाळेला भेट दिली. त्याचप्रमाणे गावातील सधन व्यक्ती ,प्रतिष्ठीत व्यक्ती यांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन त्यांना या विषयाचे महत्त्व पटवून देण्यात आले व त्यातून त्यांनी सुद्धा शाळेला त्यांच्या परीने ग्रंथ भेट दिले. अशा रीतीने पालकांचा सहभाग वाढत गेला.

शालेय संघटन व्यवस्थापन व प्रशासनाची कार्यवाही -

शालेय स्तरावर सर्व शिक्षकांना स्वतःच्या बेतनातून ग्रंथालयाच्या समृद्धीसाठी स्व इछेनुसार रकमेचे आव्हान करण्यात आले त्यातून सर्व शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला त्यांनी आपल्या अर्ध्या दिवसाचे वेतन ग्रंथालयाला दान स्वरुपात दिले. त्यामागे असा उद्देश की आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे आपल्याला समाजामध्ये जाऊन पालकाकडून काही अपेक्षा करता येईल विद्यार्थ्यांनी सुद्धा ग्रंथालय समृद्धीसाठी त्यांच्या आवडीचे एक पुस्तक खरेदी करून शाळेच्या ग्रंथालयात भेट दिले. पुस्तक देवाणघेवाणीसाठी विद्यार्थांचे गट तयार करून त्यांचा गट प्रमुख तयार करून तो गट प्रमुख शिक्षकाला मदत करू लागला त्यामुळे शिक्षकांचे कार्य सुलभ झाले. सर्व उपक्रमांमध्ये सर्वांना सहभागी करुन व्यक्ती व्यक्तींमधील संघर्ष जाणून घेऊन त्यांचे निराकरण केले. नियमित बैठकांचे आयोजन करून प्रत्येकाला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली व त्यांच्याही मताचा स्वीकार केला गेला. सर्वांची भूमिका स्पर्धेची न राहता समन्वयाची कशी राहील याचा विचार करण्यात आला.

शाळा प्रगतीचे पुनरावलोकन व प्रत्याभरण यासाठीची कार्यवाही-

शिक्षकांना ग्रंथालयासंदर्भात विविध विषयाचे काम विभागून देण्यात आले उदाहरणार्थ; देणगी चा हिशोब ठेवणे, ग्रंथ व पुस्तकांची देवाणघेवाण, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन, भाषण स्पर्धा, निबंध स्पर्धा ,पालक भेट अशा प्रकारची कामे शिक्षकांना देण्यात आली होती. प्रत्यक्ष कामाची सुरुवात झाल्यानंतर ज्या ज्या विषयात काही अडचण निर्माण झाली त्यावर आम्ही सगळ्यांना एकत्र बोलावून सर्वानुमते प्रश्न सोडविला.

सारांश -

नेतृत्व विकास कार्यक्रमाअंतर्गत घेतलेल्या प्रशिक्षणाचा फार मोठा फायदा या कार्यामध्ये झाला, सहकाऱ्याच्या उल्लेखनीय सहकार्यामुळे त्यांचे कौतुक अभिनंदन केल्यामुळे प्रस्तुत कार्याला विशेष वेग व परस्पर सहकार्य मिळाले. बाहेरील तज्ञ व्यक्तींच्या व्याख्यानामुळे मुख्याध्यापक,शिक्षक, विद्यार्थी यामध्ये विशेष चैतन्य निर्माण झाले. ग्रंथालय मंडळ सतत क्रियाशील उपक्रमशील कसे राहील याबाबत नियोजन करण्यात आले आहे यातूनच वाचनप्रेमी विद्यार्थी घडविण्याचे कार्य शाळा करत आहे.

धन्यवाद

योगेश मनोहरराव बन्सोड

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तांबेवाडी.केंद्र.वडोदबाजार,तालुका फुलंब्री जिल्हा.औरंगाबाद

ई मेल आय डी - zppstambewadi@gmail.



गाव व शाळे विषयी थोडक्यात माहिती -

फुलंब्री तालुक्यातील गेवराई गुंगी हे मोठे महसुली गाव आहे. या गावाचा विस्तार मोठा असल्याने गावातील अनेक घरे वेगवेगळ्या ठिकाणी स्थलांतरित होवून गेवराई गुंगी गावाचे रामनगर, डकले वस्ती, आहेरवाडी , तांबेवाडी आणि विठ्ठल वाडी हे प्रमुख भाग बनले आहेत. यातील तांबेवाडी ही एक भाग शाळा आहे. मुख्य गावापासून एका माळरानावर सुमारे १.५ किलोमीटर अंतरावर वसलेली वाडी म्हणजे तांबेवाडी होय. तांबेवाडी या ठिकाणी सुमारे ६० कुटुंब कायमस्वरूपी वास्तव्यास आहे. शेजारीच लागून असलेल्या विठ्ठल वाडी येथे साधारण १५ ते २० कुटुंब वास्तव्य करतात.

लोकसंख्या:

तांबेवाडीची लोकसंख्या साधारणपणे ३९० आहे. नौकरी व व्यवसायाच्या निमित्ताने व इतर कारणामुळे काही कुटुंबे शहरात स्थलांतरित झाली आहेत .

भौगोलिक स्थिती:

तांबेवाडी ही वस्ती गेवराई गुंगी या गावाचा एक भाग असून गेवराई गुंगीच्या पूर्वेस वसलेली आहे. फुलंबी ते राजूर महामार्गापासून सुमारे 4 किलोमीटर अंतरावर ही वाडी आहे.भौगोलिकदृष्ट्या खडकाळ जमीन जास्त प्रमाणात आहे. सदरील वाडीच्या शेजारी पाझर तलाव आहे परंतु त्यात पाण्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

गावातील शिक्षण व व्यवसाय प्रमाण :-

तांबेवाडी येथील पालकांच्या शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असून त्यांचा प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. शेतात राबणारे सदस्य जास्त असल्याने बरेच जण रोजंदारीने काम करतांना दिसतात. प्रयोगशील शेतकरी आपल्या शेतात प्रयोग करतांना दिसतात परंतु त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. सततचा दुष्काळ, पाण्याची कमतरता असल्याचे जाणवते. अलीकडच्या काळातील तरुणांचा विचार करता त्यांचे शिक्षण १२ वी ते पदवीधर असे आहे परंतु नौकरी व व्यवसायाचे प्रमाण अत्यल्प असल्याचे जाणवते.

शाळेचा इतिहास :-

मराठवाडा मुक्तीसंग्राम ज्या भूमीच्या साक्षीने लढला गेला ती हीच भूमी, शिक्षणा अभावी भोगावे लागणारे दुष्परिणाम अनेक जण भोगून बसलेले, राजकीय स्थित्यंतरे प्रगतीला पोषक ठरतात हे न सांगताही ९० दीच्या दशकात अनेकांना उमजू लागले होते. प्रगती करावयाची असेल तर शिकले पाहिजे याच मनोभूमिकेतून शेजारच्या गावात न जाता आपल्या स्थानिक परिसरात बालकांना शिक्षण मिळाले पाहिजे.असा विचार करून शासन आणि प्रशासनाकडे स्थानिकांनी पाठपुरावा करून १९९७ साली तांबेवाडी या ठिकाणी जिल्हा परिषदेची शाळा सुरु करण्यात आली.

शाळेला तात्त्विकदृष्ट्या मान्यता मिळाली होती. परंतु भौतिक सुविधा उपलब्ध कराव्या लागणार होत्या. त्या सुविधा मान्यता मिळाल्यावर लगेच मिळणे सहज शक्य नव्हते.

शैक्षणिक दृष्ट्या तांबेवाडीचा प्रवास सुरु झाला. वर्ग खोली नसल्याने सदरील शाळा झाडा खाली व मंदिरात परिस्थिती नुसार भरू लागली. तांबेवाडी येथील विद्यार्थी इतरत्र न जाता स्वतः च्या गावातील शाळेतच शिकू लागले. बिनभिंतीची शाळा दोन वर्षे सुरु होती त्यानंतर प्रशासकीय बाबी पूर्ण झाल्यानंतर एक खोली मंजूर झाली. गावाच्या एकत्रित जागेवर एक वर्ग खोली बांधकामानंतर तांबेवाडीची शाळा दृश्यस्वरुपात आली.

शाळा अस्तित्वात होती वर्गखोली उपलब्ध होती विद्यार्थ्यांचे प्रवेश झालेले होते. परंतु शिक्षकाची बदली झाल्यानंतर नवीन शिक्षकाची नियुक्ती न झाल्याने विद्यार्थ्यांच्या शिकण्यात अडचणी, अडथळे येत होते. काही वेळा तात्पुरत्या स्वरुपात शिक्षकांच्या नियुक्त्याही सदरील शाळेवर करण्यात आल्या. परंतु शिक्षकांच्या नियुक्त्या तात्पुरत्या स्वरुपात असल्याने फारशी शैक्षणिक प्रगती शाळेस करता आली नाही. शाळेसमोर अनेक समस्या होत्या त्यामुळे नंतरच्या काळात सदरील शाळेतील विद्यार्थी जि.प.प्रा.शा. गेवराई गुंगी या शाळेत शिकू लागले. विद्यार्थ्यांची तात्पुरती व्यवस्था त्या शाळेत करण्यात आली. ही परिस्थिती ऑगस्ट २००९ पर्यंत होती.

बदलाची जाणीव (शाळा विकासाचे नियोजन व अंमलबजावणी)

ऑगस्ट २००९ पर्यंत विद्यार्थ्यांची व्यवस्था शेजारील जि.प.प्रा.शा. गेवराई गुंगी शाळेत करण्यात आल्याने तांबेवाडी शाळेस जीर्ण स्वरूप आले होते. शाळेच्या आवारात गुरे ढोरे बांधली जात होती. गाजर गवताने शाळेचा पूर्ण परिसर व्यापलेला होता. पक्या भिंतीची पण बऱ्याच ठिकाणी ढासळलेल्या स्वरुपात ,मैदान उपलब्ध परंतु खेळण्यास अयोग्य ,गेट पडलेले पिण्याच्या पाण्याची कोणत्याही प्रकारची सोय नाही ,स्वच्छता गृहाचा दर्जा जेमतेम व पाण्याच्या अभावामुळे वापरण्यास अयोग्य अशी शाळेची परिस्थिती होती. अशा परिस्थितीत मी योगेश मनोहरराव बन्सोड व श्रीम. अपेक्षा थोरात हे दोन शिक्षक या शाळेवर रुजू झालो.

ही अवस्था बदलली पाहिजे सर्व भौतिक सुविधा असतील तर विद्यार्थ्यांची अध्ययन अध्यापन प्रक्रिया व्यवस्थित होवू शकते. मुले आनंदी व निरोगी वातावरणात चांगल्या प्रकारे शिकू शकतात व शाळेत टिकू शकतात. म्हणून शाळेचे अंतरंग व बाह्यरंग बदलणे गरजेचे होते. यासाठी आवश्यकता असते ती निधी आणि समाजाच्या सहभागाची.

बदलासाठी प्राधान्य क्रम निश्चिती -

मी शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने पालकांना प्रथमतः बैठकीसाठी निमंत्रित करून त्यांना शिक्षणाचे महत्व समजून सांगण्यात आले. व्यवस्थित शिक्षण पुंर्ण न झाल्यामुळे त्याचे दुष्परिणाम समजावण्यात आले. तसेच अध्ययन अध्यापन व्यवस्थित होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींची चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रथमतः ज्या गोष्टी बदलायच्या होत्या त्याची प्राध्यान्य क्रमानुसार त्या गोष्टींची यादी तयार केली. पालक व गावकऱ्यांबरोबर नियोजनाबद्दल चर्चा केली. शाळेसाठी मुलभूत सोयी सुविधा व आवश्यक फर्निचर उपलब्ध करून शिकण्याच्या वातावरणात तातडीने बदल करणे याला प्राधान्य दिले. काही गावकऱ्यांनी शाळेसाठी आर्थिक मदत केली. शाळेच्या विकासासाठी पालकांना व गावकऱ्यांना विश्वासात घेतल्यामुळे गावकऱ्यांनी शाळेसाठी प्रथम नळ उपलब्ध करून दिला पण नळाला पुरेसे पाणी नसल्याने स्थानिक रहिवाशी श्री. संजय तांबे यांच्या खाजगी विहिरीतून पाण्याची मोफत सोय करण्यात आली. आवार भिंत दुरुस्त करण्यात आली तसेच प्रवेशद्वाराची व्यवस्थित उभारणी करण्यात आली. कमानीसह शाळेला भव्य लोखंडी प्रवेशद्वार बसवण्यात आले. त्यामुळे शाळेच्या आवारात वृक्षाची लागवड व बाग तयार करण्यात आली. शाळेच्या मैदानाचे सपाटीकरण करण्यात आले. शाळेच्या भिंती रंगविण्यात आल्या. या सर्व गोष्टी बदलासाठी समाजाचा सहभाग मिळाला व त्यांनीच शाळेची निगा राखण्यास व रक्षणास मदत केली.

खालीलप्रमाणे शाळेचा कायापालट झाला.

लोक सहभागातून खालीलप्रमाणे शाळेसाठी सुविधा निर्माण करण्यात आल्या.

- डिजिटल लार्निंग रूम
- परस बाग



पूर्वीची शाळा



आत्ताची शाळा



आत्ताची शाळा



आत्ताची शाळा

- मैदान
- स्वतंत्र भोजन कक्ष
- आवार भिंत
- रंग रंगोटी
- ग्रंथालय

शाळेचे VISION आणि MISSION

VISION -

उत्तम नागरिक होण्याच्या प्रक्रियेत शाळेकडून अपेक्षित असणाऱ्या बाबी, विद्यार्थी विकासास सहाय्यक ठरणाऱ्या बाबी विद्यार्थ्याला उत्तम प्रतीच्या गुणवत्ता पूर्ण अध्ययन अनुभव देणे हे शाळेचे VISION आहे.

MISSION -

भारताचा चांगला नागरिक घडविण्याची जबाबदारी शिक्षकांवर आहे. त्यादृष्टीने अध्ययन अनुभव देणे, विद्यार्थी विकासास सहाय्यक ठरणाऱ्या बाबी पुरविणे ही जबाबदारी शिक्षकांची आहे. त्यादृष्टीने रचना, नियोजन व कृती आराखडा करून अंमलबजावणी करणे हे शिक्षकांसाठी, शाळेसाठी क्रमप्राप्त ठरते. मूल्यांवर व कौशल्यावर आधारित वेगवेगळी उद्दिष्टे पूर्ण करणाऱ्या उपक्रमाची रचना या शाळेने केलेली आहे. सदरील उपक्रमाची रचना प्रामुख्याने ४ गटात विभागणी करून केलेली आहे.

१) अध्ययनार्थी :

अध्ययनार्थी परिपूर्ण व्हावा यासाठी त्याच्या संबधित त्याच्या व्यक्तीमत्वात वेगवेगळ्या गुणांचा समावेश व्हावा यानुसार उपक्रम घेण्यात येतात. यामध्ये प्रामुख्याने त्याच्यावर संस्काराचे सिंचन व्हावे हा उद्देश ठेवण्यात आला आहे. यामध्ये पुढीलप्रमाणे उपक्रमाचा समावेश करण्यात आला आहे.

- अक्षरावरून नाव सांगणे.
- राहण्याचे ठिकाणाचे चित्र काढणे
- कुटुंबाचे चित्र काढणे
- आवडत्या प्राण्या व पक्ष्या बाबत माहिती मिळविणे.
- आवडते चित्र काढणे.
- आवडते खेळ खेळणे.


आवडते चित्रे काढतांना

या अध्ययनार्थ्याच्या स्व: संबंधित उपक्रमाचा समावेश करण्यात आला आहे.

स्वतःची आवड, निवड, भावना , बलस्थाने, मर्यादा, गुण कौशल्य अचूकपणे ओळखणे आदी उद्दिष्टे समोर ठेवून शाळेने उपक्रमाची रचना केलेली आहे. या विभागातील उपक्रमामुळे विद्यार्थी स्वतः विषयी भरभरून बोलतात, आपली मते मांडतात व अभिव्यक्त होतात.

माझ्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्य:

उपक्रमाच्या या विभागातून अध्ययनार्थीच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्य यांची जाणीव करून देण्यात येते.तसेच मराठी, गणित व इंग्रजी या शालेय विषयात परिपूर्ण आणावी, प्रत्येक विषयातील संबोध संकल्पना स्पष्ठ करून घ्याव्यात याची जाणीव सुद्धा विद्यार्थ्यांना याच विभागात करून देण्यात येते. शालेय परिपूर्णतेच्या जबाबदाऱ्यां सोबत स्वतःला व्यवस्थिततेच्या दृष्टीने नियम कसे घालून द्यावेत. आपल्या वस्तूंची जबाबदारी कशी घ्यावी, खेळात वगैरे ठिकाणी सुरक्षितता कशी बाळगावी, चांगले वाईट वर्तन कोणते, खोटे बोलू नये त्याचे काय दुष्परिणाम होतात अशा अनेक गोष्टींची जाणीव करून देण्यात येते. तसेच आपली काही कर्तव्ये आहेत ती सुद्धा कशी पार पाडावीत हे सुद्धा आनंददायी वातावरणात विद्यार्थ्यांना सांगितले जाते.

माझे सहकारी (अध्ययनार्थी)


वाढ दिवस साजरा

शाळा हा व्यक्तिमत्व विकासाचा प्रभावी घटक असून सहकारी विद्यार्थ्यांशिवाय शाळा पूर्ण होवू शकत नाही. त्यामुळे सहकारी वर्ग मित्रासोबत वर्तन कसे ठेवावे, समस्यांची सोडवणूक कशी करावी, त्यांच्याशी सुसंगत कसे वागावे. गटात काम करतांना सहकाऱ्याना कसे समजून घ्यावे शिकण्यात एकमेकांना कशी मदत करावी आदी गोष्टींचा विचार करून यात उपक्रमाची रचना करण्यात आली आहे. शाळेतील विद्यार्थी सहज सहकारी मित्रासोबत जोडी चर्चा करतात. एकमेकांना समजून घेतात. यामुळे एकमेकांबद्दल सुसंवादी नाते संबंध, इतरांबद्दल आस्था आणि मानवी प्रतिष्ठेचा आदर होतो. नागरीक घडविण्याच्या दृष्टीने उपक्रमाचा हा टप्पा महत्वपूर्ण ठरतो.

माझा समाज

व्यक्तींचा मिळून समाज होत असतो. समाजात सुरु असणाऱ्या चुकीच्या चालीरीती, अंधश्रद्धा, पद्धती यांची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे गरजेचे असते. यासोबतच चूक काय? आणि बरोबर काय ? हे ओळख होण्याच्या दृष्टीने वेगवेगळे उपक्रम, सामाजिक संदेश देणारे उपक्रम या प्रकरणात शाळेने आखलेले आहे. सामाजिक संदेश देण्याचा शाळेतील विद्यार्थी शिक्षक आणि मुख्याध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करतात.

शाळेने MISSION पूर्ण करण्यासाठी राबविलेले काही उपक्रम ;-

१ मुलांच्या कथा कविता

२ बाल सभा

३ बँक ऑफ तांबेवाडी

४ भूमिका अभिनय

५ महापुरुष जयंती पुण्यतिथी

६ मातीच्या गणेश मूर्ती तयार करणे

७ आकाश कंदील पणती तयार करणे

८ आनंदनगरी

९ वृक्ष रोपण

१० मतदान प्रक्रिया

११ ग्रंथ दिंडी

१२ होळी

१३ रक्षा बंधन

१४ टाकावू पासून टिकावू तयार करणे.

१६ शैक्षणिक सहल, क्षेत्र भेट

१७ विविध क्रीडा स्पर्धा

१८ बाजार


वेश भषा स्पर्धा

अशा अनेक उपक्रमाचे आयोजन करून शाळेने उत्तम नागरिक घडविण्याच्या उद्देशाने उपक्रम राबविलेले आहेत.

अध्ययन अध्यापन प्रक्रियेत झालेला बदल :-

जि. प. प्रा. शा. तांबेवाडी येथे सुरुवातीच्या काळात अभ्यासक्रम, क्रमिक पुस्तके यांचा विचार करून अध्ययन अध्यापन कार्य केले. सदरील परीस्थितीत द्यावयाचे अध्ययन अनुभव तासिका पाठनियोजन, घटक नियोजन आदी पारंपारिक पद्धतीचा उपयोग करून प्रामाणिकपणे अध्ययन अध्यापन करण्यात येत होते तरी अपेक्षित यश मिळत नव्हते. द्वीशिक्षकी शाळा असल्याने वर्ग १ ते ५ वर्गाचा अभ्यासक्रम पूर्ण करणे अवघड जात होते. शाळेतील १०० % विद्यार्थी उतारा वाचन ब गणिताच्या मुलभूत क्रिया १००% करू शकतील या बद्दल खात्री वाटत नव्हती. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हा कार्यक्रम आला आणि अध्ययन अध्यापन प्रक्रियेत बदलास सुरुवात झाली. व प्रत्यक्ष झालेला बदल खालीलप्रमाणे आहे.

१) प्रत्यक्ष कृतीतून मुलांना अध्ययन अनुभव दिला .

२) अध्ययन अध्यापन प्रक्रिया वैविध्यपूर्ण व आनंददायी झाली.

३) अमूर्त संकल्पना मूर्त स्वरुपात स्पष्ट/ संबोध स्पष्ट झाल्या.

४) क्षेत्र भेटीच्या माध्यमातून मुलांना ग्रामपंचायत, सरकारी दवाखाना, कुंभार, लोहार, परिसरातील पिके व ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे ठिकाणी भेट देवून मुलांचे अध्ययन अनुभव समुद्ध करण्यात आले.

५) गट कार्य / गट चर्चा यांचा शिकण्यासाठी उपयोग होवू लागला.

६) तंत्रज्ञान / डिजिटल रूम / इंटरनेट चा वापर अध्ययन अध्यापनात वाढला.

७) खेळाद्वारे व उपक्रमा द्वारे अध्ययन अध्यापन होवू लागले.

८) प्रगत चाचण्या, अध्ययन निश्चिती चाचण्याद्वारे मुलांची, वर्गाची व शाळेची प्रगती स



शैक्षणिक साहित्य निर्मिती व वापर :-

One picture speaks more than 1000 words या ओळीनुसार शैक्षणिक प्रक्रिया एकमार्गी न राहता विद्यार्थी केंद्रित होण्याच्या दृष्टीने शैक्षणिक साहित्य चे महत्व लक्षात घेवून आम्ही तांबेवाडी या शाळेत शैक्षणिक साहित्य निर्मिती करण्यास सुरुवात केली. प्रथम साहित्य बनविण्यावरच भर होता परंतु जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यवसायिक विकास संस्थेमार्फत राबबिल्या जाणाऱ्या विविध प्रशिक्षणाच्या व केंद्रसमेलनाच्या माध्यमातून याचा प्रभावी वापर कसा करावा याचे सुलभन मिळाले.

या साधनांमुळे मुलांच्या अध्ययन अध्यापनात नक्कीच सकारात्मक बदल आढळून आला तसेच मुलांना साहित्य हाताळताना आनंद वाटू लागला व अपेक्षित उद्दिष्टे साध्य होण्यास मदत झाली. साहित्य बनविण्यासाठी विद्यार्थ्यांची मदत, सहभाग घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना स्वनिर्मितीचा आनंद मिळू लागला. या साहित्यात चार्ट, नकाशा, गणन पाटी, सम – विषम संख्या वाचक पाटी, चित्र कार्ड, अक्षर पाटी, शब्द पाटी इ समावेश आहे.

शालेय वातावरण आणि कार्य संस्कृती :-

आमच्या शाळेचे वातावरण आनंददायी, तणावमुक्त, अध्ययन व अध्यापनास पोषक व खेळकर असे वातावरण आहे कारण येथील मुले मुक्तपणे आपले मत मांडतात , निर्भीडपणे उत्तरे देतात व उपक्रमात / खेळात सहभाग घेतात. कामांची/ जबाबदारीची विभागणी गटागटात केलेली आहे व मुले शालेय कामकाजात जबाबदारीने व आनंदाने सहभागी होतात. विद्यार्थ्यांना अध्यापन करावयाची घटकाची तयारी शिक्षक साहित्यासह करून ठेवतात. त्यामुळे कृतियुक्त अध्ययन व अध्यापनासाठी साहित्य व इतर बाबींची अडचण उद्भवत नाही. विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष कृतीला यावेळी वाव देण्यात येतो. प्रत्येक विद्यार्थी स्वतंत्रपणे कृती करतो त्यामुळे त्याच्या अध्ययन अध्यापनाबाबतच्या संकल्पना त्याला चांगल्या प्रकारे समजतात व दीर्घकाळ त्याच्या स्मरणात राहतात. शाळेतील शिक्षकाची भूमिका केवळ सुलभकाची असते. विद्यार्थ्यांची शिकण्यासाठीची समज दृढ करण्याच्या दृष्टीने अध्यापन करण्यात येते. अध्ययन अध्यापनात सहजपणा टिकावा, शिकण्यासाठी हलके फुलके वातावरण असावे यासाठी मनोरंजनात्मक खेळ, उपक्रम, आणि गाणी घेण्यात येतात.





जि.प.प्रा.शा. तांबेवाडी येथील शालेय वातावरण आणि कार्य संस्कृती :-

- हवेशीर, स्वच्छ, व भरपूर प्रकाश असणाऱ्या वर्ग खोल्या.
- आनंददायी व तणावमुक्त वातावरण.
- बालकांना त्यांच्या भावविश्वात रममाण करणारी रंगरंगोटी.
- शिक्षक, पालक, विद्यार्थी, यांच्यातील सुसंवाद व विचारांची देवाणघेवाण.
- सेमी इंग्रजीची व्यवस्था.
- स्वच्छतेचे संस्कार
- दत्तक झाडांची निगा

- संस्कारमय परिपाठ
- विद्यार्थांची वेगळयापानाची हजेरी
- विद्यार्थ्यांचे सादरीकरण
- कृतियुक्त अध्ययन - अध्यापन मनोरंजनात्मक खेळ गाणी
- अध्ययन – अध्यापनाचे सिंहावलोकन इत्यादी.

शाळा सुटण्याच्या शेवटच्या ठराविक मिनिटात शाळेतील सर्व विद्यार्थी मैदानावर एकत्र होतात. परिपाठाप्रमाणे आपल्या रांगेत उभे राहून वंदेमातरम् चे गायन करतात आणि दिवसाचा समारोप करण्यात येतो.

अशा प्रकारे शाळेची कार्य संस्कृती असून उपक्रमाचे आयोजन व वेळापत्रकातील बदला प्रमाणे शाळेची कार्य पद्धती अपवादात्मक स्थितीत बदलते. त्यावेळी शिक्षक – मुख्याध्यापक यांच्या समन्वयातून योग्य त्या बाबींची दखल घेवून बदल करण्यात येतो.



पर्यवेक्षीय यंत्रणा शाळा भेट

केंद्रप्रमुख यांचा शाळा विकासात सहभाग

केंद्रप्रमुख श्री. विनायक वाघ व सध्याचे केंद्र प्रमुख श्री. सुरेश भोपळे यांच्या सुलभक म्हणून शाळेला वेळोवेळी भेटी झाल्या शाळा भेटी दरम्यान त्यानी वर्ग भेटी देवून विद्यार्थ्यांच्या सोबत हितगुज, चर्चा व मार्गदर्शन केले. तशेच शाळेच्या शिक्षकांना शाळेतील प्रत्येक मूल शिकू शकते याचा आत्मविश्वास दिला. केंद्रामध्ये शिक्षण परिषदांचे यशस्वी आयोजन करून त्यामध्ये शिक्षकांचे अध्ययन अध्यापन बाबत येणाऱ्या समस्यावर चर्चा करून मार्गदशन केले. केंद्रसंमेलनामध्ये / शिक्षण परीषदामध्ये शिक्षकांना चांगले मार्गदर्शन मिळावे यासाठी मा. गट

शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, साधनव्यक्ती, तज्ञ शिक्षक, यांना मार्गदर्शनासाठी बोलविले. त्याच बरोबर त्यांनी शालेय नेतृत्वाविषयी वेळोवेळी मार्गदशन केले. शाळेसमोर येणाऱ्या अडचणी, समस्या बद्दल प्राधान्य क्रम कसा द्यावयाचा या विषयी या शाळेच्या शिक्षकांना मागर्दर्शन मिळाले.



गट साधन केंद्र यांचा शाळा विकासात सहभाग

गट साधन केंद्राच्या वतीने शिक्षकांना दर्जेदार कृतीयुक्त कार्यशाळा, प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.. मा. गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, साधनव्यक्ती व तज्ञ शिक्षका तर्फे शाळेतील प्रत्येक मूल कसे शिकू शकते याचा शैक्षणिक साहित्य, भाषा पेटी , गणित पेटीच्या सह्याने कृतीयुक्त सुलभन, मार्गदशन, प्रोत्साहन या शाळेच्या शिक्षकांना मिळाले. केंद्रसंमेलनामध्ये / शिक्षण परीषदामध्ये शिक्षकांना मा. गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, साधनव्यक्ती श्री. लक्ष्मण भिवसने, श्री. रवींद्र बावस्कर , श्री. बाबासाहेब साळुंके, श्रीम. भारती अंकुशकर यांचे शालेय नेतुत्व व अध्ययन व अध्यापन याबाबत मार्गदर्शन मिळाले. तसेच शाळेतील वर्गाला भेट देवून विद्यार्थ्यांसोबत व शिक्षकांसोबत संवाद साधला व शाळेतील शिक्षकांचे कौतुक व त्यांना प्रोत्साहन दिले.

उल्लेखनीय / एका दृष्टीक्षेपात .



धन्यवाद

नीलिमा योगाजी आखाडे

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,हटझर, केंद्र.दुर्गापूर, पंचायत समिती.धानोरा,जिल्हा.गडचिरोली.

महाराष्ट्राच्या पूर्व दिशेला वसलेला गडचिरोली जिल्हा व या जिल्ह्याच्या पूर्व दिशेला छत्तीसगड सीमेलगत असलेले धानोरा तालुक्यातील विस्तीर्ण वनराईने वेढलेले अतिमागास अतिदुर्गम भागातील १८० लोकसंख्या असलेले हटझर गाव.

गावाकडे जाण्याकरिता एकच पायवाट. वाहतूक अतिशय तुरळक असल्याने या पायवाटेवर झाडेझुडपे वेली वाढलेल्या व रस्त्यावर मोठमोठे दगड अस्त्याव्यस्त पडलेले. या रस्त्यावरून जाताना कोणत्याच प्राणी,पक्षी यांचा आवाज येत नाही तर आवाज येतो फक्त किर्र किर्र करणाऱ्या किड्याचा आणि जी व्यक्ती त्या रस्त्याने जात आहे त्याच्या वाहनाचा, अशी भयाण शांतता पसरलेली असते.

२० वर्ष शैक्षणिक कार्याचा अनुभव गाठीशी असलेली मी नीलिमा आखाडे १४/०६/२०१७ ला पहिल्यांदा या शाळेत गेले तेव्हा दोन खोल्यांच्या शाळेची परिस्थिती बघून माझे सर्व विचारचक्रच थांबले होते.२६/०६/२०१७ ला शाळेचा पहिला दिवस बोटावर मोजण्याइतके विद्यार्थी शाळेत आले पण मुलांशी संवाद साधण्याच्या प्रयत्नात मी अपयशी ठरले कारण होते भाषिक भिन्नता. पण राकेश कुयोटी हा मराठी समजणारा युवक मदतीला आला.

अतिदुर्गम भागातील या चिमुकल्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा निश्चय आम्ही केला आणि कामाला लागल्या. रोज काहीतरी नियोजन करावे आणि शाळेत जावे तर शाळेत विद्यार्थ्यांचा पत्ताच नाही रिकामे वर्ग, रिकामी शाळा व रिकामेच पटांगण. काय करायचे ? हतबल न होता आम्ही कामाला लागलो , यातूनच उपक्रमाची एक मालिका सुरु झाली.

शिक्षण आपल्या दारी-

मुले शोधण्यासाठी आता शाळा मुलांपर्यंत पोहचायला लागली. दोन्ही शिक्षिका मुलांना शाळेत आणण्यासाठी त्यांच्या घरी,शेतात,जंगलात,नाल्यावर चहूदिशांना फिरून मुलांना जमवायचे व त्यांना गप्पागोष्टी करीत शाळेत घेऊन यायचे.गप्पागोष्टी नृत्य यामुळे मुले शाळेत रमायला लागली.त्यातही सुरवातीला ह्या सर्व बाबी करण्यासाठी गोंडी भाषेचा उपयोग शाळेत करण्यात येवू लागला त्यामुळे मुलांच्या मनात शाळेबद्दल आपुलकी निर्माण व्हायला लागली.मुलांना कृतियुक्त शिक्षण देणे सुरु केले त्यातूनच या मुलांचा विद्यार्थी बनण्याकडचा प्रवास सुरु झाला.गप्पागोष्टीतून विद्यार्थी हळूहळू वाचनलेखन व गणितीय क्रियांकडे वळायला लागले. विद्यार्थी न कळत अध्ययन करू लागले.

माझे आवडते प्रयोग-

प्रत्येक विद्यार्थ्याची गरज ओळखायची व त्याप्रमाणे त्या विद्यार्थ्यांवर शैक्षणिक प्रयोग करायचे. त्यासाठी आम्ही (मी आणि माझी सहकारी शिक्षिका) विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार शैक्षणिक साहित्य तयार करायला सुरुवात केली.मुख्य अडचण होती ती भाषेची. मग गोंडी भाषेतील नेहमी वापरले जाणारे शब्द शिकून ते मुलांसोबत उपयोगात आणायला सुरुवात केली. द्विभाषिक पुस्तक तर त्यांच्या मदतीला होतेच पण त्याशिवाय विविध चित्रयुक्त शैक्षणिक साहित्य पण दोन्ही भाषेतून तयार करायला सुरुवात केली. शैक्षणिक साहित्य तयार करतांना त्यांनी मुलांचा सुद्धा सहभाग घेण्यास सुरुवात केली.त्यामुळे विद्यार्थी आता बाहेर भटकण्यापेक्षा शाळेत जास्त रमायला लागली. सतत गैरहजर राहण्याचे प्रमाण आता अत्यंत कमी झाले. त्यामुळे अर्धे काम आता सोपे झाले. मुलांना शाळेची ओढ लावण्यास E-learning साहित्याचा फार उपयोग झाला.

वाचनकुटी –

नियमीत शाळेत येणाऱ्या या विद्यार्थ्यांना शाळेत टिकवून ठेवणे हेच सर्वात मोठे आव्हान होते कारण जन्मापासून स्वच्छंदी जंगलात फिरणारे हे विद्यार्थी एका जागी शाळेत इतक्या वेळ टिकून राहणे अवघड होते.त्यामुळे प्रत्येक वेळी नवीन काही क्लुप्ती शोधून काढणे आणि मुलांना शाळेत टिकवणे अशी कसरत शाळेत सुरु होती.त्यातून वाचन कुटीची कल्पना उदयास आली. दिवसभरात एक तास मुलांनी ग्रंथालयातून कोणतेही एक पुस्तक घ्यावे व ते वाचावे नाही तर चित्र तरी बघावे. अश्या पद्धतीने हळूहळू विद्यार्थी वाचनाकडे वळायला लागले.

हीच वाचनकुटी कला कार्यानुभव विषयासाठी पण उपयोगात यायला लागली. चित्र काढणे,रंग भरणे,कागद, बांबू, काड्या या पासून विविध वस्तू तयार करणे त्याची प्रदर्शनी भरविणे. आनंददायी शिक्षणातून हे विद्यार्थी आपल्या इयत्तेच्या क्षमतेनुसार अध्ययन करीत क्षमता प्राप्त करीत आहेत.

शाळेची सामाजिक बांधिलकी-

गावातील सामाजिक परिस्थितीचा विचार केला तर समाजात साक्षरतेचे प्रमाण १५ते२० % आहे.शिक्षणाबद्दल अनास्था,उदासीनता व अंधश्रद्धेने पछाडलेले लोक येथे पाहायला मिळतात.घरात कोणी आजारी पडले तर त्याला दवाखान्यात न नेता गावातील पुजारी, भूम्या, भगत यांच्याकडे नेवून गावठी उपाययोजना केल्या जातात.प्रसंगी एखाद्याचा त्यात मृत्यूही होतो.

आजही या गावात कुरमाघर आहेत.स्त्रियांना मासिक पाळीच्या काळात ५ते६ दिवस वेगळ्या झोपडीत राहावे लागते.तिथे कोणतीच सोय नसते. स्त्रिया गुरे राखायला जंगलामध्ये जातात.पुरुषामध्ये नशेचे प्रमाण खूप आहे. बहुतांश वेळ त्यांचा नशेत जातो. पुरुष शिकार करून आणतात. अशिक्षित जगापासून, सुधारणावादी लोकांपासून दूर राहण्याचा प्रयत्न हे लोक सतत करीत असतात.

या सर्वाचा परिणाम शाळेवर होतो. विद्यार्थ्यामध्ये पण हेच घरचे संस्कार होतात. त्यामुळे पालक सभेचे नियमितपणे आयोजन करून नशेचे दुष्परिणाम सांगणारे video वारंवार दाखविणे सुरु केले.शिक्षणाचे फायदे, शासनाच्या विविध योजना यावर सतत पालकांसोबत बोलत राहिल्याने काही पालकांमध्ये आता निश्चितपणे फरक दिसत आहे. सुरुवातीस नशा करून शाळेत येणारे पालक आता शाळेत येताना व्यवस्थित येतात आणि शाळेला सहकार्य करतात.

समारोप –

शाळेतील मुले १००% शैक्षणिक क्षमता प्राप्त करू शकले नाहीत .पण गोंडी भाषेत बोलणारे विद्यार्थी मराठी कडे वळले आहेत. वाचन,लेखन व गणितीय क्रिया करायला लागले आहेत. अतिदुर्गम भागातील आदिवासी मुलांना शिक्षणाची गोडी लावणे व त्यांना शिकते करणे, शाळेत टिकवून ठेवणे , पालकांना शाळेबद्दल आस्था निर्माण करणे हे या सत्रातील कामाची फलश्रुती आहे. येणाऱ्या दिवसांमध्ये शाळेची गुणवत्ता नक्कीच वाढलेली असेल असा विश्वास आम्हाला आहे.



शालेय मंत्रिमंडळ







शाळेत घेतले जाणारे विविध उपक्रम व सहभागी विद्यार्थी

धन्यवाद

कविता दिलीप मयेकर
जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा, पावस क्रमांक.1
तालुका,जिल्हा.रत्नागिरी



साऱ्या कोवळ्या जीवांना उजेडाचा गंध यावा .....

याचे उजेडाचे दान देण्या झोपडीत सूर्य यावा .....

प्रस्तावना

'जसे मुख्याध्यापक तशी शाळा' असे मुख्याध्यापकांच्या भूमिकेविषयी सातत्याने म्हटले जाते.

अध्यापक, प्रशासक, व्यवस्थापक अशा प्रकारे मुख्याध्यापकांना विविध भूमिकेतून शाळेचे कामकाज करावे लागते. दर्जेदार अध्यापन करण्याबाबत सहकारी शिक्षकांना मार्गदर्शन करणारे अध्यापन कुशल मुख्याध्यापक विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी मदत करतात. शाळेतील कामकाजावर नियंत्रण ठेऊन सहकारी शिक्षकांच्या अध्यापनातील त्रुटी कुशलतेने दूर करीत असतात. शालेय शिस्त राखणे आणि शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी विविध उपक्रमांची कार्यवाही करणे हे त्यांचे आद्यकर्तव्य आहे. त्यांच्या दैनंदिन वर्तनातून आणि कामकाजातून शाळेचा दर्जा प्रतिबिंबित होत असतो.

शिक्षक, पालक, विद्यार्थी यांच्याविषयी तपशीलवार माहिती मुख्याध्यापकांना असणे आवश्यक आहे. तो समाजाभिमुख असणे आवश्यक आहे. समाजऋणाची जाण ठेऊन विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी झटणारे ज्ञानपरायण मुख्याध्यापक शाळेचा दर्जा उंचावण्यात यशस्वी होतात.

अशाच एका शाळेच्या नेतृत्व शैलीचा व्यक्ती विकास या सदरातून केलेला आहे. शाळा आहे जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श मराठी शाळा, पावस नं. 1 . जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श मराठी शाळा, पावस नं. 1 ही ग्रामीण भागातील म्हणजेच रत्नागिरी जिल्ह्यातील व रत्नगिरी तालुक्यातील ३५०० लोकवस्तीतील पावस गावातील शाळा.

१२ ऑक्टोबर १९४७ साली या शाळेची स्थापना झाली. स्वामी स्वरूपानंद महाराज यांच्या वास्तव्याने पुनीत झालेला त्यावेळेचा हा भाग गणपतीच्या छोट्या मंदिरापाशी हसरी गोजिरी मुले आनंदाने खेळत-बागडत एकत्र जमा व्हायची. जवळपासच्या भोवतालची छोट्या छोट्या ५ गावातील सर्व जाती-धर्माची मुले तिथे शिकण्यास यायची. काही काळानंतर त्या सर्व शाळा जिल्हा परिषद, रत्नागिरी प्रशासनांतर्गत काम करू लागल्या. त्या शाळेसाठी झटणाऱ्या सर्व शिक्षणप्रेमी, दानशूर व्यक्तीमत्त्वांसाठी कोटी कोटी धन्यवाद. या वास्तूस चैतन्यमय वातावरणाशी सदिच्छा भेट देणाऱ्या सर्व अभ्यासू, दयावंत व्यक्तींना कृतज्ञतेने दंडवत. अद्यापही सातत्याने आपली शाळा समजून काम करणाऱ्या सर्व शिक्षणप्रेमी आबालवृद्धांना खूप खुप धन्यवाद.

ही केस स्टडी सादर करताना आम्हाला खालील थोर व्यक्तींचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

1. मा.श्री.शिवलकर साहेब - प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक संस्था, रत्नागिरी.
2. मा.श्री.डी.बी.कुळाल साहेब - मा. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद (प्राथमिक), रत्नागिरी.
3. मा.श्रीमती हिरवे मेडम - मा. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, रत्नागिरी.

4. मा.श्री.यु.एस.भोसले साहेब - मा. शिक्षण विस्तार अधिकारी, पावस बीट, पंचायत समिती, रत्नागिरी.
5. मा.श्री.म.जै.सय्यद साहेब - मा. केंद्रप्रमुख, केंद्रीय शाळा, पावस, ता.जि. रत्नागिरी.

दृष्टी व ध्येय

शैक्षणिक गुणवत्ता सातत्याने टिकवून ठेवण्यासाठी मुख्याध्यापकांनी एक नवी दृष्टी निर्माण करावी. त्यादृष्टीने प्रेरित होऊन ध्येयाचा ध्यास घ्यावा, म्हणजे ते निश्चितच यशस्वी होतात. या शाळेला लाभलेल्या सर्वच मुख्याध्यापकांनी अशीच दृष्टी व ध्येय निश्चित केले होते. त्यामुळे २०१८ साली शाळेला ७१ वर्षे पूर्ण होत आहेत त्या अनुषंगाने खालील ध्येये निश्चित केली आहेत.

दृष्टी : - नव्या पिढीतील नेतृत्व विकसित करून शालेय परिवर्तन घडविणे ज्यामुळे प्रत्येक मुल शिकेल व प्रत्येक शाळा प्रगतीशील होईल.

ध्येय : - शालेय स्तरावर नेतृत्व क्षमता समृद्ध करून संघ बांधणीतून दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे.

या वास्तूकडे पाहताना दिव्यत्वाची जुळते गाठ

या तेजाचे दर्शन घडता अंत:करणही होते अफाट

निसर्ग देवतेने जणू फुलविला ज्ञानगंगेचा काठ

शाळा कशी म्हणू याला हे तर ज्ञानाचे विद्यापीठ



१००% पटनोंदणी आणि १००% उपस्थिती ठेऊन मुलांना दर्जेदार शिक्षण कसे देता येईल, हे आपले उद्दिष्ट, हे उद्दिष्ट यशस्वी करण्यासाठी 'नियोजन' हा व्यवस्थापनातील नियोजनाचा महत्वाचा भाग आहे. उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी उपलब्ध कालावधी, साधनसामग्री, मनुष्यबळ या सर्वांचा सातत्याने विचार करून कालबद्ध कृती व त्याची वेळोवेळी करावयाची पडताळणी म्हणजे नियोजन होय.

हे नियोजन करताना विविध भौतिक सुविधा मिळविण्यासाठी सातत्याने जिल्हा परिषदेकडे मागणी करणे आणि त्या सुविधा प्राप्त करून घेणे महत्वाचे असल्याने त्या दृष्टीने काम सुरु झाले. काही वेळा शालेय व्यवस्थापन समितीमार्फत नियोजन करून अंमलबजावणी करावी लागते तर काही वेळा ग्रामपंचायत, विकसित कंपन्या, संस्था तसेच दानशूर व्यक्तींकडून देणगीरूपाने निधी संकलन करून शालेय विकासास हातभार लावला जातो. अशा पद्धतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पावस नं. 1 ने प्रगतीसाठी गुणवत्तेबाबतचा सर्व सहकारी व पालकवर्गांचा भरभरून प्रतिसाद मिळविला.

शाळा विकासाच्या दृष्टीने नियोजन करताना फारच तारेवरची कसरत करावी लागली. कारण दि. २८.१२.२०११ रोजी मी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पावस नं. 1 येथे हजर झाले त्यावर्षीचा विद्यार्थी पट ११० होता आणि शिक्षक संख्या फक्त ०३ होती. हा तीनचा शिक्षकवृंद आणि छोटी छोटी मुले सांभाळून त्यांना प्रगतशील मार्गावर नेण्याची माझी जबाबदारी होती. इयत्ता ४ थी साठी पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा लागू होती. तेव्हा इयत्ता ४ थीचा पट ३२ होता. इयत्ता ४ थी च्या वर्गशिक्षकावर फार मोठी जबाबदारी होती. शाळेतील सर्वात मोठा वर्ग हा परीक्षेत सहभागी होता. आता राहता राहिले ३ वर्ग. त्यांची दोनच शिक्षकावर जबाबदारी. त्यातच नव्याने येणारे शिक्षण प्रवाह, नवनवीन योजना व नवनवीन उपक्रम हे सर्व हसतमुखाने, उत्साहाने, न कंटाळता सर्व प्रपंच मागे ठेऊन मी समर्थपणे पार पाडले.

याकामी मला नुकताच आलेला बालकांचा सक्तीचा व मोफत शिक्षणाचा अधिकार उपयोगी पडला. RTE नुसार पालकांच्या मधून निवड झालेली शालेय व्यवस्थापन समिती शाळेत २०१० साली अस्तित्वात आली. ती समिती सक्रीय व उत्साही होती. प्रत्येक अडीअडचणीत व समस्या सोडवण्यासाठी समिती तत्पर होती.

कोणताही आर्थिक व्यवहार करताना त्याचे अचूक नियोजन व लक्ष शाळेच्या कामकाजावर होते. शाळेच्या गुणवत्तेचा तीन-तीन महिन्यांनी मासिक सभेत आढावा घेतला जात होता. तसेच इंग्रजी बोलणे, लिहणे यासाठी वारंवार पालकांकडून येणाऱ्या सूचना, कला कार्यानुभव, शारीरिक शिक्षणाचे उपक्रम घेणे यासाठी मिळालेला वेळ फारच कमी पडत होता परंतु पालकांच्या सहकार्यातून व त्यांच्या प्रतिसादातून सर्व काही यशस्वी झाले. सर्व शाळा भेटीदरम्यान शाळेच्या विद्यार्थ्यांचा प्रतिसाद निश्चितच चांगला होता.

त्यानंतर २०१४ साली शिक्षणोत्सव हा नवीन कार्यक्रम आला. त्यात सर्व कलाकृतींचे वेगवेगळी दालने मांडून शिक्षणाचे महत्व उत्कृष्ठरित्या शाळेने सादर केले. जवळपासच्या शाळा हे पाहण्यासाठी आल्या. ४०० ते ५०० ग्रामस्थ या कार्यक्रमासाठी उपस्थित राहिले. यातूनच कार्यक्रमाची यशस्विता दिसून आली. त्यानंतर उत्कृष्ठ ग्रंथालयाचे प्रदर्शन शाळेत मांडण्यात आले. खूप जुनी पुस्तके तसेच नवीन पुस्तके प्रदर्शनात मांडण्यात आली होती. या ग्रंथालयाचे प्रदर्शन पाहायला सर्व समित्या, गावातील वाचक प्रेमी, आजी-माजी विद्यार्थी याच बरोबर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व उपशिक्षणाधिकारी यांनी भेट दिली होती व त्यांनी गौरवोद्गार काढले आणि मन कृतकृत्य झाले.

नाविन्यपूर्ण उपक्रम सुरु असताना चावडी वाचन हा कार्यक्रम घ्यायचे ठरले होते. सर्व तयारी झाली. अनेक ग्रामस्थांसमोर विद्यार्थ्यांचे वाचन घ्यायचे ठरले. त्यांत वेगवेगळ्या मासिकांतील परिच्छेद, वर्तमानपत्रातील हेडलाईन्स, किशोर अंकातील मजेशीर खेळ, प्रत्यक्ष पाठ्पुस्तकातील उतारे मुलांनी निर्भीडपणे वाचून दाखविले. इयत्ता दुसरीच्या मुलांनी फळ्यावरील संविधान शुद्ध तसेच स्पष्ट वाचले. आणि आलेल्या मूल्यमापन समितीला थक्क करून सोडले.

या विविध उपक्रमांबरोबर "शालेय पोषण आहार" योजना परिपूर्णपणे सुरु आहे. दुपारी ठीक १:३० वाजता गरम गरम वरण-भात, आमटी-भात, उसळ-भात मुले आनंदाने जेवत आहेत. पालकही आता खूप खुश आहेत कारण सकाळी शाळेत पाठवताना मुलांना जर घाईत खायला देता आले नाही तर दुपारी निश्चितच पोषण आहार मिळणार, अशी खात्री पालकांना वाटते आणि ते मनापासून शाळेला शुभेच्छा देतात.

स्पर्धा व उपक्रम

“जसे नेतृत्व तसे कार्य”. एखादा नवीन विचार, उपक्रम किंवा कार्यक्रम प्रथम मी मुख्याध्यापक या नात्याने माझ्या शिक्षकांसमोर सांगत होते. त्यांना तो विचार पटत होता आणि उत्साहाने ते करण्यास तयार होत-होते. त्यासाठी वेळ आणि साहित्य यांची उत्कृष्टरीत्या सांगड घातली जात होती.

जसे शाळेत पठण स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन इत्यादींचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आले. पठण स्पर्धेसाठी सौ.देसाई यांनी उत्कृष्ठपणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्याकडून तयारी करून घेतली. तर विज्ञान प्रदर्शनाची पूर्ण तयारी व सादरीकरण सौ. लांजेकर यांनी केले. तर मी स्वतः या स्पर्धांचे सर्व व्यवस्थापन, नियंत्रण तसेच प्रशासन पाहत होते. तसेच यासाठी आवश्यक ती सर्व मदत करत होते.

अनुदाने

विविध योजना, उपक्रम सांभाळत असताना शाळेत येणारी विविध अनुदाने महत्वाची असतात. ही अनुदाने योग्य रीतीने खर्ची घालणे व त्याचबरोबर त्याची योग्य ती उपयोगिता महत्वाची असते.

या शाळेची इमारत ही ८ खोल्यांची असून शालेय परिसर हा एकूण क्षेत्र २३ गुंठे आहे. त्यातच इतर इमारती आहेत. त्यांची योग्य ती देखभाल करणे हेही तितकेच महत्वाचे. जिल्हा परिषदेकडून शाळा देखभाल दुरुस्ती, शाळा अनुदान, शिक्षक अनुदान अशी विविध प्रकारची अनुदाने शाळेस प्राप्त होत असतात. त्यांची अंदाजपत्रके तयार करून निधी प्राप्त करणे तसेच त्यांची योग्य ती विल्हेवाट लावणे आदी कामे शालेय व्यवस्थापन समितीद्वारे योग्य तऱ्हेने हाताळली जातात. तसेच शासनाकडून मिळालेल्या शालेय पोषण आहारासोबत ग्रामस्थ तसेच पालकांकडूनही विद्यार्थ्यांसाठी पूरक आहार व भाजीपाला दिला जातो. त्यामुळे या शाळेची शालेय पोषण आहार योजना इतर शाळेपेक्षा वेगळी ठरत आहे.

शालेय नेतृत्व विकासासाठी प्रशालेत राबविण्यात आलेले विविध उपक्रम

1. **स्काऊट गाईड :** शालेय उपक्रमाबरोबरच शाळेमध्ये विविध सहशालेय उपक्रम राबविले जातात. स्काऊट गाईड हा त्यातीलच एक अग्रगण्य उपक्रम आहे. या सर्व उपक्रमांचे कामकाज शाळेतील शिक्षिका सौ. लांजेकर या पाहतात. या उपक्रमांतर्गत होणारे विविध उपक्रम, शिबिरे यांत पथकातील सर्व ४० विद्यार्थिनी सहभागी होतात. या पथकाने सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात शाळेला जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक पटकावून दिला.



2. **सांस्कृतिक कार्यक्रम** : विद्यार्थ्यांमध्ये अनेक सुप्त गुण असतात. या सुप्त कलागुणांना चालना मिळते ती शाळेतच. शाळा हे त्यांचे पहिले व्यासपीठ असते, यासाठी शाळेमध्ये दरवर्षी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

यांत विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य, एकपात्री प्रयोग, विविध मनोरंजनाचे कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमास ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष मा. काकासाहेब सामंत हेही उपस्थित होते. विद्यार्थ्यांद्वारे सादर केल्या गेलेल्या कलागुणांचे त्यांनी विशेष कौतुक केले.



3. **चावडी वाचन :** शिक्षण प्रक्रियेमध्ये ऐकणे, वाचणे व लिहणे या तीन गोष्टींना अनन्यसाधारण महत्व आहे. यापैकी वाचन ही प्रक्रिया अतिशय महत्वाची आहे. वाचन हे अर्थपूर्ण असले पाहिजे. विद्यार्थ्यांना वाचनाची कला उत्तम प्रकारे अवगत होण्यासाठी प्रशालेमध्ये प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी चावडी वाचन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी सौ. सावंत, पं. स. सदस्या सौ. साळुंखे, पावस गावचे सरपंच श्री. सुभाष पावसकर तसेच स्वामी स्वरूपानंद विद्या मंदिर या प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. सीताराम पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थही उपस्थित होते.

या सर्वांच्या उपस्थितीत मुलांनी निर्भीडपणे अर्थपूर्ण वाचन केले. मान्यवरांनी विचारलेल्या प्रश्नांची योग्य ती उत्तरे दिली. त्यामुळे उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे व सर्व शिक्षकांचे कौतुक केले.



4. **रमजान ईद :** शाळेमध्ये सर्व धर्म सहिष्णुता हे मूल्य जोपासले जाते. हिंदुच्या सणाबरोबरच इतर धर्मातील सणांची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी व त्यांच्यामध्ये इतर धर्माविषयी आदर निर्माण व्हावा या हेतूने आम्ही शाळेमध्ये सर्वधर्मीय कार्यक्रमाचे आयोजन करीत असतो.

त्याचाच एक भाग म्हणून पावस हे गाव हिंदूंबहुल जरी असले तरी अल्पसमाज असलेल्या मुस्लीम समाजासाठी पवित्र मानलेल्या रमजान ईदचेही आयोजन केले होते.



5. **सरस्वती पूजन :** सरस्वती म्हणजे विद्येची देवता. त्यामुळे या विद्येचे म्हणजे सरस्वतीचे पूजन करणे ही आनंदाची गोष्ट आहे. त्यानुसार २ ऑक्टोबर या दिवशी सरस्वती पूजन करण्यात आले. या दिवशी विधीपूर्वक सरस्वती मूर्तीची शालेय परिसरात स्थापना करण्यात आली.

तसेच याच कार्यक्रमाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांना जुने ग्रामीण पारंपारिक खेळाची माहिती देऊन त्या खेळांची स्पर्धाही घेण्यात आली.



6. **स्पर्धा परीक्षा :** आजचे युग हे स्पधेचे युग आहे. आज प्रत्येक ठिकाणी पुढे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना जीवघेण्या स्पर्धेला सामोरे जावे लागते. या स्पर्धांची विद्यार्थ्यांना बालवयातच सवय लागावी व हे विद्यार्थी स्पर्धेत टिकून राहावेत म्हणून शाळेतील विद्यार्थ्यांना विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी दिली जाते.

इयत्ता २ री व ३ रीच्या मुलांना MTS परीक्षेस बसविले जाते तसेच ४ थीच्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत घेतल्या जाणाऱ्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेला बसविले जाते. यावर्षी दुसरी व तिसरीतील अनुक्रमे ५ व १६ विद्यार्थी MTS परीक्षेस बसले होते. यापैकी तिसरीतील कु. अद्वैत विवेक काळे हा विद्यार्थी केंद्रात प्रथम आला. तसेच पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २१ विद्यार्थी सहभगी झालेले होते. त्यापैकी १९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर आकाश अमर गुरव हा विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकला.

या सर्व विद्यार्थ्यांसाठी सातत्याने सकाळी ९:३० ते १०:४५ व सुट्टीच्या दिवशीदेखील मार्गदर्शन सुरु होते. यासाठी सौ. मैथिली लांजेकर, सौ. विधी देसाई व मी स्वतः अथक सातत्यपूर्ण मेहनत घेतली.



7. बालदिन : १४ नोव्हेंबर भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस. या दिवशी संपूर्ण देशात हा दिवस 'बालदिन' म्हणून साजरा केला जातो. विद्यार्थ्यांना देखील या दिवसाची फार उत्सुकता असते. म्हणून या दिवशी शाळेमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे तसेच क्रीडा स्पर्धांचे आयोजन शाळेद्वारे केले जाते.



8. **सर्वांगसुंदर व्यायाम प्रकार :** शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहावे म्हणून शाळेद्वारे सर्वांगसुंदर व्यायाम प्रकार विद्यार्थ्यांकडून करून घेतले जातात. या विविध व्यायाम प्रकारांबरोबरच विद्यार्थी डम्बेल्स, रिंग, काठी यांसारखे साधनयुक्त कवायती मुले दर शनिवारी करतात.



नवोपक्रम

शिक्षकांच्या उपक्रमशिलतेमुळे शाळेचे वातावरण चैतन्यमय बनते. विद्यार्थ्यांना समृद्ध शैक्षणिक अनुभव मिळून त्यांचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास होतो. शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी आपण जे काही परंपरेपेक्षा वेगळे करतो त्याला नवोपक्रम म्हणतात.

आमच्या प्रशालेत सौ. मैथिली लांजेकर यांनी 'करू मैत्री पर्यावरणाशी' असा नवोपक्रम शाळेत राबविला. यामध्ये शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. शाळेतील सर्व मुले पशु, पक्षी यांना पाहणे, त्यांचे निरीक्षण करून त्यांची माहिती पालक, शिक्षक किंवा इतर स्रोतांचा उपयोग करून मिळवू लागली. याची फलश्रुती म्हणजेच रत्नागिरी जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या नवोपक्रम स्पर्धेत आमच्या उपक्रमास जिल्हास्तरीय स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळाला.

स्वविकास

शालेय विकास करताना शिक्षकांचा स्वतःचा विकास होणेही तेवढेच महत्वाचे असून शिक्षकांनी त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत. त्यांचा व्यासंग वाढविणे नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरू शकतो.

S. S. C. D. Ed./ H. S. C. D. Ed. एवढीच गरजेपुरती शैक्षणिक पात्रतेपर्यंत मर्यादित न राहता अधिक विविध प्रकारच्या पदव्या तसेच पदव्युत्तर शिक्षण प्राप्त करून ज्ञान वृद्धिंगत करणे गरजेचे आहे. याचाच एक भाग म्हणून मी कला विषयात पदवी परीक्षा उत्तीर्ण होऊन पदवी प्राप्त केली. तसेच सौ. मैथिली लांजेकर पदवी तसेच पदव्युत्तर यांसह D. S. M, C. P. C. T. इत्यादी परीक्षेत उत्तीर्ण होऊन यश मिळविले. याचप्रमाणे सौ. विधी देसाई यांनीदेखील B. Ed. सह कला शाखेत पदव्युत्तर पदवी संपादन केली. याशिवाय या शिक्षकांनी भारत स्काऊट गाईड बेसिक व अडव्हांस कोर्स, विद्या भारती तसेच नवोपक्रम व शोध निबंध सादर करणे इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटविला. केवळ स्व-विकासापुरते मर्यादित न राहता प्राप्त ज्ञानाचा उपयोग शाळा तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केला.

शाळा संरक्षण आणि सुरक्षा

जि.प.शाळा पावस नं 1 मध्ये पहिली ते चौथीपर्यंतची ६ ते ९ या वयोगटातील मुले शिकत आहेत. त्यामुळे लहान मुलांची सुरक्षितता अतिशय महत्वाची आहे. म्हणूनच शाळेची इमारत चिरेबंद पक्की आहे. इमारतीची छत कौलारू असून शाळेभोवती चिरेबंदी सरंक्षक भिंत आहे. त्यामुळे बाहेरील कोणत्याही व्यक्तीस अवैधपणे सहजासहजी शालेय परिसरात प्रवेश करता येत नाही.

कृतियुक्त अध्ययन पद्धती (ABL)

अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील रुपांतरणात शाळेत चालू असलेल्या कृतियुक्त अध्ययन पद्धतीचा महत्वाचा वाटा आहे. गेली तीन वर्षे याच पद्धतीचा सातत्याने वापर होत आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाला खूप वेळ मिळतो तसेच स्वयंअध्ययनास संधीही मिळत आहे. शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षकांच्या सातत्याने सान्निध्यात राहत असल्याने त्यांची शिक्षकांविषयीची भीतीही कमी झालेली आहे. याचा परिणाम विद्यार्थी पटसंख्येवर होऊन शाळेचा पटही वाढला.

यशस्विता

आज प्रत्येक शाळेतील विद्यार्थी पटसंख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे शिक्षक संख्याही त्याप्रमाणात कमी होत आहे. परंतु माझ्या शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे इथे सातत्याने पटसंख्या केवळ टिकूनच राहिली नाही तर दरवर्षी त्यात वाढच होत आहे. हे सर्व शक्य झाले ते शाळेने घेतलेल्या नाविन्यपूर्ण तसेच कृतीशील अध्ययन-अध्यापन पद्धतीमुळेच. एव्हढेच नाही तर इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी त्यांचे माध्यम बदलून आमच्या मराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेण्यास उत्सुक असतात. या शाळेचे दुसरे वैशिष्ट म्हणजे शाळेतील माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात नावलौकिक निर्माण करीत आहेत जसे - वैद्यकीय, अभियांत्रिकी, संशोधन, शिक्षण, आरोग्य, कृषी, भारतीय प्रशासकीय सेवा इ. ही सर्व मान्यवर विद्यार्थी शाळेच्या विविध शैक्षणिक उपक्रमांत आवर्जून त्यांचा सहभाग नोंदवतात. आमच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षेत्रातील अनुभव कथन करून मार्गदर्शन करतात.

धन्यवाद

अमोल प्रदीप बेळगे
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भोगलवाडी नं.2,तालुका.जिल्हा.औरंगाबाद
ई-मेल आयडी- amolbelage87@gmail.com

प्रस्तावना -

औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर म्हणून जगाच्या नकाशावर ओळखले जाते व औरंगाबाद तालुका हा शैक्षणिकदृष्ट्या शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखला जातो. याच तालुक्यातील डोंगरकुशीत वसलेल्या विविध नाविन्यपूर्ण कृती कार्यक्रम राबविणाऱ्या अनेक जिल्हा परिषद शाळा त्यातच SLDP हा दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन प्रामुख्याने डोळयासमोर येणारी व कृतीकार्यक्रम राबविणारी शाळा म्हणजे डोंगर माथ्यावर हिरव्यागार सृष्टीत २४ घरे असलेल्या खेड्यातील शाळा म्हणजे जि.प.प्रा.शा. भोगलवाडी शाळा नं.2



या शाळेचा उल्लेख करताना शाळेचा वारसा सांगणे हे अनन्य साधारण आहे. खरे पाहता २४ घरे असणारी वस्ती असून ही शाळा सुरुवातीस भाग शाळा म्हणून सुरु होती (वर्ष २००२). त्यानंतर ही शाळा वस्तीशाळा म्हणून उदयास आली आणि ग्रामशिक्षण समितीच्या मान्यतेने व ठरावानुसार तेथीलच वस्तीतील शाळेत माझी नियुक्ती झाली. शाळेची सूत्रे हातात घेतल्या नंतर मला साथ मिळाली ती सह शिक्षकांची , त्यातच नाविन्यपूर्ण कार्यक्रमाची रेलचेल करत 12 पट असणारी शाळा ही यशाचे शिखर उंचावत पटसंख्या वर्षागणिक वाढत होती. अशाच परिस्थितीत मैलाचा दगड ठरावा या प्रमाणे त्यांना SLDP प्रशिक्षणातील विविध तंत्र व पद्धती पर्यवेक्षीय यंत्रणेच्या माध्यमातून शाळा विकासासाठी उपुयक्त ठरल्या. सन २०१७ साली १५० पटसंख्या असताना सुद्धा दोन शिक्षकावर इ. 8वी पर्यंतचे वर्ग सांभाळणे मोठे

आव्हानच होते, परंतु विद्यार्थ्यांचे अध्ययन अध्यापन सुलभ होण्यासाठी शाळेच्या कामाची त्यांच्या तीव्रतेप्रमाणे वर्गवारी करणे व प्राधान्यक्रम निवडून कामाची विभागणी करणे सोपे गेले व अध्ययन अध्यापनाकरिता वेळ मिळू लागला. त्यातूनच बहुवर्ग अध्यापन तंत्र पद्धतीनुसार वर्ग मित्राकडून विद्यार्थ्याच्या क्षमता निहाय गट तयार करून व गटास एक प्रतिनिधी देऊन त्यामार्फत गट अध्ययन पद्धतीचा अवलंब करण्यात आला. सहशालेय उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा शारीरिक व बौद्धिक विकास करण्याच्या हेतूने खो-खो व बुद्धिबळ या खेळावर प्रभुत्व मिळविले. त्यामुळे मुलांना शाळेची आवड निर्माण झाली आणि जीवन कौशल्यांचा अवलंब मूल्यशिक्षण खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये रुजू लागले. खरेपणाची भावना विकसित होऊन विद्यार्थी शाळेत व घरी प्रामाणिकपणे वागू लागले. नियमित शाळेत येणे, खोटे न बोलणे इ.कृती यांच्या दैनंदिन व्यवहारातून समोर येऊ लागल्या. पाहता पाहता शाळेच्या गुणवत्तेत वाढ होऊ लागली. त्याचा परिणाम म्हणून गावकऱ्यांचे पाय शाळेकडे वळू लागले. शाळेला लागणाऱ्या भौतिक सुविधा आणि गरजांची यादी तयार झाली आणि गावकऱ्यांच्या मदतीने शाळा सुसज्ज झाली.



नेतृत्व विकास -

मुख्याध्यापक हा शाळेचा आधारस्तंभ असतो आणि तसेच शाळेच्या विकासाचा मुख्य जल प्रवाह असतो यात जोपर्यंत सक्षम पालक,मेहनती विद्यार्थी, उपक्रम सहकारी व योग्य मार्गदर्शन यांचे झरे येऊन मिळत नाही तो पर्यंत शिक्षणाचा जल प्रवाह योग्य दिशेने प्रवाहित होत नाही. यावरील सर्वांचे उत्कृष्ठ उदाहरण म्हणजे भोगलवाडी शाळानं.2 या शाळेची सर्व टीम केंद्रप्रमुख व साधन व्यक्ती यांच्या लक्षात SLDP प्रशिक्षणामुळे आली व यासाठी शालेय नेतृत्व विकास प्रशिक्षणातील काही महत्वाच्या बाबींचा आधार घेत आम्ही स्वतःला सक्षम बनविण्यासाठी प्रयत्न सुरु केले व शाळा भेटी दरम्यान LEARNING WALK, VISION, MISSION, वेळेचे व्यवस्थापन, अध्ययनअध्यापनातील नव नवीन तंत्र, प्रोब्लेम

SOLVING, कोचिंग & मेंटरिंग, SWOT, जोहारी विंडो इ. बाबींवर केंद्रप्रमुख आणि साधन व्यक्ती यांनी शाळा भेटीत सतत चर्चा केली. त्यानुसार परिवर्तनाकडे आमची वाटचाल सुरु होती.

दृष्टी (VISION), ध्येय (MISSION) -

ध्येय साध्य करण्यासाठी शाळा विकासाचा आराखडा तयार करण्यात आला. त्यासाठी त्यात विकासाचे काही महत्वपूर्ण टप्पे तयार करण्यात आले. कारण कोणतेही ध्येय योग्य दृष्टी असल्याशिवाय साध्य होणारच नाही म्हणूनच सर्व शिक्षक, मुख्याध्यापक व पर्यवेक्षीय यंत्रणेने महत्वाचा निर्णय घेतला तो म्हणजे शाळेचे रूप बदलण्याचा . शाळेची रंग रंगोटी, स्वच्छ आणि सुंदर शालेय परिसर विविध झाडे लावून शाळेचा परिसर सुशोभित करणे, शाळेचा स्तर उंचावणे , ISO मानांकन प्राप्त करून देणे हे सर्व साध्य करण्यासाठी एका चांगल्या संघाची आवश्यकता असते. म्हणून सर्व पर्यवेक्षीय यंत्रणा,मुख्याध्यापक शिक्षक, गावकरी, पालक हे साध्य करण्यासाठी एकत्र आले व त्या दिशेने वाटचाल करू लागले व तसेच केंद्र प्रमुख व साधनव्यक्ती यांनी तयार केलेला कच्चा आराखडा शाळेसमोर ठेवण्यात आला व त्यात आवश्यक ते बदल चर्चेद्वारे करण्यासाठी ठेवले असता प्रामुख्याने अतिशय महत्वाचे ध्येय निश्चित करण्यात आले " माहितीच्या उपक्रमातून विद्यार्थी स्पर्धा परीक्षेसाठी तयार करणे"याची सर्वस्वी तयारी शाळेमार्फत करून घेतली. याचेच फलित म्हणजे शिष्यवृत्ती निकाल- या शाळेतून एकूण 15 विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक असून शिष्यवृत्तीचा निकाल 100% आहे .



शालेय व्यवस्थापन समिती बैठक

संघ बांधणी -

शाळेसंबधी एखादे ध्येय व यश संपादन करण्यासाठी आवश्यकता असते ती एका मजबूत संघाची. संघ बांधणी साठी आवश्यक आहे. शिक्षक, मुख्याध्यापक , SMC सदस्य, पालक व गावकरी यांचे स्नेहबंध व एकमत जे रोज शाळेच्या संपर्कात असतात आणि यांच्यातील दुवा म्हणजे पर्यवेक्षिय यंत्रणा ज्यात गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख ,विषय व विशेष साधन व्यक्ती , विशेष शिक्षक इ. या सर्वानी एकत्र एकसंघ करण्याचे काम केले. शाळा विकासासाठी पहिली बैठक शाळेत आयोजित करण्यात आली व त्यात आम्ही सुचविलेल्या व व्यक्त केलेल्या अपेक्षा, दृष्टी व ध्येय जेव्हा आम्ही निधीचे आवाहन समोर ठेवण्यात आले. प्रस्ताव सर्वांसमोर ठेवण्यात आला. सर्वांच्या मान्यतेने निधी स्वरुपात लोकसहभागातून मिळालेले योगदान म्हणजे – 1. संगणक २५०००/- रु. 2. तार कम्पाउंड १५०००/- रु. 3. ३००० लिटर पाणि टाकी २००००/- 4. लाईट फिटिंग १००००/- रु. 5. स्प्रे पेंटिंग ५५०००/- रु. 6. 17 गुंठे जमीन – 1 लाख 80 हजार ७. मैदानात सिमेंटचे गट्टू 2 लाख, 8. साऊड सिस्टीम १५०००/- रु. 9. प्रोजेक्टर ३००००/-रु. आणि आता संरक्षक भिंतीसाठी प्रस्तावित 6 लाख 50 हजार रु. मंजूर झाले. 11. 52 इंच LED टी.व्ही. संचया सर्वातून उदयास आली, नवीन रूपात जि.प.प्रा.शा. भोगलवाडी नं. 2



अध्यापन करताना प्रथम वार्षिक नियोजन, घटक नियोजन व मासिक नियोजन या प्रमाणे कार्यवाही करण्यात यायची व इतर बाबी (सहशालेय उपक्रम) वेळे अभावी घेण्यास अडचण यायची जसे शाळेत भरपूर कामे असतात उदा. अध्यापन, योग्य अध्यापनासाठी शैक्षणिक साहित्य निर्मिती, विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष, व्यक्तिगत व्यवस्थापन, अर्थ

व्यवस्थापन , शासकीय कामे, ONLINE कामे परीक्षा , प्रशिक्षणे, खेळ-स्पर्धा इ. यावर मात करण्यासाठी केंद्रप्रमुख आणि साधन व्यक्ती यांच्या मार्गदर्शनानुसार शाळेतील सर्व शिक्षकांनी SLDP अंतर्गत TIME MANAGEMENT या घटकानुरूप P1, P2,P3, P4 नुसार कामाची विभागणी कऋण घेतली. ज्यामुळे वेळेचा चांगल्या प्रकारे उपयोग झाला कुणावरच दबाव न येता परिणामी सर्व कामे वेळेत पूर्ण होऊ लागली व प्रत्येक व्यक्तीपरत्वे आपापल्या जबाबदाऱ्या आनंदाने स्वीकारून व्यवस्थित नियोजनाप्रमाणे वेळेत पूर्ण करण्यात आल्या. शाळेने आपल्या कामाची विभागणी चांगल्या प्रकारे केली आहे.

जसे P1 – महत्वाचे/ तातडीचे, टी.सी.बुक लिहिणे ,प्रवेश निर्गम लिहिणे, परीक्षा नियोजन, राष्ट्रीय उत्सव साजरे करणे, स्तर निर्धारण, ONLINE माहिती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था.

P2 – महत्वाचे नसलेले / तातडीचे, शा.पो.आ, संस्कुतिक कार्यक्रम, परिपाठ, विविध प्रशिक्षणे, दैनंदिन निरीक्षण.

P3 – महत्वाचे/ तातडीचे नसलेले - शालेय कीर्द, आवक-जावक रजिस्टर, ग्रंथालय,पालक सभा, आरोग्य तपासणी शिबीर ,उपस्थिती टिकविणे,

P4 – महत्वाचे नसलेले / तातडीचे नसलेले –वेळेवर उद्भवणारे प्रश्न, भौतिक सुविधा, शाळा शुशोभिकरण .

LEARNING WALK :

अध्ययनाचा मार्ग निश्चित करत असताना वर्गात काय चालले आहे हे प्रत्यक्ष पाहून विद्यार्थ्यांची गुंतवणूक, अध्यापन शैली, काही समस्या दिसून आल्यावर त्यावर विचार मंथन अध्ययन अध्यापनातील प्राधान्यक्रम , विद्यार्थी व शिक्षक आंतरक्रीया तसेच विद्यार्थी व शिक्षक वेळेवर येतात काय ?, संसाधनाचा प्रभावी वापर, परिपाठ पद्धत, शाळेतील भौतिक सुविधा मध्यान्ह भोजन योजना, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छता गृह, शाळेचे नियम व शिस्त या बाबी केंद्र प्रमुख आणि साधन व्यक्ती यांना प्रशिक्षणात झालेल्या मार्गदर्शनातून,त्यांनी केलेल्या शाळा भेटीतून यावर माहिती देण्यात आली. याचेच फलित

म्हणून आज या सर्व बाबी व्यवस्थित दिसून येतात आणि यामुळे शिक्षक, विद्यार्थी व पर्यवेक्षीय यंत्रणेमध्ये विश्वास व स्नेहबंध निर्माण झाले.



विषय साधन व्यक्ती संवाद साधतांना

प्रभावी वर्ग व शाळाभेट :



शालाभेटी दरम्यान इयत्तानिहाय प्रत्येक विद्यार्थ्यांचा साधन व्यक्ती मार्फत अध्ययन स्तर निश्चित करण्यात आला. शिक्षकांशी संवाद साधून व प्रारंभिक स्तरावरील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार शैक्षणिक साहित्यांचा वापर करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे बाबत सविस्तर चर्चा झाली. ERAC तंत्र पद्धतीची माहिती विषय साधनव्यक्ती मार्फत या शाळेतील प्रत्येक शिक्षका पर्यत साधनव्यक्ती मार्फत पोहचविण्यात आली. तसेच या पद्धतीने अध्ययन अनुभव दिल्यास सर्व मुले 100% प्रवाहात टिकून राहतात हे महत्वाचे. सुरवातीला पारंपारिक पद्धतीने शिकविले जायचे व अध्यापन एकतर्फी असायचे, शैक्षणिक साहित्याचा अभाव असायचा व विद्यार्थ्यांचे शिकणे कमी व्हायचे. केंद्रप्रमुख आणि साधनव्यक्ती यांच्या शाळा भेटीचा निश्चितच फायदा झाला प्रत्येक भेटी दरम्यान शाळेची सद्य

स्थिती यावर चर्चा होऊन शाळेच्या विकासासंबंधी ठराव घेण्यात आले . शाळेच्या भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे, शाळेत मुलांना नियमित पाठविणे, E-LEARNING ,स्पर्धा परीक्षा तयारी ,सांस्कृतिक कार्यक्रम, जन जागृती ,मूल्य शिक्षण या गोष्टीची वारंवार व वेळोवेळी वरिष्ठ व पर्यवेक्षीय यंत्रणा यांच्या कडून शिक्षक व पालक यांचे समुपदेशन करण्यात आले,



पर्यवेक्षीय यंत्रणेच्या मार्गदर्शन व समुपदेशनामुळे आम्हाला शाळेत नाना विविध उपक्रम राबविण्याची संधी उपलब्ध होते.



मा. गट शिक्षणाधिकारी संवाद साधतांना

CHANGE CURVE

एकीकडे शाळेचे बाह्य रूप झपाट्याने बदलत होते ज्या मुळे विद्यार्थ्यांचाही उत्साह वाढत होता परिणामी ER AC तंत्र पद्धतीचा वापर केल्या मुळे 100 % मुले शिकण्यात सहभागी झाले व शाळेत टिकू लागले याचाच प्रत्यय म्हणजे गावाजवळ असलेली इंग्रजी माध्यमाची

शाळा बंद झाली व वर्षा गणिक विद्यार्थी शाळेत प्रवेशित होऊ लागले व शाळा झपाट्याने शैक्षणिक प्रगतीकडे वाटचाल करू लागली.

PROBLEM SOLVING

शाळेच्या वाढत्या पट संख्या मुळे शाळेला वर्ग खोल्या कमी पडत होत्या व शाळेला पुरेशा प्रमाणत जागाही उपलब्ध नव्हती यावर मात करण्यासाठी आम्ही सर्व ,आणि गावकरी यांनी गावकऱ्यांच्या वादामुळे पडून असलेली वादग्रस्त जागा व त्यासाठी गावातील मालकी हक्क असलेले १९ लोकांचे समुपदेशन करून व SLDP अन्वये 'JOHARI WINDOW' चा मार्ग अवलंबून ही वादग्रस्त असलेली जागा शाळेसाठी दान म्हणून मिळवली. त्याचा उपयोग सध्या विद्यार्थी खेळाच्या मैदानासाठी वापरतात.

शाळेची विशेष बाब -

शाळेत दैनंदिन अध्यापन करत असतानाच सहशालेय उपक्रमाअंतर्गत शाळेतील श्री. काळे सर यांनी सुरुवात केली ती बुद्धिबळ खेळाची त्यासाठी सर्व प्रथम शाळे मार्फत सर्व शिक्षकांच्या वतीने एक डेमो बोर्ड खरेदी करण्यात आला. विद्यार्थ्यांना या खेळाविषयीचे नियम सांगून यामध्ये आवड व रुची निर्माण करण्यात आली. मुलांचा उत्साह पाहून आपल्या पाल्यांना CHESS बोर्ड घेवून दिले. याचे फलित असे की शाळेतील विद्यार्थ्यांनी DSO अंतर्गत होणाऱ्या स्पर्धेत सहभागी होवून जिल्हयात प्रथम आले आणि विभागापर्यंत मजल मारली. तसेच तालुकास्तरीय स्पर्धेत मुले व मुली यांनी दोन्ही गटात प्रथम क्रमांक मिळविला.



तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत प्रथम क्रमांक

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोगलवाडी क्र.2 DIGITAL शाळा :

ज्ञानरचनावाद,ERAC अध्यापन पद्धती, शैक्षणिक साहित्याचा अधिक वापर इ. दैनंदिन अध्यापनात करत असताना एवढ्यावरच न थांबता शाळास्तर आणखी उंचावण्यासाठी DIGITAL school ची संकल्पना सर्व पर्यवेक्षीय यंत्रणा तसेच शाळा टीम यांनी रुजविली व ही शाळा लोकसहभागातून DIGITAL झाली. यामध्ये अभ्यासक्रम शिकविण्यासाठी विविध

SOFTWARE तसेच E-LEARNING VIDEO याद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देण्यात येतात.

इतर उपक्रम :

1. गप्पांमधून स्पर्धा परीक्षेकडे :

   माहितीचा उपक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोगलवाडी क्र.2 या शाळेत सहशालेय उपक्रमातर्गत राबविण्यात येतो. मुलांना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी माहितीचा उपक्रम वेगळ्या वेळेत न घेता शाळेच्या परिपाठामध्येच घेण्यात येतो. याचे फलित असे की मुलांच्या सामान्य ज्ञानात खूप भर पडत आहे. व नवनवीन माहितीचा शोध विद्यार्थी स्वयंप्रेरणेने करत आहेत.

2. बुद्धिबळातून बुद्धिमत्तेकडे :

   दुपारच्या सुट्टी नंतर विद्यार्थ्यांना सक्रीय ठेवण्यासाठी बुद्धिबळ या खेळाचे आयोजन केले जाते. यातून विद्यार्थ्यांची बुद्धी तीक्ष्ण होऊन एकाग्रता वाढण्यासाठी मदत होते. काही विद्यार्थी गटाने बसून स्वयंशिस्तीने एकमेकास अध्ययनास सहकार्य करतात.



3. स्पोकन इंग्लिश :

   इंग्लिश मशीनच्या सहाय्याने विद्यार्थी इंग्रजी वाक्य तयार करतात. तसेच 12 काळातील वाक्य आपण दिलेल्या क्रीयापदानुसार तयार करून सांगतात.



4. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन :

गावात पाण्याचा अभाव असल्यामुळे टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू या संकल्पनेचा विचार करून बिस्लरी बॉटलच्या साहाय्याने झाडांना पाणी देऊन झाडांची जोपासना करतात.



5. वाढदिवस साजरा करणे :

उपस्थितीत वाढ होण्यासाठी न चुकता शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याचा वाढदिवस शाळेत साजरा करण्यात येतो

6 .वाचन कट्टा :

या उपक्रमांतर्गत विद्यार्थी विविध पुस्तकांचे वाचन स्वयंप्रेरणेने फावल्या वेळेत करतात.

6. भाषण व निबंध स्पर्धा :

वेळोवेळी भाषण व निबंध स्पर्धेचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून विद्यार्थ्यांना समृद्ध करतात.



शाळेचा सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग

धन्यवाद

संजय गुलाबराव पाटील
जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय, सावरगाव डुकरे, तालुका.चिखली,जिल्हा बुलडाणा
ईमेल आयडी - sawargaondukare123@gmail.com

प्रास्ताविक -

जिल्हा परिषद हायस्कूल सावरगाव दुकरे या शाळेचे नेतृत्व करत असताना विद्यार्थी वयोगट व त्यानुसार त्यांच्या गुणवत्ता विकासाच्या दृष्टीने प्रयत्न करताना शाळास्तरावर काही समस्या भेडसावतात. त्या समस्यांना मी आव्हान समजून ते आव्हान स्वीकारले. भेडसावणाऱ्या समस्यांची यादी करून त्यांचे वर्गीकरण केले. त्यांचा प्राधान्यक्रम ठरवून त्या समस्येचे मूळ शोधले. कारण समस्या मुळातून दूर केल्याशिवाय विद्यार्थी विकास व त्यातून शाळेची गुणवत्ता टिकून ठेवणे शक्य नाही हे मी जाणले. त्यापैकी काही समस्या आम्हाला जाणवल्या ,

- विद्यार्थी संख्येनुसार भौतिक सुविधांची उपलब्धता नव्हती .
- विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीचे प्रमाण जास्त होते.
- खेड्यावरून ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांची वाहन व्यवस्था नव्हती.
- प्रत्येक मूल शिकू शकते,यावर साशंकता होती.
- अप्रगत विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात आणण्याची गरज होती.
- कुमारवयीन मुला-मुलींच्या वर्तनात होणारे बदल व त्यानुसार शालेय स्तरावर होणारे परिणाम याबाबत फारशी उपाययोजना केलेली नव्हती.

अशा वेगवेगळ्या समस्या नेतृत्व करत असताना माध्यमिक स्तरावर जाणवत होत्या. परंतु शालेय नेतृत्व विकास प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर समस्या निराकरण कसे करावे याबद्दल माहितीचे उपयोजन करून त्याचे निराकरण करण्यासाठी दिशा मिळाली,हुरूप आला.

शाळेची दृष्टी (Vision) -

जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यांच्या समस्या व आव्हाने हे शहरातील शाळांमधील विद्यार्थी व त्यांची आव्हाने यापेक्षा वेगळी आहेत, शेवटी शाळेचा आत्मा म्हणजे विद्यार्थी, म्हणून शाळेचा विकास साधणे म्हणजे प्रथमत: विद्यार्थी केंद्रबिंदू मानून योजना आखण्याचे ठरले. त्यानुसारच शाळेची दृष्टी निश्चित करण्यात आली. कोणतीही शाळा समाजापासून वेगळी राहू शकत नाही. शाळा मोठ्या समाजाचा एक घटक असते. शाळा स्थानिक समाज, जिल्हा, राज्य, केंद्र आणि वैश्विक समाजाचा घटक असते.. हे लक्षात घेऊन (Vision) दृष्टी ठरवण्यात आली.. 'विद्यार्थी शिक्षक यांचा ऋणानुबंध विकसित करून अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे ,जेणेकरून प्रत्येक विद्यार्थी आपले भावी जीवन उत्कृष्ट पद्धतीने जगेल.

ध्येये -

- शाळेच्या प्रत्येक घटकाचा विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी उपयोग करून घेणे.
- सहकारी शिक्षक वर्गात सांघिक भावना निर्माण करून त्याचा विद्यार्थी विकासात सहभाग देणे.
- सामाजिक घटकांचा जास्तीत जास्त सहभाग घेऊन शाळेबद्दल समाजाचा विश्वास दृढ करणे.
- प्रशासकीय यंत्रणा व शासनाची धोरणे व योजना यांचा शाळेच्या विकासासाठी उपयोग करून घेणे.
- शाळेचा प्रत्येक विद्यार्थी समाजाचा भावी दर्जेदार व स्वावलंबी नागरिक बनवणे.

शाळा विकासासाठी केलेले नियोजन व त्याची अंमलबजावणी -

- प्रथम शाळा व्यवस्थापन समिती आणि शाळेचे सर्व शिक्षक यांच्या एकत्र बैठका घेतल्या.
- बैठकीत शाळा आराखडा व त्यानुसार शाळेचे ध्येय निश्चित केले.
- ध्येय निश्चिती नंतर ते पूर्ण करण्यासाठी उपलब्ध साधने (अ) भौतिक साधने (ब) मनुष्यबळ (क) आर्थिक भांडवल याबद्दल नियोजन केले.
- पुरेशा वर्गखोल्या, नादुरुस्त वर्गखोल्या, ग्रंथालयाची खोली, स्वतंत्र वाचनालय कक्ष, शिक्षक कक्ष, प्रयोगशाळा, कार्यालय, स्वच्छतागृह दुरुस्त करून घेणे व रंगरंगोटी करून फलक लावणे.
- एक शिक्षक एक शिपाई यांची पदे रिक्त होती त्यासाठी ठराव घेऊन वरिष्ठाकडे मागणी करणे.

- लोकवर्गणी, शिक्षकांचा सहभाग घेऊन विद्यार्थी बैठक व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे.
- शिक्षकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना शिकण्यास प्रोत्साहित करणे.
- बदलत्या अध्ययन-अध्यापन पद्धतीचा स्वीकार करावा यासाठी प्रगत शाळांना भेटी व तेथील उपक्रम यांचा उपयोग शाळेतील विद्यार्थ्यांसाठी करून घेणे.
- पालक सभा घेऊन विद्यार्थी उपस्थिती टिकवून ठेवणे.
- खेड्यातील विद्यार्थी प्रवासाची व्यवस्था करणे.

शाळा प्रगतीसाठी अवलंबिलेली तत्त्वे -

- सर्व विद्यार्थ्यांना समान दर्जाचे व सर्वसमावेशक शिक्षण मिळावे यासाठी सर्व जाती धर्माचे व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेशित करण्यात येते.
- शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला शासकीय प्रत्येक योजनांचा लाभ मिळावा यासाठी स्वतंत्र व्यवस्था करून ती योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात येते.
- सर्व विद्यार्थी, शिक्षक शिक्षणाच्या प्रवाहात यावे यासाठी वर्गातील बैठक व्यवस्था गरजेनुसार बदलली जाते.
- विद्यार्थी समस्या व त्यांचे निराकरण व्हावे यासाठी प्रत्येक शिक्षक विद्यार्थी नोंदवही अद्ययावत ठेवतात.
- समाजातील प्रत्येक घटकाला शाळा आपली वाटावी यासाठी पालकांचा सहभाग घेऊन विद्यार्थी शिक्षक पालक भेटी दर महिन्याच्या एका शनिवारी एक वर्गासाठी आयोजित करून त्याची अंमलबजावणी केली जाते.
- विद्यार्थी सुरक्षेसाठी मुलींचे "स्वसंरक्षण प्रशिक्षण विद्यार्थी सुरक्षा रक्षक पथक तयार करून त्यांना प्रशिक्षित केले जाते.

शालेय वातावरण व कार्यसंस्कृती :-

शाळेची सुरुवात मंगलमय व आनंदी वातावरणात होते. प्रत्येक शिक्षक व कर्मचारी वेळेच्या आत शाळेत उपस्थित असतो.. मंगल ध्वनीने पाच मिनिटात शाळेची सुरुवात होते व शाळा भरणार असे सर्व विद्यार्थ्यांना कळते. सर्व विद्यार्थी प्रार्थनेस जमा झाल्यानंतर परिपाठात सहभागी होतात, शाळेच्या प्रांगणात पुरेशी झाडे

आहेत,फुलबाग आहे त्यामुळे शाळा म्हणजे बाग असे वातावरण आहे. वर्गखोल्यांची मांडणी अर्धगोलाकार आकाराची असून कार्यालय मधोमध आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षक आपलेसे वाटतात त्यामुळे फक्त वर्गातच नाही तर इतर वेळी सुद्धा शिक्षक विद्यार्थी संवाद, चर्चा नेहमी चालू असते. शाळेतील प्रत्येक घटक आपले काम प्रामाणिकपणे करतो त्यामुळे एखादा शिक्षक सुट्टीवर असला तरी पर्यायी व्यवस्था करावी लागत नाही. "शिकण्यासाठी या व सेवेसाठी जा' या ब्रीदवाक्यानुसार प्रत्येक विद्यार्थी शिक्षक व कर्मचारी कार्यरत असतो. एकंदरीत शाळेचे वातावरण आनंदी व शिकण्यास पूरक असे आहे, त्यामुळे इंग्रजी माध्यमांच्या शाळा गावापासून चार किलोमीटर अंतरावर असून सुद्धा आमच्या शाळेत पटसंख्या चांगली आहे.

स्व विकास व त्यातून शालेय विकास आणि संघ बांधणी -

स्वविकास :- नेता म्हणून माझ्यातील उणिवा व शक्तिस्थाने यांचा शोध घेतला. अवघड वाटणाऱ्या बाबी सहकाऱ्याच्या मदतीने जाणून घेतल्या . काही गोष्टी सर्वाना सांगण्यासारख्या खुल्या करून त्याचा उपयोग सर्व सहकारी व समितीतील सदस्य यांच्यामध्ये विश्वास निर्माण झाला.. त्यामुळे प्रत्येकातील आपली शक्तिस्थाने कोणती व त्याचे संधीत रूपांतर करून आमचा एक संघ तयार झाला. मत-मतांतरे यांचा स्वीकार करून सर्वांच्या मताचे एकत्रीकरण केले व त्या सर्वांचा एकच उद्देश म्हणजे 'विद्यार्थी गुणवत्ता' हे लक्षात घेऊन काम सुरु केले..

शाळेतील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत झालेले बदल -

शाळेत चालणारी महत्त्वाची प्रक्रिया म्हणजेच अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, SLDP प्रशिक्षणापुर्वी अध्ययन अध्यापन प्रक्रिया शाळेत सुरु होती, ती जुन्या पद्धतीने शिक्षक शिकवतात विद्यार्थी ऐकतात ,उत्तरे देतात परंतु या प्रकल्पानंतर अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत आमूलाग्र बदल घडून आला.

- प्रथमत: नेता या नात्याने अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत बदलासाठी पाठ निरीक्षणात बदल केला. पाठ निरीक्षणातून मुलांचे शिकणे सोपे व्हावे,यास महत्व दिले.
- शिक्षकांना पाठ टाचणाच्या जुन्या चौकटी सोडून विद्यार्थी कृती,गटकार्य व फलित या नोंदी घेण्यास सांगितले.

- शिक्षक वर्गात किंवा वर्गाबाहेर गटकार्य करून समृद्ध अध्ययन अनुभव देतात.
- शिक्षक काय शिकवतात यापेक्षा विद्यार्थी कसे शिकतात याकडे लक्ष दिले जाते.
- फक्त वर्गच शिकण्यासाठी असतो असे नाही तर शिकणे ही निरंतर प्रक्रिया आहे याची जाणीव शिक्षक व विद्यार्थ्यांना झाली.

शाळेसाठी पालक व समाजाचा सहभाग -

शाळा, समाज, पालक, विद्यार्थी यांचा कर्णदुभाजक म्हणजे मुख्याध्यापक म्हणजे नेता असतो. विद्यार्थी हितासाठी समाजातील विविध घटकांचा सहभाग घेऊन त्यातून शाळेचा विकास घडून आणणे हेच खरे नेत्याचे महत्त्वाचे काम असते. भौतिक सुविधा शाळेत उपलब्ध होत्या परंतु त्याचा उपयोग विद्यार्थ्यासाठी कमी होत होता तर काही भौतिक सुविधा अपुऱ्या होत्या. त्यापैकी मला सर्वात जास्त भेडसावणारी समस्या म्हणजे विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सुविधा, झाडांना व पोषण आहारासाठी पाणी याची. त्यासाठी प्रथम शिक्षक निधी 20000 रुपये उपलब्ध करून गट तयार केले. प्रत्येक गटात दोन शाळा व्यवस्थापन समिती सदस्य देऊन लोकवर्गणी केली. 45 हजार रुपये निधी जमा झाला. शाळेत वीस हजार रुपयांमध्ये बोरवेल व पंधरा हजार रुपयांमध्ये पंप टाकला.उरलेल्या दहा हजार रुपयांमध्ये प्लंबिंग करून माजी दिवंगत विद्यार्थ्यांच्या पालकांनी पिण्याच्या पाण्याची टाकी दुसऱ्या मजल्यावर बांधून दिली. त्याचे कनेक्शन ठिकठिकाणी काढून शुद्ध पिण्याचे पाणी व वापराचे पाणी असे वेगळे कनेक्शन केले. त्याचा उपयोग बगीचा व वृक्षसंवर्धनासाठी झाला. आज गावात पिण्याचे पाणी नाही मात्र शाळेत चोवीस तास शुद्ध पाणी उपलब्ध आहे त्यामुळे विद्यार्थी व त्यांचे आरोग्य व परसबाग ह्या बाबी अद्ययावत आहेत.

शालेय गुणवत्तेच्या अनुषंगाने राबवले जाणारे उपक्रम व नवोपक्रम -

शाळेचा विकास फक्त विद्यार्थ्यांच्या अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुधारण्यानेच होतो असे नाही तर त्यासाठी काही पूरक शालेय उपक्रम राबवावे लागतात. कारण विद्यार्थी शाळेतच अनियमित असेल तर त्याचा गुणवत्ता विकास साधणे शक्य नाही,म्हणून शाळेसाठी काही नवोपक्रम राबविण्यात येतात ते पुढील प्रमाणे

- "विद्यार्थी मित्र"- दादा ताई या गटाची स्थापना करून प्रत्येक वर्गात एक रजिस्टर ठेवलेले आहे,त्यात गैरहजर विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या समस्या जाणून त्यांना शाळेत घेऊन येण्याचे काम विद्यार्थी करतात.
- परिपाठाच्या वेळी समोर लिहिलेल्या वर्ग पटानुसार मोजणी होते. ज्या वर्गाची विद्यार्थी उपस्थिती जास्त आहे त्या वर्ग मित्राला / वर्ग नायकाला फुल देऊन सन्मानित केले जाते.
- विज्ञान, गणित विषयासाठी एक स्वतंत्र प्रयोगशाळा असून विविध शैक्षणिक साधने विद्यार्थ्यांकडून बनवून घेतले जातात. ते साहित्य प्रयोगशाळेत उपलब्ध करून दिले जाते.
- खेळाचे स्वतंत्र मैदान व त्यात कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल व वैयक्तिक खेळासाठी अतिथी निदेशकांमार्फत कोचिंग केले जाते व सराव करून घेतला जातो.
- परिपाठ, सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी मित्र मंडळ, सांस्कृतिक विद्यार्थी मंडळ, क्रीडा मंडळ या मंडळाची स्थापना करून विद्यार्थी त्यानुसार कार्यवाही करतात, जेणेकरून विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त व स्वतः काम करण्याची सवय लागते.

अपेक्षित शाळेचे कल्पनाचित्र व त्यासाठी आपण पार पाडत असलेली भूमिका -

आजची स्पर्धा व आजची आव्हाने लक्षात घेऊन माझ्या शाळेत माझी शाळा कशी असावी याबाबतचे माझे कल्पनाचित्र हे फार मोठे आहे, त्याला थोडक्यात मांडत आहे.

- भविष्यात माझ्या शाळेतील विद्यार्थी शंभर टक्के शाळेत उपस्थित असेल व त्याला शंभर टक्के दर्जेदार गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाईल.
- शाळेतील प्रत्येक घटक हा विद्यार्थ्यांसाठी उपयोगी पडेल व त्याचा विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी उपयोग होईल.
- माझ्या शाळेतील प्रत्येक शिक्षक ज्ञानाने परिपूर्ण असेल जे विद्यार्थ्यांना मिळत नाही किंवा शिकण्यात अडचणी येतील त्याला सुलभक म्हणून माझा शिक्षक तयार असेल.
- माझी शाळा ISO असेल. विद्यार्थ्यांना प्राथमिक आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करण्यासाठी स्कूल प्राथमिक आरोग्य केंद्र असेल.
- विद्यार्थी आंतरराष्ट्रीय दर्जाचा निर्माण व्हावा यासाठी तसे पूरक शिक्षण देण्याची सुविधा शाळेत असेल.

भूमिका -

- शिक्षकांचा दर्जा व आत्मविश्वास वाढविण्यासाठी तयार करणे.
- भौतिक सुविधांची उपलब्धता करून देण्यासाठी समाज व शासन यांच्याशी समन्वय साधणे.
- शिक्षक कर्मचारी यांची संघ बांधणी करून संघनायकाची भूमिका बजावणे.
- आव्हानांना संधीत रूपांतर करण्याची क्षमता निर्माण करणे.

शालेय संघटन व्यवस्थापन व प्रशासन इत्यादींची केली जाणारी कार्यवाही -

शाळा विकास व गुणवत्ता टिकून ठेवणे हे एकट्याचे काम नसून अनेक व्यक्ती व इतर घटक व्यवस्थापनात सहभागी करून त्यांचा त्यानुसार सहयोग घ्यावा लागतो. त्यासाठी एकापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र करून त्यांना एका विशिष्ट ध्येयाप्रति कार्यान्वित करणे हे कसब असते. त्यासाठी सर्वांच्या मतांचा आदर करून त्यांना आपले विचार व प्रेरणा यांचा शाळा ध्येयाच्या दृष्टीने वापर करून घ्यावा लागतो. शिक्षक पालक विद्यार्थी संघ तयार करून त्यामध्ये सांघिक भावना तयार केली जाते. प्रत्येक शाळाच्या प्रगतीच्या कार्यात सर्वांचा सहभाग करून टीमवर्क केले जाते.शाळेच्या विविध विकास योजना आखताना शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचा सल्ला व विचारांचे एकत्रीकरण करून ठरविल्या जातात. व्यवस्थापनाच्या सहाय्याने योजना आखल्या जातात व त्यांची अंमलबजावणी एकत्रित येऊन केली जाते. वेगवेगळया कामाचे वर्गीकरण करून प्रत्येकाच्या क्षमतेनुसार त्यांची जबाबदारी दिली जाते. त्यासाठी चार-पाच व्यक्ती व कर्मचारी यांचा एक गट तयार करून त्यावर जबाबदारी दिली जाते. त्यांना पूर्ण पाठिंबा नेता म्हणून मुख्याध्यापक या नात्याने दिला जातो. शासकीय विविध योजना त्यांची शाळेत होणारी कार्यवाही यावर प्रत्येक व्यवस्थापन बैठकीत चर्चा करून त्याचे सहकार्याने व कर्मचाऱ्यांच्या मदतीने शासनाच्या प्रत्येक योजना व नियमांचे पालन करून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवल्या जातात. थोडक्यात शासनाचे विविध शासन निर्णय ,शासकीय योजना यांची अंमलबजावणीची रणनीती ही व्यवस्थापन समितीच्या समक्ष अवलंबिली जाते व त्यावरील प्रत्यक्ष कार्यवाही ही शाळेतील शिक्षक कर्मचारी व विविध विद्यार्थी मंडळ यांच्या सहकार्याने केली जाते. त्यासाठी प्रत्येक महिन्याला एक बैठक घेऊन प्रशासकीय कामे, व्यवस्थापकीय कामे व प्रत्यक्ष शाळा स्तरावरील कामे यांचे वर्गीकरण करून त्यानुसार रणनीती आखली जाते.

शाळा प्रगतीचे पुनरावलोकन व प्रत्याभरण यासाठी ची कार्यवाही:-

- प्रत्येक महिन्याच्या बैठकीत मागील महिन्यात अवलंबलेल्या योजना व त्याच्या कार्यवाहीचा आढावा घेतला जातो, काही अडचणी असतील तर मदत करून किंवा शक्य नसल्यास कामाची दिशा बदलून पर्यायी व्यवस्था केली जाते.
- वेळोवेळी शिक्षक व विद्यार्थी वर्ग नायक यांची बैठक घेऊन कार्यवाहीचा आढावा घेतला जातो.
- विद्यार्थ्यांच्या दर आठवड्याला लेखी व तोंडी चाचण्या घेऊन प्रगतीचा आढावा घेतला जातो त्यांच्या नोंदी घेऊन नव्याने नियोजन केले जाते.
- विद्यार्थी विकासाच्या योजनांची प्रत्यक्ष कार्यवाही झाली किंवा नाही याची वेळोवेळी माहिती घेतली जाते त्यासाठी येणाऱ्या समस्या जाणून घेऊन त्यांना पूरक परिस्थितीसाठी मदत केली जाते.
- शिक्षक बैठकीत प्रत्येक वर्गाच्या प्रगतीबद्दल चर्चा करून एक वर्ग एक शिक्षक दुसऱ्या शिक्षकाला सहकार्य करेल याबद्दल योजना तयार केल्या जातात.
- प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांच्या नोंदी, प्रगती पत्रके, गृहपाठ, प्रात्यक्षिक नोंदी प्रकल्प नोंदी याचा आढावा घेतला जातो. त्यावरून प्रत्येक वर्गाचा श्रेणी तक्ता तयार केला जातो. प्रत्येक वर्गातील अप्रगत विद्यार्थी संख्या ठरवून त्यासाठी पुढील महिन्याची योजना आखली जाते.

समारोप -

शाळा प्रगतीच्या दृष्टीने आखलेली ध्येये धोरणे व त्या ध्येयाप्रती पोहोचण्यासाठी केलेली कार्यवाही ही निरंतर प्रक्रिया आहे. त्यामुळे विशिष्ट काळानंतर शाळेचे ध्येय हे काळानुरूप बदलावे लागते तो कार्यकाळ निश्चित करून आमच्या शाळेची काही धोरणे आखली. त्याचा कालावधी एक वर्ष गृहीत धरुन त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली. त्या कार्यवाहीत आलेले अडथळे व काही अनुभव हे पुढील कामासाठी व योजनासाठी वापरून शिक्षकांचे सहकार्य घेताना "रॉजर्स कर्व" सारखे महत्त्वाचे मुद्दे मी शालेय नेतृत्व विकास प्रशिक्षणातूनच वापरले. त्याचा वेळोवेळी उपयोग करून टीमवर्क केले व त्यामुळे शाळेच्या प्रगतीचे ध्येय गाठता आले. त्यासाठी मिळालेले प्रशिक्षणातील प्रात्यक्षिके व कृती याचा फायदा झाला.

धन्यवाद

चेतना संतोष होमकर

जिल्हा परिषद आदर्श शाळा,कळवंडे,माडवाडी,तालुका.चिपळूण,जिल्हा.रत्नागिरी

ईमेल आयडी - zppskalvandemadwadi@gmail.com

प्रस्तावना -

Leadership is the art of motivating a group of people to act towards achieving common good.

खरच, शाळा प्रमुख म्हणून नेतृत्व बजावताना अनेक अनुभव आले. ते मांडण्याची तसेच शाळा प्रगतीकडे नेताना केलेला प्रवास कथन करण्याची, व्यक्त करण्याची संधी या निमित्ताने मिळाली आहे.

शाळा एक अध्ययन संस्था दृष्टी / ध्येय -

"ही आवडते मज मनापासून शाळा

लाविते लळा ही जसा माऊली बाळा"

खरच या ओळींना सार्थ ठरविणारी निसर्गाच्या कुशीत वसलेली माझी, स्वच्छ, सुंदर, आनंददायी शाळा म्हणजेच आमची आजची जिल्हा परिषद आदर्श शाळा, कळवंडे माडवाडी होय.

बघताच, प्रांगणात पाऊल टाकताच प्रेमात पडावे अशी माझी शाळा आहे. मी 16.06.2011 रोजी या शाळेत बदली होऊन आले आणि भव्य पटांगण, नविन होत असलेली इमारत, गुणी विद्यार्थी, ग्रामस्थ पाहून प्रेमात पडले व माझ्या स्वप्नातील शाळा साकारण्याची संधी येथे मला नक्की मिळेल या भावनेने आनंदून गेले व उपशिक्षक म्हणून प्रामाणिकपणे कामकाजास सुरूवात केली. "मुले ही देवाघरची फुले आहेत" तसेच "मुले हीच राष्ट्रची खरी संपत्ती आहे" याचे भान ठेवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याकडे मुख्य लक्ष केंद्रीत करीत असताना मुले व ग्रामस्थांसोबत आपुलकीचे नाते निर्माण झाले व अचानक 1 ऑगस्ट 2014 रोजी सौ.गौरी भागवत यांची बदली झाल्याने माझ्याकडे शाळेचे मुख्याध्यापक पद आले व खऱ्या अर्थाने नेतृत्वाची संधी समोर आली.

शाळा परिवर्तनाची तत्वे -

खरं तर शाळा म्हणजे केवळ इमारत किंवा नुसते विद्यार्थी नसून अंतरंग व बहिरंग आकर्षक असावे. असे मला वाटत होते. एक शिक्षक व मुख्याध्यापक म्हणून मला माझे कर्तव्य पार पाडायचे होते.

समाजात अनेक व्यावसायिक व सेवा कार्य करणारे माणसे आहेत. परंतु साक्षात ईश्वराचे पवित्र स्थान समाजाने गुरूला दिले आहे. या समाजाचे, देशाचे भावी आधारस्तंभ असलेल्या मुलांचे आपण काहीतरी देणं लागतो. ही भावना मनात ठेवून काम करत गेले. त्यामुळे माझ्या नेतृत्वाला सहकारी शिक्षक, ग्रामस्थ, अनेक सेवाभावी संस्था, माजी विद्यार्थी यांची खंबीर साथ मिळाली. त्यामुळेच शाळेच्या प्रगतीचा आलेख दिवसेंदिवस उंचावत आहे.



शाळेशी संबंधीत समुदायाची संस्कृती –

आमच्या कळवंडे माडवाडी शाळेच्या संबंधीत माडवाडी, किंजळवाडी व सुतारवाडी अशा तीन वाड्या असून सुमारे 450 ते 500 लोकसंख्या आहे. येथील सर्व लोक कुणबी समाजाचे असून भात शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. पावसाळ्यानंतर काही लोक भाजीपाला लागवड करून तर काही लोक बांधकाम व्यवसाय

करून आपला उदरनिर्वाह करतात. वर्षभरातील गणेशोत्सव, होळी, नवरात्री असे सर्व सण समारंभ एकोप्याने अत्यंत उत्साहाने व आनंदाने साजरे करतात. एकमेकांच्या सुख दु:खात सहभागी होणारे सांस्कृतिक वारसा जपणारे प्रेमळ लोक असल्याने शाळा विकासासाठी त्यांची मदत घेण्याचा मी निर्णय घेतला.

शाळा व पर्यायाने समाज प्रगत व यशस्वी व्हायचा असेल तर त्यासाठी शिक्षक, विद्यार्थी व समाज यांतील आंतरक्रिया अत्यंत निकोप व आनंददायी हवी, प्रत्येकाला शाळा माझी वाटायला हवी कारण शाळेतील छोटी मुलं अत्यंत खेळकर, जिज्ञासू, खोडकर, भावनिक व सतत काहीतरी करण्याची धडपड करणारी असतात. त्यांची ग्रहणक्षमता तीव्र असते. याच वयात त्यांना योग्य खतपाणी मिळाले तर नक्कीच आपल्या शाळेतील मुले उत्तुंग यश मिळवतील हा विश्वास ग्रामस्थाना देवून आपलेसे केले कारण माझ्यापुढे माझ्या स्वप्नातील शाळा साकारण्यासाठी अनेक आव्हाने, समस्या व अडचणी आ वासून उभ्या होत्या व लोकांनाही सहकार्य करण्याची साद एका कवितेतून घातली त्या ओळी मला आजही आठवतात.

“सहभागाचे गीत नवे हे
समरसतेने गाऊ या ।
गावक-यांनो शाळेसाठी
जगून जरासे पाहू या ।।
शाळा माझी, मी शाळेचा
मंत्र जपु या नवा खरा
मनामनातून सहकार्याचा
नित्य वाहू दे गोड झरा
खार बनु या प्रत्येकाने
नवा सेतू बांधू या ।
गावक-यांनो शाळेसाठी
जगून जरासे पाहू या” ।।

आणि खरचं आज अखेर त्यांनी माझ्या हाकेला ओ दिली आहे.

समस्येची वास्तव स्थिती: आव्हाने, अडचणी -

आज शाळेने मागील चार पाच वर्षात अनेक क्षेत्रात उत्तुंग यश मिळवले आहे. पुरस्कार मिळवले आहेत. त्यांचा पुढे उल्लेख येईलच. अनेक वैशिष्ठ्यांनी व उपक्रमांनी शाळा आज सज्ज आहे परंतु तेथपर्यंत पोहचण्यासाठी मला अनेक अडचणींना सामोरे जावे लागले.

लोकांची शाळेबद्दलची उदासिनता –

सर्व प्रथम तीनही वाड्यांमधील लोकांना एकत्र करून प्रसंगी रात्रीच्या सभा घेवून सुसंवाद साधला. विद्यार्थी हेच आपले भावी आधारस्तंभ असून त्यांची प्रगती साधायची असेल तर आपली उदासिन भूमिका बाजूला ठेवून शाळेबद्दल सकारात्मक दृष्टीकोन ठेवण्यासाठी मत परिवर्तन केले. त्यामुळे पुढील वाटचाल सुकर झाली.

पाण्याची गंभीर समस्या –

शाळेसाठी बगीचा तयार करण्यासाठी तसेच पोषण आहार, स्वच्छतागृह यासाठी पाणी व्यवस्थेचा अभाव होता. त्यासाठी शालेय परिसरात बोअर घेतली. परंतु कातळ जमीन असल्याने पुरेसे पाणी लागले नाही. पुन्हा तीच समस्या. अशा वेळी खचून न जाता शाळेपासून 500 मीटर अंतरावरील विहिरीत 1 एचपी चा पंप टाकला व 1/2 कि.मी. वरून शाळेत पाणी आणले त्यामुळे आज आकर्षक बगीचा तयार झाला आहे.

अपुरे व ओबडधोबड क्रिडांगण –

यावर मात करण्यासाठी लोकांना खेळाचे महत्व पटवून दिले. Sound Mind in a Sound Body. सर्व लोकांना क्रिडांगणासाठी जागा कमी आहे असे लक्षात आल्यानंतर ग्रामस्थांनी 8 गुंठे जमीन मैदानासाठी बक्षीस रूपाने देण्याचा ठराव संमत केला. त्यानंतर सर्व ओबडधोबड मैदानावरील सफाई, जेसीबीने सपाटीकरण करण्यात आले. मैदानाची आखणी झाली. त्याचा परिणाम म्हणजे केंद्र, बीट, तालुका, जिल्हा स्तरापर्यंत विद्यार्थी क्रिडा स्पर्धेत सहभागी आहेत.

स्थलांतरीत व शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या समस्या –

शाळेजवळच क्रशर असल्याने पररा‌ज्यातून व परप्रांतातून कामासाठी आलेल्या मुलांच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न होता. परंतु सर्वांना सामावून घेत त्यांच्यासाठी

- आनंददायी शिक्षण
- बोली भाषेतून शिक्षण
- परिसरातील शिक्षण

- बालआनंद मेळावा
- शैक्षणिक साहित्याचा वापर
- गृहभेटी

यांसारख्या उपक्रमांमूळे मुले आनंदाने शाळेत येवू लागली व शिकू लागली.

आर्थिक समस्या –

कोणत्याही क्षेत्रात प्रगती करायची किंवा भौतिक सुविधा निर्माण करायच्या तर पैसा गरजेचा होता. यासाठी मागील पाच वर्षांपासून सतत प्रयत्न केले. एकूण सुमारे 12 लाख रूपयांची भरघोस शैक्षणिक मदत प्राप्त झाली. त्यासाठी लोक संपर्कावर भर दिला.

उठावासाठी सहभागी घटक-

श्रमदान –

सर्व ग्रामस्थ (माडवाडी, किंजळवाडी, सुतारवाडी) आर्थिकदृष्ट्या पुरेसे सक्षम नव्हते. परंतु त्यांच्यातील श्रमदानाचा वेळोवळी उपयोग करून घेतला. श्रमदानामुळे शाळेचा भव्य परिसर अतिशय देखणा करण्यास खुप मदत झाली. बागबगीचा करण्यासाठी लागणारी अंतर्गत रचना, बांधकाम, क्रिडांगणाचे सपाटीकरण, गांडुळ खत प्रकल्प, संरक्षक भिंतीचे कुंपण, शालेय परसबाग, ध्वजस्तंभ, साफसफाई, इत्यादी सर्व कामे ग्रामस्थांच्या श्रमदानामुळेच शक्य झाली.

मुंबई मंडळ –

वाडीतील बहुतांश लोक म्हणजे माजी विद्यार्थी कामानिमित्ताने मुंबईला असतात. परंतु "घार हिंडते आकाशी, चित्त तिचे पिलापाशी" या उक्तीप्रमाणे त्यांचे लक्ष मात्र आपल्या चिमुकल्यांकडे असते. त्यामुळेच मी त्यांना शालेय विकासासाठी मदत करण्याचे आवाहन केले. त्यांनीही शाळेसाठी इन्व्हर्टर, एक एच.पी. पंप, अनेक प्रकारचे शालेय साहित्य या रूपाने आजपर्यंत सुमारे 70 हजारांचा उठाव शाळेसाठी केला आहे.

लायनेस क्लब चिपळूण –

या आंतरराष्ट्रीय संस्थेची मी स्वत: सभासद असून सह-सेक्रेटरी या पदावर काम करत असल्याने या क्लब मार्फत शाळेला गॅस शेगडी, सर्व विद्यार्थ्यांना स्वेटर, फळझाडांचे वाटप, शैक्षणिक सी.डी., या रूपाने सुमारे 20 हजार रूपये मदत केली आहे.

रोटरी क्लब –

या संस्थेशी आपुलकीचे, स्नेहाचे संबंध असल्यामुळे त्यांनीही शालेय रंगरंगोटीसाठी 15 हजारांचा मदत मिळाली.

साईदिव्या मेडिकल ऍण्ड एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई -

या संस्थेने दरवर्षी मुलांना शालोपयोगी साहित्य, संगणक, प्रोजेक्टर, इंटरऍक्टीव्ह बोर्ड या रूपाने सुमारे 1 लाख 25 हजारांची मदत मिळाली.

दानशूर व्यक्ती –

आजपर्यंत आजुबाजूच्या परिसरातील अनेक दानशूर व्यक्तींशी सतत जिव्हाळ्याचे संबंध ठेवत संपर्क केल्याने शाळेची आर्थिक बाजू भक्कम होण्यास खूप मदत झाली. यामध्ये श्री.वसंत शेठ उदगे , श्री.नितीन शेठ नलावडे, श्री.अजय खेडेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.आरमारे, श्री.किशोर कदम यांसारख्या दानशूर व्यक्तींचा येथे समावेश आहे. अशा प्रकारे या सर्वांच्या मदतीने शाळेचे रूपडे पालटले.

सभागृहाची व्यवस्था –

इयत्ता 1 ते 5 वी पर्यंत 35 पटसंख्या असल्याने शाळेला दोन वर्ग खोल्या व एक कार्यालय एवढीच इमारत होती. परंतु गुणवत्ता विकास, शाळा सिध्दी सारख्या स्पर्धेत उतरताना विविध उपक्रमांसाठी सभागृह गरजेचे होते. परंतु शासनाच्या निकषात बसत नसल्याने सभागृहासाठी अनुदान कधीच मिळणार नव्हते. म्हणून मी लोकांना साद घातली की , 50 वर्षापूर्वी वाडीत शाळा नव्हती. ती शासनाने स्थापन केली. दहा वर्षांपूर्वीची इमारत जुनी झाल्यामुळे पुन्हा नवीन इमारतीसाठी निधी दिला. पण आता सुवर्ण महोत्सवी वर्षात आपणही शाळेसाठी काहीतरी करावे. ही साद घातली. सभागृहाची गरज असल्याने सर्वांनी श्रमदान केले

तर मी लोकसहभागातून बांधकाम साहित्य पुरवेन. या माझ्या संकल्पनेला सर्वांनी सहमती दर्शवली. परंतु त्यासाठी वारंवार सभा घ्याव्या लागल्या. यानंतर दोन महिन्यातच 5 लाखाचे शाळेचे देखणे सभागृह सर्वांच्या श्रमदानाने व सहकार्याने साकार झाले.

जिल्ह्यातील असा कदाचित पहिलाच उपक्रम असावा. मा. आमदार व अन्य सर्वा मान्यवरांच्या हस्ते दिमाखात उद्घाटन झाले व आपण केलेल्या कामाचे चीज झालेले पाहून मला कृतार्थ वाटले.

शैक्षणिक उठाव (समाज सहभाग)

अ.क्र.	शैक्षणिक वर्ष	तपशिल	स्वरूप
1	2011-12	बेंचेस, सा.फु.द.पा., घड्याळ, फिल्टर, शैक्षणिक साहित्य	30,000/-
2	2012-13	शालेय रंगरंगोटी, फळझाडांची कलमे, वह्या, सरस्वती मूर्ती, श्रमदान	25,000/-
3	2013-14	वनभोजन, श्रमदान, शैक्षणिक साहित्य	20,000/-
4	2014-15	फुलझाडे, संगणक, संगणक टेबल, इन्व्हर्टर, गॅस शेगडी, सिमेंटचे खांब, लोखंडी गेट, श्रमदान, बुलबलु पथकासाठी गणवेष, सांस्कृतिक कार्यक्रम	1,65,000/-
5	2015-16	श्रमदान, बोअरवेल, प्रोजेक्टर, पंप, शालेय परिसर विकास प्रकल्प	1,55,000/-
6	2016-17	श्रमदान, इंटरॅक्टव्ह बोर्ड, शैक्षणिक साहित्य, स्वेटर, इत्यादी	2,15,000/-
7	2017-18	श्रमदान व लोक सहभागातून सभागृह व शैक्षणिक साहित्य	5,00,000/-
8	2018-19	वह्या वाटप, नारळ रोपे, शैक्षणिक साहित्या इत्यादी.	20,000/-
		एकूण	11,30,000/-

अशा प्रकारे वरील अनेक समस्यांवर मात करत समस्या सोडवण्याबरोबरच इतर अनेक महत्वपूर्ण बाबींवर भर देत शाळेच्या प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू ठेवली.

आनंददायी अध्ययन-अध्यापन प्रक्रिया -

जग एकविसाव्या शतकात झपाट्याने प्रगती करत असताना या स्पर्धेत टिकण्यासाठी आमच्या शाळेतील मुलेही अग्रस्थानी राहण्यासाठी शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर दिला. यामध्ये रचनावादी तसेच आनंददायी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचा अंतर्भाव केला. दरवर्षी नवोपक्रम राबवले. त्यामध्ये गणिताशी गट्टी, उपक्रमांच्या माध्यमातून अध्ययन-अध्यापन अशी सांगड, बालकांच्या विविध समस्यांवर दृष्टीक्षेप असे अनेक नवोपक्रम समाविष्ट आहेत. शाळेमध्ये दरवर्षी विविध स्पर्धांचे आयोजन नियमित केले जाते.

- ❖ पुष्पगुच्छ स्पर्धा
- ❖ पथनाट्य स्पर्धा
- ❖ वक्तृत्व व निबंध स्पर्धा
- ❖ कविता व श्लोक पाठांतर स्पर्धा
- ❖ बगीचा देखरेख स्पर्धा
- ❖ प्रश्नमंजूषा व पाढे पाठांतर स्पर्धा
- ❖ भजन स्पर्धा
- ❖ समुहगीत गायन स्पर्धा
- ❖ वादन स्पर्धा

इत्यादी स्पर्धांचा समावेश असल्याने मुलांच्या सृजनशीलतेला, कलाविष्काराला तसेच बुध्दीमत्तेला वाव मिळत गेला. त्यामुळे आमचे चिमुकले विद्यार्थी आज आत्मविश्वासाने सर्व गोष्टींना सामोरे जातात.

शाळेचे आगळे-वेगळे उपक्रम -

शालेय परिसर विकास प्रकल्प –

सिध्दी ट्रस्ट व पित्रे फौडेशन, देवरूख व जिल्हा परिषद शिक्षण विभाग रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने सन 2015-16 ते 2017-18 या तीन वर्षात हा प्रकल्प यशस्वीरित्या राबवून अनेक पारितोषीके मिळवून दिली. प्रकल्प प्रमुख म्हणून मी स्वत: काम पाहिले. व मागील वर्षी सर्वोत्कृष्ट शाळा हा सन्मान मिळवला. या प्रकल्पामुळे आमच्या शाळेचे संपूर्ण रूपडे पालटले.

रान भाज्या व पुष्पगुच्छ प्रदर्शन –

आमची शाळा ग्रामिण व डोंगराळ भागात असल्याने पावसाळ्यात अनेक प्रकारच्या रानभाज्या परिसरातच उगवतात. तसेच अनेक रंगीबेरंगी पानाफुलांच्या वेलींनी परिसर नटलेला असतो. याचाच उपयोग करून शाळेत रानभाज्यांचे व पुष्पगुच्छ तयार करण्याचे प्रदर्शन शाळेत मुलांच्या मदतीने दरवर्षी संपन्न होते. याचा मुलांना खुपच फायदा झाला.

सीमेवरील जवानांना राख्या पाठविणे –

कला-कार्यानुभव उपक्रमांतर्गत शाळेत राख्या तयार करून देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांना दरवर्षी पाठवून मुलांमध्ये देशप्रेमाची भावना जागृत केली.

अनेक विषयांवरील पथनाट्य –

आत्मविश्वास, अभिव्यक्ती कौशल्य, सृजनशीलता या सर्वांचा विकास होण्यासाठी शाळेत विविध विषयांवरील पथनाट्ये बसविली आहेत. त्यामध्ये

- ❖ लेक शिकवा अभियान पथनाट्य
- ❖ स्वच्छता अभियान पथनाट्य
- ❖ गोवर, रूबेला पथनाट्य
- ❖ साक्षरता अभियान पथनाट्य
- ❖ नमन लोककला पथनाट्य
- ❖ लोकसंख्या वाढ पथनाट्य

इत्यादीचा समावेश आहे.

महिला मेळावे –

दरवर्षी शाळेत वाडीतील सर्व महिलांचे मेळावे घेतले जातात. त्यामध्ये हळदीकुंकू, किशोरवयीन मुलींचे उद्‌बोधन यांसारख्या विषयांवरील तज्ञ बोलवून महिलांना मार्गदर्शन केले जाते.

बालचेतना शिबीर –

आर्ट ऑफ लिव्हिंग तर्फे मुलांच्या मानसिक, शारिरीक व भावनिक विकासासाठी 6 दिवसांचे शिबीर आयोजित केले जाते.

कब बुलबुल पथक –

मी स्वत: फ्लॉक लिडरचे ट्रेनिंग केले असल्याने शाळेत कब बुलबुल पथक यशस्वीरित्या चालविले जाते. दरवर्षी मेळावे घेतले जातात. याचा मुलींच्या सर्वांगिण विकासासाठी नक्कीच उपयोग होत आहे.

पंचरंगी कवायत –

सर्व मुलांची पंचरंगी कवायत गाण्याच्या तालावर उत्तमरित्या बसविली आहे.

अप्रगत/ विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी मार्गदर्शन -

1. उपचारात्मक अध्यापन
2. शैक्षणिक साहित्याचा भरपूर वापर
3. वैयक्तिक मार्गदर्शन
4. खेळातून शिक्षण
5. जादा तासाचे नियोजन
6. रात्र अभ्यासिका

प्रज्ञावान मुलांसाठी विशेष उपक्रम -

1. विविध स्पर्धा
2. बाह्य परिक्षा
3. संगणकाचा वापर
4. शिष्यवृत्ती मार्गदर्शन
5. तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन

अशाप्रकारे वरील आगळ्यावेगळ्या उपक्रमात बरोबरच पुढील अनेक वैशिष्ट्ये व बलस्थाने आपणांस पहावयास मिळतात.

शालेय वैशिष्ट्ये -

- स्वच्छ सुंदर रमणीय परिसर
- डिजीटल इंटरऍक्टीव्ह् क्लास रूम
- आनंददायी व रचनावादी शिक्षण पध्दती
- उत्तम लोक सहभाग
- भव्य शैक्षणिक उठाव
- नाविण्यपूर्ण उपक्रम
- सहशालेय उपक्रम
- 100 टक्के उपस्थिती
- क्रिडास्पर्धांमधील यशस्वी वाटचाल
- शाळाबाह्य व स्थलांतरीत विद्यार्थी प्रवेश
- विज्ञान प्रदर्शनातील यशस्वी सहभाग
- आकर्षक रंगरंगोटी व बोलक्या भिंती
- वनभोजन
- क्षेत्रभेट
- चुणचुणीत व बोलके विद्यार्थी
- अनेक पुरस्कार प्राप्त
- गांडुळ खत प्रकल्प
- शालेय परसबाग
- सर्व शासकीय योजनांचा विद्यार्थ्यांना लाभ

(गणवेष, पोषण आहार, पुस्तक पेढी, अपंग शिष्यवृत्ती, उपस्थिती भत्ता इत्यादी)

अशा वैशिष्ट्यांमुळे आजपर्यंत अनेक मान्यवरांनी शाळेला भेटी देवून समाधान व्यक्त केले व याच कार्याची दखल प्रशासनाने घेतल्याने अनेक पुरस्कार आजपर्यंत शाळेला मिळाले आहेत.

त्यामध्ये जि.प.अध्यक्ष, विस्तार अधिकारी जि.प., आमदार मा.श्री.सदानंद चव्हाण साहेब, जि.प.सदस्य, पंचायत समिती सभापती, पंचायत समिती सदस्य, गटशिक्षण अधिकारी, विस्तार अधिकारी पंचायत समिती चिपळूण यांचा समावेश आहे.

शाळेची यशोगाथा / प्राप्त पुरस्कार

अ.क्र.	सन	तपशील
1	2013-14	उत्कृष्ट पटनोंदणी पुरस्कार
2	2014-15	आदर्श शाळा पुरस्कार
		ग्रामिण गुणवत्ता विकास कार्यक्रम, तालुका स्तर-व्दितीय
3	2015-16	ग्रामिण गुणवत्ता विकास कार्यक्रम, व्दितीय
		शालेय परिसर विकास जिल्हा स्तर-तृतीय
4	2016-17	आदर्श शिक्षक पुरस्कार,
		शालेय परिसर विकास प्रकल्प, जिल्हा स्तर-प्रथम
		कार्यानुभव स्टॉल-जिल्हा स्तर-प्रथम
		पथनाट्य-जिल्हा स्तर-तृतीय
5	2017-18	शाळा सिध्दी, जिल्हा स्तर-व्दितीय
6	2018-19	शालेय परिसर विकास 1. सर्वोत्कृष्ट शाळा 2. लेक शिकवा पथनाट्य, जिल्हा स्तर-प्रथम 3. कार्यानुभव स्टॉल, जिल्हा स्तर-व्दितीय

अशा प्रकारे शाळेची वाटचाल होत असताना मुख्याध्यापक म्हणून मला निश्चितच आनंद होत आहे. शालेय कामकाजाबरोबरच इतर अनेक शैक्षणिक व सामाजिक कार्याचा शालेय प्रगतीसाठी उपयोग झाला.

अ.क्र.	ग्रामिण भागातील आपत्तीच्या काळातील सेवाकार्य	शैक्षणिक व सामाजिक कार्य
1	रोगांच्या साथी येवू नये यासाठी वेळोवेळी सभांमधून आरोग्यविषयक मार्गदर्शन	• साक्षरता अभियान सक्रीय सहभाग • निर्मल ग्राम पुरस्कारात योगदान • चिपळूण येथिल अखिल भारतीय साहित्य संमेलनात सक्रीय सहभाग. • मंडणगड येथील स्नेहदीप अंध वि क्लब मार्फत मदत • लोकचेतना अभियान तज्ञ मार्गदर्शन • स्वच्छता अभियान सक्रीय सहभाग • विविध कार्यक्रमांचे निवेदन • महिला मेळाव्यांचे आयोजन • साई तरूण मित्र मंडळ कोढे येथील मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रमात दिग्दर्शन व निवेदन, त्यातील एका मुलाची • नाट्यस्पर्धां मधून राज्य पातळीवर झेप • नामदेव शिंपी समजोन्नती • मंडळावर विविध पदांवर कार्यरत • शालेय परिसर विकास प्रकल्प प्रमुख
2	लायन्स क्लब चिपळूणच्या विविध पदांवर काम करताना क्लब तर्फे मोफत वह्या, शैक्षणिक साहितय वाटप, वृक्षारोपण, महिलांना मार्गदशन, स्वेटर वाटप, गरीब अनाथ महिलेस शिलाई मशीनचे वाटप,	
3	अवर्षण सदृष्य परिस्थिती येवू नये म्हणून पथनाट्य व चर्चामधून सामाजिक जाणीव जागृती.	

अशा प्रकारे वरील सर्व शैक्षणिक व सामाजिक काम करीत असताना मला अनेकांचे मोलाचे सहकार्य, प्रेरणा, मार्गदर्शन लाभले. त्यामध्ये सर्व ग्रामस्थ, महिला मंडळ, सहकारी शिक्षिका सौ.निकीता केतले, केंद्र प्रमुख मोहीते मॅडम व मोहीते सर, विस्तार अधिकारी मा.सौ.सुभेदार मॅडम व सौ.पटेल मॅडम, मा.सौ.खडस मॅडम, गटशिक्षण अधिकारी मा.श्री.शिगवण साहेब व देसाई साहेब, अनेक सामाजिक संस्था, दानशूर व्यक्ती, माजी विद्यार्थी, सर्व शालेय समित्या इत्यादींचा मी आर्वजून उल्लेख करेन. तसेच नुकतीच एक दु:खद बातमी वाचनात आली ती म्हणजे मॅक्सिन बर्कसन माऊशींचे निधन. मी पण सुमारे 25 वर्षांपूर्वी डि.एड्. शिक्षणासाठी फलटण असताना त्यांच्या शाळेला भेट दिली, त्यावेळी मला आनंददायी शिक्षण, रचनावादी शिक्षणपद्धतीच प्रेरणा मिळाली. एक परदेशी विदूषी आपल्या भारतात येवून फलटण सारख्या ग्रामिण भागात मातृभाषेतून कसे शिक्षण देत होती ते खरचं पाहण्यासारखे होते, ते भाग्य मला लाभले. या सर्वांच्या शाबासकी बरोबरच मला शाळेबरोबरच काही सन्मान प्राप्त झाले.

सन	तपशील
2013-14	तालूका स्तरीय विज्ञान प्रदर्शन-व्दितीय क्रमांक (लोकसंख्या शिक्षण)
2014-15	तालूका स्तरीय विज्ञान प्रदर्शन-व्दितीय क्रमांक (लोकसंख्या शिक्षण)
2015-16	तालूका स्तरीय विज्ञान प्रदर्शन-प्रथम क्रमांक (जिल्हा स्तरासाठी निवड)
2016-17	• जि.प. आदर्श शिक्षक पुरस्कार • मनुष्यबळ विकास मंत्रालय मार्फत राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार • प्रकल्प प्रमुख जिल्हा स्तर प्रथम क्रमांक
2017-18	प्रकल्प प्रमुख प्रथम क्रमांक

अशा प्रकारे शाळेचा कायापालट होताना ती आदर्श असावी ही भावना मनात ठेवून काम केल्याने त्याचे आज निश्चित फळ मिळाले आहे. परंतू कोणतेही काम एकट्याने यशस्वी होत नाही यासाठी सर्वांना सोबत घेवून काम केल्यास ते नक्कीच प्रेरणादायी आदर्शवत होऊ शकते, म्हणूनच संघ भावनेतून विद्यार्थी विकासासोबत आम्ही शाळा विकासात यशस्वी झालो.

धन्यवाद

अमोल पांडुरंग पाटील

नगर परिषद माध्यमिक विद्यालय शाळा क्र.६ तळेगाव दाभाडे, चाकण रोड, तालुका.मावळ, जिल्हा.पुणे

ईमेल आयडी- tdnphighschool6@gmail.com

प्रस्तावना -

शासन स्तरावरील शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम राबवत असताना शालेय स्तरावर विविध अडचणी, समस्या निर्माण होतात. या समस्यांवर नेतृत्व विकास कार्यक्रमातून मार्गदर्शनपर वाट मिळाली . आमच्या शाळेत सर्वच क्षेत्रांवर प्रकाश टाकत काम करण्याचा व संघ बांधणी त्याचप्रमाणे अध्ययन अध्यापन प्रक्रीयेतील बदल व सर्वच क्षेत्रांवर काम करण्याचा संकल्प आम्ही करुन एक सकारात्मक पाऊल टाकले . त्याचा परिणाम बदल घडून आला तो सादर करीत आहोत. आमच्या शाळेत काम करत असताना सर्व प्रकारच्या नेतृत्वाचा कस लावून शाळांचे अस्तित्व तयार करण्याचा संकल्प व सकारात्मक बदल घडवून आणण्याकरिता एक पाऊल यशाकडे" हा मंत्र घेऊन शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांची सहविचार सभा घेऊन संघभावना वाढीस लावण्यासाठी प्रयत्न केला. याचा परिणाम शाळा स्तरावर उपस्थिती, गुणवत्ता व शासन स्तरावरील सर्व कामांकरिता व या अनुषंगाने आमच्या प्रमुख संस्थाकडून मोठ्या प्रमाणात सहकार्य मिळण्यास सुरुवात झाली.



शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांची सहविचार सभा

शालेय नेतृत्वांमधील संकल्पनात्मक मुद्दे व प्रक्रीया, जशी शाळा एक अध्ययन संस्था शाळा विकसन, नियोजन, अमलबजावणी अशा प्रकारच्या विविध पद्धतीने शाळा स्तरांवर विविध बदल घडवून आणण्यासाठी एक संकल्प एक ध्येय, सामाजिक जबाबदारी, सामाजिक बांधीलकी यांचा पूर्णपणे समावेश करुन शाळा विकसित करण्याचे ध्येय, दृष्टी याचा पुरेपूर वापर करण्याचा संकल्प केला. यामधून शाळा विकास होताना दिसला. २०१६ साली शाळेची स्थापना झाली. त्यानंतर एक सकारात्मक पाऊल टाकण्याच्या उद्देशाने झपाटून सर्व कामाला लागलो.

पालक सभा/ शाळा व्यवस्थापन समिती सहविचार सभा -

शाळा क्र. ६ येथे वरील कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता पालकांचा सहभाग, विद्यार्थी सहभाग शासन सहभाग घेऊन शालेय गुणवत्ता वाढीसाठी, सदरच्या उपक्रमाचे आयोजन करुन विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न चालू केला. त्याचप्रमाणे शाळा स्तरांवर स्वविकासा करिता विविध सामाजिक संस्थाची मदत घेत योग शिबीर , पुस्तक वाटप , मोफत पाठ्य पुस्तके यांसारखे अनेक उपक्रम घेऊन स्वविकास व संघबांधणी यामध्ये विकास घडवून आणला.



SMART GIRL - पालक कार्यशाळा

वाचन प्रेरणा दिन -

शाळेमध्ये "वाचन प्रेरणा दिन" मोठ्या उत्साहाने घेतला जातो. या वाचन प्रेरणा दिनामध्ये पहिल्या वर्षी लेखक श्री. भाऊसाहेब काळे - रस्ता कांदबरीचे लेखक, वाचन प्रेरणा दिनानिमित्त उपस्थित होते. तर चालू वर्षी औंधच्या राजकन्या यांनी शाळेसाठी त्यांच्या भावाने लिहिलेले . "लाल मोती पिवळे मोती' पुस्तक सर्व विद्यार्थ्यांना वाचन प्रेरणा दिनानिमित्त भेट दिले..

शालेय विद्यार्थ्यांकरिता व शाळेच्या विकासाकरिता संघ बांधणी या गुणवैशिष्ठ्यांचा पुरेपुर उपयोग करत लोकसहभाग घेतला. यामध्ये शाळेच्या आवारात "वृक्षारोपण" तसेच व्यक्तीमत्व विकासाकरिता "व्याख्यानमाला" आणि जनजागृती करिता "विविध संस्थाचा सहभाग" घेत विद्यार्थी आणि शिक्षक यांना संघबांधणी करत शाळेने प्रगती करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे.

स्वविकास व संघ बांधणी -

वैयक्तीक आणि व्यावसायिक विकास शालेय विकासाच्या दृष्टीने संघबांधणी व शालेय विकासाच्या दृष्टीने क्रियाशील संघ तयार करणे. सदरच्या कार्यक्रमात शाळेचे फोटो जे दाखवलेले आहेत त्यामधुन शाळेच्या विकासाकरिता व संघ बांधणी करुन शाळेचा विकास साधण्यासाठी शालेय स्तरावर असंख्य उपक्रम राबवण्यात येतात ते पुढीलप्रमाणे.



Inner Wheel Club of Talegaon Dabhade Study workshop for 10" Std Students



शाळेचा मुख्याध्यापक म्हणून मी - अमोल पांडुरंग पाटील शालेय विद्यार्थ्यांच्या हिताकरिता सर्व शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सभा आयोजित करुन इ. १० वी च्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा,भावी शिक्षणाचे नियोजन ,यासाठी मार्गदर्शन केले.

परिपाठ -

शाळा क्र. ६ येथे शालेय परिपाठांमध्ये संस्कार कथा विज्ञान तंत्रज्ञानाविषयी अद्यावत माहिती विद्यार्थ्यांना सांगितली जाते. यातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाला एक वेगळा आकार शालेय शिस्त यांसारख्या गोष्टींचा अंतर्भाव दिसून येतो. यांसारख्या स्तुत्य कृतीमधुन स्वविकासाला मदत होते.

अध्ययन - अध्यापन प्रक्रीयेत बदल -

शाळा प्रमुख अध्ययन अध्यापन प्रक्रीयेत बदल घडवत असताना शालेय स्तरावर डिजीटल शिक्षण, सहकारी शिक्षकांना विविध प्रशिक्षणांमध्ये सक्रीय सहभाग व शालेय स्तरावर अध्यापन अध्ययन अनुभव गळी उतरवण्याकरिता खूप प्रकारचे उपक्रम अध्यापन दर्जेदार करण्याकरिता शाळा प्रमुख व सहकारी कसोशीने प्रयत्न करतात.

विद्यार्थ्यांना मदत होण्यासाठी पालक ,नागरिक, यांना माहिती देऊन व्यवस्थितरित्या शाळेत चालणाऱ्या उपक्रमांची माहिती देऊन येणाऱ्या काळात होणारे उपक्रम व गुणवत्ता वाढीसाठी मदतीचे आवाहन करून, समाज सहभाग घेत इ.१० वी मुलांना ५० प्रश्नसंच (अपेक्षित) मोफत त्याचप्रमाणे इतर शैक्षणिक संस्थांकडून विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कार रुजण्याकरिता अवांतर

वाचन,स्पर्धा परीक्षा तयारीसाठी पुस्तके प्राप्त झाली, सदरचे पाऊल एक समृद्ध शाळेची नांदी झाली.







मुलींसाठी व्याख्यानांचे आयोजन

शाळा विकासाकरिता "धन्वंतरि महोत्सव" - योग,आहार,व्यायाम,यातून रोग बाजूला ठेवता येतात.यासाठी प्रात्याक्षिके,व्याख्याने व प्रश्नोत्तरे यांचा वापर करून उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.किशोरवयीन मुलीना गुड टच ,बेड टच या संकल्पनेबाबत मुलीना अवगत करून स्वसंरक्षणाबाबत माहिती देण्यात आली.

शालेय स्तरावर पोषक अध्यापन वातावरण निर्मिती करिता विविध प्रकारचे क्रीडा समृद्धी उपक्रम घेतले जातात. विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धेमध्ये मिळविलेल्या यशाकरिता ट्रॉफी बहाल करण्यात आली. यामधून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढण्यास मदत पर्यायाने विद्यार्थ्यांच्या उपस्थिती व संपादनात सकारात्मक बदल घडुन आला.

अध्यापन व अध्ययन प्रक्रीयेत विविध प्रकारचे दिवस साजरे करुन जसे की 'गणित दिन', 'विज्ञान दिन', 'भूगोल दिन', 'स्वच्छता पंधरवडा' यातुन ज्येष्ठ नागरिक सन्मान ,संपर्क हेरिटेज वॉक, अगत्य इंटरनॅशनल अंतर्गत फिरती प्रयोगशाळा (एल ॲन्ड टी) यांसारख्या असंख्य उपक्रमामधून आमच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रगती दिसून आली त्यातून एकूणच विद्यार्थ्यांच्या विकासात .शाळेचे योगदान दिसून येते.



धन्यवाद

मंगला एलकटवाड
मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, इंदिरा नगर, बायजीपुरा,मनपा, औरंगाबाद.
ईमेल आयडी- mangalayelkatwad70@gmail.com

प्रस्तावना -

असाध्यते साध्य करिता सायास

कारण,अभ्यास, तुकाम्हणे... ...

या शब्दात संत तुकाराम महाराज यांनी कष्टाचे महत्व प्रतिपादले आहे. माणसाला कोणत्याही क्षेत्रात जर यशस्वी व्हावयाचे असेल तर कठोर परिश्रम आणि दृढ संकल्प याला पर्याय नाही. डॉ. अब्दुल कलाम यांनी म्हटले आहे शॉर्टकट हा जीवनात यशस्वी होण्याचा मार्ग नाही. कारण शॉर्टकटमुळे मिळालेले यश हे चिरकाल टिकणारे नसते त्यासाठी कठोर मेहनत करावी लागते व योग्य त्या व्यक्तींचे मार्गदर्शन घ्यावे लागते. केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे याउक्तीनुसार, विविध उपक्रम, खेळ यातून आम्ही आमच्या वरिष्ठ मंडळीच्या मार्गदर्शनाने आमची शाळा सुंदर शाळा, या ध्येयाने प्रेरित होऊन हसत-खेळी मेळीच्या वातावरणात गुणवत्ता वाढविण्याचा ध्यास धरला.

त्याने प्रेरित होऊन आमच्या शाळेतील सर्व शिक्षकांनी वेगवेगळे कौशल्य वापरुन विद्यार्थीसंख्या वाढविणे, उपस्थिती टिकविणे, गुणवत्ता वाढविणे व सर्वांगीण विकास घडवून आणणे हे उद्दिष्ट साध्य करण्याचा कसोशीने प्रयत्न केला आणि त्याचे फलद्रुप म्हणून आज आमच्या शाळेत सर्वांच्या सहयोगाने शाळासमृद्धीच्या वाटेवर आणण्यास यश मिळाले.

परिवर्तनाची गरज -

आपण २१ व्या शतकात वावरत असताना शिक्षण क्षेत्रात फार मोठे बदल झालेले दिसून येत आहेत.या बदलाबरोबरच अनेक आव्हाने शिक्षण क्षेत्रासमोर निर्माण झाली आहेत.या बदलानुरूप बदल अपरिहार्य आहेत अन्यथा शाळांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊ शकतो असच काहीस मनपा कें.प्रा.शा.वमा.शा. इंदिरानगर बायजीपुरा औरंगाबाद या शाळेबाबत घडत आहे. शाळेच्या परिसरात अनेक इंग्रजी माध्यमाच्या शाळा उघडलेल्या आहेत आणि त्या भाषेविषयी असलेल आकर्षण याला इंदिरानगर

बायजीपुराचे पालकही अपवाद नव्हते. शाळेचा पट कमी होऊन तो इंग्रजी माध्यमात दाखल होऊ लागला. ही धोक्याची घंटा ओळखून सर्व शिक्षकांच्या सहकार्याने कामास सुरुवात केली.

नेतृत्वाचा विकास -

विद्यार्थी,पालक,शिक्षक,पर्यवेक्षीय यंत्रणा व अधिकारीवर्ग यांच्यातील सर्वात महत्वाचा दुवा मुख्याध्यापकच असून तो जर सक्षम झाला तर शाळा विकसित होण्यास वेळ लागणार नाही, ही बाब साधनव्यक्ती यांच्या लक्षात SLDP प्रशिक्षणामुळे चांगलीच लक्षात आली होती. यासाठी मग यासाठी शाळाभेटी दरम्यान शाळेच्या गरजा व समस्या या LEARNING WALK द्वारे समजून घेणे, वेळेचे व्यवस्थापन, दृष्टी (VISION), ध्येय (MISSION), संघबांधणी, अध्ययन –अध्यापनातील नवनवीन तंत्र अशा अनेक बाबीं वर चर्चा करण्यात आली.



दृष्टी (VISION), ध्येय (MISSION) –

प्रत्येक ध्येय साध्य करण्यासाठी त्यांची योजना व कालावधी निश्चित करण्यातआला. ज्यात शाळेची रंगरंगोटी करुन बाह्यरुप बदलणे, शाळा DIGITAL करणे, शाळेचे कम्पाऊंड तयार करणे, मुलांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची (RO) व्यवस्था करणे, HANDWASH STATION तयार करणे, मुलांमुलीसाठी स्वच्छ स्वच्छतागृह उपलब्ध करणे, विविध झाडे लावून शालेय परिसर फुलविणे, अध्ययन- अध्यापनात नवनवीन तंत्राचा वापर करत विद्यार्थ्यांना अध्ययनाची गोडी लावणे, विद्यार्थ्यांचा अध्ययनातील गुणात्मक दर्जा उंचावणे, अध्ययनस्तर निश्चितीत शाळेचा स्तर केंद्रात व तालुक्यात उंचावणे, सर्वात महत्वाचे हे सर्व साध्य करण्यासाठी एक चांगल्या संघाची बांधणी करणे, मुख्याध्यापक, शिक्षक आणि पर्यवेक्षीय यंत्रणेच्या डोळयातील हे स्वप्न SMC सदस्य, आणि पालक यांच्या डोळयातही दिसणे गरजेच आहे. ते स्वप्न सत्यात आणण्यासाठी मुख्याध्यापक, साधनव्यक्ती यांनी तयार केलेला कच्चा आराखडा त्यांच्यासमोर ठेवण्यात आला व त्यात आवश्यक तीन प्रमुख ध्येय निश्चित करण्यात आली. 1. शाळेचा अध्ययनस्तर उंचावणे. 2. शाळा पूर्णपणे DIGITAL करणे. 3. सर्व प्रकारच्या भौतिक सुविधांनी शाळा परिपूर्ण करणे.

TIME MANAGEMENT -

शालेय नेतृत विकास प्रशिक्षण घेतल्यानंतर आपल्या नेतृत्व कौशल्याच्या बळावर ध्येय निश्चित करुन संघबाधणी केली, एकीकडे शाळा भौतिक सुविधेने परिपूर्ण आणी शाळेचा अध्ययनस्तरसुद्धा उंचावयाचा तेव्हा आम्ही कामाचे नियोजन करून, प्रथम कामाचा प्राधान्यक्रम ठरविला. काही लवकर बदल दिसतील अशा बाबी आम्ही अगोदर केल्या त्यामुळे शाळेत होणारा बदल पालकांपर्यंत पोहचला. शिक्षकांना शाळा सुटल्यानंतरही काम करतांना पाहून त्यांच्या मदतीसाठी पालकसुद्धा पुढे सरसावले. पालकांच्या मदतीमुळे आमच्या कामाला वेग आला. काही कामांची जबाबदारी SMC, व

पालक यांच्यावर सोपविण्यात आली आणि ती सहजपणे स्विकारून पारही पडली. अशाप्रकारे समाजाचा सक्रीय सहभाग नोंदविण्यात यश मिळू लागले.ERAC तंत्राचा अध्ययन अध्यापन प्रकियेत वापर करण्यासाठी विविध शैक्षणिक साहित्याची गरज भासत होती त्यामुळे भरपूर शैक्षणिक साहित्यांची निर्मिती करण्यात आली. त्याचबरोबर विविध गटकार्य, कृतीयुक्त अध्ययन अध्यापन पद्धतीचा शोध घेण्यात आला व अध्ययनात रंजकता निर्माण झाली..







DIGITAL शाळा -

शाळेत संगणक कक्ष आहे. त्यात 10 संगणक आहे. त्यावर मुलांचे दररोज वर्ग होतात व शाळेत आमदार निधीतून लॅपटॉप प्राप्त झाला आहे. त्याचा उपयोग आम्हाला विद्यार्थ्यांसाठी करुन घेता येतो.

शाळेत एक प्रोजेक्टर असून त्यात शिक्षण अभ्यासक्रमाविषयीचे सॉफ्टवेअर व व्हीडीओ दाखविण्यासाठी उपयोग होतो.



समता आणि समानता व बाल अधिकार :

कु. महेक रफीक शेख ही इयत्ता 8 वी तील विद्यार्थीनी अस्थिव्यंग आहे. ती सर्वांना वेगळी अशी वाटायची तिच्या या परिस्थिती मुळे तिचा स्वत: चा आत्मविश्वास घटू लागला व तिला सर्वांमध्ये मिसळण्यास अडचणी येऊ लागल्या त्यामुळे तिचे शाळेत मन रमेनासे झाले. परिणामी शाळेतील तिची गैरहजेरी वाढू लागली. अशातच विशेष शिक्षक श्रीम. खरात अनिता मॅडम व विशेष साधनव्यक्ती श्री. बाबजे युवराज सर यांची शाळेस भेट झाली असता त्यांच्या निदर्शनास ती मुलगी आली. त्यांनी शिक्षकांशी चर्चा करुन तिच्याकडे विशेष लक्ष पुरवुन तिला आपुलकी, प्रेम आणि सुरक्षितता दिल्यास ती

शाळा बाह्य होणार नाही असे सुचविले. तसेच तिच्याशी संवाद साधतांना तो कशा प्रकारे साधावा या विषयी शिक्षकांना मदत केली. परिणामी आता तिची शाळेतील उपस्थिती नियमित झाली परंतू तिच्या शैक्षणिक प्रगतीबाबत अजुन बराच मोठा पल्ला गाठणे बाकी आहे.



वर्गातील सर्व मुलांना लिहिता व वाचता यावे हे शासनाचे धोरण आहे आणि ते करण्यासाठी शिक्षक अथक प्रयत्न करीत असतात. त्यांच्या प्रयत्नांना साथ देणे गरजेचे आहे. ही बाब ओळखून मा. डॉ. निपुण विनायक आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांच्या प्रेरणेतून तसेच डॉ. निधी विनायक यांच्या संकल्पनेतून शिक्षकांसाठी शिकू आनंदे ही उपक्रम पुस्तिका साकारली.यात आमच्या शाळेतील सहशिक्षिका

1) शितल आव्हाड – चला संवाद करुया,चला अभिनय करुया.

2) विद्युल्लता गोरे - बुझो तो जाने (आकार ओळखा)

3) स्मितानाईक - चला गोष्ट बनवू या.

यांच्या शिक्षण पुरक कृतींचा समावेश करण्यात आला आहे.





मुठभर गोष्टी -

महानगर पालिका आयुक्त मा. डॉ.निपुण विनायक तसेच श्रीमती डॉ.निधी विनायक यांच्या प्रेरणेने मुठभर गोष्टी हा कथासंग्रहाचा उपक्रम साकार झाला. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू भाषेतून कथा लिहिल्या आहेत. शिक्षक दिनी यापुस्तकाचे विमोचन करुन सर्व कथा लेखक शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

यात आमच्या शाळेतील सहशिक्षिका

1) विद्युल्लता गोरे - गोडूचीगोष्ट,लोककथा,ज्ञानाची किंमत

2) क्रांती देशमुख - आणि गौरव अधिकारी झाला

3) कल्पना खामगावकर - टॉफी





सांस्कृतिक कार्य -

राज्यस्तरीय लोक नृत्य स्पर्धेत आमचा संघ बक्षीस पात्र ठरला.





विद्यार्थी व पालकांच्या मदतीने बालोद्यानाची निर्मिती करण्यातआली.





भावी योजना -

1. शिक्षकांना भाषा विकासा संबंधी वारंवार प्रशिक्षण देऊन 100% गुणवत्ता आणण्यासाठी प्रयत्न करत आहोत. प्रत्येक मुल शिकले पाहिजे यादृष्टीने सतत प्रयत्न करत आहोत.
2. शाळेतील अभ्यासक्रमाच्या अमुर्त संकल्पना मुर्त स्वरुपात स्पष्ट होण्यासाठी LED ची गरज आहे. ती मिळवण्यासाठी प्रयत्न चालु आहे.
3. बालोद्यानात मुले रमावित या उद्देशाने खेळाचे अधिकचे साहित्य आणण्यासाठी प्रयत्नशील आहोत.

आमच्या यशाची परिणामकारकता -

शाळेची पटसंख्या वाढली.मुलांचे गैरहजेरीचे प्रमाण कमी झाले. शाळेची गुणवत्ता वाढली. विद्यार्थी व पालक शाळेसंबंधी सकारात्मकदृष्टीने विचार करु लागले. शिक्षकांचा आत्मविश्वास वाढला.यातूनच विद्यार्थी गुणवत्तेत वाढ झाली.

धन्यवाद

अनिल कनीराम चव्हाण
जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,बोराखेडी,तालुका.मोताळा,जिल्हा.बुलडाणा
ईमेल आयडी - anilkaniramchavhan@gmail.com

प्रस्तावना-

शालेय नेतृत्व विकास प्रशिक्षणामुळे शालेय कामकाजाचे नियोजन व्यवस्थापन कौशल्य आत्मसात झाल्याने प्रत्येक बाबीकडे पाहण्याच्या व अंमलबजावणी करण्याचा सकारात्मक दृष्टीकोन प्राप्त झाला आहे. कोणत्याही कामाला यशस्वी करण्यासाठी सकारात्मक विचार असणे महत्त्वाचे असते हे या प्रशिक्षणामुळे सिध्द झाले आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण दर्जेदार शिक्षण देण्यासाठी त्यांची अडचण, समस्या जाणून घेऊन त्यावर योग्य प्रभावी नियोजन शिक्षकांचे मदतीने करता आले. दैनंदिन कामकाजात योग्य नियोजन करून शाळेचा विकास साधता आला,मल्टिटास्किंग (Multi Tasking work) कार्य करण्यास मदत मिळाली. शिक्षकांच्या सकारात्मक वर्तनात बदल करून त्यांच्याकडून अपेक्षित काम करून घेण्याची दिशा मिळाली. शिक्षक मुख्याध्यापक यांचे संबंध चांगले झाले आणि सर्व एकत्रित येऊन शाळेच्या विकासासाठी, केंद्राच्या विकासासाठी कार्य करू लागले. शंभर टक्के मुले शिकू शकतात याकडे लक्ष केंद्रित करून मुलांना शिक्षण देण्यात येत आहे. समाजाला पालकांना सोबत घेऊन कार्य करण्यास सुरुवात करण्यात आली.जेणेकरून मुलांच्या शिक्षणाची प्रगती व शाळा विकास साधता आला,आमच्या शाळेची गुणवत्ता उत्तम झाली असून विद्यार्थी संख्या ३२० झाली आहे.आमच्या शाळेमध्ये आजू बाजूच्या चार गावातील मुले येत आहेत . शाळेची गुणवत्ता व दर्जा सुधारला शाळांची पटसंख्या वाढली म्हणजे केंद्रातील शाळांची प्रगती झाली, शाळेमध्ये उत्तम दर्जाचे Hand Wash Station समाजाच्या सहकार्याने उपलब्ध असून नियमित वापरात आहे. SLDP प्रशिक्षणातील कामाची विभागणी हा मुद्दा अतिशय उपयुक्त ठरला आहे.या मुळे प्रत्येक शिक्षकाचा सहभाग त्यांच्या आवडी नुसार मिळाला आहे.कारण नेतृत्व करताना नियोजनाच्या वेळी कामाच्या विभागणीमध्ये शिक्षकांचा सहभाग मिळाला.

शाळेची दृष्टी (VISION) -

एकच ध्यास गुणवत्ता विकास.

MISSION -

- १००% मुलांना प्रगत करणे.
- शाळेची पटसंख्या वाढविणे.
- शाळा डिजिटल करणे.
- शाळा ओजस प्राप्त करणे.
- शाळेतील सर्व सुविधा High Tech करणे.
- सर्व विषयाचे स्वतंत्र E-Learning कक्ष स्थापन करणे

शाळा विकासासाठी केलेले नियोजन व त्याची अंमलबजावणी -

सध्या आमची शाळा ISO,प्रगत,डिजिटल,तसेच उत्तम भौतिक सुविधा असणारी आहे.Hand Wash Station, स्वच्छता गृह,बाथरुम,RO पिण्याचे पाणी, अशा आधुनिक साहित्याचा वापर करणारी शाळा आहे.पुरेश्या वर्ग खोल्या उपलब्ध आहे.क्रीडांगणामध्ये चेकर बसवलेली आहेत .पुढील काही वर्षात शाळा High Tech सुविधायुक्त करावयाची आहे .आंतरराष्ट्रीय शाळा 'ओजस' करण्याचा प्रयत्न केला जात आहे.संगणक कक्ष मोठा करणे,सर्व विषयाचे e content तयार करणे नियोजनात आहे. शाळेत विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे हा ध्यास आहे.वरील सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी आम्ही पालक,समाजातील शिक्षणप्रेमी प्रतिष्ठीत नागरिक यांच्याशी वेळोवेळी संपर्कात असतो. पालक शाळेत येऊन वाढदिवस साजरा करून शाळेला उपयुक्त मूल्यवान भेट वस्तू देतात.



शालेय वातावरण व कार्य संस्कृती -

प्रत्येक उपक्रमात कार्यक्रमात मुले-मुली मिळून उत्स्फूर्तपणे सहभाग घेतात. त्यांना समान संधी देण्यात येते सांस्कृतिक कार्यक्रमात प्रत्येक वर्गातील सर्व मुलामुलींना समान संधी दिली जाते. शाळेला संरक्षण भिंत आहे. अग्निशामक यंत्र वापरायची व्यवस्था आहे. मुलांना शाळेच्या बाहेर शिक्षकांच्या निगराणीत पाठवले जाते.त्यांना कोणत्याही प्रकारची शिक्षा केली जात नाही.सर्व शिक्षक नेहमी मुलांचे रक्षण करण्यास तत्पर असतात. शाळेत परिवहन समिती गठीत असून कार्यान्वित आहे.शाळेत थोर व्यक्तीची जयंती पालक समाजातील शिक्षणप्रेमी यांच्या उपस्थितीत साजरी केली जाते.स्थानिक वर्तमानपत्रे याची दखल घेतात.विविध सण ,समारंभ शाळेतच साजरे करण्यात येतात.प्रत्येक गुरुवारी बालसंसद /बालमेळावा कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.याचे सर्व रेकार्ड शाळेमध्ये उपलब्ध आहे.



शाळा प्रगतीची अवलंबलेली तत्वे -

शाळेच्या गेट पासून ,प्रत्येक वर्गापर्यंत प्रसन्न व हिरवेगार वातावरण उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. भिंतीवर शैक्षणिक तक्त्याचे लेखन केलेले आहे.मुलांना आवडणारे चित्र, रंगरंगोटी,शैक्षणिक घोषवाक्य लिहिलेली आहेत. सुविचार प्रत्येक झाडावर लटकवलेले आहेत.ज्यामुळे आनंददायी वातावरण तयार झालेले आहे. शाळेत नर्सरी आहे. वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेतला जातो. शाळेत विविध प्रकारच्या झाडांचे संवर्धन केले आहे. प्रत्येक

वर्गाबाहेर वर्गाची उपस्थिती लावली आहे.शाळा रोज सकाळी साडेदहा वाजता भरते साडेनऊ ते साडेदहा, या एक तासा मध्ये वर्ग पाचवी व आठवीचे विद्यार्थ्यांचे स्कॉलरशिप क्लास घेतले जातात. दर गुरुवारी सर्व विद्यार्थ्यांच्या समित्यांची सभा घेतली जाते.

गुणवत्तापूर्ण दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शाळा डिजिटल, econtent,संगणक प्रयोगशाळा,ग्रंथालय, शैक्षणिक साहित्याद्वारे शिक्षण अवलंबिले जाते.वर्ग व्यवस्थापनामध्ये बदल करण्यात आले आहेत.अभ्यासात मागे असलेल्या मुलांना क्षमतेनुसार शैक्षणिक अनुभव देण्यात येत आहेत .१००% मुलांना प्रगत करण्याचे नियोजन शाळा करते.



कागदापासून विविध आकाराच्या वस्तू बनवताना विद्यार्थी

स्व विकास व त्यातून शालेय विकास आणि संघबांधणी-

प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाच्या आधारे शालेय व्यवस्थापन काटेकोर व सुस्थितीत करायला मदत मिळाली. या प्रशिक्षणामुळे शिक्षकांच्या अध्यापन करताना येणाऱ्या समस्या समजून घेता आल्या. शिक्षकांचा प्रभावी व सकारात्मक सहकार्य घेण्याचे नियोजन करण्यास मदत मिळाली. शालेय नेतृत्व व्यवस्थापनामध्ये सर्व शिक्षकांची सहकार्य स्वेच्छेने प्राप्त करण्यात यश मिळाले आहे. शालेय दैनंदिन कामकाज मध्ये मल्टिटास्किंग चा उपयोग करून आवडीनुसार इतर शिक्षकांना त्यांच्या कार्यक्षेत्रानुसार दिला जातो. जेणेकरुन सर्व शिक्षक आपले काम आवडीने पूर्ण करतात. त्यामुळे शाळेचा विकास झाला आहे मुख्याध्यापक ,शिक्षक आणि पालक यांचे

संबंध दृढ झालेले आहेत आणि सर्व मिळून मुलांचे शिक्षणासंदर्भात योग्य पाऊल उचलतात .शंभर टक्के मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते. शालेय विकास साधला जातो. सदर प्रशिक्षणामुळे कृतीयुक्त अध्ययन अध्यापनात विद्यार्थी व शिक्षकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रशिक्षणामुळे सकारात्मक विचार, कामाचे नियोजन,कामाची विभागणी,अशा महत्वाच्या विषयाची माहिती प्राप्त झाली.



वृक्षारोपणात महिला पालकांचा सहभाग

शाळेतील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत झालेला बदल -

सुरुवातीला शिक्षक केन्द्री असलेले अध्ययन-अध्यापन आता विद्यार्थी केंद्रित झाले, त्यासाठी ई लर्निंग, ग्रंथालय, कृतीयुक्त अध्यापन, कम्प्यूटर लॅब, क्षेत्रभेट शालेय, परिसरात बैठका, व शैक्षणिक साहित्य या बाबींचा वापर केला जातो, व्यवस्थापनात विषयनिहाय बदल केले. वैयक्तिक, सामूहिक, गटकार्य, प्रकल्प इत्यादींचा समावेश झालेला आहे. वर्ग व्यवस्थापनामध्ये विद्यार्थी शिक्षक चर्चा करून बसण्याची व्यवस्था ठरवतात, शैक्षणिक साहित्याचा वापर शिकण्याकरता विद्यार्थी करतात.जेणेकरून त्यांचे अनुभव कायमस्वरूपी टिकणारे असतात. प्रत्येक विद्यार्थी अध्यापनातील प्रक्रियेमध्ये सहभाग घेतो आणि आपल्या आवडीनुसार शैक्षणिक अनुभव घेतो.

शाळा प्रगत आहेअसून सर्व वर्ग खोल्यांच्या भिंती आकर्षित ,रंगीत व बोलक्या आहे. त्याचा वापर वेळोवेळी केला जातो. विद्यार्थी स्वत: शैक्षणिक साहित्याचा वापर करतात.

शाळेसाठी पालक व समाजाचा सहभाग -

शाळेच्या विकासात पालक व समाजाचा अतिशय मोलाचा वाटा आहे. लोकसहभागातूनच शाळा डिजिटल झालेली आहे. प्रत्येक वर्गात ई लर्निंग साहित्य आहे .hand-wash स्टेशन, बँड ढोल पथक आहे .विविध महापुरुषांची जयंती पुण्यतिथी शाळा व समाज मिळून साजरी केली जाते. शाळेत होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमासाठी पालक मंडळी आवर्जून उपस्थित असतात. शिवजयंती, जिजाबाई जयंती, जनजागृती रॅली ,गणपती, यात शाळा, शिक्षक, विद्यार्थी समाज एकत्र आलेले दिसतात .शाळेच्या प्रगतीसाठी सर्व मिळून सहकार्य करतात.

शालेय गुणवत्तेच्या अनुषंगाने शाळेत राबविलेले उपक्रम - (नवोपक्रम)-

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा बोराखेडी येथे नाविन्यपूर्ण उपक्रम मोठ्या प्रमाणात राबवले जातात. प्रवेशोत्सव कार्यक्रमापासून विविध उपक्रम राबविले जातात.विविध जनजागृती रैली ,जन-पर्यावरण दिन,जागतिक लोकसंख्या दिन,विश्वविज्ञान दिवस उत्साहात साजरे केले जातात. नर्सरी, आरोग्य तपासणी, ग्रंथालय, संगणक कक्ष, बाथरूम, हेड वाश स्टेशन, स्कूल टीचर इंफॉर्मेशन बोर्ड आहेत. शासन आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येते जसे - तंबाखू मुक्त शाळा, बालक संरक्षण,स्वच्छ मुलगा स्वच्छ मुलगी- हे उपक्रम राबविले जातात. यामध्ये प्रत्येक दिवशी परिपाठात एक स्वच्छ मुलगा, मुलगी यांची निवड करून एक मेडल देण्यात येते.दिवसभर निवड झालेल्या मुला –मुलीजवळ मेडल असते..प्रत्येक दिवशी प्रत्येक विद्यार्थ्यांची स्वच्छ पुरस्कार मिळण्यासाठी धडपड असते,म्हणून स्वच्छतेवर शंभर टक्के विद्यार्थी जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करतात. पुस्तक प्रदर्शनीचे आयोजन करण्यात येते. यामध्ये थोर नेत्यांची ओळख, विविध माहितीची पुस्तक इतिहासाचे पुस्तक आणि विद्यार्थ्यांचे संदर्भ पुस्तकांचा संग्रह मुलांसमोर ठेवण्यात येतो.

अपेक्षित शाळेचे कल्पनाचित्र व त्यासाठी आपण पार पाडत असलेली भूमिका -

सध्या शाळा प्रगत,डिजिटल.ई लर्निंग असून ISO नामांकन प्राप्त आहे. भविष्यात शाळा 'ओजस म्हणजेच आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा करायची आहे. त्यासाठी ऑनलाईन माहिती भरण्यात आलेली आहे, रजिस्ट्रेशन केलेली आहे. ओजस शाळेची कार्यप्रणाली ही समजून घेण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न सुरु आहे.सर्व सुविधायुक्त शाळा बनविण्याची तयारी आहे. शाळेचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षक,शाळेसाठी शासनाने विविध उपक्रम दिलेले आहेत, ते सर्व शाळेमध्ये योग्यरीत्या प्रभावी राबविण्यात येतात. शालेय संघटन, व्यवस्थापन व प्रशासन इत्यादीची केली जाणारी कार्यवाही , व्यवस्थापन समिती आणि सर्व शिक्षकांना विश्वासात घेऊन सर्वांचे विचार सन्मान ठेवून सर्वानुमते विकासाचे नियोजन केले जाते प्रत्येक निर्णय घेण्यापूर्वी सर्वाची घेतले जाते . माता पालक संघ ,शिक्षक-पालक संघ ,पर्यावरण समिती, शाळा व्यवस्थापन समिती ,विद्यार्थी संघटना, समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत . सर्व पालक समाजातील प्रतिष्ठित नागरिक, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक सदस्य, पंचायत समिती सदस्य, शिक्षण प्रेमी लोक हे सर्व शाळेच्या कार्यक्रमात सहभाग घेतात. शाळेने बोलावलेल्या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहतात . शाळेचे व्यवस्थापन विद्यार्थ्यांचा विकास याकडे लक्ष देतात.

शाळा प्रगतीचे पुनरावलोकन व प्रत्याभरणासाठीची कार्यवाही -

जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा बोरखेडी प्रगत,डिजिटल,ISO नामांकित प्राप्त शाळा असून शंभर टक्के विद्यार्थांना गुणवत्ता व दर्जेदार शिक्षण देणारी शाळा आहे.१००%विद्यार्थ्यांची प्रगती केली जाते व त्यांना योग्य मार्गदर्शन करून मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न शाळेतर्फे केले जाते. शिक्षकांना मुख्याध्यापक म्हणून योग्य मार्गदर्शन वेळोवेळी केले जाते. शिक्षकांच्या मासिक सभा घेतल्या जातात, त्यामध्ये आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांची प्रगती व सर्वागीण विकासाबाबत सविस्तर चर्चा केली जाते.आलेल्या अडचणी , समस्या याबाबत सर्व शिक्षक मुख्याध्यापक मिळवून योग्य मार्ग काढून ती समस्या दूर करण्याचा प्रयत्न करतात. याचा अर्थ असा की विद्यार्थ्यांची प्रगती होते. शाळेचा विकास झालेला दिसतो. शालेय विकास आराखडा, शाळा सिद्धी मध्ये सुधारण्याचे नियोजन,यामध्ये भौतिक सुविधा आणि प्राप्त सुविधांमध्ये वाढ करण्याचे नियोजन केलेले आहे.स्वच्छतागृह, शालेय नेतृत्व विकास प्रशिक्षणातून विकासाची दृष्टी निर्माण झाली आहे.



शिक्षक पालक सहविचार सभा



समारोप-

अशाप्रकारे शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमामुळे मुख्याध्यापकांना व्यवस्थापन कौशल्य प्रास झाले यातून मुख्याध्यापक, शिक्षक, समाज ,पालक यांना सोबत घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी शाळेमध्ये असलेल्या सुविधांचे योग्य नियोजन व पूर्ण वापर करण्यात मदत झालेली आहे.मल्टिटास्किंग काम करणे याचा योग्य प्रभावी वापर कसा करावा हे लक्षात आल्यामुळे प्रशिक्षण ते यशस्वी झालेच,विद्यार्थी गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रशिक्षणाचा उपयोग झाला.

धन्यवाद

जगदिश निंबा बडगुजर

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुसुंबा, भिलाटी, तालुका,जिल्हा.धुळे.

व्यक्तिचा विकास जसा Head, Heart, Hand म्हणजे बौद्धिक, भावनिक, कौशल्य या सर्व अंगांनी झाला पाहिजे. तेव्हाच ती व्यक्ती सुदृढ नागरिक, समाजोपयोगी नागरिक बनू शकते. तसे शाळेच्या विकासात नुसता भौतिक विकास न साधता बौद्धिक विकासाला सामाजिक, सांस्कृतिक, भौतिक विकासाची जोड दिली तर ती शाळा आदर्श शाळेच्या दिशेने वाटचाल करते. या दृष्टीने शाळेच्या विकासात काही अडथळे आम्हाला जाणवले.

1) समाजाची शाळेबद्दल अनास्था.
2) अशिक्षित पालक वर्ग, अनारोग्य
3) अकुशल काम करणारा पालक वर्ग
4) प्रमाणभाषेत अभिव्यक्त होण्यासाठी अडथळा ठरू पाहणारी बोलीभाषा – परिणामी शाळेपासून लांब राहण्याकडे पालकांचा कल
5) अनास्था – अंधश्रद्धा, विविध धार्मिक कार्यक्रम.
6) मुलगा-मुलगी भेद
7) कौटुंबिक अडचणी
8) कुटूंबाच्या आर्थीक अडचणींचा मुलांच्या शालेय उपस्थितीवर होणारा परिणाम. परिणाम – गैरहजेरी, अनियमितता
9) परिणामी सर्वांगीण शालेय विकासाला अडथळे

मुख्याध्यापक या नात्याने शाळेतील समाजाचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले. प्रथम गावात पालकांशी संपर्क वाढविण्याचे ठरवून आम्ही कामाला लागलो. पालकांशी संपर्क वाढवत असतांना विद्यार्थ्यांच्या विकासाला मारक ठरणाऱ्या अनेक गोष्टी लक्षात यायला लागल्या. या गोष्टींबद्दल जाणीव जागृती करण्यासाठी, शालेय व्यवस्थापन समिती, मातापालक संघ, शिक्षक पालक संघ अधिक सक्षम करण्याचे ठरवून आम्ही त्या दिशेने पाऊल उचलले. प्रथम थोडे सज्ञानी व उत्साही असलेल्या पालकांची निवड करून सक्षम शालेय व्यवस्थापन समिती आम्ही स्थापन केली. शालेय व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून पालकांचा शाळेत सहभाग वाढविला. शाळाशुभारंभ, राष्ट्रीय कार्यक्रमात सहभाग, विविध रॅली, अभियान, सांस्कृतिक कार्यक्रम यातून पालक शाळेत डोकाऊ लागले. शिक्षक पालकांशी त्यांच्या भाषेत बोलून जवळीक साधू लागले.

शाळा गुणवत्ता विकासाची उद्दिष्ट्ये -

1) शाळा फक्त विद्यार्थी आणि शिक्षकांपुरताच मर्यादित आहे हा दृष्टीकोन बदलणे माझी शाळा, आपली शाळा करणे - शाळा हा गावाचा, गावाच्या संस्कृतीचा आरसा असतो. त्या दृष्टीने गावाचा शालेय प्रगतीसाठी कसा उपयोग करून घेता येईल यावर विचार करणे.

2) शालेय भौतिक सुविधेत तातडीने पूर्तता करता येण्यासारख्या बाबींवर प्रकाश टाकून शालेय व्यवस्थापन समिती, पालक, लोकसहभाग, शिक्षक सहभागातून करावयाच्या कामांची यादी करून शाळा व्यवस्थापन समिती व पालकांच्या, शिक्षकांच्या निदर्शनास आणून देणे.

3) **<u>प्रत्यक्ष अध्ययन</u>** – अध्यापन पद्धतीत नाविन्यता आणून आनंददायी शिक्षणातून गुणवत्ता विकासाकडे वाटचाल करणे ध्येयपूर्ती करणे.

4) शालेय वेळेनंतर विद्यार्थ्यांचा गृहपाठ, सराव अभ्यास करून घेण्यासाठी सुशिक्षित अध्यापनाची आवड असलेल्या युवकांची नेमणूक करणे.

5) शाळेच्या राष्ट्रीय व सांस्कृतीक कार्यक्रमात पालकांचा, माजी विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन सौहार्द्रपूर्ण वातावरणाची निर्मिती करणे.

6) घेण्यात आलेल्या विविध परीक्षांचा निकाल पालकांपुढे ठेऊन अधिक प्रगतीसाठी नियोजन करणे.

7) गुणवत्तापूर्ण विकास कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या प्राथमिक कौशल्याकडून इयत्तावार उद्दिष्टांच्या पूर्ततेकडे वाटचाल करणे.

8) अध्ययनस्तराकडून अध्ययन निश्चितीकडे त्या दृष्टीने वार्षिक नियोजन करणे.

9) शाळेची भौगोलिक परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर परिणाम करणारी अडचण, पर्यवेक्षिय यंत्रणेच्या सहाय्याने सोडवणे.

याप्रमाणे नियोजन करून शाळेतील सर्व शिक्षक एकत्र येऊन आम्ही प्रत्यक्ष काम सुरु केले.



केंद्रांतर्गत शिक्षण परिषद







२०१८-१९ या शैक्षणिक वर्षात पालकांच्या मदतीने शाळेपासूनचा 100 मीटर यार्ड परिसर शाळेने यशस्वीपणे तंबाखूमुक्त केला. पूर्वी ओट्यावर पत्ते खेळायला

बसणारे पालक, भिंतीवर गुटखा, तंबाखू खाऊन थुंकणारे पालक शालेय परिसरात स्वच्छता पाळू लागले. माता-पालक मिटींगच्या माध्यमातून स्वच्छतेच्या सवयींवर उद्बोधन करून स्वच्छतेचे महत्व पटवून देऊन बालकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावण्यात यश आले.

पालकांना शाळेत यायला जो संकोच वाटत होता तो कमी झाला. परिणामी शाळेचा पालक, माता संपर्क वाढला. शालेय व्यवस्थापन समितीच्या मिटींगच्या माध्यमातून शालेय अडचणींवर चर्चा होऊ लागली.

राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत शालेय भौतिक सुविधेचा आढावा मांडून तातडीने करावयाच्या कामांची यादी केली. त्यात दोन वर्गखोल्यांच्या मध्ये भिंत बांधून हॅण्डवॉश स्टेशन उभारले व हात धुवा अभियानाची पुर्तता केली. शाळेला संलग्न किचन शेड बांधले. स्वतंत्र पोषण आहार शिजविण्याची व्यवस्था झाली. अकुशल काम करणारा पालकवर्ग असल्या कारणाने आम्ही लोकसहभागातून वर्गणी उभी करू शकत नाही. सर्व पालकवर्ग मजूरीची कामे करतो. मात्र शिक्षकांनी हाकेला ओ देत वर्गणी उभी करून शालेय रंगकाम सुरू केले. भिंती बोलक्या करून गुणवत्ता वाढीस पोषक वातावरण निर्मिती कडे पाऊल टाकले.



बोलक्या भिंती



हॅण्डवॉश स्टेशन - - हात धुवा अभियानाची पुर्तता

समाजात निरक्षरता असल्याकारणाने ब-याच अंधश्रद्धा, मुलींच्या शिक्षणा विषयी अनास्था होती. विद्यार्थ्यांना घरकाम, उदरनिर्वाहासाठी रोजंदारी कामाकडे नेण्याचा पालकांचा कल होता. धार्मिक कार्यक्रमांचा पगडा एवढा होता की, एखाद्या घरी नवस असला, गावची मरीआईची यात्रा असली की सर्व शाळा ओस पडत असे.

शिक्षकांनी पालकांचे उद्बोधन केले. विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीतून त्यांचे कसे नुकसान होते हे लक्षात आणून दिले. मुलीपण मुलांबरोबर शिकल्या तर सर्व घराची प्रगती होते हे पटवून दिले.



अध्यापन पद्धतीत बदल -- गटचर्चा, जोडीचर्चा, खेळ

विविध सामाजिक अडचणी सोडवत शालेय गुणवत्ता विकासावर भर देण्यासाठी शिक्षकांनी अध्यापनात विविध साहित्याचा वापर करून विद्यार्थ्यांच्या ज्ञानरचनावादाला प्रोत्साहन दिले. शिक्षककेंद्री अध्यापन पद्धती न ठेवता विद्यार्थी केंद्रस्थानी मानून अध्यापनाच्या पद्धतीत बदल घडवून आणले. गटचर्चा, जोडीचर्चा, खेळ, विविध उपक्रम, कृती यातून आनंददायी अध्यापन कसे होईल याकडे शिक्षकाचा कल राहू लागला. हे सर्व करीत असतांना प्रकर्षाने जाणवत होते की, ऋतुमानानुसार विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत अनियमितता असते. त्याला कारण ही तसेच होते. शाळेचा भौगोलिक परिसर फारच अडचणीचा आहे.




महादेव मंदिर
शेत
मंदिर
शाळा
पांझरा नदी

नकाशात शाळेची भौगोलिक स्थिती दर्शवली आहे. अशा परिस्थितीत आमच्या शाळेच्या टिमने मुलांची उपस्थिती टिकविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. पालकांची प्रसंगी नाराजी ओढवून आम्ही नाल्यातून मुलांची ने-आण करत असू. अशा परिस्थितीत कळंबेश्वर भिलाटी वस्तीतून स्थानिक ठिकाणी वर्ग भविण्याची मागणी पालकांची होऊ लागली. वरिष्टांच्या परवानगीने आम्ही ही मागणी पूर्णत्वास नेण्याचा संकल्प केला.

दि. 15-06-2018 च्या शालेय व्यवस्थापन समितिच्या मिटींग मध्ये विषय मांडून ठराव क्र. 7 'कळंबेश्वर भिलाटी येथे नविन वर्ग १ ते ४ चालू करणे'. बहुमताने पारित करून नविन शैक्षणिक वर्षाला शुभारंभ केला. पालकांनी विशेष समाधान मानले. परंतु ही प्रक्रिया सोपी नव्हती. त्यासाठी आमच्या शाळेच्या केंद्रप्रमुख परदेशी सर व विस्तार अधिकारी दंडगव्हाळ मॅडम यांनी मोलाचे प्रयत्न केले. आज याचा परिणाम म्हणजे शाळेची आज अखेर पटसंख्या 84 आहे व उपस्थितीचे प्रमाण ९२% ते ९५% पर्यंत आहे.

गुणवत्ता वाढीसाठी भाषा पेटीतील साहित्य व गणित पेटीतील साहित्य वापरून अध्यापनात नाविन्यता आणून सतत प्रयत्नशील राहणार आहोत.



नाविन्यपुर्ण, आनंददायी अध्यापन पद्धती

विद्यार्थ्यांच्या आरोग्याविषयी सजगता दाखवून आम्ही वेळोवेळी जंतनाशक दिन, गोवर, रूबेला लसीकरण यासारखे आरोग्य खात्याच्या उपक्रमात सहभागी होऊन व आरोग्य अधिकारी डॉ. विजय गौड यांचे मार्गदर्शन पालकांना व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देऊन विद्यार्थ्यांचे आरोग्य जपण्यास सजग राहतो.



आरोग्य अधिकारी यांचे मार्गदर्शन

धन्यवाद

भागीनाथ यादवराव सरोवर
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जैतापूर केंद्र-हतनूर तालुका.कन्नड जिल्हा.औरंगाबाद
ई-मेल आयडी bysarowar491@gmail.com

- **शालेय परिसर व शाळा विकासात सहकार्य - -**

जिल्हा सातत्यपूर्ण व्यावसायीक विकास संस्था औरंगाबाद, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख,विषय साधन व्यक्ती यांचे शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम अंतर्गत प्रशिक्षण झाल्यामुळे त्या प्रशिक्षणातून प्रभावित होऊन या सर्वांनी वेळोवेळी शाळा भेटीदरम्यान,केंद्र परिषदेमधून सर्व मुख्याध्यापकांना प्रोत्साहन देण्यात आले.त्यामुळे **जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जैतापूर केंद्र - हतनूर ता कन्नड** ही शाळा विकास करण्यास प्रवृत्त झाली. मुख्याध्यापक या नात्याने मी व माझे सहकारी मिळून शाळा विकासात महत्वाची भूमिका बजावली. शाळा विकासात कसा बदल करता येईल या दृष्टीने शालेय परिसर,रंगरंगोटी ,वर्ग सजावट, विद्यार्थी गुणवत्ता वाढ इ.सर्व गोष्टीमुळे शाळा विकासात येणा-या अडचणी या सर्व गोष्टी दूर करण्याचे लक्ष्य ठेऊन शालेय विकास परिणामकारकपणे करण्याची प्रेरणा शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमातून मिळाली. शाळेमध्ये सर्व क्षेत्रीय अधिकारी, वर्गशिक्षक यांनी शाळेच्या चांगल्या परिस्थितीत आणखी सुधारणा करण्याचे निश्चित केले.हे सर्व SLDP प्रशिक्षणातून शक्य झाले व आणखी शालेय विकास साधण्याचे निश्चित करण्यात आले.

शाळा विकास नियोजन आणि अंमलबजावणी -

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जैतापूर या शाळेचा मुख्याध्यापक या नात्याने मी आपल्या सहकारी शिक्षकांसोबत बैठक घेऊन शाळा विकास करण्यासाठी विचारविनिमय केला परंतु सुरुवातीला शिक्षकांनी अल्प सहभाग दाखविला. परंतु शिक्षकांच्या या भूमिकेत बदल करणे हा मोठा प्रश्न माझ्यापुढे होता, आपल्या नेतृत्व गुणाने शिक्षकांच्या या भूमिकेत मी बदल करू शकलो. सांघिक वृत्तीने काम केले तर काम यशस्वी होते ही सांघिक भावना शिक्षकामध्ये निर्माण केली. सुरुवातीलाच शाळा विकासाचे शिक्षकांच्या मदतीने नियोजन केले. नियोजनाशिवाय कोणतेही कामकाज पूर्ण होऊ शकत होते याची जाणीव सर्व अधिकारी,गटशिक्षणाधिकारी,विस्तार अधिकारी केंद्रप्रमुख,विषय साधनव्यक्ती यांनी करून दिल्यामुळे नियोजनाला प्राधान्य देण्यात आले. शाळेच्या अत्यावश्यक गरजा ठरवून संबंधित बाबींमध्ये बदल करायचा, याबाबत यादी तयार करून प्राधान्य क्रम देण्यात आला. त्यामध्ये शालेय परीसर,स्वच्छता,विद्यार्थी उपस्थितीसाठी पालक भेटी नियोजन, शालेय परिसरात वृक्षारोपण, शाळेची रंगरंगोटी, शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन यासारख्या कामकाजाविषयीचे नियोजन करण्यात आले.

शालेय विकास नियोजन व शाळा व्यवस्थापन समिटी सहकार्य -

शाळेच्या विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांची साथ असणे आवश्यक आहे. यामध्ये शाळा व्यवस्थापन समिती महत्वाची आहे शाळा विकासात सर्वांची मानसिकतेत बदल घडवून आणणे आवश्यक होते.त्याशिवाय शाळेचा विकास शक्य नाही.म्हणून सर्वप्रथम शाळेत पालकसभेचे आयोजन करण्यात आले.



क्षेत्रीय अधिकार्यांच्या उपस्थितीत पालक सभा

सर्वप्रथम आम्हाला पाहिजे तेवढा प्रतिसाद मिळाला नाही. नंतर आम्ही (मी व माझ्या शिक्षकांनी) पालक भेटीचे नियोजन करून सर्व पालक भेटी केल्या व पालक

भेटीतून पालकांचे प्रबोधन केले. शाळेत विद्यार्थ्यांच्या मदतीने वृक्षारोपण करण्यात आले. त्या वृक्षांची संगोपनाची जबाबदारी विद्यार्थ्यांवरच देण्यात आली त्यामुळे विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक झाडांचे संगोपन केले. तसेच स्वत:हून काही फुलांच्या झाडांची लागवड केली



शालेय व सह शालेय उपक्रम

शाळा विकासामध्ये विद्यार्थी विकासात सहशालेय उपक्रम महत्वाचे असतात. हे ओळखून प्रभावी अध्यापन व अध्ययन उपक्रमाखेरीज शाळेमध्ये थोर नेते,महापुरुषाच्या जयंती पुण्यतिथी,व इतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले.शाळेत वाचन प्रेरणा दिन ,योग दिवस इ उपक्रम सुरु करण्यात आले.

समता-समानता, शाळा सुरक्षा, बालअधिकार, शालेय वातावरण -

समता-समानता - शाळेमध्ये यापूर्वी समता व समानता वाढीसाठी, विद्यार्थी विकासासाठी शाळेत समता व समानता प्रस्थापित करण्यासाठी जाणीवपूर्वक केले गेले. मुले व मुलींमध्ये लिंगसमभाव निर्माण करणे, खेळांमध्ये मुले व मुलींचा एकत्रित समावेश करणे, वर्गात मुले व मुलींना एकत्र बसण्याची बैठक व्यवस्था करणे या गोष्टीना प्राधान्यक्रम देण्यात आला. सुरुवातीला मुले व मुली एकत्र खेळण्यास, बसण्यास तयार होत नव्हते. परंतु त्यांच्यामध्ये लिंगसमभाव निर्माण करून त्यांचे प्रबोधन करण्यात आले. तसेच कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता समानतेची भावना त्यांच्या मनात निर्माण करण्यात आली. समानतेच्या दृष्टीकोनातून ज्या विद्यार्थांना जे आवश्यक आहे ते देण्याचा प्रयत्न केला जात आहे. उदा. ज्या विद्यार्थांना खेळाची आवड आहे त्या विद्यार्थ्यांना खेळण्याची संधी देणे,ज्यांना सांस्कृतिक कार्यक्रमाची आवड आहे त्यांना सांस्कृतिक कार्यक्रमात भाग दिला जातो. तसेच त्यांना गाण्याची आवड आहे

त्यांना गाण्यासाठी प्राधान्य दिले जाते. यादृष्टीने शाळेत आज रोजी समता-समानता या दृष्टीने कामकाज चालते.



बाल अधिकार व विद्यार्थी सर्वांगीण विकास

प्रत्येक विद्यार्थ्याला बाल अधिकाराविषयी मार्गदर्शन करणे आवश्यक आहे याची जाणीव झाली. त्यादृष्टीने विद्यार्थ्यांना बाल अधिकाराविषयी मार्गदर्शन करण्यात येते. विद्यार्थ्यांना शालेय वातावरणात त्यांच्या अधिकाराचा वापर करण्याविषयी मोकळीक दिली जाते. विद्यार्थी सुद्धा इतरांच्या अधिकारावर बाधा येऊ न देता स्वत:च्या अधिकाराचा वापर प्रभावीपणे व आवश्यक त्या ठिकाणी करतात. एखाद्या घटनेविषयी स्वत:चे मत मांडणे , खेळामध्ये सहभागाची संधी उपलब्ध करून देणे, विविध सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेण्याचे स्वातंत्र्य

यासारख्या बाल अधिकाराकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले जाते. विद्यार्थी सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी व त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात. विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकासासाठी आरोग्य चांगले असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने नियमित उपक्रमाशिवाय दररोज योग सराव आयोजन करून विद्यार्थी विकासात शाळा महत्वाची भूमिका बजावत आहे.



शालेय वातावरण व शिक्षक भूमिका

शालेय वातावरण, परिसर, प्रसन्न व आनंददायी होण्यासाठी शाळेत झाडेझुडपे, फुलांचा बागबगीचा,शाळा सुशोभन करण्यासाठी विद्यार्थी शिक्षकांचासुद्धा सहभाग घेण्यात आला.शाळेतील झाडेझुडपे बागबगीचा यांच्या संगोपनाची जबाबदारी विद्यार्थ्यावर सोपविल्यामुळे ते काळजीपूर्वक जोपासतात . शाळा भरण्यापूर्वी झाडांना पाणी घालणे, शाळा परीसर, वर्ग परिसर स्वच्छ करून कचरा कुंडीमध्ये कचरा टाकतात.

शाळेची दृष्टी (VISION) आणि ध्येय (MISSION)

कोणत्याही बाबतीत विकास साधायचा असेल तर दृष्टी आणि ध्येय हे घटक महत्वाचे असतात. vision डोळ्यासमोर ठेऊन ध्येय ठरविले तर ते साध्य करण्यासाठी प्रयत्न करणे सोपे जाते व ध्येयाप्रती निष्ठा ठेवली तर ती पूर्ण होण्यासाठी वेळ लागत नाही. हा दृष्टीकोन माझ्यात निर्माण झाल्यामुळे vision डोळ्यासमोर ठेऊन ध्येय ठरविली.सर्व प्रथम केंद्रात भौतिक सुविधेच्या बाबतीत परिपूर्ण अशी शाळा बनविण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवले. शालेय विकासासाठीचे सर्व निकष पूर्ण करण्याचे ठरविले.त्यामध्ये सर्व वर्गांना स्वतंत्र वर्ग खोली ,शाळेला आवारभिंत,पिण्याच्या पाण्याचीसुविधा,मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह ,क्रीडांगण इ.गोष्टीकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले .समग्र शिक्षा अभियानातून या सर्व गोष्टी पूर्ण करण्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने पाठ पुरावा करून त्या

पूर्ण करून घेण्यात आल्या. लोकसहभागातून सर्व शाळेला रंग -रंगोटी करून घेण्यात येऊन सर्व भिंती बोलक्या करण्यात आल्या.शाळेच्या आवारात वृक्ष लागवड करण्यात आली. शाळेच्या परिसरात ठिकठिकाणी फुलांच्या झाडांची लागवड,फुलांची बाग तयार करून शाळा सुशोभित करण्यात आली.

सांघिक कार्यातून यश -

कोणत्याही क्षेत्रात प्रगतीसाठी प्रभावी नेतृत्व महत्व्वाचे असते. हा सर्वसामान्य नियम शालेय विकासात सुद्धा लागू होतो.हे लक्षात घेता शाळा विकास चांगल्या प्रकारे घडून येतो..त्याप्रमाणे मुख्याध्यापक सुद्धा शाळेचा नायक असतो.तो जेवढा तत्पर तेवढे शाळेतील इतर घटक तत्पर असतात त्या दृष्टीने मुख्याध्यापकाचे कार्य चांगले असेल तर शाळेची सुद्धा प्रगती होते हा विश्वास माझ्यामध्ये निर्माण झाला.यातून प्रभावित होऊन शाळेच्या विकासात मोलाची भूमिका पार पाडली.परंतु हे कार्य एका व्यक्तीचे नसून सांघिक वृत्तीने काम केले तर त्यात यश निश्चीत आहे हे मला माहीत होते . आपल्या सर्व सहकार्यांना सोबत घेऊन काम करण्याचे ठरविले. शिक्षकांमध्ये सांघिक कार्य करण्याची भावना निर्माण करून, आपल्या नेतृत्वाच्या प्रभावाने त्यांना प्रभावित करून कोणत्याही प्रकारचा व्यक्तीभेद न करता सांघिक काम करण्याची भावना त्यांच्या मध्ये निर्माण केली.त्यादृष्टीने त्यांनी कामकाज करण्यास सुरुवात केली तालुक्यातील आज प्रगतीपथावर असणारी शाळा म्हणून तालुक्यात गणली जात

आहे.समानतेच्या दृष्टीकोनातून त्यांनी कामाचे वाटप सहकाऱ्यामध्ये केले.त्यामुळे सहकाऱ्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव न राहता सर्वजण उस्फूर्तपणे काम करतात.सर्वांमध्ये शाळा विकासाची जिद्द त्यामुळे निर्माण झाली.

त्याचप्रमाणे शालेय व्यवस्थापन समितीतील सदस्यांमध्ये सुद्धा संघभावना निर्माण झाली.कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता शाळा विकासात कसा हातभार लावता येईल या दृष्टीने सहकार्याची वृत्ती निर्माण केली व शाळा विकासात सर्वांचे सहकार्य मिळविले.शालेय विकासात मुख्याध्यापक नात्याने आपले महत्वपूर्ण योगदान देण्याचा पूर्ण प्रयत्न केला.

अध्ययन अध्यापन प्रक्रियेत झालेला बदल -

पोषक अध्ययन वातावरण विकसित करणे -

शाळेमध्ये पोषक अध्ययन वातावरण निर्माण करण्यासाठी जिल्हा तालुका स्तर प्रशिक्षणाची मदत झाली आहे. शाळेतील शिक्षकांनी विविध शैक्षणिक साहित्य निर्माण करून विद्यार्थी अध्ययन विकासात महत्वाची भूमिका बजावत आहेत. . त्याचप्रमाणे शाळा स्तरावर प्राप्त भाषापेटी , गणित पेटीतील साहित्य वापराविषयी शिक्षकांना विविध स्तरावरील मार्गदर्शन उपयोगी ठरत आहे.



सक्रीय अध्यापन तंत्राचा वापर करणे -

अध्यापनाची नवनवीन तंत्रे वापरली तर अध्ययन अध्यापन प्रक्रिया अतिशय प्रभावी होऊ शकते. हा विश्वास स्वत:मध्ये असल्याने आधी स्वतः त्याचा अंगीकार केल्यामुळे आपल्या सहकाऱ्यांमध्ये सुद्धा याची जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांची सर्वप्रथम सहविचार सभा घेऊन त्यांचे प्रबोधन केले. त्यानंतर सर्वांनी अध्यापनात नवीन तंत्र ,पद्धतीचा वापर करण्यास सुरुवात केली ज्ञानरचनावादी पद्धतीचा वापर, बहुवर्ग अध्यापन पद्धती,गट पद्धती यांचा नियमित वापर शाळेत केला जात आहे. तसेच इ लर्निंग साहित्याचा अध्यापनात वापर करण्यासाठी शिक्षकांना तंत्रस्नेही बनविण्यासाठी प्रयत्न केले. आज शाळेत

LCD मोबाईल, यासारख्या इ लर्निंग साहित्याचा वापर अध्ययन अध्यापनात केला जात आहे.



शाळेचा दैनंदिन आढावा घेणे -

अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभाबीपणे राबविण्यासाठी घटक नियोजन व वार्षिक नियोजन दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे चालविले जावे म्हणून शाळेच्या पहिल्याच दिवशी शिक्षकांची सहविचार सभा घेऊन सूचना दिल्या जातात. तसेच सर्व वर्गशिक्षकांना आपापल्या वर्गात घटक नियोजन , वार्षिक नियोजन , शाळेचे वेळापत्रक लावणे व त्यानुसार अध्ययन अध्यापन करणे बंधनकारक करण्यात आले

आहे. त्यामुळे सर्व वर्गात घटक व वार्षिक नियोजन लावण्यात येऊन शाळेच्या वेळापत्रकाप्रमाणे शाळेचे कामकाज चालते. त्याचप्रमाणे शालेय कामकाजाचे वाटप शिक्षकांमध्ये केलेले आहे ते दिलेल्या वेळेत झाले किंवा नाही , अध्ययन अध्यापन घटक नियोजन , वार्षिक नियोजनाप्रमाणे चालते किंवा नाही याचा दैनंदिन आढावा घेतला जातो. तसेच वर्गातील अध्ययन अध्यापन प्रक्रिया व्यवस्थित चालू आहे किंवा नाही याची खात्री करण्यासाठी मुख्याध्यापक या नात्याने वर्गात भेटी दिल्या जातात. यामुळे शालेय गुणवत्ता वाढीस लागण्यास मदत झाली.

शाळेचे स्वयं मुल्यांकन करणे , पुनरावलोकन आणि सुधारणा करणे -

शाळेचे स्वयं मुल्यांकन केले तर आपली प्रगती किती झाली, काय करणे बाकी आहे व त्यामध्ये काय सुधारणा करण्याची आवश्यकता आहे या विषयी जाणीव निर्माण होते शाळेचा एकूण आरसाच आपल्या समोर उभा राहतो. त्यामुळे माझी समृद्ध शाळा , शाळासिद्धी , प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत २५ मुद्यांच्या आधारे शाळेचे मुल्यांकन करण्यात आलेले आहे . त्यामुळे शाळा सुधारण्यासाठी दिशा मिळाली. कमतरता असलेल्या बाबींची पूर्तता करण्यासाठी प्रयत्न केले जातात . कमतरता असलेल्या बाबींची प्राधान्यक्रमाने यादी तयार करून त्या पूर्ण करण्यासाठी जबाबदारी निश्चित करून त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातात. त्यासाठी सर्व शिक्षक, शालेय व्यवस्थापन समितीचे सहकार्य

घेतले जाते आणि आवश्यक त्या ठिकाणी प्रशासकीय कामांसंबंधी वरिष्ठ कार्यालयाची मदत घेतली जाते . त्यामुळे शाळेच्या विकासात सुधारणा झाली.

प्रगती चाचण्या -

शाळेच्या भौतिक सुविधेबाबत ज्याप्रमाणे स्वयं मूल्यमापन करण्यात येते त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमतांची पडताळणी करण्यासाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन अंतर्गत प्रगती चाचण्या घेण्यात येतात. त्यामध्ये पायाभूत चाचणी , संकलित चाचणी १ व २ यांचा समावेश होतो.याखेरीज वेळोवेळी शाळा अंतर्गत चाचण्या घेण्यात येतात.या चाचण्यांमध्ये विद्यार्थ्यांची प्रगती जाणून घेऊन त्यामध्ये प्रगती करण्यासाठी प्रयत्न केले जातात. त्यासाठी शिक्षक अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करतात.

अध्ययन स्तर निश्चीती -

औरंगाबाद जिल्ह्यात मागील वर्षापासून सर्व शाळेतील विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमतांची पडताळणी करण्यासाठी मागील वर्षी अध्ययन स्तर निश्चितीच्या ३ चाचण्या घेण्यात आल्या. तर या वर्षी आत्तापर्यंत २ चाचण्या घेण्यात आल्या. या चाचण्यांच्या आधारे विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतांची पडताळणी करून माहितीचे विश्लेषण करण्यात आले. वर्गनिहाय किती विद्यार्थी कोणत्या क्षमतेमध्ये आहेत ? याचे विश्लेषण करून विद्यार्थ्याच्या क्षमतेमध्ये वाढ करण्यासाठी प्रयत्न केले जातात. ज्या त्या वर्गाच्या अंतिम स्तरावर विद्यार्थी जाण्यासाठी केंद्रसंमेलनामधून

आराखडा देण्यात आला. तसेच अध्ययन अध्यापन सुकर होण्यासाठी कोणत्या संकल्पना वापराव्यात ? कोणती तंत्र वापरावीत ? याविषयी माहिती घेण्यासाठी शिक्षकांना केंद्रसंमेलनात भाग घेण्यासाठी प्रेरित केले व विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केले जात आहेत.गटशिक्षणाधिकारी ,शिक्षण विस्तार अधिकारी ,केंद्र प्रमुख ,विषय साधन व्यक्ती यांनी वेळोवेळी विद्यार्थ्यांच्या क्षमतेमध्ये वाढ करण्यासाठी मार्गदर्शन केले.

शैक्षणिक साहित्य निर्मिती -

विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेत वाढ होण्यासाठी शैक्षणिक साधनाचा , साहित्याचा उपयोग होतो हे लक्षात घेऊन अवघड संकल्पना,अमूर्त संकल्पना विद्यार्थ्यांना समजून सांगण्यासाठी शिक्षकांना वर्गनिहाय अध्ययन क्षमतेप्रमाणे शैक्षणिक साहित्य निर्माण करण्यासाठी प्रेरणा देण्यात आली. त्यामुळे शिक्षकांनी शिक्षक अनुदानांतून मिळालेल्या पैशातून व स्वत:च्या काही पैशाने आपल्या वर्गासाठी आवश्यक ती शैक्षणिक साहित्याची निर्मिती केली व त्याचा दैनंदिन अध्ययन अध्यापन प्रक्रियेत वापर करतात. तसेच काही साहित्य विद्यार्थ्यांना गटात स्वत:हून शिकण्यासाठी दिले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना अध्ययनात आवड निर्माण झाली .

केंद्रप्रमुख,साधनव्यक्ती यांचा शाळा विकासात सहभाग -

साधनव्यक्ती व केंद्रप्रमुख यांचे शाळा नेतृत्व विकास कार्यक्रम प्रशिक्षण झाल्यामुळे त्या प्रशिक्षणातून प्रभावित झाले होते.प्रशिक्षणातून मिळालेल्या नेतृत्व गुणाविषयी त्यांनी सुलभक या नात्याने तालुका स्तर, शाळा स्तर भेटीतून वेळोवेळी मार्गदर्शन केले. यशस्वी शाळांच्या यशोगाथा आम्हाला दाखविण्यात आल्या.त्यामुळे नेतृत्व गुणांचे विकसन झाले . तसेच साधनव्यक्ती व केंद्रप्रमुख या नात्याने शाळेला दिलेल्या वेळोवेळी भेटीतून शाळा विकासाबाबत प्रेरणा दिली. त्याचप्रमाणे केंद्रस्तर शिक्षण परिषदांमधून त्यांनी प्रेरित केले. तालुका गुणवत्ता कक्षाच्या बैठकीतून मार्गदर्शन करण्यात आले.

शाळा विकासासाठी अंतर्भूत असणाऱ्या घटकाविषयी तसेच विविध शाळांची उदाहरणे देवून शाळा विकास कसा घडवावा याविषयी मार्गदर्शन दिले. त्याचप्रमाणे ज्या बाबी पूर्ण करण्यासाठी किंवा साध्य करण्यासाठी अडचणी येत होत्या त्याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. आपण सुद्धा शाळेचा विकास करू शकतो असा आत्मविश्वास केंद्रप्रमुख व साधनव्यक्ती यांनी शाळाभेटी दरम्यान केला .त्यामुळे आणखीनच प्रोत्साहन मिळाले. केंद्रप्रमुख व साधनव्यक्ती यांनी शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकांना उपस्थित राहून मार्गदर्शन केले आणि त्यांचेसुद्धा सहकार्य मिळवून दिले.

शाळेत राबविले जाणारे नवोपक्रम -

विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये रांगोळी स्पर्धा,सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, वाढदिवस साजरा करणे, सांस्कृतिक कार्यक्रम व मूल्यवर्धन यासारखे नवोपक्रम राबविले जातात.त्यात सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले जाते, स्पर्धेमुळे विद्यार्थ्यामध्ये जिंकण्याची जिद्द निर्माण होते तर अपयश पचवण्याची क्षमता निर्माण होते.या नवोपक्रमासाठी वर्गनिहाय नियोजन केले जाते.



क्षेत्रभेट, सहल उपक्रमातून अभ्यास -



शाळेमध्ये विविध उपक्रमाशिवाय क्षेत्र भेटीतून विद्यार्थ्यांना संधी दिल्या जात आहेत. यामुळे पट व उपस्थिती वाढणे, आनंददायी शिक्षणाचे उद्दीष्ट साध्य होण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

विद्यार्थी विकासात तंत्रज्ञानाचा वापर-

विद्यार्थी गुणवत्ता सुधारण्यासाठी शाळेत तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यासाठी शाळेत संगणक प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आली आहे.त्यामध्ये त्यात 10 संगणकाचा समावेश आहे.

संगणक प्रयोगशाळा

त्यासाठी वर्गनिहाय वेळापत्रक तयार करून वेळापत्रकानुसार त्या त्या वर्गाला संगणकाचे ज्ञान दिले जाते. त्याप्रमाणे काही अभ्यासक्रम सुद्धा संगणकाच्या आधारे शिकविला जातो, विद्यार्थी स्वतः संगणक हाताळतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना आवड निर्माण झालेली आहे. तसेच शालेय कामकाजामध्ये सुद्धा संगणकाचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. शाळा मोबाईल डिजिटल करण्यात आली आहे. त्याच्या साहाय्याने सुद्धा प्रत्येक वर्गात अभ्यासक्रमातील काही घटक विद्यार्थ्यांना शिकवले जातात.अवघड घटक सोपा वाटण्यासाठी याचा उपयोग झाला. त्यामुळे अध्ययन अध्यापनात गोडी निर्माण झाली आहे.

इतर उल्लेखनीय कार्य-

शाळेच्या विकासात लोकसहभाग महत्वाचा आहे त्यासाठी शाळेची लहान मोठी आर्थिक गरज असणारी कामे लोकसहभागातून पूर्ण केली जातात .त्यासाठी पालकांचे प्रबोधन केले जाते व आर्थिक सहभाग मिळविला जातो. शाळेची पूर्वीची स्थिती व आताची स्थिती यात झालेला बदल त्यांना निदर्शनास आणून दिला जातो, शाळेत होत असलेला बदल त्यांच्या सहज लक्षात येतो. त्यामुळे ते शाळेसाठी आर्थिक मदत करायला तयार असतात.शालेय व्यवस्थापन समितीचे सहकार्य,शिक्षकांची सांघिक काम करण्याची भावना, लोक सहभाग डायट औरंगाबाद, गटशिक्षणाधिकारी,शिक्षण विस्तार अधिकारी,केंद्र प्रमुख,विषय साधन व्यक्ती, आय. डी. विषय शिक्षक यांचे प्रभावी मार्गदर्शन या सर्व गोष्टी मुळे शाळेस **जिजाऊ शाळा पुरस्कार** प्राप्त झाला आहे.शाळा विकास होण्यास मदत होऊन आज शाळा प्रगती पथावर आहे.

धन्यवाद

शंकर भाऊसाहेब कबाडी
मनपा प्राथमिक शाळा,ओंकारनगर शिवनगर, सावेडी, जिल्हा.अहमदनगर.
ईमेल आय डी - bhausaheb.829@gmail.com

प्रस्तावना -

अहमदनगर महानगरपालिका अकरा शाळासोबत सन २०११ मध्ये फक्त 4 विद्यार्थ्यांसाठी नव्याने सुरु केलेली म.न.पा प्राथमिक शाळा ओंकारनगर ,केडगाव जिल्हा अहमदनगर येथील शाळा आज स्वतःची खास वेगळी ओळख निर्माण करत आहे. आज या शाळेत 60 विदयार्थी ज्ञानरचनावादी पद्धतीने शिक्षण घेत आहेत. विद्यार्थाचा सर्वागीण विकास करणे एवढेच ध्येय समोर ठेवून शासनाच्या विविध योजना व उपक्रम राबवत मी मुख्याध्यापक कबाड़ी आणि माझे सहकारी शिक्षक विद्यार्थ्यांचा सर्वागीण विकास करण्यासाठी अथक प्रयत्न करत आहोत.



अग्रणी शाळा व सामुदायिक भागीदारी -

शाळाबाह्य व अंतर्गत व्यावसायिक शिक्षण समुदाय विकसीत करण्यात आला. समुदायाशी प्रतिबध्दता उत्कृष्टपणे समन्वयाने जोपासण्यात आली. शाळा विकासात पालक व इतर नागरिकांचा प्रामुख्याने सक्रीय सहभाग घेण्यात आला,

शाळेची पार्श्वभूमी :- अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सन २०११ मध्ये ओंकारनगर

केडगाव उपनगर येथे म.न.पा प्राथमिक शाळा ओंकारनगर, सन २०११ मध्ये शाळेची सुरुवात करण्यात आली. सुरुवातीला विद्यार्थी पट कमी होता तसेच विविध आवश्यक भौतिक सुविधांचा तुटवडा होता. मी पदभार स्वीकारल्यानंतर विद्यार्थ्यांचा सर्वागीण विकास व भौतिक सुविधेची उपलब्धता या गोष्टीला सर्वोच्च प्राधान्य दिले. सहकारी शिक्षकांच्या सहकार्याने वरील ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न करत आहे. विविध सामाजिक संस्था संघटना /पालक , दानशूर व्यक्तीमार्फत ग्रंथालय पुस्तके, शालेय रंगरंगोटी, वृक्षारोपण संगोपन, परसबाग ई-लर्निग साहित्य क्रीडा साहित्य, शैक्षणिक साहित्य, साउंड सिस्टम, जलशुद्धीकरण यंत्र फर्निचर इ. लोकसहभागातून प्राप्त झालेले आहेत.

शाळेमध्ये विविध उपक्रम राबवून शैक्षणिक गुणवतावाढीसाठी शिक्षक प्रयत्न करत आहेत. ज्ञानरचनावादी अध्ययन अध्यापन वाढदिवसानिमित्त शालेय ग्रंथालयास पुस्तक भेट, विद्यार्थी बचत बँक, बाल आनंद मेळावा दर शनिवारी दप्तरमुक्त शाळा, टॉय बैंक (खेळणीतून शिक्षण) इ. द्वारे गुणवत्ता वाढीसाठी आनंददायी पद्धतीने निसर्गाच्या वातारणात अध्ययन - अध्यापन केले जाते. या सर्व गोष्टीमुळे साहजिकपणे विद्यार्थ्यांच्या संपादनात अपेक्षित वाढ झाली.

शाळेचा वाढता पट :

ओंकारनगर परीसरातील विविध वस्त्यामधून विदयार्थी शाळेत प्रवेश घेऊ लागले. एक आदर्श व अग्रणी शाळा म्हणून या शाळेची परीसरामध्ये स्वतंत्र ओळख निर्माण झाली. आज रोजी शाळेच्या पटामध्ये वाट होऊन ती सत्तर झालेली आहे.

शाळेची बदललेली स्थिती :

म.न.पा प्राथ.शाळा ओंकारनगर ही शाळा आज रोजी परिसरामध्ये एक आदर्श शाळा म्हणून गणली जाते. मुख्याध्यापक, शिक्षक यांचे प्रामणिक प्रयत्न व पदाधिकारी पालक, विविध सामाजिक संस्था अधिकारी,पर्यवेक्षक, साधनव्यक्ती यांच्या सक्रीय सहकार्यामुळे शाळेची प्रगती होत आहे. शाळेची इमारत व शालेय परिसर सर्व सुविधेसह सुसज्ज आहे.

महानगरपालिका ओंकारनगर शाळेचे आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरत ई लर्निंग क्लासरूमची निर्मिती केलेली आहे.

आज या शाळेत बहुसंख्येने गोरगरिबांची मुले शिक्षण घेत आहेत. या मुलांना हायटेक करण्यासाठी कल्याण येथील साईप्रसाद हार्डवेअरचे संचालक निवृत्ती सखाराम पानसरे यांनी शाळेला ई लर्निंग साहित्य खरेदी करण्यासाठी निम्मा खर्च दिला तर निम्मा खर्च पालक, शिक्षक व लोकसहभागातून मिळविला आहे.

ओंकारनगरच्या शाळेचे रूप :

बदल करायचा असेल तर त्याला निधीची नव्हे तर प्रबळ इच्छाशक्तीची आवश्यकता असते. इच्छाशक्ती असली की मदतीचे हजारो हात पुढे येतात. हीच इच्छा बाळगून केडगाव येथील ऑकारनगर शाळेने आपले रूप पालटले आहे. एखादया खाजगी शाळेपेक्षाही ओंकारनगरची शाळा स्वच्छ, सुंदर असून इथे विद्यार्थी आनंददायी पद्धतीने शिक्षण घेत आहेत. या शाळेला रोटरी क्लबने पुस्तके भेट दिली. त्यातून ग्रंथालयाची उभारणी झाली .विविध स्पर्धामध्ये या शाळेतील मुलांनी विविध बक्षीसे पटकाविली आहेत. पारंपारिक सण व राष्ट्रीय सण शाळेत मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात.

सदाबहार शाळा -

कलर ट्री मूळ ओंकारनगर शाळेचे सौदर्य खुलले. ओंकारनगरची शाळा हिरवाईने नटलेली आहे. मृत झाडांनाही जिवंतपणा आणून कलर ट्री नाविन्यपूर्ण उपक्रम विद्यार्थी व शिक्षकाच्या जीवनात आनंददायी शिक्षणाचा नवा धडा ठरत आहे. या शाळेत विविध प्रकारच्या ११५ झाडाचे रोपण केलेले आहे. त्यामुळे शाळेचे निसर्गरम्य रूप पाहून येणारा प्रत्येकजण आनंद घेत आहे. फळे , फुले औषधी गुणधर्म असणा-या झाडामुळे शालेय वातावरण प्रसन्न व उत्साही दिसत आहे. शाळेने केवळ जिवंत झाडे जगविली नाहीत तर वाळलेल्या झाडांना रंग देऊन जिवंत केले आहे. वाळलेल्या झाडांना रंग देऊन मुलांना रंगाची ओळख करू देण्यात आली आहे.

शाळेचे २०१४ पासून दरवर्षी २० झाडे लावली आहेत दिवंगत मल्हारी देसाई व परीवाराने झाडे लावण्यासाठी व संगोपन करण्यासाठी खूपच मदत केली व करत आहेत. देसाई परिवारा सोबत मुख्याध्यापक व शिक्षक पालक, विद्यार्थी शालेय बागेमध्ये श्रमदान करत आहेत. शाळेतील झाडांना शाळेतच तयार करण्यात येत असलेले कंपोस्ट खत देण्यात येते. मुले नियमितपणे झाडांची काळजी घेतात. शाळेतील प्रत्येक झाडाला प्रोष पित्रोडा यांचेकडून

नामफलक भेट देण्यात आलेला आहे. त्यावर झाडाचे मराठी व इंग्रजी नाव लिहिण्यात आले. त्यामुळे झाडाची नावे मुलांना माहिती झाली आहेत .

ओंकार नगर शाळा तृतीय : अहमदनगर शहर स्वच्छ शाळा २०१८ स्पर्धेत मनपा प्राथमिक शाळा ओंकार नगर, केडगाव शाळेने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले.मुलासाठी पिण्याचे शुद्ध पाणी , हात धुण्यासाठी Handwash Station, स्वच्छ शौचालय, स्वच्छ व सुंदर शालेय परिसर Rainwater Harvesting .Compost खतप्रकल्प ,शालेय बाग निर्मिती ,विद्यार्थी स्वच्छता हे निकष प्राप्त असल्यामुळे शाळेला हा पुरस्कार मिळाला.

शाळेला ISO मानांकन - ओंकारनगर शाळेला ISO मानांकन प्राप्त झाले आहे. सन २०१४ मध्ये मी शाळेच्या मुख्याध्यापक पदाचा कार्यभार स्वीकारला तेव्हा शाळा ओसाड ,उजाड अवस्थेत होती. त्यानंतर शाळेचा कायापालट करण्याचा निर्धार केला .शाळेसाठी वस्तू व रोख स्वरुपात दोन लाख रुपयांचा लोकसहभागातून मिळवत शाळेत सर्व भौतिक सुविधा निर्माण केल्या..



शैक्षणिक गुणवत्ता व विकास -

शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम अंतर्गत शाळा भेटीकरिता ओंकारनगर शाळेची निवड केली. प्रशिक्षण घेतल्यानंतर सदर शाळा भेट करून E.R.A.C तंत्राचा वापर करून वर्ग अध्यापन केले मुलामध्ये विविध क्षमता व कौशल्य असतात.प्रत्यक्ष अनुभवातून मुलाची अध्ययन क्षमता विकसित होत असते. आव्हान चिंतन, कृति व सहभाग यादवारे अध्ययन क्षमतेचा विकास झालेला दिसून येतो. प्रत्यक्षवर्ग अध्ययन अध्यापन करताना विद्यार्थी गट करून संधी देऊन प्रत्यक्ष सहभाग घेऊन अध्यापन करण्यात आले. ई-लर्निंग द्वारे अध्ययन अध्यापनाचा अनुभव देण्यात आला. मुख्याध्यापक व शिक्षक यांना देखिल ERAC तंत्राविषयी मार्गदर्शन करण्यात आले. विदयार्थी स्वयंशिस्त व शिक्षक प्रेरणा यामुळे सदर शाळेने शाळा सिदधी उपक्रमामध्ये अ श्रेणी प्राप्त केलेली आहे.

शाळेच्या या प्रगतीमध्ये आतापर्यंत मुख्याध्यापक,शिक्षक, पालक, विद्यार्थी शाळा व्यवस्थापन समिती, साधनव्यक्ती मातापालक संघ,शिक्षक संघ, विविध सामाजिक संस्था पर्यवेक्षणीय यंत्रणा यांचे सक्रीय योगदान लाभले आहे तसेच अधिकारी व पदाधिकारी यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केल्यामुळेच सदर शाळेचा कायापालट झालेचे दिसून येते.

धन्यवाद

नंदा नारायण बाईत

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आबलोली नं. २, पागडेवाडी, तालुका.गुहागर जिल्हा.रत्नागिरी

ई-मेल आयडी - zpschoolpagadewadi@gmail.com

प्रस्तावना –

रत्नागिरी जिल्हयातील गुहागर तालुक्यातील आबलोली नंबर २, पागडेवाडी या शाळेत मुख्याध्यापिका म्हणून मी काम करते. शाळेचा विकास करताना बऱ्याच गोष्टीत सुधारणा करणे आवश्यक आहे असे वाटत होते, त्या अनुषंगाने केंद्र प्रमुख श्री जाधव सर यांची मोलाची मदत मिळाली. सर्वप्रथम त्यांच्याशी चर्चा करून, आम्ही शाळेचे उद्देश ठरवले.

१. केंद्राच्या कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये शाश्वत स्वरूपाचा बदल घडवून आणणे.
२. शाळेतील अध्यापन अध्ययनाची गुणवता सुधारणे.
३. विद्यार्थ्यांना पुरेशी सुरक्षा पुरवणे.
४. अध्यापनाची गुणवता सुधारणे.
५. संघ भावनेतून विद्यार्थी गुणवता वाढवणे.
६. शालेय समाजातील गरीब विद्यार्थ्यांना मदत करणे.
७. स्वत: मध्ये शालेय नेता म्हणून सुधारणा घडविणे.

शाळा विकास नियोजन आणि अंमलबजावणी - आधुनिक काळातील विद्यार्थ्यांना टि. व्ही, संगणक, मोबाइल स्क्रीनची खूप आवड आहे. शिक्षक वर्गात खूप मेहनत घेऊन अध्यापनाचे कार्य करत असतात परंतु विद्यार्थी हवे तेवढे त्यांच्या शिकवण्याकडे लक्ष देत नव्हती, बोलण्याकडे लक्ष देत नव्हती, शिकवलेला पाठ्यघटक, त्यावरील प्रश्न, प्रसंग वर्णन याबाबत कितीतरी उदाहरणे देऊन माहिती पुरवली तर फक्त ऐकत होती. स्वतःच्या शब्दात सांगण्यास कचरत होती. विद्यार्थी लक्ष देवून ऐकतच नव्हती, आपआपसांत गप्पा मारायची .

केंद्रप्रमुखांशी चर्चा करत असताना जाणवले की मुलांना टी. व्ही. व इतर इलेक्ट्रोनिक वस्तूंचे विशेष आकर्षण असते मग आपण शाळेत अशीच काही डिजीटल साधने आणली तर काही फायदा होऊ शकेल असा विचार केला. या साहित्यांचा वापर केला तर मुले शिकण्यात आनंद घेतील असा विचार केला, मात्र त्यासाठी लागणारे साहित्य, त्याचा खर्च याबाबींचा विचार केल्यानंतर, हा खर्च परवडणारा नाही, हे लक्षात आले. लोकसहभाग व पालक सहभाग यातून काम पूर्ण होऊ शकते असे केंद्र प्रमुखांनी सुचविले तेव्हा आम्ही सर्वानुमते ठरवून शालेय व्यवस्थापन समिती सभा आयोजित केली. या सभेत विद्यार्थ्यांसाठी डिजीटल शाळा कशी महत्वाची आहे हे समजावून सांगण्याचे प्रयत्न केले.

शालेय व्यवस्थापन समिती पदाधिकाऱ्यांनी, शिक्षक व विद्यार्थी यांच्या समस्या समजून घेऊन चार दिवसांनी सर्व पालकांची पालक सभा घेऊन ३२ इंची LED टीव्ही घेण्याचा प्रस्ताव मांडला. पालक सभेत पालकांना आवाहन करण्यात आले. शाळेचे हे आवाहन पालकांनी मान्य केले. त्या एकाच पालक सभेत ६०,००० रुपयांचा निधी जमा झाला. त्याच सभेत सर्व देणगीदारांचे अभिनंदन करून दुसऱ्या दिवशी जाऊन ३२ इंची LED TV आणि विषयनिहाय DVD, CD हे साहित्य खरेदी केले. खरेदी केलेल्या नवीन LED TV चे विद्यार्थ्यांसह

पालकांनाही खूप आकर्षण होते. सर्व विद्यार्थी पदाधिकारी आणि पालकांसमवेत नवीन LED TV चे उद्घाटन झाले.



विद्यार्थ्यांची तर खूपच उत्सुकता वाढली होती. प्रथम कार्टून वेगवेगळी नृत्यगीते, कविता, गोष्टी, विषयनिहाय DVD दाखविण्याचे नियोजन केले. विद्यार्थ्यांना खूप आनंद झाला. याचा परिणाम असा झाला की, विद्यार्थ्यांची उपस्थिती तर वाढलीच, मुले बोलायलाही लागली, उत्साहाने ऐकायला लागली. विचारलेल्या प्रश्नांची बरोबर उत्तरे देऊ लागली. एवढच नव्हे तर विद्यार्थी स्वतः TV सुरु करतात. त्यांना हव्या त्या विषयाची DVD बघतात. स्वाध्याय सोडवतात.



शाळा विकासात पालक आणि इतर भागधारकांचा सहभाग – शालेय गुणवत्तेसह विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक स्वच्छतेकडे लक्ष देणे हेही शाळेचे आद्य कर्तव्य असून यातूनच विद्यार्थ्यासाठी हँडवॉश स्टेशन व शालेय सुशोभिकरण अंतर्गत बगीचा याची गरज असल्याचे SMC अध्यक्ष श्री विजय पागडे व इतर सदस्यांना बोलून दाखवली. त्यांनी सभा लावून या विषयावर चर्चा करून ठराव केला. हॅडवॉश स्टेशनसाठी लोकसहभागातून देणगी मिळवून गावातील कारागिरांकडून हॅडवॉश स्टेशन बांधून घेतले. तर ग्रामपंचायतीकडून १४ व्या वित आयोगातून अनुदान उपलब्ध करुन शाळेसमोरच्या अंगणाला आकर्षक लादी लावून विविध प्रकारच्या फुलझाडांसाठी कट्टा बांधून घेतला. हैंडवॉश स्टेशनमुळे सर्व विद्यार्थ्यांना जेवणापूर्वी व जेवणानंतर तसेच स्वच्छतागृहातून आल्यावर हातपाय धुण्याची सोय उपलब्ध झाली. विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक चांगली सवय लागली तर समोरच्या अंगणात पावसाळ्यात खूप चिखल व्हायचा तो ही त्रास कायमचा संपला. शिवाय विविध प्रकारची फुलझाडे व फुले उपलब्ध झाली.



अशा प्रकारे आमच्या शाळेत मुलांची संपादणूक व गुणवत्ता वाढ शालेय नेतृत्व विकासातून होऊन आनंदी वातावरणात अध्ययन अध्यापन प्रक्रिया गतिशील झाली.

धन्यवाद

सोनवणे डी.एन.
जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा निल्लोड केंद्र निल्लोड तालुका.सिल्लोड
जिल्हा.औरंगाबाद

ई-मेल आयडी cpsnillod@gmail.com

प्रस्तावना:-

शालेय नेतृत्व विकास प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर नवीन शैक्षणिक सत्रामध्ये तालुक्यातील प्राथमिक वर्ग असलेल्या शाळांना सर्व साधन व्यक्ती व केंद्रप्रमुख प्रशिक्षणातून विकसित झालेल्या दृष्टिकोनावर आधारित भेटी देण्यात आल्या. पर्यवेक्षीय यंत्रणेच्या माध्यमातून सिल्लोड तालुक्यातील शाळांचा शैक्षणिक गुणवत्ता विकास घडून येण्यास मदत झाली. अनेक शाळेच्या शालेय नेतृत्वामध्ये आमुलाग्र बदल घडून आले. मुख्याध्यापकांना योग्य दिशा मिळण्यास मदत झाली. मुख्याध्यापक व शिक्षकांच्या सुसंवादामुळे विद्यार्थ्यांच्या पर्यायाने वर्ग शाळा व तालुक्याचा शैक्षणिक गुणवत्ता विकास होण्यास हातभार लागला.

शाळा भेट :-

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा निल्लोड शाळेत सर्वप्रथम सर्व साधन व्यक्ती व केंद्रप्रमुख यांनी भेट दिली. शालेय विद्यार्थ्यांच्या परिपाठाचे निरीक्षण करण्यात आले विद्यार्थी उपस्थिती, सादरीकरण यांच्या नोंदी घेण्यात आल्या,शाळेत वेळोवेळी भेटी देऊन मला व माझ्या शिक्षकांना शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी तसेच शाळेच्या प्रगतीसाठी योग्य त्या मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. माझ्या शिक्षकांसोबत चर्चा करून त्यांना येत असलेल्या अडचणी, समस्या याबाबत संवाद साधण्यात आला.या भेटीदरम्यान वर्ग भेटी सुद्धा करण्यात आल्या.विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतल्या अडचणी समजून घेण्यात आल्या. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुलभ होण्यासाठी शिक्षकांना मदत करण्यात आली.



परिपाठाच्यावेळी उपस्थित विषय साधन व्यक्ती

Vision:-

- अध्ययन स्तर निश्चितीमध्ये प्रत्येक टप्प्यामध्ये दहा टक्के वाढ करणे.
- प्रारंभिक स्तरातील विद्यार्थी दोन टक्केपेक्षा कमी करणे.
- आठवड्यातून एक दिवस दप्तर मुक्त शाळा उपक्रम राबविणे.
- शंभर टक्के विद्यार्थी उपस्थिती ठेवण्यासाठी विद्यार्थी पूरक शालेय वातावरण निर्मिती करणे.
- शाळा प्रगतीसाठी लोकसहभाग या माध्यमातून निधी मिळविणे.

Mission :-

- सर्वप्रथम शिक्षकांच्या बैठकीचे आयोजन करणे.
- प्रत्येक वर्गशिक्षकाने दर पंधरा दिवसांनी विद्यार्थी संपादन पडताळणी करणे.
- प्रारंभिक स्तरातील विद्यार्थी यादी तयार करणे व त्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करणे.

- विषयनिहाय,स्तरनिहाय विद्यार्थ्यांचे गटात अध्ययन अध्यापन करणे.
- सहयोगी अध्ययनासाठी नियोजन करणे.
- दरमहा शाळेस भेट देऊन अध्ययन स्तर निश्चितीची पडताळणी करणे.
- शाळा भेटी दरम्यान शिक्षक व विद्यार्थी यांच्याशी संवाद साधून त्यांच्या समस्या सोडविणे.
- केंद्रप्रमुख यांनी दर पंधरा दिवसांनी मुख्याध्यापक व शिक्षक यांची आढावा बैठक घेऊन त्यांच्याशी संवाद साधणे.
- Vision साध्य करण्यासाठी केंद्रप्रमुख, विषय साधन व्यक्ती यांनी मदत करणे.

मुख्याध्यापक/ शिक्षक बैठक:-

सर्व शिक्षकांची परिपाठानंतर बैठक घेण्यात आली बैठकीमध्ये शाळा भेटीची उद्दिष्टे निश्चित करण्यात आली. शाळेतील प्रत्येक वर्ग शिक्षकाकडून त्याच्या वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या क्षमता संपादणूकीचा संपूर्ण विचार जाणून घेण्यात आला. प्रामुख्याने भाषा व गणितात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी बनविण्यात आली. आपला वर्ग व शाळा प्रगत करण्यासाठी कोणते उपक्रम घेतले याची माहिती घेण्यात आली.



मुख्याध्यापक कक्ष- माझ्या शिक्षकांशी संवाद साधताना विषय साधन व्यक्ती

वर्ग भेट :-

वर्ग भेटीमध्ये विद्यार्थी जसे आहेत त्याच स्थितीमध्ये बसून विद्यार्थ्यासोबत गप्पा मारण्यात आल्या व टप्प्याटप्प्याने विद्यार्थ्याचा स्तर जाणून घेण्यात आला. प्रत्येक मूल शिकु शकते या नुसार वर्गात आव्हाने कोणती आहेत याची नोंद घेण्यात आली.



वर्ग भेटीदरम्यान शिक्षक विद्यार्थ्यांशी संवाद साधताना विषय साधन व्यक्ती

वर्गामध्ये वेगवेगळ्या अध्ययन स्तरांची विद्यार्थी असतात त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना सारखे शिकवून समजत नाही अशा वेळी नेमके काय करावे असा प्रश्न प्रत्येक शिक्षकांसमोर असतो. याबाबत विद्यार्थ्यांचे स्तरानुसार गट करणे, अध्ययन अध्यापन करणे, हुशार विद्यार्थ्यांच्या मदतीने सहयोगी अध्ययन घडवून आणणे,काहींना वैयक्तिक मार्गदर्शन करणे, विद्यार्थी संचिका,वैयक्तिक नोंदी, वर्ग सजावट, स्पर्धा, उपक्रम यासाठी बहुकार्यप्रवणता किती महत्त्वाची आहे हे शिक्षकांना पटवून देण्यात आले.

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा निल्लोड येथे साधनव्यक्ती बळीराम विठोबा गाडेकर,श्री रमेश धोंडीबा गिराम , श्री प्रकाश एकनाथ शिंदे यांनी भेट दिल्यानंतर विविध विषयांवर चर्चा करण्यात आली सदर शाळा ही केंद्रीय शाळा असल्याने येथील मला संपूर्ण केंद्राची आस्थापना विषयक व इतर कामे करावी लागतात

तसेच माझ्याकडे केंद्रप्रमुख पदाचा अतिरिक्त पदभार सुद्धा असल्याने मला एकाच वेळी अनेक कामे करावी लागतात तसेच शाळा भेट सुद्धा करावी लागते.त्यामुळे अशा परिस्थितीत शाळा भेटीच्या माध्यमातून संघबांधणी व माझे शालेय नेतृत्व कसे असावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

शिक्षण परिषदांना मार्गदर्शन :-

निल्लोड केंद्राच्या शिक्षण परिषदेमध्ये उपस्थित सर्व शिक्षकांना अध्ययन स्तर निश्चिती बाबत सखोल असे मार्गदर्शन करण्यात आले. स्तर निश्चितीमध्ये विद्यार्थी कोठे आहेत याची माहिती प्रत्येक वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांची यादी तयार करून अध्ययन-अध्यापन करण्यासाठी वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. भाषा व गणित पेटीचा वापर प्रारंभिक स्तरातील विद्यार्थ्यांसाठी त्याच प्रमाणे भाषा व गणित विषयात मागे असलेल्या विद्यार्थ्यांसाठी करण्यात यावा. याबाबत भाषा व गणित पेटी मधील साहित्याची ओळख व प्रात्यक्षिके करून दाखविण्यात आली. उपस्थित सर्व शिक्षकांना अध्ययन स्तर निश्चितीमध्ये सर्व विद्यार्थी अंतिम स्तरामध्ये कसे पोहोचतील यासाठी प्रत्येक शिक्षकाला उद्दिष्ट ठरवून देण्यात आले.

शाळेत राबविण्यात आलेले उपक्रम :-

विविध कार्यक्रम : समारंभ, स्पर्धा, परिषदा, बैठका, विद्यार्थ्यांचे सादरीकरण, गुणवत्तावाढीसाठी राबवलेले उपक्रम, मूल्यवर्धन उपक्रम, पालक सभा, प्रवेश पंधरवडा.



स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी शिक्षक व विद्यार्थी





स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी विविध नेत्यांच्या पोशाखात विद्यार्थी



दहीहंडी कार्यक्रम सहभागी विद्यार्थी

गुणवत्ता वाढ :-

प्रत्येक वर्गाची गुणवत्तावाढीसाठी शिक्षकांना विश्वासात घेऊन अध्ययन स्तर निश्चिती ची चाचणी प्रथम घेण्यात आली त्यामधून विद्यार्थ्यांची स्तर निश्चिती करण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला तसेच या काळात प्रारंभीक स्तरात असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ERAC अध्ययन पद्धतीचा वापर करण्यात आला त्यातून विद्यार्थ्यांची क्षमता संपादणूक वाढ झालेली दिसून आली.

भौतिक सुविधा :-

शाळेचा गुणवत्ता विकास होण्यासाठी भौतिक सुविधा हा एक घटक सुद्धा महत्त्वपूर्ण आहे. सर्वप्रथम सर्व शिक्षक व पालक यांची बैठक घेऊन आहे त्या भौतिक सुविधेपासून विद्यार्थ्यांना आनंददायी व उत्साहित करणारे वातावरण प्रत्येक वर्गात तयार करणे, नीटनीटकेपणा, भित्तीपत्रके, बाहेर व आतील रंगरंगोटी या साऱ्या गोष्टी

विद्यार्थ्यांचे अध्ययन-अध्यापन परिणामकारक होण्यासाठी गरजेच्या आहेत. त्यासाठी शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने या गोष्टी पूर्ण करण्यात आल्या.

विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी प्रशस्त ग्राउंड उपलब्ध होतेच परंतु त्याची साफसफाई करणे गरजेचे असल्याने ग्राउंड स्वच्छ करून विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले. स्वतंत्र मुख्याध्यापक कक्षाची शाळेत निर्मिती करण्यात आली. मुख्याध्यापक कक्षाची रचना बैठक व्यवस्था, विविध समिती चार्ट, कपाट सुव्यवस्थित करण्यात आले. सर्व शिक्षकांच्या बैठका या कक्षामध्ये घेण्यात येतात. शौचालय व स्वच्छता गृह, सुविधा मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र पणे करण्यात आली.

लोकसहभाग :-

'माझी शाळा माझा वर्ग' : माझ्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी व माझी शाळा ही भावना दृढ होण्यासाठी प्रत्येकाचा सहभाग कोणत्या ना कोणत्या प्रकारे असणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य व गावातील दानशूर व्यक्तीचा सहभाग घेण्याचे निश्चित करण्यात आले .त्यानुसार १३१०००/- निधी लोकसहभागातून मिळविण्यात यश आले.

कोणतेही काम यशस्वीपणे करायचे असेल तर त्यामध्ये सर्वांचा सहभाग असणे आवश्यक आहे. यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांची टीम तयार करण्यात आली. प्रत्येकाच्या इच्छेप्रमाणे व क्षमतेप्रमाणे कामाची जबाबदारी देण्यात आली. त्यामुळे प्रत्येक शिक्षक आपले काम इतरापेक्षा कसे चांगले होईल यासाठी प्रयत्न करत होते. आवडीचे काम मिळाल्याने सर्वांमध्ये सांघिक भावना निर्माण झाली. आपले काम चांगले होण्यासाठी ते इतरांची निसंकोचपणे मदत घेऊ लागले.

शाळेची पूर्वतयारी, परिपाठ नियोजन, मध्यान्ह भोजन योजना, विविध शालेय कार्यक्रम, खेळांचे नियोजन, परिपाठात प्रत्येक विद्यार्थ्याला क्रमाने संधी देणे.शाळा व्यवस्थापन समिती बैठक नियोजन, शिक्षक-पालक सभा, गैरहजर विद्यार्थी पालक भेट,

मूलभूत क्षमता प्राप्त असणारे व मागे असणारे विद्यार्थी यांची यादी तयार करणे इत्यादी सर्व कामाचे नियोजन करण्यात आल्याने शालेय प्रशासन सुधारले.

शाळेचा नावलौकिक :-

शालेय नेतृत्व विकासामुळे शाळेच्या प्रत्येक बाबीमध्ये बदल घडून आले. शाळेची भौतिक सुविधा, रंगरंगोटी, वर्ग सजावट, वृक्षारोपण व संवर्धन, मुख्याध्यापक कक्ष, चविष्ट शालेय पोषण आहार व मुख्य म्हणजे विद्यार्थ्यांसाठी आनंदी वातावरण व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये झालेला बदल वाखाणण्याजोगा आहे. त्यामुळे शाळेत सेमी इंग्रजी माध्यम सुरू करण्यात आले. गावातील सर्व मुलांचे आपल्या शाळेत प्रवेश होण्यासाठी या बाबीची मदत झाली. गावातील प्रवेश पात्र शंभर टक्के मुले आपल्या शाळेत दाखल करणे. मूलभूत क्षमता 100 टक्के विद्यार्थ्यांना येणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये वाढ करणे, यासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून प्रयत्न होताना दिसून येतो.

नाविन्यपूर्ण उपक्रम :-



नाविन्यपूर्ण उपक्रम दप्तर मुक्त शाळा





नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत दप्तर मुक्त शाळेमध्ये मध्ये चित्र काढताना व रंगवताना विद्यार्थी

आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी शाळे दप्तर मुक्त शाळा उपक्रम राबविला जातो. या दिवशी अनेक उपक्रम घेतले जातात. विविध विषय देऊन प्रत्येकास बोलण्याची संधी देणे,विविध स्पर्धाचे आयोजन केल्या जाते, रांगोळी स्पर्धा,चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, गाणी ,गप्पा ,गोष्टी सांगणे, विविध कलाकृती तयार करून घेणे. या दप्तर मुक्त शाळेमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळाला त्यांना जे आवडते ते करण्याची सुवर्ण संधी मिळते.

जिल्हा सातत्यपूर्ण व्यावसायीक विकास संस्था औरंगाबाद, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, विषय साधन व्यक्ती यांचे प्रभावी मार्गदर्शन या सर्व गोष्टी मुळे शाळा विकास होण्यास मदत होऊन आज शाळा प्रगती पथावर आहे.



धन्यवाद

दयानंद सिताराम मोकल
रायगड जिल्हा परिषद शाळा, कानपोली
मु.कानपोली, पोस्ट.पडघे केंद्र.वावंजे, तालुका.पनवेल,जिल्हा.रायगड
ई मेल आय डी - rzpschoolkanpoli1962@gmail.com



शाळा एक अध्ययन संस्था -

रायगड जिल्हा परिषद शाळा कानपोली ही पनवेल पासून १४ कि.मी पूर्वेला कासारा नदीच्या काठी असलेली जिल्हा परिषदेची शाळा.

कानपोली ही तालुक्यातील पहिली ISO मानांकित शाळा आनंददायी, नवोपक्रमशील तसेच डिजिटल शाळा लोकसहभागातून समृद्ध झाली आहे. कानपोली ही तालुक्यातील पहिली ABL उपक्रम राबविणारी शाळा. शाळेला शाळा सिद्धीअंतर्गत **'अ' श्रेणी** प्राप्त आहे. शाळेला स्वच्छ विद्यालय अंतर्गत **5* श्रेणी** प्राप्त झाली आहे. सन २०१२-१३ मध्ये नवीन इमारतीचे बांधकाम सर्व शिक्षा अभियान योजनेतून झाले. कानपोली ही तालुक्यातील पहिली ज्ञानरचनावादी शाळा आहे. अनेक शिक्षकांनी या शाळेला भेटी दिलेल्या आहेत. मुलांच्या उपक्रमांचे कौतुक केलेले आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्रात १००% प्रगत शाळा. विज्ञान प्रदर्शनात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करून तालुक्यात एक आदर्श निर्माण करणारी अशी शाळा. नवोपक्रम स्पर्धेत जिल्हा राज्य स्तरावर सहभाग घेतलेली अशी गुणवत्ता पूर्ण कानपोलीची ही शाळा आहे.

दृष्टी (Vision) :-

१) ISO मानांकित शाळा

२) A B L स्कूल.

३) शाळेला स्वच्छ विद्यालय अंतर्गत **5* श्रेणी** प्राप्त.

४) नवोपक्रमशील शाळा.

५) शाळासिद्धी ' अ ' श्रेणी कायम ठेवणे.

६) अध्यापनात डिजिटल साहित्याचा वापर करणे.

७) १००% प्रगत शाळा.

८) गुणवत्तापूर्ण शिक्षण.

९) अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर करणे.

१०) विज्ञान प्रदर्शनात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी

ध्येय (Mission) :-

१) १००% विद्यार्थी प्रगत करणे. (प्रत्येक वर्गातील प्रत्येक विद्यार्थी प्रगत करणे)

२) शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर करणे.

३) शैक्षणिक साहित्याची निर्मिती करणे व त्याचा वापर दैनंदिन अध्यापनात करणे.

४) प्रत्येक विद्यार्थ्यांची गुणवत्ता व त्याच्या क्षमतांचा विकास करणे.

५) विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे व त्यांचा विकास करणे.

६) शाळासिद्धी मध्ये **'अ'** श्रेणी प्राप्त करून **आदर्श शाळा** घडवणे.

७) विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा विकास करणे.

८) लोक सहभागातून शालेय भौतिक सुविधा प्राप्त करणे.

९) पालक जनजागृती करणे व शिक्षणाचे महत्व पटविणे.

१०) शाळेला स्वच्छ विद्यालय अंतर्गत **5* श्रेणी** प्राप्त.

शाळा विकास नियोजन व अंमलबजावणी :-

गावकरी मिळून काम करू ! गाव शाळा आदर्श करू !!

सर्व प्रथम SMC च्या मदतीने लोकांमध्ये शाळेच्या विकासाचे महत्व पटवून दिले. गावात प्रभात फेरी काढून शिक्षणाविषयी जनजागृती करण्यात आली. एकोप्याने राहू या, विकासाकडे जाऊ या !! अशी घोषवाक्य संरक्षण भिंतीवर लिहिली व सर्व समाज शिक्षणाविषयी व शाळेविषयी प्रेरित केला. समाजातून लोकसहभाग व शाळा सुधार निधी वस्तू स्वरुपात मिळविल्या, त्यानंतर "पालक व शाळा व्यवस्थापन" समिती यांच्या सभा घेऊन नियोजनाचा आराखडा तयार केला. दानशूर व्यक्तींच्या भेटी घेतल्या. नियोजनाप्रमाणे व गाव विकास आराखड्याप्रमाणे भौतिक सुविधा प्राप्त केल्या गावातील कौशल्य प्राप्त व्यक्तींशी संपर्क करून

त्यांचा विद्यार्थी विकासात रांगोळी कलाकार, वाद्य वादक, सुतार हार तयार करणारे, कुटीर उद्योग करणारे इ. यांना सहभागी करून घेतले.



विद्यार्थी वाचन विकास उपक्रम

अध्यापनात ज्ञानरचनावादाचा उपयोग



अध्यापनात ज्ञानरचनावादाचा उपयोग

सर्व प्रथम सातारा येथील कुमठे बीट या शैक्षणिक ठिकाणाला भेट दिली तेथील रचनावादी पद्धती जाणून घेतली मुलांचा विकास होत आहे, हे अभ्यासले स्वत: अनुभवले आणि शाळेत, अध्यापनात ज्ञानरचनावादाचा उपयोग ख-या अर्थाने सुरु झाला.

ज्ञानरचनावादी शैक्षणिक साहित्याची निर्मिती करून त्याचा वापर दैनंदिन अध्ययन-अध्यापनात वापर केला.

१) शिक्षक, विद्यार्थी व पालकांचा सहभाग घेऊन शैक्षणिक साहित्याची निर्मिती.केली.

२) विभागीय स्तरावर होणाऱ्या शिक्षणाच्या वारीस भेट दिली.

३) SMC सदस्यांना घेऊन अभ्यास दौरा, शैक्षणिक सहल या माध्यमातून प्रत्यक्ष बदलाचा अभ्यास केला.

४) लोकसहभागातून शाळा डिजिटल करून अध्यापनात व स्वयंअध्ययनासाठी त्याचा वापर होत आहे, या साठी १००%शाळा डिजिटल केली

५) शाळा वेळापत्रक तयार करणे, सराव चाचण्या, नवोपक्रम, स्पर्धा आयोजन यात पालकांचा सहभाग घेण्यात आला.

माजी विद्यार्थी संघातर्फे विद्यार्थ्यांना बक्षिसे, प्रेरणा, कौतुक याद्वारे प्रोत्साहीत केले गेले.



अध्यापनात उपक्रमशीलता -

१) उपक्रमांसाठी आवश्यक शैक्षणिक साहित्याची निर्मिती करून त्याचा वापर दैनंदिन अध्ययन-अध्यापनात वापर केला.

२) शिक्षक, विद्यार्थी व पालकांचा सहभाग घेऊन शैक्षणिक साहित्याची निर्मिती केली.

३) या कल्पनेतून नवनवीन उपक्रम तयार केले उदाहरणार्थ किल्ला उपक्रम, माझी काव्य शाळा, कर्णाला अभयारण्य ,पिल्लूदर्शक शब्द असे विविध उपक्रम.

४) कानपोली शाळेस अभ्यास दौरा , शैक्षणिक सहल या माध्यमातून भेट देणा-या शाळाच्या वेळी SMC सदस्यांना व पालकांना प्रत्यक्ष बदलाची जाणीव करून दिली.

५) आपली शाळा, मुले (विद्यार्थी) प्रगती करत आहेत हे पाहून पालकांचा तसेच SMC सदस्यांचा लोकसहभाग वाढला.

६) क्रीडा स्पर्धा, विज्ञानप्रदर्शन, गुणवत्ता स्पर्धा, नवोपक्रम, स्पर्धा आयोजन यात पालकांचा सहभाग घेण्यात आला.

७) माजी विद्यार्थी संघातर्फे विद्यार्थ्यांना बक्षिसे , प्रेरणा, कौतुक याद्वारे प्रोत्साहीत केले गेले.



संगीतमय परिपाठ (कला विषयक उपक्रम)

विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढावी व त्यांना अध्ययनात रुची निर्माण व्हावी यासाठी संगीतमय परिपाठ सुरु केला शिक्षक स्वत: हार्मोनियम वाजवीत असल्याने मुलांच्या विविध प्रार्थना, समूहगीत, श्लोक यांचा सराव हार्मोनियमवर होऊ लागला. त्यामुळे त्यांना शाळेत येण्याची गोडी निर्माण झाली. बडबड गीते, कविता ह्या संगीतमय झाल्या. हे पालकांनी स्वत: अभ्यासले, अनुभवले आणि ख-या अर्थाने शाळेत पालकांचा सहभाग सुरु झाला.

१) हार्मोनियमचा दैनंदिन अध्ययन-अध्यापनात वापर केला.

२) त्यामुळे संगीतमय परिपाठाची निर्मिती झाली.

३) या कल्पनेतून नवनवीन उपक्रम तयार केले उदाहरणार्थ काव्य गायन, समूहगीत गायन, देशभक्तीपर गीत गायन असे विविध उपक्रम.

४) कानपोली शाळेस अभ्यास दौरा, शैक्षणिक सहल या माध्यमातून भेट देणा-या शाळाच्या वेळी SMC सदस्यांना व पालकांना प्रत्यक्ष बदलाची जाणीव करून दिली.

५) आपली शाळा, मुले (विद्यार्थी) प्रगती करत आहेत हे पाहून पालकांना, SMC सदस्यांना आनंद झाला व लोकसहभाग वाढला.



६) **परसबाग उपक्रम (कार्यानुभव विषयक उपक्रम)**

ही आवडते मज मनापासुनी शाळा

लाविते लळा ही जशी माऊली बाळा!!

हास-या फुलांची बाग जशी आनंदी

ही तशीच शाळा मुले इथे स्वच्छंदी !!

या काव्याप्रमाणे कार्यानुभव विषयक "परसबाग" हा उपक्रम सुरु केला. या बागेत लाल जास्वंद, सफेद जास्वंद, डबल जास्वंद, झेंडू, तगर, मोगरा, अबोली अशा विविध फुलांची झाडे लावली त्याच बरोबर आंबा, पपई अशी फळझाडे लावली. पपईचा पूरक आहार म्हणून उपयोग केला तसेच पाम, अशोक अश्या शोभेच्या झाडांची लागवड केली तुळशीची रोपे लावली. प्रत्येक झाडाची मुले परिसर अभ्यासातून माहिती सांगू लागली आणि ख-या अर्थाने "परसबाग" हा उपक्रम सार्थकी ठरला.



पपईची झाडे

शाळा परिवर्तनाची तत्त्वे :-

१) सर्व संसाधनांचा उपयोग आणि सहभाग घेऊन विकास.

२) माता-पालक संघ, शिक्षक-पालक संघ, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांची शिक्षणाविषयी, शाळा विकासाविषयी जनजागृती केली.

३) विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धतीचा अवलंब केला.

४) शैक्षणिक साधन निर्मिती केली व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला.

५) शिक्षकातील संघ भावना आणि शाळा विकासासाठी लोकांची एकजूट घडवून आणली.

६) विद्यार्थी गुणवत्ता ही फार महत्वाची होती त्यासाठी गुणवत्ता कक्षाची स्थापना केली.

७) लोक सहभागातून भौतिक सुविधा प्राप्त केल्या.

८) प्रत्येक उपक्रमात १००% विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविला त्यामुळे प्रत्येकाला वाटू लागले की, आपलाही सहभाग हा महत्वाचाच असून त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची जाणीव झाली.

९) गट पध्दतीचा वापर केला व गट नायकांची गुणवत्ता विकासासाठी मदत झाली.

१०) सर्व बलस्थानांचा व शक्तीस्थानांचा उपयोग व वापर केला.



समता :-

१) १००% विद्यार्थ्यांचा सहभाग व गटनायकांच्या मार्गदर्शनाचा उपयोग.

२) आषाढी एकादशी, नाताळ, रमजान ईद अशा सर्व सणांचे आयोजन.

३) या सणांबद्दल माहिती व सादरीकरण त्यामुळे भारतीय संस्कृतीची जाणीव.

४) CWSN मुलांना सुद्धा चांगले शिक्षण मिळावे यासाठी सदैव तत्पर.

५) सर्व मुलींना मुक्त शिक्षण मिळण्यासाठी प्रयत्न.

६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवनपट वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन तसेच व्याख्यानाचें आयोजन व चवदार तळ्याचे पाणी काव्य गायन.

७) विद्यार्थ्यांचा बौद्धिक स्तर ओळखून गटवार मार्गदर्शन.

८) विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी प्रयत्न.



समानता :-

१) रक्षाबंधन, दहीहंडी, हळदी कुंकू या कार्यक्रमातून प्रबोधन.

२) माता संगोपन व स्त्री सबलीकरण (सुरक्षितता व आरोग्य) याबद्दल मातांना मार्गदर्शन (तज्ञ डॉक्टरांकडून)

३) लिंग समभाव या बाबत वर्तमान पत्रातून लेखन.

४) ध्वज निधी संकलन.

५) सर्व धर्म समभाव, मीना-राजू मंच उपक्रमातून साध्य झाले.

६) सांस्कृतिक कार्यक्रमातून विविध संस्कृतींचे दर्शन घडविले जाते .

७) नागरी ,शहरी, प्रादेशिक विविध संस्कृतींचे दर्शन घडविले जाते

८) मुलींना व मुलांना सारखीच कामे सांगितली जातात.

९) वेशभूषेतून प्रबोधन केले जाते.

लिंगसम भाव आणि सामाजिक समावेश :-

१) बालिकादिन ,बेटी बचाओ बेटी पढाओ ,रांगोळीस्पर्धा ,जागतिक महिलादिन, साजरा करून सर्व समाजाचा सहभाग घेण्यात येतो.

२) महिला मेळावा ,महिलांचा व्यक्तिमत्व विकास या माध्यमातून गावातील सर्व महिलांचा सहभाग घेण्यात येतो.

३) शाळा सजावटीसाठी पालकांचा स्वेच्छेने सहभाग.

४) लोक सहभागातून १००% डिजिटल शाळेचे स्वप्न पूर्ण केले ज्यात २ प्रोजेक्टर व ७ संगणकाचा समावेश

५) लोक सहभागातून ISO शाळेचे स्वप्न पूर्ण केले

६) लोक सहभागातून ABL शाळेचे स्वप्न पूर्ण केले

७) लोक सहभागातून विद्यार्थ्यांना पूरक आहार देणे.

८) विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिल यांचे वाटप

९) लोकसहभागातून व CSR च्या माध्यमातून मुलींसाठी शौचालयाचे बांधकाम पूर्ण.

शाळा संरक्षण आणि सुरक्षा :-

१) शालेय सभागृह पालकांच्या श्रमदानातून बांधण्यात आले. त्यामुळे माझी शाळा ही भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली. तसेच शाळेला संरक्षक भिंत आहे, गेट आहे.

२) शाळेतील विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी दानशूर व्यक्तींच्या लोकसहभागातून आर्थिक मदतीतून स्टेज (व्यासपीठ) चे बांधकाम पूर्ण.

३) शाळेतील स्वच्छ भारत उपक्रमांतर्गत पाणपोईचे काम पूर्ण (दानशूर व्यक्तींच्या लोकसहभागातून आर्थिक मदत.)

४) शाळेतील स्वच्छ भारत उपक्रमांतर्गत CSR च्या आर्थिक मदतीतून शुद्ध जल विद्यार्थ्यांना दिले जाते.

५) आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगविषयक उपक्रमांचे आयोजन.

६) वृक्षारोपण दिन

७) महिला, विद्यार्थी व पालक यांच्या सहकार्यातून संपूर्ण गाव स्वच्छता मोहीम राबविली. यात मंदिरे, शाळा, व गावाच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली.

८) आपत्कालीन व्यवस्थापनाचे मार्गदर्शन करण्यात आले.

९) प्लास्टिक मुक्त गाव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

१०) विद्यार्थ्यांच्या मदतीने वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन



वृक्षारोपण

बाल अधिकार :-

१) विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धतीचा शाळेत वापर होतो. त्याच्या आवडीचा विषय त्याच्या वेळेत अभ्यासासाठी घेण्याचे स्वातंत्र्य शाळेत ठेवले आहे.
२) शैक्षणिक साहित्याची निर्मिती करून शाळेचे वातावरण आनंददायी बनवण्यात आले.
३) माझी काव्यशाळा, प्रगल्भ गणितीय वर्ग, भयमुक्त वातावरण, बालसभा असे विविध उपक्रम शाळेत राबवले जात आहेत.
४) शाळेत बालकांचे मंत्रिमंडळ स्थापन केले आहे.
५) विद्यार्थ्यांना बोलके करण्यासाठी किल्ला उपक्रम, थोरांची ओळख, शब्द संग्रह असे विविध उपक्रम राबवले आहेत.
६) बालकांच्या उत्तम आरोग्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठा, पोषक आहार युक्त पोटभर जेवण व पूरक आहार गोवर रुबेला लसीकरण, सुलभ व्यायाम प्रकार, योगा, डंबेल्स प्रकार, व्यवस्थितपणासाठी आरसा बिंदी उपक्रम सातत्याने घेतले जातात.
७) भावनिक विकासासाठी शेकोटी हा गप्पा गोष्टींचा उपक्रम राबविला जातो.
८) स्वच्छता दूत म्हणून विद्यार्थ्यांच्या नेमणुका करून स्वच्छतेचा प्रसार केला जातो.



शाळेत रक्षा बंधन सण उत्साहात साजरा

शालेय संस्कृती :-

१) शाळा सुरु होण्याच्या अगोदर शाळा पूर्व तयारी मध्ये शालेय स्वच्छता केले जाते.

२) संगीतमय परिपाठ सादरीकरण केले जाते व दिवसाची सुरुवात होते. त्यानंतर भाषा विषयी प्रकट वाचन गणितीय संकल्पना व संबोध स्पष्टतेवर भर दिला जातो.

३) राष्ट्रीय दिनी गावातील प्रतिष्ठीत वरिष्ठ मंडळीचा उत्स्फूर्त सहभाग असतो.

४) वाचन प्रेरणादिन साजरा होतो. वाचण्यासाठी विविध पुस्तके उपलब्ध करून दिली जातात व CSR च्या माध्यमातून कपाटे उपलब्ध केली आहेत.

५) डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवनावर आधारित माहिती व पुस्तकाचे वाचन तसेच प्रसंग वाचन.

६) ५ सप्टेंबर रोजी 'शिक्षकदिन' साजरा केला जातो, एक दिवस विद्यार्थी शिक्षकांच्या भूमिकेत शिक्षक म्हणून काम करतात.

७) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र, संविधानासाठी त्यांचे योगदान याबाबत मार्गदर्शन केले जाते.

८) प्रभात फेरी मध्ये विद्यार्थी घोषवाक्य तसेच ड्रम यांचा वापर केला जातो आणि यात पालकांचा सहभाग घेतला जातो.

९) मुलींच्या शिक्षणास प्राधान्य.देण्यासाठी एकपात्री प्रयोगाचे सादरीकरण केले जाते.

१०) मुलींच्या सुरक्षिततेसाठी 'तक्रार निवारण समितीची' स्थापना केली आहे तसेच मुलींच्या हक्क व अधिकाराबाबत जन जागृती केली जाते.

११) आरोग्यासाठी नियमित व्यायाम व स्वच्छतेचे उपक्रम घेतले जातात.

१२) राष्ट्रीय दिनी, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध गुणदर्शन कार्यक्रमांचे सादरीकरण केले जाते.

१३) त्यानंतर भाषा समृद्धीसाठी चावडी वाचन, प्रकट वाचन तसेच गणितीय संकल्पना व संबोध स्पष्टतेसाठी विविध कार्यक्रम घेतले जातात.

१४) सर्व धर्मियांच्या सणांबद्दल माहिती दिली जाते व सण उत्साहात साजरे केले जातात.

शालेय वातावरण आणि शाळेतील कार्य संस्कृती :-



खेळात सहभाग

शालेय वातावरण आणि शाळेतील कार्य संस्कृती -

१) दररोज शाळा सुरु होण्याच्या अगोदर विद्यार्थी शाळेची साफसफाई करतात.

२) प्रवेशोत्सवाच्या दिवशी रांगोळी काढून आंब्याचे तोरण बांधून शाळेची सजावट केली जाते, गोड शिरा दिला जातो.

३) लोक सहभागातून मुलांना खाऊ वाटप करतात.

४) शाळेच्या पहिल्या दिवशी सर्व मुलांचे फुल देवून गावातील वरिष्ठ मंडळीकडून स्वागत केले जाते.

५) शाळेच्या पहिल्याच दिवशी मुलांना पाठ्यपुस्तके व गणवेशाचे वाटप केले जाते.

६) दि. ०१ जुलै ते १० जुलै या काळात प्रत्येक वर्षी वृक्षारोपण केले जाते .

७) २१ जून रोजी पालकांचा सहभाग घेऊन योग दिन साजरा केला जातो. वृक्षासन, ताडासन इ. योगासने तसेच सूर्य नमस्कार यांसारखे प्रकार तज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली घेतले जातात.

८) प्रत्येक शनिवारी सांघिक कवायत होते.

९) स्वातंत्रदिनाच्या व प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमास माजी विद्यार्थी, पालक, मातापालक, प्रतिष्ठित व्यक्ती तसेच SMC सदस्य असे १५० हून अधिक प्रतिष्टीत नागरिक उपस्थित होते. या मेळाव्यात भौतिक विकास, शाळेच्या गरजा यांचा विचार

करून ग्रामस्थ मंडळाच्या योगदानातून **१५ लाखांपर्यंत रुपये** आर्थिक मदत वस्तूरुपात जमा झाली.

१०) जमा झालेल्या मदतीतून ISO शाळा, ABL स्कूल, स्वच्छ जल योजना, ४ शौचालय, खुले व्यासपीठ, सभागृह, पंखे, फ्रीज, टेबल, कपाट प्रोजेक्टर, संगणक डिजिटल शाळा व शालेय रंगरंगोटी असे संकल्प पूर्ण झाले.



नवागतांचे स्वागत

"स्व" विकास आणि संघबांधणी -

वैयक्तिक आणि व्यावसायिक विकास :- "स्वत:चा विकास घडवून आपल्या सहकाऱ्याला आपल्या सोबत घेवून जाऊया तरच आपला गट जिंकेल" या भावनेने अध्ययन केले जाते त्यामुळे संघबांधणी उत्तम झाली आहे. पर्यायाने प्रगत शाळा निर्माण झाली आहे. गुणवत्ता वाढली आहे. शिक्षक सुलभक, मार्गदर्शक म्हणून काम करत आहेत.



शैक्षणिक साहित्य निर्मिती

शिक्षकांनी स्वतःची शैक्षणिक पात्रता वाढवली असून मुक्त विद्यापीठातून बी.ए./बी.एड व एम.ए./बी.एड. अशी शैक्षणिक पात्रता वाढवली आहे. तांत्रिक ज्ञान विकसित केले आहे. विविध प्रशिक्षणाच्या आधारे स्वतःचे अध्यापन कौशल्य विकसित केले आहे. जिल्हा, राज्य अशा स्तरावर विविध प्रशिक्षण घेतले आहेत. शाळेचा मुख्याध्यापक म्हणून मी व माझ्या सहकारी शिक्षक यांच्या मदतीने हे काम करू शकलो. मला राज्य पुरस्कार प्राप्त झाला आहे तसेच पनवेल भूषण, जिल्हा पुरस्कार, असे अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेचे नेतृत्व एकसंघ आहे आणि तशीच संघभावना आम्ही विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये रुजवली आहे.

सतत दहा वर्ष मला तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय शैक्षणिक साहित्यनिर्मिती तसेच लोकसंख्या शिक्षण स्पर्धेमध्ये पहिला/व्दितीय क्रमांक मिळाला तसेच नवोपक्रम स्पर्धेत २ वेळा पहिला/व्दितीय क्रमांक आलेला आहे.

शालेय विकासाच्या दृष्टीने क्रियाशील संघ तयार करणे :-

१) शाळेमध्ये माजी विद्यार्थी संघ स्थापन केलेला आहे व तो सक्रीय आहे.
२) गावातील ग्रामस्थ मंडळ महिला मंडळ, तरुण मंडळ, बँज़ो वाद्यपथक, कलापथक, कलाकार मंडळी शालेय कार्यक्रमामध्ये स्वतःहून सहभागी होतात.
३) महाविद्यालयातील विद्यार्थी शालेय विकासासाठी वेळ देतात व शैक्षणिक प्रगतीमध्ये योगदान देतात. उदा. संगणकीय कामे, त्यांची जोडणी व इतर.
४) ग्रामस्थ मंडळाने सभागृहाचे बांधकाम करून दिले आहे.



माजी विद्यार्थी मेळावा

अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत बदल घडवून आणणे-

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया आनंददायी व विद्यार्थी केंद्रित करण्यासाठी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत पुढील प्रकारचे बदल करण्यात आले.

१) पोषक अध्ययन वातावरण विकसित करणे.

२) अध्ययन-अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर सुरु आहे.
३) शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता वाढविणे साठी प्रयत्नशील आहे.
४) विविध शैक्षणिक प्रशिक्षणांचा लाभ घेऊन त्यांचा वापर आम्ही दैनंदिन अध्यापनात करणे.
५) अध्यापनात YouTube सारख्या विविध चॅनेलचा प्रभावी वापर व स्वतःचे चॅनेल विकसित करणे त्यावर मुलांना संधी दिली जाते.
६) कृतीतून शिक्षण, उपक्रमातून शिक्षण, प्रकल्पातून शिक्षण.
७) ज्ञानरचनावादी संकल्पनेचा उपयोग करून विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनासाठी प्रवृत्त केले जाते.
८) शैक्षणिक साहित्य निर्मिती करून अध्ययनात साहित्यांचा उपयोग केला जातो.

शाळेचा दैनंदिन सर्वांगीण आढावा घेणे / फेरफटका मारणे :-

विद्यार्थ्यांसाठी बिनभिंतीची शाळा हा उपक्रम राबवला जातो. या उपक्रमांतर्गत फेरफटका मारत-मारत परिसराचे अवलोकन केले जाते. शाळेचे स्वयंमुल्यांकन केले जाते. स्वतःच्या शाळेशी प्रामाणिक राहून स्पर्धेमध्ये यश संपादन करण्यासाठी धडपड केली जाते. वेळोवेळी SMC व पालक यांच्या अभ्यास दौऱ्याचे नियोजन केले जाते. यातून स्पर्धेच्या युगामध्ये आपली शाळा कुठे कमी पडते याचा अभ्यास करून आवश्यक सुधारणा केल्या जातात तसेच अध्ययन स्तर सातत्याने उंचावण्यासाठी आम्ही सर्व प्रयत्नशील असतो.



योगादिन

पुनरावलोकन करणे व सुधारणा करणे :-

दरमहा विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणांचा अभ्यास करून त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले जाते. व्यवस्थापनामध्ये काही कमतरता आढळून आल्यास ती पूर्ण करण्यासाठी SMC व

पालकसभेत चर्चा करून समस्येचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला जातो. अध्ययनात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पूरक मार्गदर्शन केले जाते. यासाठी शिक्षक स्वेच्छेने जादा वेळ देऊन मार्गदर्शन करतात. उजळणी वर्गांचे व उपचारात्मक वर्गांचे आयोजन केले जाते योग्य समस्या जाणून घेवून योग्य उपचार केले जातात.

अग्रणी शाळा व सामुदायिक भागीदारी -

शाळा बाह्य व अंतर्गत व्यावसायिक शिक्षण समुदाय विकसित करणे :-

समुदायाशी प्रतिबद्धता :-

'मी शाळेचा माजी विद्यार्थी आहे व शाळेचा विकास हा माझ्या हाती आहे. त्यासाठी माझा वेळ मी सत्कारणी लावीन व शाळेचा विकास अग्रणी ठेवण्याचा प्रयत्न करेन" अशी भावना प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये निर्माण झाली त्यातून शालेय नेतृत्व विकसित झाले ' ही सामुदायिक समाजाची भावना असून शाळेच्या विकासास सर्व कटीबद्ध आहेत. विद्यार्थी स्नेहसंमेलनात माजी विद्यार्थी व गावातील सर्व समाजाचा सहभाग असतो. शाळा ही समाजाचा आरसा आहे. आज शाळेमध्ये असणारे विद्यार्थी उद्या समाजाचा प्रमुख घटक बनणारच आहेत. त्यादृष्टीने समाज सुदृढ करायचा असेल तर विद्यार्थ्यांमध्ये योग्य संस्कार रुजवले पाहिजेत. म्हणून शाळेमध्ये बालसंस्कार शिबिराचे आयोजन केले जाते. त्यांना जीवनावश्यक मूल्यांचे शिक्षण दिले जाते. मुल्ये ही शिकून समजत नाहीत तर ती आचरणातून व निरीक्षणातून आत्मसात केली जातात यामुळे शाळेतील शिक्षकांचे आचरण सुद्धा आदर्श शिक्षकासारखे असते.

शाळा विकासात पालक व इतर भागधारकांचा सहभाग :-

१) पालक जनजागृतीचे आयोजन केले जाते.
२) शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना केली आहे. दरमहा समितीच्या बैठका होतात व शाळेचा विकास आराखडा तयार करण्यासाठी समितीचे कार्य प्रशंसनीय आहे.
३) महिला तक्रार निवारण समिती शाळेमध्ये कार्यरत आहे.
४) माजी विद्यार्थी संघाची स्थापना केली आहे व त्यांच्या आर्थिक मदतीतूनच डिजिटल शाळेचे स्वप्न पूर्ण करण्यात आले आहे.
५) शिक्षकांच्या रजेच्या काळात शिक्षणप्रेमी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वेळ देऊन त्यांना मार्गदर्शन करतात.
६) ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळ विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहण्यासाठी शाळेला भेट देतात.
७) तरुण मित्र मंडळ यांचे मोलाचे योगदान लाभते.
८) शाळेमध्ये माता-पालक संघ कार्यरत आहे. शालेय साफसफाई मध्ये त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे.
९) वरील सर्व समित्यांच्या बैठका नियमित होतात व प्रत्येक बैठकीचे इतिवृत्त शाळेत ठेवले जाते.





शाळेविषयी वर्तमान पत्रात आलेल्या बातम्या

शालेय आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नाविन्यपूर्ण मार्ग शोधणे :-

आज सरकारी शाळेच्या समोर अनेक आव्हाने आहेत. अनेक समस्यांवर मात करत आज जिल्हा परिषदेच्या शाळा गुणवत्ता पूर्ण शिक्षण देत आहेत. त्या पैकी काही समस्या खालील प्रमाणे आहेत.

१) शालेय पोषण आहारात पपईची लागवड करून पूरक आहार दिला जातो.

आज सरकारी शाळेतील शिक्षकांवर अनेक अशैक्षणिक कामे लादली गेली आहेत . जसे जनगणना, BLO ची कामे, मतदान कामासाठी नियुक्ती, गाव सर्वेक्षण, कुटुंब सर्वेक्षण संगणकीय कामे अशा इत्यादी. या कामांच्या वाढत्या व्यापामुळे शिक्षकांना अध्यापनास ही वेळ कमी पडत आहे. परंतु शाळेतील शिक्षक या कामाबरोबरच शाळेसाठी जादा वेळ देवून शिकवण्याचे काम करतात. तसेच अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे विद्यार्थी स्वतःहून शिकण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत.

भौतीक सुविधांबाबत आर्थिक अडचणी -

सर्वात मोठी अडचण होती पैशांची. शाळा डिजिटल करायची असेल तर कमीत कमी लाख भर तरी निधी उभारणे गरजेचे होते. या कामी सुद्धा कानपोली गावचे ग्रामस्थ शाळेसाठी धावून आले. त्यांनी तब्बल १,५०,००० रु. चा निधी शाळेसाठी उभा केला व डिजिटल शाळेसोबत शाळेला रंगरंगोटी सुद्धा करून दिली. आज शाळेमध्ये अध्यापनात प्रोजेक्टरचा वापर केला जातो. त्यामुळे विद्यार्थी आवडीप्रमाणे शिकतात.

शालेय गुणवत्ता सुधारण्यासाठी वेगळे विचार करून वेगळे स्त्रोत शोधणे :-

१) मुलांना स्वयंअध्ययनाची सवय लावणारे उपक्रम घेतले जातात. जसे माझी बाग, किल्ला उपक्रम, स्वच्छता दूत इत्यादी.
२) विद्यार्थी अभ्यास गट स्थापन करून विद्यार्थी गटागटाने अभ्यास करतात.
३) वर्गाध्यापनात बदलत्या बैठक व्यवस्थेचा अवलंब केला जातो.

४) परिसरात जाऊन निसर्गाचे निरीक्षण करणे व त्याची मदत अध्यापनात करून घेणे यासाठी क्षेत्रभेटींचे आयोजन केले जाते.

५) आनंददायी मेळावे, संस्कार शिबीर, सुट्टीतील शिबीर, सांस्कृतिक स्पर्धा व क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले जाते.

६) दुसऱ्या शाळेतील शिक्षकांद्वारे छोट्या परीक्षा घेण्यात येतात.

७) वेळोवेळी पर्यवेक्षण यंत्रणेच्या भेटी घेऊन फेर तपासणी , पडताळणी करण्याचे आवाहन करण्यात आले.

८) वाचन स्पर्धा व नाट्यीकरण स्पर्धा यातून विद्यार्थ्यांची वाचन क्षमता व अभिनय क्षमतेला वाव देण्यात आला.

९) कविता तयार करणे, गोष्ट तयार करणे या उपक्रमातून विद्यार्थ्यांना बोलके करण्यासाठी मदत झाली.



विज्ञान प्रदर्शन

शालेय व्यवस्थापन सक्षमीकरण करणे -

प्रशासकीय कारभार कमी करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे :-

शाळेचा प्रशासकीय कारभार कमी करण्यासाठी गावकऱ्यांनी शाळेला तंत्रज्ञानाचा उपयोग व्हावा म्हणून संगणक दिला आहे. शाळेतील संसाधनाचे योग्य प्रकारे व्यवस्थापन केले आहे. डिजिटल वर्गखोलीच्या वापराचे वेळापत्रक आहे. वेळापत्रकाप्रमाणे शिक्षक व विद्यार्थी त्याचा वापर करून अध्ययन-अध्यापन करतात.

संसाधनांचे गतीशील आणि योग्य उपयोजन करणे :-

शाळेतील सर्व संसाधनांच्या वापराचे नियोजन केले आहे. मुले व मुली यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था असून पाणी पुरवठा सक्रीय आहे. शाळेला स्वतंत्र स्वयंपाकगृह आहे. शाळेचे मध्यान्ह भोजन शाळेतील स्वयंपाक घरात शिजवले जाते. गावकऱ्यांनी दिलेल्या संगणकाचा वापर करून विद्यार्थी तंत्रज्ञानाचे धडे घेतात.

शाळेत ई-गव्हर्नसचा वापर करणे :-

स्मार्ट फोन, प्रोजेक्टरच्या माध्यमातून शाळेत ई-गव्हर्नन्सचा उपयोग केला जातो.

समग्र शिक्षा व्यवस्थापन :-

SDMIS सर्व शाळांचे online काम पूर्ण करून घेण्यात आले. अंगणवाडी ते 12 वी पर्यंतची सर्व मुले शाळेत दाखल करून घेण्यात आली. प्रत्येक शिक्षकाने गाव सर्वेक्षण करून एकही मूल शाळाबाह्य राहणार नाही याची काळजी घेतली आहे. सर्व विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळत असून प्रत्येक बालकांचा व्यक्तिमत्त्व विकास साधला जाण्यासाठी संपूर्ण शिक्षकवृंद कटिबद्ध आहे.

मनोगत

रायगड जिल्हा परिषद शाळा कानपोली, केंद्र – वावंजे ता.-:पनवेल,जि,रायगड हि केंद्रातील नव्हे तर तालुक्यातील ISO मानांकित शाळा, ABL स्कूल, डिजिटल स्कूल अशी नाव लौकिक असलेली शाळा आहे. बहुतांश शाळेत पायी चालत जावे लागते. काही शाळा या खूप जास्त पटाच्या आहेत. या सर्व शाळांना SLDP कार्य प्रेरणेतून प्रेरित केले. SMC सभांना जाऊन तेथील पालकांना शालेय विकासाचे महत्व पटवून दिले. मुलींच्या संरक्षणासाठी महिला तक्रार निवारण समितीची स्थापना सर्व शाळेत करून घेतली. लोक सहभागाच्या माध्यमातून सर्व शाळा समृद्ध झाल्या. व बहुतांश शाळा ' अ ' श्रेणी प्राप्त झाल्या.

मुलींच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज होती. या अनुषंगाने प्रत्येक हळदी कुंकू कार्यक्रमाला उपस्थित राहून मातांना मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. तसेच ही समस्या सोडवण्यासाठी प्रत्येक शिक्षकाला प्रेरित करणे गरजेचे होते. कारण एकही मूल शिक्षणापासून वंचित नाही राहिला पाहिजे हे आमचे ध्येय आहे. शालाबाह्य बालके शोधण्यासाठी प्रत्येक गावातील शिक्षकांनी गावसर्वेक्षण करून शाळेपासून दूर असलेल्या बालकांना मूळ शिक्षण प्रवाहात आणण्याचे काम केले. मला मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक तसेच माझ्या कार्यात मला सहकार्य करणाऱ्या सर्व शिक्षकांना माझे मनःपूर्वक धन्यवाद.

धन्यवाद

अनिल सखाराम कड

जिल्हा परिषद माध्य. व उच्च माध्य.विद्यालय, मंगरुळ नवघरे,तालुका.चिखली,जिल्हा.बुलडाणा.

ई मेल आयडी - zphsmangarul1967@gmail.com

प्रास्ताविक -

माझ्या शाळेमध्ये शालेय नेतृत्व विकास प्रशिक्षण घेण्याअगोदर अनेक समस्या होत्या, अनेक आव्हाने होती. त्या समस्या वेगवेगळया होत्या. त्यामध्ये एक म्हणजे भौतिक सुविधेचा अभाव, मैदानाचा अभाव, पालकांची उदासीन भूमिका तसेच शिक्षकांची तंत्रज्ञान वापराविषयी उदासीनता, कार्यालयीन कर्मचाऱ्यांची तसेच शिक्षकांची काम करण्याविषयी अनास्था या सारख्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. त्यामुळे यासारख्या अनिश्चित व वेळेवर येणाऱ्या समस्या योग्य रीतीने कशा हाताळाव्यात जेणे करून शाळेत मुख्याध्यापक म्हणून नेतृत्व करताना कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी तसेच कोणता विषय कशा पद्धतीने हाताळावा यासाठी शालेय नेतृत्व विकास प्रशिक्षणाचा मला खूप फायदा झाला.

माझ्या आवाक्यातील समस्या ओळखणे व त्या समस्या सोडविण्यासाठी किती कालावधी द्यावा व त्या समस्या कोणत्या पद्धतीने सोडवाव्यात, यासाठी मला हे प्रशिक्षण फायद्याचे वाटले, समस्या किंवा आव्हाने येतातच परंतु त्यातून पळवाट न काढता त्यावर योग्य पर्याय कसा निवडावा हे या प्रशिक्षणातून मला चांगले समजले.

माझ्या शाळेतील शिक्षकांच्या मदतीने वर्गखोल्या ज्ञानरचनावादी बनविल्या. तसेच इतर भौतिक सुविधा मध्ये संगणक प्रोजेक्टरच्या माध्यमातून मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांची शिक्षण घेण्याची आवड वाढतच आहे. शिवाय यामुळे विद्यार्थी गळतीचे प्रमाण कमी झालेले आहे. शिक्षकांना तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन दिले असुन त्याचा वापर करून शिक्षक सुद्धा अध्ययन-अध्यापन तसेच संपर्कासाठी तंत्रज्ञानाचा वापर करीत असल्याने विद्यार्थी पालक शिक्षक

यांच्यामध्ये एक प्रकारचे नाते तयार झाले आहे. विद्यार्थीसुद्धा शैक्षणिक साहित्याची हाताळणी वैयक्तिक रित्या करीत आहेत. दैनिक परिपाठामध्ये सुद्धा विद्यार्थी उत्स्फूर्त सहभागी होत आहेत. आपले विचार व्यक्त करतात, सर्व महापुरुषांच्या जयंती / पुण्यतिथी कार्यक्रमात भाषणे, गीत यामध्ये सहभागी होत आहेत. तसेच माझ्या शाळेतील विद्यार्थी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्य स्तरापर्यंत पोहोचली, त्यामागे शिक्षक विद्यार्थी यांचे खूप मेहनत दिसून आली आहे. अशा पद्धतीने मुलांच्या शैक्षणिक तसेच गुणात्मक विकास होण्याच्या दृष्टीने सर्व घटक योग्य पद्धतीने कार्य करीत आहेत.

शाळेची दृष्टी (Vision) -

माझ्या शाळेचा विकास करताना सर्वप्रथम एक प्रकारचे सकारात्मक वातावरण तयार करावे लागले की ज्यामध्ये कोणत्याही प्रकारची भीती नाही. विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास करण्यासाठी शिक्षक पालक मुख्याध्यापक एकत्र येऊन काही नियम ठरवणे जेणेकरून विद्यार्थी विकासाला मदत होईल त्यामध्ये अतिरिक्त तासिका घेणे, वेगवेगळ्या स्पर्धात्मक परीक्षेला विद्यार्थी सामोरे जाण्यासाठी नवोदय, स्कॉलरशिप,एन टी एस, एन एम एम एस परीक्षा याबाबत अतिरिक्त मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करणे, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी वेगवेगळ्या खेळांच्या स्पर्धा घेणे, रांगोळी स्पर्धा घेणे अशा विविध स्पर्धा घेणे. भौतिक सुविधा नसतील तरीही त्यावर मात करून पर्यायी गोष्टींचा वापर करणे त्यासाठी वेगवेगळ्या समाज माध्यमाचा वापर करणे, विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्याचे अध्ययन अध्यापन कौशल्य विकसित होण्यासाठी शिक्षकांना वेगवेगळ्या प्रशिक्षणात जाण्यास प्रवृत्त करणे तसेच प्रशिक्षणानंतर त्याचा वापर सर्व शिक्षक व सर्व विद्यार्थ्यांनी घेणे या सर्व बाबीचा अंतर्भाव केला जातो. विद्यार्थी शाळेत टिकून राहावा यासाठी काही उपाययोजना राबविल्या जातात. त्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती तसेच पालकांचे सहकार्य मिळाले. त्यामुळे सकारात्मक परिणाम दिसून आला. तसेच कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी बालरक्षक म्हणून शिक्षकाची नेमणूक केली.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने परिसरात CCTV कॅमेरे लावण्यात आले. वर्ग खोली सुसज्ज बनविणे तसेच तेथे ज्ञानरचनावादी साहित्याची रचना करणे व त्याचा अध्ययन-अध्यापनात वापर करणे. शाळेच्या समोरील गेट नादुरुस्त होते ते दुरुस्त करणे. शिक्षकांना योग्य व सकारात्मक काम करायला प्रोत्साहन देणे त्यांच्या विचारांचा तसेच मतांचा आदर करून त्या पद्धतीने त्याचा वापर शालेय कामकाजात करणे.विद्यार्थी कलागुणांना वाव देणे व त्यासाठी भरपूर प्रयत्न करणे, पालकांचे सहकार्य मिळविणे,या सर्व बाबी आम्ही जाणीवपूर्वक शाळेत केल्या.

शाळा विकासासाठी केलेले नियोजन व त्याची अंमलबजावणी -

शालेय नेतृत्व विकास प्रशिक्षणानंतर मी तयार केलेल्या आराखड्यानुसार विद्यार्थी गुणवत्ता विकास, शाळेचा भौतिक विकास व शिक्षक गुणवत्ता यावर काम करीत असताना खालीलप्रमाणे नियोजन व अंमलबजावणी केली व त्या व्यतिरिक्त अनेक विकासात्मक कामांची अंमलबजावणी केली.

विद्यार्थी गुणवत्ता विकास –

विद्यार्थी गुणवत्ता विकास हा वर्ग पाचवीतील विद्यार्थ्यांना चार अंकी भागाकार या क्रिया येणे यासाठी आराखडा तयार केला. त्यासाठी प्रथमतः शाळेतील सर्व शिक्षकांची बैठक घेतली व त्या बैठकीमध्ये शिक्षकांची इयत्ता पाचवी तील विद्यार्थ्यांना भागाकार कसा करता येईल याविषयी मते घेतली. त्यांच्यातूनच त्याचे उत्तर घेऊन किती विद्यार्थ्यांना भागाकाराची क्रिया येत नाही हे पाहिले, वेगवेगळ्या गणित शिक्षकांनी त्या वर्गावर जाऊन विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट करण्यासाठी पूर्वचाचणी घेतली. चाचणीच्या आधारे अनेक गोष्टी समोर आल्या .बऱ्याच मुलांना वजाबाकी, गुणाकार क्रिया करण्यात अडचणी होत्या. त्यामुळे त्यांचे गट तयार करून त्यांना गटवार मार्गदर्शन केले. त्यांच्यातील विद्यार्थ्यांमार्फत विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन त्यांना अध्ययन पातळीपर्यंत आणण्यासाठी एक कृती

आराखडा तयार करून प्रयत्न केला , त्यानुसार प्रथम सत्रापर्यंत बरेच उद्दिष्ट साध्य झाले व त्यामध्ये सुधारणा सुरू आहे.

भौतिक सुविधांचा विकास –

शाळेला सर्वप्रथम डिजिटल करणे अपेक्षित होते, शाळेमध्ये संगणक संच होते त्यामध्ये काही दुरुस्ती करणे आवश्यक होते त्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने तसेच शिक्षक व कर्मचारी यांच्या मदतीने वर्गणीद्वारे संगणक दुरुस्ती करून घेऊन त्याद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जात आहे. शिवाय प्रोजेक्टर दुरुस्ती करून त्याद्वारा ही अध्ययन-अध्यापन प्रक्रिया राबवण्यात येत आहे. त्यासाठी सर्व शिक्षक योग्य रीतीने तंत्रज्ञानाचा वापर करून अध्यापन करतात, काही वर्ग खोल्या अतिशय जुनाट आहेत त्यामध्ये बयाच भिंतींना तडे गेलेले आहेत त्यांच्या दुरुस्तीसाठी शिकस्त खोली प्रस्ताव तालुका कार्यालयात व जिल्हा कार्यालयाकडे पाठविण्यात आलेला आहे. यासाठी प्रशिक्षणातील डॉक्टर अमोल डोंबाळे सरांच्या डेव्हलपिंग व्हीजन व समस्या निराकरण या प्रशिक्षण तासाचा उपयोग झाला. शिवाय शाळेचे गेट नादुरुस्त होते. तेही दुरुस्तीचे काम शाळा व्यवस्थापन समिती व पालकांच्या सहकार्याने प्रगतीवर आहे.

शिक्षक गुणवत्ता विकास -

शिक्षकांमध्ये गुणवत्तेचा विकास व्हावा यासाठी प्रत्येक वर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्गाला शाळेतील शिक्षकांना जाण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. त्या प्रशिक्षणाचा फायदा सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना कसा होईल यासाठी सर्वांना मार्गदर्शन केले जाते. उदाहरणार्थ अविरत प्रशिक्षण, अध्ययन क्षमता विकसन प्रशिक्षण, तेजस उपक्रम (TAG), SPOKEN इंग्रजी प्रशिक्षण, भाषासमृद्धी प्रशिक्षण, तसेच मी वेगवेगळ्या प्रशिक्षणास हजर असतो.

प्रत्येक महिन्यात होणाऱ्या केंद्रातील शिक्षण परिषदेला हजर राहून शासन निर्णय तसेच इतर अद्यावत माहिती सर्वांना वाचून दाखविली जाते व तिची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने जबाबदारी निश्चित केली जाते. यासाठी प्रशिक्षण वर्गातील श्री बालाजी शेळके सर, श्री ओमप्रकाश शेळके सर यांच्या वेगवेगळ्या तासिकेच्या माध्यमातून या विषयाच्या अनुषंगाने माहिती देण्यासाठी खूप उपयोग झाला.

शिक्षक तंत्रस्नेही असावेत यासाठी शिक्षकांच्या सभा आयोजित केल्या व त्यांना तंत्रज्ञान वापरून कशा पद्धतीने अध्यापन करावे व त्यासाठी कोणत्या गोष्टी आवश्यक आहे याची माहिती डायटच्या माध्यमातून दिली. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणजे माझे सर्व शिक्षक तंत्रस्नेही झाले आहेत.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने व त्यांच्यातील आवड कला जोपासण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना डायटद्वारा आयोजित भूमिका अभिनय व लोक नृत्य स्पर्धेत सहभागी केले. लोकनृत्य स्पर्धेत विद्यार्थी तालुका, जिल्हा व विभाग स्तरावर प्रथम येऊन राज्यस्तरापर्यंत पोहोचले. त्यासाठी थी केदार सर, अतिथी निदेशक श्री गाडे सर , परिचारिका उबरकर ताई यांनी खूप मेहनत घेतली. राज्यस्तरापर्यंत पोहोचण्यासाठी बराच निधी जमा करावा लागला. त्यामध्ये पालकांनी स्वतः तसेच काही दानशूर व्यक्तींनी आणि शिक्षकांनी खूप मदत केली. नृत्यासाठी लागणारे साहित्य शिक्षकांनी स्वतः तयार केले व राज्य स्तरावर जाऊन तेथे द्वितीय क्रमांक मिळविला. त्यामुळे विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय स्पर्धेला कसे सामोरे जावे याचा चांगलाच अनुभव आला. या गोष्टींचे सर्व श्रेय व प्रशिक्षणात झालेल्या अनुभवाला देणे योग्य ठरेल ज्यामध्ये कामाची विभागणी कशी करावी कोणते काम कोणाकडे द्यावे ही क्षमता विकसित झाली.



शाळा प्रगतीसाठी अवलंबिलेली तत्त्वे -

शाळेची प्रगती ही काही एका व्यक्तीने होत नाही हे मी प्रशिक्षणात शिकलो होतो. त्यासाठी सर्वच घटक म्हणजे पालक, विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक आणि समाज यांनी एकत्र येऊनच शाळेची प्रगती करता येते त्यासाठी खालील गोष्टींचा उपयोग शाळा प्रगतीसाठी केला गेला.

समता - कुठलेही संस्थेची क्षेत्राची प्रगती करायची असेल तर समता असणे आवश्यक आहे. समता प्रस्थापित नसेल तर कोणतेही काम यशस्वी होऊ शकत नाही म्हणून सर्व शिक्षक व विद्यार्थी जेव्हा समतेची जाणीव ठेवतील तेव्हा अध्ययन-अध्यापन प्रक्रिया यशस्वी होऊ शकते.

समानता - विद्यार्थी शिक्षक पालक हे समानतेच्या तत्त्वानुसार वागावे यासाठी तसे वातावरण शाळेमध्ये प्रस्थापित करण्यासाठी या प्रशिक्षणाचा मला जास्त फायदा झाला. शिक्षकातील वाद कसे मिटवावे. समस्या कशा सोडवाव्यात हे मला प्रशिक्षणातील "नाटिका सादरीकरण" हा कृतीयुक्त तास महत्त्वाचा व फायद्याचा ठरला. तसेच मोकळीकेतून समानता कशी जोपासायची हे "मित्र बनविणे" या मोकळीकेतून शिकायला मिळाले.

सर्वसमावेशकता - प्रशिक्षण घेत असताना वेगवेगळ्या जिल्ह्यातून प्रशिक्षणार्थी आले होते परंतु कोणत्याच तासाला त्यांना आपल्या जुन्या सहकाऱ्यांसोबत प्रशिक्षण न घेता इतर जिल्ह्यातील प्रशिक्षणार्थी सोबत विचारांची आदानप्रदान करण्यासाठी प्रशिक्षणात गट केले जायचे त्यामुळे सर्वसमावेशकता हे तत्त्व शाळेच्या प्रगतीसाठी किती महत्वाचे आहे हे समजले. प्रशिक्षणातील प्रशिक्षणार्थीच्या वेगवेगळ्या मतामुळे आम्हाला आपल्या शाळेमध्ये कोणत्या गोष्टी करता येतील की ज्याने सर्वसमावेशकता निर्माण करता येईल हे समजले.

शाळा संरक्षण व सुरक्षा -

